नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.


वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका


युगवाणी
ऑक्टो. नोव्हें. डिसें. १९८७
'दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी' — लेख : अक्षय-कुमार काळे.
'तवंग' (कथा) - वऱ्हाडपांडे
कविता —

अनुक्रमणिका

ऑक्टोबर-नोव्हें.-डिसेंबर
एकोणवीसशे सत्यांशी
वर्ष ४३ : अंक १०-११-१२
[महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त]

युगवाणी

मुख्य संपादक : आशा सावदेकर
संपादक : श्रीपाद भालचंद्र जोशी
कार्यकारी संपादक : केशव जोशी

विदर्भ साहित्य संघाचे मुखप

अनुक्रम • • •

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

■ संपर्क : संपादक युगवाणी, वि. सा. संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२ / दूरभाष : २३९२९

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य, संघ, झाशीराणी चौक, नागपूर ४४००१२
मुद्रक : म. पां. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, २२४, टिकेकर रोड, धनतोली, नागपूर ४४० ०१२

संपादकीय

ऑक्टो. नोव्हे. डिसें. ८७ चा हा अंक वाचकांना विशेष वाटावा. कारण ह्यात कथा ह्या वाङ्मय प्रकारावर भर दिलेला आहे. कथेच्या अंगानेच ह्या अंकाची रचना आहे, अनेक कथाप्रवाहांचे सूचन होईल अशा कथा यात आहेत. उदा. वास्तववादी ग्रामीण, दलित, इत्यादी.

विशेष वाङ्मयप्रकार या दृष्टीने कथेचे सामर्थ्य जाणवावे हा प्रयत्न इथे आहे. 'गतकालीन' या सदरातही अनेक वर्षांपासून कथा हा वाङ्मयप्रकार हाताळत राहिलेले वसंतराव वऱ्हाडपांडे यांची कथा जाणीवपूर्वक दिलेली आहे. आधुनिकतेच्या खुणा ३७ वर्षांपूर्वीही कशा दिसत होत्या हे स्पष्ट व्हावे म्हणून ती कथा अभ्यसनीय आहे.

नुकतीच काही दिवसांपूर्वी मराठी चित्रपटांचे अभिनय क्षेत्र गाजविणारे आणि निसर्ग चित्रकारीत रससिद्ध असलेले चंद्रकांत यांनी विदर्भ साहित्य संघास भेट दिली; सत्कार स्वीकारला. त्यांनी रामगिरीच्या आसपासचा प्रदेश आपल्या कुंचल्याने स्थिर केला. ते चित्र या अंकाच्या मुखपृष्ठावर आहे. श्री. चंद्रकांत मांढरे यांच्या या कलापूर्ण सद्भावनायुक्त भेटीबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

या अंकातील 'मानाचे पान' एकसष्टाव्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून ज्यांची निवड झाली, त्या प्रा. वसंत कानेटकर यांना अर्पण करीत आहोत.

जी. ए. कुळकर्णी या कथाक्षेत्रास नवा प्रांत जोडणाऱ्या साहित्यकारांचा मृत्यू ही अत्यंत शोकपूर्ण घटना ! जी. एं. चा अभ्यास करणाऱ्या प्रा. कुल्लींचा भावमधुर ललित लेख हीच आमची जी. एं. ना वाहिलेली श्रद्धांजली ठरावी.

आशा सावदेकर

अनुक्रमणिका

मानाचे पान

वसंत कानेटकर हे नाव रसिकांच्या मनी मानसी ठसले ते नाटककार म्हणून ! खरे तर कादंबरीच्या क्षेत्रातही त्यांचे कार्य लक्षणीय आहे. प्रा. कानेटकर हे प्रयोगशील कलावंत आहेत. केवळ टूम म्हणून ते साहित्यात प्रयोग करीत नाहीत, त्यांच्या कलाकृतीतील आशयच प्रयोगशीलतेची मागणी करणारा असतो.

कानेटकर, तुमच्या नाटकात तुमचा असा एक स्पर्श असतो. प्रेमा तुझा रंग कसा, लेकुरे उदंड झाली यात नुसता विनोद नव्हे तर जीवनाचे अलभ्य असे आकलन आणि त्यातून उगवलेले कलात्मक चिंतन आहे. इतिहास, पुराणाचे संकेत तोडणारे 'मीरा–मधुरा' वा पौराणिक कथेतूनही पल्याड जाऊन मानवी मनाचे सुंदर दर्शन घडणारे मत्स्यगंधा व याहीपेक्षा–थोर महा-मानवांना मूर्त करणारी 'हिमालयाची सावली' 'विषवृक्षाची छाया' आणि मनाच्या गुंतागुंतीवर प्रकाश टाकणारे 'वेड्याचे घर उन्हात' ही नाटके ह्या आपल्या प्रगत प्रयोगशीलतेच्या खुणा आहेत.

प्रेमाची विविधता आणि विश्वात्मता, त्या मार्गात येणारी दुःखे, अटळ भोग, त्यांची गुंतागुंत आणि त्यातून फुलणारे जीवन आपल्याला मोलाचे वाटतात. म्हणून तुमच्या नाटकातले महामानव रूढ अर्थाने नियतीला शरण जात नाहीत.

आपल्या नाटकातून ध्येयवेडी, झपाटलेली, व्यवहारी, हिशेबाला झुगारून देणारी माणसे भेटतात. प्रेमासाठी दुःखाला आमंत्रण देणारी, दुःख पचवूनही ठाम उभी राहणारी माणसं भेटतात म्हणूनच ती नाटके नित्यनूतन वाटतात.

आपल्या या थोरवीमुळेच आपल्याला एकसष्टाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद प्राप्त झाले आहे. 'युगवाणी 'तर्फे आपले हार्दिक अभिनंदन.

आशा सावदेकर

अनुक्रमणिका

सोताचं घर !

या. वा. वडस्कर

आदल्या दिवशी ती बातमी कळल्यापासून अलोकी वुढीच्या डोळयांसमोर एकसारखं 'सोताचं, सत्तंचं घर' दिसत होतं. तिथे जाऊन राहण्यास तिचं मन खूप अधीर झालं होतं.

"हयेट माय, केधोकची यिवून बसली इथिसा मोटार आपली यिवूनच राहचली आझून ! कइसा येते काजिनं वावा !" अलोकी वुढी काता-वून स्वतःशीच वोलली. "माह्या नसिवाचं गाठोडं माहृया जल्माच्या आंधीच हारपलं. तसी मोटारई तं नसन हारपली कुठी ? का रूतली असन मनाव यखांद्या गढ्ढयात !"

दोन अडीच तासांपासून म्हातारी सडकेवर डोळे रोखून मांगलवाडीला जाणाऱ्या बसची वाट पाहात होती. त्याच वेळी तोंडाने तिची अखंड वडवड चालू होती. अलीकडे तिची ही सवयच झाली होती. आपल्याला कुणी तरी जाब विचारते आहे आणि आपण बिनतोड उत्तरं देत आहोत अशा आविर्भावात ती सतत स्वतःशी बोलायची.

अलोकी वुढी आता चांगलीच वैतागली. वैशाखातला पेटता सूर्य धरणीमातेवर आगीचा वर्षाव करीत होता. मक्याचे कणीस निखाऱ्यांवर भाजले जावे तशी धरणीमाता भाजली जात होती. उन्हाने सगळा परिसर होरपळून निघाला होता. हात लावाल तिथे चटके बसत होते. वाऱ्याचे डोके सुद्धा मग तापले. तो वेडयासारखा आडवाउभा धावू लागला. आड येईल त्याला गरम डागण्या देऊ लागला.

वाऱ्याचा गरम सपकारा तोंडावर बसला तशी अलोकी वुढी कळवळली. तहांनेने तिचा घसा कधीचा कोरडा पडला होता. तिने पुन्हा एकवार मागे वळून पाहिले. मागच्या बाजूने येणारा धुक धुक आवाज तिला कधीपासून साद घालीत होता. विहिरीवरील पाणी काढण्याचे एंजीन चालू होते. तिथपर्यंत ती गेली असती तर तिची तहान नक्की भागली असती.

पण विहीर पलिकडच्या शेतात होती. "मी पानी प्येवाले जाईन. तितल्या येळात मोटार यीन आनं चाल्ली बी जाईन. वसा मंग सांच्या वक्ता-पावतर माशा मारत !" ती स्वतःला पुन्हापुन्हा बजावीत होती आणि जागची उठत नव्हती. आता सुद्धा तिने आपली दृष्टी सडकेवर पुन्हा रोखली आणि ती तशीच बसून राहिली.

"मांगलवाडीले कायले चाल्ली मन्तं सती पडाले ?" अलोकी वुढी पुन्हा बडबडू लागली. "तुह्या सवाल तं अजाबच वाट्टे मले. तुले काय इतलंई मालूम नायी मनाव का तिथिसा माहचं घर हाये ?... हो. हो. माहचं सोताचं घर. खास माह्या सत्तंचं ! थो दईत इतले दिवस मले यिवू नाही दे. आता थोच पडला पासला. आता कोन रोखन माहचावाला रस्ता ?"

"आवो तं बिचारे, काल वजारा नाही गेलती काय मी ? तिथं थ्या हेटचाले दिसली का नं. . . थो वो, थोच मांगलवाडीचा. थो मन्ते कसा मले, आवो वो अलोका काकी तुले मालूमच नाही काय मनाव नत्थू काका मेला नं ? आठ दिवस झाले अज. अजच्या दिवसीच सांच्या पायरी गेला. मले वाटलं, तू येसीन."

"माह्यं तोंड तं मंग मालूमच हाये तुले ! म्या मनलं, तुह्या गाववाल्याइनं दमनीच तं धाड्ली होती मले नेवाले ! मोठा नाक उच्ची करून वोलतं तं ! जो गांडीले पाय लावून पयाला मन्तं का नाही मंग थो ! जसी त्याच्यामांगं लस्टान लागली होती कोनी !"

"माय वो माय !" अलोकी बुढी कळवळली. "नड्डा कसा कोड्डा पड्ला माय माह्या. ऊनइ दम घिऊ देत नाही. झाडमाड मनाव दाटमाट साव-लीचं तं थेई नाही. ताह्यनीनं जीव जाते माय माह्या आता. कसं करू बापा इठ्ठला !"

तेवढयात म्हातारीने कान टवकारले. दुरून मोटरचा आवाज येत होता. म्हातारी लक्ष देऊन ऐकू लागली. हळूहळू आवाज वाढत गेला. म्हातारी उठून उभी राहिली. लुगडंचोळीचे लहानसे बोचके तिने आपल्या बगलेत घेतले आणि ती मोटरची वाट पाहू लागली.

पण मोटर आलीच नाही. मोटरऐवजी धुरळा उडवत एक ट्रक आला. म्हातारी ट्रकवाल्याने थांबावे म्हणून मोठमोठयाने त्याला विनवू लागली. ट्रकमध्ये भरती नव्हती. अनेक मजूर स्त्रीपुरुष ट्रकमध्ये उभे होते. ट्रक थांबला नाही. ट्रकमधले स्त्रीपुरुष म्हातारीकडे पाहून फिदीफिदी हसले. म्हातारीच्या अंगावर ढीगभर गरम धुरळा उडवून ट्रक भर्रकन निघून गेला.

ट्रकवाल्याच्या नावाने म्हातारीने कडाकडा बोटं मोडली. त्याला ती शिव्याशाप देऊ लागली. पण ट्रक निघून गेला होता. ऊन्ह भयंकर तापत होते आणि वारा आणखीच चेकाळला होता.

काही वेळाने धुरळा खाली बसला. मग म्हातारीनेही बोचके खाली ठेवले. स्वत: सुद्धा पुन्हा खाली बसली. डोक्यावरची हिवराची सावली आता आणखीच रोडकी झाली होती. सडकेवर पुन्हा एकदा नजर लावून म्हातारी बडबडू लागली. "माह्या येसोंता असता घरी तं थो नसता आला बापा माह्यासंग ! पन थो जाऊन बसला नागपूरले. सा महने झाले त्याचं येक बोटभर कारट नाही. आपलली माय मेली का जिती हाये हे पाहालेई त्याले रिकामपन नाही."

"थ्या कमिनाले मनलं का चाल... आवो तं माह्या भावाले... त्याले मनलं का थो दईत मेला तं चाल. तं थो मले पुसते का कोन्ता दईत... आता तूच सांग खरं खरं, मी दईत कोनाले मनतो हेई त्याले मालूम नसन ?. मंग म्या मनलं का तुहा जवाई मेला. तं थो मने बेस झालं नेला तं. आता तूई मरून जाय. माह्या मांगलची पिडाच चालली जाते मंग."

"म्याई असी घोरपिडा काहाडली मंग त्याची ! रागच तसा आला मले. म्या मनलं मी नाही मरत. तूच मर. तुह्या तेरवीची खीर खाईन मी. तव्हा कुठी माह्या जिवाचा घोर कमी होईन."

"काह्यची पिडा हाये वो माह्यो थ्या हल्याच्या मांगं ? थ्या दयतानं मले टाकलं तव्हा येसोंता पोटात होता माह्या. त्याच्या बाद महचन्याकमऱ्यात तं झाला वो थो. त्याच्याबाद आत्वीन महचनाखांड राहचली असन माय थ्या कमिनाच्या घरी तं काहाडली मले हात धरून घराच्या भाईर."

माह्या भावानं मले घराच्या भाईर काहाडलं तं माह्या बापई लडे आनं मायई लडे, पन आपल्या पोराचा हात नाही धरे कोनी. त्याले असं नाही म्हने का ह्या घरावर जसी तुही सत्ता हाये तसीच अलोकीचीई हाये. थो त्याइच्या पोटचा लेक होता. आनं मले त्याइनं यखांद्या उकंडयाहून उचलून आनली होती."

"माह्या बाप मने, चाल बाई, तुले तुह्या घरी निवून घालतो. तुहं जे काही बरंवाईट होवाचं असन थे तुह्या घरीच हू दे. तुह्या तकदीराचा मालक आता तुहा नोवराच होये. त्याले वाटन तं तुले जित्ती ठिवन. नाही तं मारून टाकन."

"म्याई मंग बापाले मनलं, थ्या दयतानं माह्या जीव घेन्यापक्से तुमीच मले हिरीत काऊन नाही टाका ?'

वाऱ्याला पुन्हा एकदा चेव आला. गोल गोल फिरत तो वर आकाशात गेला. सडकेवरची कवटा-भर माती उडाली आणि म्हातारीच्या तोंडावर सपकन येऊन बसली. अलोकी बुढी आता सडकेला शिव्या घालू लागली. सडकेच्या आईमाईचा उद्धार करू लागली.

खरे म्हणजे, ही नावाचीच सडक होती. तो एक माती-गोटे मुरूम टाकून तयार केलेला रुंदसा रस्ता होता. दक्षिणेकडे वीसेक किलोमीटर अंतरावर राज्य महारस्त्याला जाऊन मिळाला होता. उत्तरेकडे तो मांगलवाडीपर्यंत गेला होता. राज्य महारस्त्यावरील तालुक्याच्या गावापासून मांगलवाडीपर्यंत एस. टी. च्या एकदोन फेऱ्या होत. त्याही जेमतेम सहाएक महिने. पहिला पाऊस पडला की फेऱ्या थांबत. दिवाळीनंतर रस्त्यावरून दुरुस्तीचा हात फिरवला गेला की पुन्हा सुरू होत. या फेऱ्यांना ना टाईम टेबलचे बंधन असे ना फेरी झालीच पाहिजे असा आग्रह असे.

अलोकी बुढीचे गाव सडकेपासून बारा किलो-

मीटर आत होते. आदल्या दिवशी बाजारात नवरा मेल्याची बातमी कळताच ती खूप उत्तेजित झाली. मग सोबतीची वाट न बघता एकटीच कोसभर अंतर चालून घरी परत आली. दुसऱ्या दिवशी मांगलवाडीला जाण्याचा पक्का निश्चय करून, भावाने सोबत यायचे नाकारले तरी ती नाउमेद झाली नाही.

सकाळी तिने बसच्या वेळेबद्दल गावात चार–दोन लोकांकडे चौकशी केली. लिंबापूर वीस-पंचेवीस घरांचे लहानसे खेडे होते, या खेड्यातले फारसे कुणी गाव सोडून बाहेर जात नसत, कुणी तिला अकराची वेळ सांगितली. कुणी दहाची, एक बहाद्दर गडी छातीवर हात मारून म्हणाला, मोटर नऊ वाजताच फाटयावर येते.

अलोकी वृद्धीची मग चांगलीच तारांबळ उडाली. कसे तरी तिने चार तांबे अंगावर ओतले· चोळी आणि लुगडे पिळून वाळू घातले. नंतर भाकर टाकली. ती बांधून घेतली. लहानसे बोचके घेऊन जमेल तेवढ्या लवकर निघाली. सडकेवर येऊन पोहचली तेव्हा ऊन्ह कडक झाले होते. फाटयावर मोठे झाड नव्हते. ती मग हिवराच्या बारक्याशा सावलीत बसली आणि बसची वाट पाहू लागली. त्याच वेळी तोंडाने स्वतःशीच बडबडू लागली.

"मले वाटे, मी माह्या घरी जाईन आनं माह्या मांगल्ला वनवास सरन. वनवासच नाही तं काय माय ? लय हडहड होती बापा मले लाहानपनापासूनच. कोनीई मले हाका मारे तं कसे – वो बह्याडवानीचे, मी काय बह्याड हाये काय वो ? पन माह्ये मायबापच मले बह्याड बह्याड करतीन तं लोकं काय उगेमुगे राह्यतीन ? यो हल्या तं मले बह्याडवानीच्या सिवाय दुसऱ्या नावानं हाकाच नाहीं मारत."

"लगन व्हाची वज्जेर वाट पाहो मी. काहून का मले वाटे मी माह्या घरी गेली का नवरा माह्या मुठीत ठुईन. थोई मंग माह्ये लय लाड करन. मी त्याले मनन का मले ह्ये पाह्यजे आनं मले थ्ये पाह्यजे."

"पन काह्यचं माय ह्ये पाह्यजे आनं थ्ये पाह्यजे. जो कांडे मले धरून. दारू पेत जाये आनं मले मारत जाये. लाताबुक्क्याइनं मारे. झोटे धरून डोक्सं आपटे. आनं यखांद्या वक्ती यखांदं झोडपं घे अन जो कांडे मले. जसा यखांद्या ढोरावासराले मारे."

"मी त्याच्यासाठी काही कराले जावो तं मले मने तोह्रं थोबकाड दाखोत नोको जाऊ मले. थ्ये पाह्यलं का मले वांती होते. आता मी साजरी नोह्यती तं थोई काय मनाव माह्याच अन्याव होता ?"

"बुवा यकलाच होता. बापाले वाटलं सासू सासरा नाही, पोरीला वनवास होणार नाही. मनून देल्लं त्यानं मले तिथिसा. घरई लहानसक असलं तरी लय साजरं होतं. मले लय आवडे वो माय. पण उकंडा करून ठिवला होता बुवानं निसता. घरात कोनी बाई सवसार नसन तं खरीच घराची रया राहीन काय मनाव, तूच सांग."

"लगन हून मी गेली आनं म्या साजरं बिंद्रावन बांधलं. त्याच्यात तुयसीचं झाड लावलं· घर सारोलं, भिती सारोल्या, सडा टाकून टाकून आंगन साजरं केलं सम्दं. घरच चकचक केलं मननं वो !"

"भांडे तं असे काये काये झाल्ते. चिच लावून घासले म्या थे, साजरे चकचक केले. मले वाटे बुवा पाहीन आनं माही पाठ थोपटन. पण त्याचे तं डोयेच फुटले होते जसे. मी साजरी नाही यवढं फकस्त बरावर दिसे त्याले."

"माह्या येसोंता पोटात राह्यला तव्हा मले वाटे आता तरी माह्ये दिवस पलटतीन. पोरगं झालं का बुवा आपसंगच नरम पडन. पन माह्या नसिबातच सुक नसन तं थो तरी काय करन ! आवो मी, बायातीन व्हाआचीच तं त्यानं थ्ये रांड आनली. धडाची न वडाची. टाकोल्या तोंडाची तं होती. इतलं होतं बा का आंगावर म्हसीसारकं मास होतं आनं कातोडी गोरी होती. तितल्यावर भुलला माय थो आनं मले घराच्या भाईर काह्याडलं. त्याच्या आंगात जोर होता. माह्या आंगात जोर राह्यता तं म्याच नसतं काह्याडलं त्याले आनं थ्या रांडलेई भाईर ?"

"मी त्याले मनो, तुह्या कमरीत इतला जोर

हाये तं राहू दे तिले. पण मले कायले घरातून हाकलतं ? लागन तं आखीन यखांदी आन. पन थे डाकीन थोडीच मानाले वसले बापा ! दोघंझनं येक झाले आनं माह्या डोस्क्यावरची सावली हिसकून घेतली. लय जीव होता वो ध्या घरावर माहा. आझूनइ जसंच्या तसं दिसते मले थे घर. माह्यं विंद्रावन असन काय माय आझून तसंच ? का खसलं असन मनाव ?"

म्हातारी थांबली. पदराने तिने डोळे पुसले. काही वेळ गप्प राहिल्यानंतर ती पुन्हा बडबड करू लागली. "कसे दिवस काहाडले असतीन बापा म्या माह्यं मलेच मालूम. का ध्या उप्पर-वाल्याले मालूम. भावाले मनलं मले राव्हाले फकस्त दोन तस्मे घर दे. थो मने मसनात राहय. नाही तं मर. मी तुही सदगत करून दीईन, थच तुहं घर मंग. कितीक जागी राह्यली असन बापा मी ! कोनाच्या कोठयात तं कोनाच्या सपरीत. कोनं हाड् मनलं का चालली कुत्र्यासारकी इखून तिकड आनं तिखून इकडं."

"दोनक वरीस कमी असतीन दहाले, खंडाऱ्यात राहून राह्यली मी. कुडाच्या दोन भिती केल्या. इखूनतिखून पास्सा फाटे जमा केले. वरतून झांजी टाकली. कसीई आपली तस्माभर जाग्यात राह्यतो. खंडाऱ्याचा मालक सेयरात राहचते मून तिथं तरी राव्हाले भेट्टे, नाही तं तिथूनई हाकललं असतं."

"हूचे काय खरंच जिनगी होये ! चिमन्या आनं मिठ्ठू सुद्दे सोताच्या कोचयात राहयतेत. कोचया म्हंजे त्याइचं घरच नोहे काय ? मंग माहाच नसीब असं फुटकं काऊन असन मनाव ? आवो ध्या खंडाऱ्यात असे इचूकाटे निघतेत. सरपाईचेई मोठ्ठे मोठ्ठे दरं हायेत. येक सरप तं रातभर घुक घुक करते. तरी मले तिथिसाच राहा लागते. जातोई मनलं कुठी तं जावाले अधार तं पायजे ?"

"मी मंग येखांदी उदबती लावतो नाही तं कापूर पेटोतो, हात जोडतो. मनतो, तुहचा मनात जसं असन तसं कर बापा. मारनाराई तूच होये. आनं ताराचं असन तरी तूच तारसीन."

"पावसाया आला का बदंबदं पानी सांडते माय. वलं, वलं हून जाते सम्दं घर. हिवायात थंडी जोर करते. दोन वाकयी जोडतो. त्याले लुगडं जोडतो. तरी थंडीनं आंग रातभर कुडकुड करते."

"बापाले मनलं माह्या पाट लावून द्या. त बाप मने थ्या गेराले कुठी टाकसीन. आल्ताई येकझन. तं थो मने पोरगं नाही पायजे. माहचा कलिजाले टाकून काय मी पाट लावत होती ? त्याले लाहन्याचं मोठं कराले कोनती गोस्ट नसन केली म्या ? सायेत मुद्दे धाडलं. आता पोलीस हाये. लगन झालं. तीन लेकरं हायेत. दोन पोरी हाये 'येक पोरगं हाये. सरकारनं राहाले कार्टर का काय मनतेत थे देल्लं थेव त्याले असाच मुकात ठिवो बापा !"

"मले आपल्यासंगं नेवाचं माहचा पोराच्या लय मनात होतं. पन थे रांड असी अज्जात हाये मनतं का नाही ?...थ्येच वो, माही सून. थ्ये मन्ते, तिले आनसिन तं मी चालली जाईन माहचा बापाच्या घरी. लय अधार हाये बापाचा तिले... पन ह्या वयलाले नोहचतं पायजे समजाले ? त्यानं काहून बायकोच्या इतलं आंजोरी राहाव ? पण कइ साई पाहान तं बायकोचीच कड घेते, मले मनते, तुले काय कमी हाये तिथिसा? दोन कस्टं करत जाय आनं दोन भाकरी खात जाय. तुले काय कोनाले पोसा लागते का कोनाचा भार हाये तुह्या डोक्स्यावर ?"

म्हातारीचा चेहरा संतापाने लाल झाला. आवाज वर चढवून ती म्हणाली, "मले कायले पोसा लागते कोनाले ? त्याले पोसाले त्याचा बापच तं आला होता ? नाही तं त्याच्या बापाच्या मायचे नवरे आले असतीन ? इतले कस्टं करून मोठं केलं म्या त्याले, आता असे पांग फेडते थो माह्यावाले !"

कसलासा आवाज ऐकला म्हणून म्हातारीने वळून मागे पाहिले. तिच्या मागच्या बाजूने शेळ्यांचा कळप चरत होता. हळूहळू सडकेच्या दिशेने येत होता. एक दहाअकरा वर्षाचं पोरगं शेळ्यांचं राखण करीत होतं.

एकचा सुमार झाला होता. ऊन्ह आता आणखीच कडक झाले होते. सगळा आसमंत भट्टीसारखा तापला होता.

शेळ्या सडकेच्या काठांनी झाडपाला खाऊ लागल्या. मुलगा मग अलोकी बुढीजवळ येऊन उभा राहिला. तिला म्हणाला, "कुठिसा जाऊन राह्यली आजी ?"

म्हातारी बराच वेळ मुलाकडे नुसतीच पाहात राहिली. मग म्हणाली, "तुह्या तोंडात हमेशा साकर पडो माह्या बापा ! कितिक दिवसाइनं तू भेटला मले आजी म्हननारा. नाही तं बुडे, नाही तं वह्याड ! दॅव तुले सुकात ठिवो माह्या राजा, . मी चालली मांगलवाडी."

मांगलवाडीची मोटारतं नव वाजताच गेली आजी, हमेशा लेट येते. अज बिलकुल रॅट टॅम आली. आता तं तिचा वापशीचाई टॅम झाला." मुलगा म्हणाला.

"माय वो माय ! इतल्या घाईनं तंगडे तोडत आली तरी मोटार चुकलीच ! माहचं नसीबच असं गोटयासारकं हाये. त्याले घाम फुटतच नाही. आता कसं करीन माय मी ?" अलोकी बुढी कपाळावर हात ठेवीत म्हणाली.

तिला धीर देत मुलगा म्हणाला, "आखिन येक टायम हाये आजी चार वाजताचा. पन त्याचा तितला भरोसा नाही राहात. येखांद्या दिवसी येतच नाही."

"तसं नोको मनू माह्या राजा. यीईन मन बापा. उपाशीच निघाली घरून. निघाली तईपासून तोंडात पान्याचा येंबई नाही गेला. भाकर बांधून आनली थ्ये आझून तसीच हाये."

"थ्या हिरीवर जाय आजी. तिथं भाकर खाय. पानी पे. घडीकभर आंग टाकसीन तरी होते. लय टॅम हाये आझून मोटार येवाले."

बस यायला वेळ आहे असे कळताच अलोकी बुढीच्या पोटातील भुकेची संवेदना खूप तीव्र झाली. घसा आणखी कोरडा पडला. ती मुलाला म्हणाली, "हो बापा, आता तू मनतं तसंच करतो. तूई चाल माहयासंगं भाकर खावाले."

"नाही आजी म्या मंघानीच खाल्ली भाकर."

"खाऊ खाल्ली तं. माहयासंग आखीन खाय. थोडीकसीच खाजो वाटलं तं."

अलोकी बुढीने मुलाचा हात धरला आणि ती विहिरीच्या दिशेने जायला वळली.

तेवढ्यात बसचा आवाज आला, मुलगा म्हणाला, "नव वाजताची मोटर मांगलवाडीहून वापस आली आजी."

म्हातारी म्हणाली, "यिवू दे आली तं. मले काही काम नाही थ्या मोटरीचं. चाल भाकर खावाले."

तेवढ्यात धुरळा उडवत बस आलीच. म्हातारीला पाहून गपकन थांबली. "बयठो बुढ्ढी जलदी," कंडक्टर ओरडला. म्हातारीला मांगलवाडीला जायचे आहे हे मुलाकडून कळताच कंडक्टरने घंटी मारायला हात वर केला. तेवढ्यात बसमधल्या एका उतारूचे लक्ष अलोकी बुढीकडे गेले. त्याच्या अंगावर पोलीसचा गणवेश होता. दोन मिनिटं थांबण्याची विनंती कंडक्टरला करून तो खाली उतरला. अलोकी बुढीकडे आला. म्हणाला, "इथं काऊन उभी हाये वो माय ? जाऊन राह्यली काय कुठी ?"

आवाज ऐकताच अलोकी बुढीने मुलाला ओळखले. तिचा चेहरा उजळून निघाला. त्याच्या तोंडावरून हात फिरवीत ती म्हणाली, "माहा येसोंता होयें काय बापा ? इतका रोड काहून झाला गा ? यखांदं कारटई नाही लेव्हत माह्या लेका ? माहा जीव नाव जसा थायऱ्यावर नाही राहत मंग."

"मी तुले काय विचारतो आनं तू काय बडबडबडतं ? कुठी जाऊन राह्यली तू ? यशवंता आवाज चढवून बोलला.

"मी चालली मांगलवाडीले," म्हातारी म्हणाली,

"काह्यले ? तिथं कोन्तं गाठोडं ठिवलं हाये तुह्यावालं ?"

"तिथिसाच राहीन मनतो आता याच्यापुढं."

"तिथं कुठं राह्यसीन ? गोयठानावर ?"

"गोयठानावर काहून राहीन ? घर नाही काय तिथं माह्यं ? तुले मालूमच नाही काय मनाव का तुहा बाप मेला ?"

"मालूम हाये सम्दं मांगलवाडीतूनच तं यिवून राह्यलो मी आता. घर इकलं म्या. डुंग होतं थेई इकलं. पलाट घेतला म्या नागपुरात. त्याचे पयसे याइचे होते. जाय तू गुपचाप घरी.

म्हातारीला ही गोष्ट अनपेक्षित होती. असे काही घडेल अशी कल्पनाही तिने केली नव्हती. ती चिडली, संतापून म्हणाली,

" तू कोन होतं माह्यं घर आणं वावर इकन्या-वाला ? मी राह्याले चालली तिथिसा."

" तुह्या बापाचंच तं होतं थे घर आनं वावर ? जातं का नाही आता गुपचाप वापस गावले ? बह्याडवानाची कुठची ! " अलोकी बुढीचा मुलगा संतापून म्हणाला. नंतर ड्रायव्हरकडे वळून म्हणाला, " चलो, ड्रायवर साव. पग्गल हय बुढ्ढी—दिमाग काम नाही करत तिचा."

यशवंता बसमध्ये चढताच बस सुरू झाली आणि निघून गेली. अलोकी बुढीसाठी गरम धुरळा आणि कडक ऊन्ह मागे ठेवून.

" पानी पेवाले चालतं ना आजी ?"—शेळया चारणाऱ्या मुलाने म्हातारीला विचारले. म्हातारीच्या कानात मात्र मुलाचे शब्द शिरलेच नाहीत. ती 'आपलं सोताचं, सत्तंचं घर' शोधीत होती. तिच्या डोळयासमोर मात्र निघून गेलेल्या बसने उडवलेला धुरळा होता. डोक्यावर कडक ऊन्ह होते.

अलोकी बुढी यापूर्वी कधीच एवढी केविलवाणी झाली नव्हती.

■

अनुक्रमणिका

गाठ

नीलिमा भावे

दुधाच्या वाटल्या आणणाऱ्या मुलानं आज फारच उशीर केला होता. दूध आल्यावर मगच उठायचं हा नेहमीचा शिरस्ता. त्यामुळे मघापासून जाग आलेली असली तरी दारावरच्या घंटेची वाट पहात शशिकला विछान्यातच या कुशीवरून त्या कुशीवर करीत आळसानं पडली होती. हा सकाळचा आळस खरं म्हणजे तिच्या मुळीच अंगी लागत नसे. कारण उठायला होणाऱ्या पाच पाच मिनिटांच्या उशीराबरोबर सकाळच्या इतर कामांचे वेळापत्रक निदान तासभराने तरी मागे पुढे व्हायचं. ते जुळवून घेताना करावी लागत असलेली घाई गर्दी डोळ्यांसमोर येऊन विछान्यावरची मऊ मऊ गादीसुद्धा तिला "ऊठ ऊठ" म्हणून डिवचायला लागायची. पण आज मात्र तिनं बोलता बोलताच ठरवलं की झाला उशीर उठायला तरी चालेल. अगदी करायला हवीच ती कामं आधी उरकून घेऊ. बबलू शाळेत आणि चंद्रकांत ऑफिसला गेले की आज मुख्य म्हणजे अगदी मनसोक्त अंघोळ करायची. रोज म्हणजे अगदी कामात काम उरकल्यासारखी ७–८ मिनिटात तिची कावळ्याची अंघोळ व्हायची. घड्याळाचा काटा सारखा पुढे पुढे सरकत असायचा. आज आता सकाळचं सगळं आवरलं, मोलकरीण, भाजीवाली, इस्त्रीवाला, पोस्टमन सगळे येऊन गेले, की सावकाशीनं, भरपूर वेळ घेऊन ती अंघोळीला जाणार होती.

गेल्या काही दिवसांपासून वरच्या फळीवरून तांदुळाचा डबा काढताना उजवा हात दंडाच्या आतल्या बाजूला जरा आखडल्यासारखा व्हायचा. सुरुवातीला जाणवलं तेव्हा शभिकलेला वाटलं की कधीतरी जड भरलेल्या बादल्या उचलून पिंपात ओतताना लचक, उसण काहीतरी भरलं असेल. तसे काही झाल्याचे आठवत तर नव्हते. पण घरातल्या कामकाजात कित्येक दुखापती न कळता, न जाणवताच होत असतात. कधीतरी भाजलेलं, कापलेलं, खरचटलेलं नंतर केव्हांतरी झोंबायला, चुरचुरायला लागल्यानंतर लक्षात येतं. कशानं काय झालं असेल ते आठवायचा प्रयत्न केला तरी पुष्कळदा नाहीच आठवत.

आज काल आपण कामाची फार घाई करतो, असं शशीला वाटायला लागलं. किंवा कामाचा आणि घड्याळाचा ताल बसवणं आता आपल्याला झेपेनासं झालं आहे कदाचित पूर्वीची हालचालीची चपळाई आता शरीराला पेलवत नाही. होणारच असं. बबलू आता आपल्या खांद्याच्यावर यायला लागला, म्हणजे आपणही वाढलोच की !

खूप दिवसांनंतर मनासारखी अंघोळ होत होती. मोठी बादली भरून गरम पाणी काढलं होतं. सुगंधी साबणाचा फेस वर वर येत होता. हाताबरोबर साबणाचा फेस अंगावर फिरवताना, हे आपलंच अंग आहे याची जणूकाही शशीला नव्यानेच ओळख होत होती. मऊ मऊ फेसानं हाताच्या बोटांचा चरचरीतपणा लपवून टाकला होता. भेगाळलेल्या टाचा, पायाच्या अंगठ्याचं खडबळीत झालेले नख, सगळं काही फेसाच्या गुळगुळीत पणाखाली झाकलं गेलं होतं. पावलं स्वतंत्रपणे घासून चोळून धुवून टाकली, आणि मग शशीनं आपलं लक्ष चेहऱ्याकडे वळवलं. कपाळ, नाक, दोन्ही कानशिलं, गाल यांच्यावरून बोटं फिरवीत ती खाली गळ्याकडे उतरत होती. तेवढ्यात तिला ती हात उंचावल्यावर आखडल्यासारखी वाटणारी जागा आठवली. ती क्षणभर थांबली. मग साबणाच्या फेसाचा हात तचास फिरवीत तिनं तो उजव्या छातीच्या पलीकडे काखेच्या बाजूला नेला. बोटं काखेच्या खाली सरकवता सरकवता हाताला काहीतरी घट्ट लागलं. तिनं बोटं चाचपल्यासारखी फिरवून किंचित दाबली. आजूबाजूच्या मांसल भागात रुतलेलं काहीतरी घट्टसं हाताला लागत होतं. तिनं हात पुन्हा मागे आणला. पुन्हा गोल फिरवला. हो नक्कीच. काहीतरी लागतंय, तिनं

दुसऱ्या बाजूला तसेच चाचपून पाह्यलं, तिथे काहीच नव्हतं. नुसतं मऊ अंग.

भीतीची एक जबरदस्त लहर तिच्या अंगातून शिरशिरत गेली. इतकावेळ खालच्या टाइल्सचा उबदार गुळगुळीतपणा कुरवाळणारी तिची पावलं एकदम अधांतरी असल्यासारखी वाटायला लागली. शरीराला आतून किंचित् कंप जाणवायला लागला. स्नानाच्या पाटावर सैल मांडी घालून थोडा वेळ तशीच बसली. पुढ्यातल्या तपेलीवर दोन्ही हात ठेवून, तपेलीतल्या काळ्या हलणाऱ्या पाण्याकडे पाहत. अंगावरचा साबणाचा फेस हळूहळू विरायला लागला. तो काढून टाकण्यासाठी पुन्हा अंगावरू हात फिरवण्याची हिंमत तिला होईना. काही वेळानंतर, जड झालेल्या हातानं बादलीतले उरलेले कोमट पाणी दोन्ही खांद्यांवरून तिने ओतून घेतलं. हातापायातली शक्ती गेल्यासारखी झाली होती. छातीत धडधडत होतं. तोंडाला कोरड पडली होती.

"आपली जायची वेळ झाली ? हे सगळं असंच मागे टाकून जायचं ? बबलूचं यंदा दहावीचं वर्ष आहे. आपल्या हॉस्पिटलच्या वाऱ्यांमधे त्याच्या अभ्यासाचं, खाण्यापिण्याचं काय होईल ? तो कॉलेजात गेलेला, त्यानं पदवी घेतलेली, त्याला नोकरी लागलेली, त्याचे लग्न झालेलं हे सगळं आपण पहाणार नाही ? बबलूला गोडाचं धिरडं आवडतं. ते त्याला कोण करून देईल ? नेहमी मारामारी करून घरी येतो, आणि त्याच्या शर्टाची बटनं तुटतात. ती कोण शिवेल ? त्याच्या दाट भुऱ्या केसांना तेलाचा हात कोण चोळेल ? चंद्रकात त्याच्यावर ओरडला वागण्यावरून, अभ्यासावरून तर त्याला जवळ कोण घेईल ?

चंद्रकांत. खरंच चंद्रकांतही तर आहे. पण आपल्यामागे त्याचं कसं होईल, हे आलंच नाही न मनात ? आपल्या छातीत गाठ लागते आहे, हे कळल्यावर त्यास काय वाटेल ? धक्का बसेल ? तो बावरून जाईल ? नाहीच बहुतेक ! उलट तो कदाचित् नाराजच होईल, त्याला वाटेल सापडणे म्हणायचे पुन्हा चक्रात, तपासणी चिकित्सा; निदान, औषधं—पुन्हा तपासणी. अन या सर्वांतून निष्पन्न काय ? आणि या सर्वांचा शेवट तरी काय ? मुख्य म्हणजे तो शेवट केव्हा ? हाच तर खरा प्रश्न आहे."

शशिकलेला आठवलं, बबलू लहान होता, तीन चार वर्षांचा तेव्हांची गोष्ट. तेव्हा शशीचे एक छोटंसं ऑपरेशन करायचं ठरलं होतं. ऑपरेशनच्या दोन दिवस आधी संध्याकाळी ती आणि चंद्रकांत बबलूला घेऊन पार्कमधे गेले होते. बबलू घसरगुंडीजवळ नंबर लावून उभा होता, आणि ती दोघं तिथे जवळच एका बाकावर बसली होती. वरून खाली घसरत येणाऱ्या फुलांकडे बबलू गुंग होऊन पहात होते. त्याचे विस्फारलेले काळे भोर डोळे, वाऱ्याने विस्कटलेले केस पहाताना शशीचा गळा पुन्हापुन्हा दाटून येत होता, परवाच्या ऑपरेशनमधे आपलं काही कमी जास्त झालं तर ? बबलू जन्मभर असाच कसली ना कसली वाट पाहत राहील. त्याला बोलवणारे, बरोबर घेऊन जाणारे कधीच कोणी त्याच्या जवळ नसेल. त्याला कधी कुणाच्या कुशीत शिरावंसं वाटलं तर तो कोणाजवळ जाईल ? आपल्यामागे हा कसा राहील ? याचं कसं होईल ? शशीचे डोळे सारखे भरून यायला लागले. तिला डोळे टिपताना चंद्रकांतनं पाह्यलं, अन् तो म्हणाला,

"तू काही काळजी करू नको."

त्याचा असा आश्वासक स्वर शशीला नवीनच होता. तो ऐकून ती भानावर आली. त्याचे पुढचे शब्द ऐकायला तिचे कान अगदी आतुर झाले. आता तो म्हणेल, "सगळं काही ठीक होईल."

वर्षानुवर्षं माणसं एकदुसऱ्याला धीर देण्यासाठी वापरत असलेले चार साधे शब्द "सगळं काही ठीक होईल." ते आज त्याच्यातोंडून तिच्यासाठी बाहेर पडणार होते. आणि ते ऐकायला ती अधीर झाली होती. जणू काही त्याच्या त्या शब्दांमुळेच सगळं काही ठीक होणार होतं. पण तो पुढे जे काही म्हणाला, ते वेगळंच निघालं.

"तू काही काळजी करू नको. काही कमी जास्त झालं, तरी बबलूकडे पहायला आपल्याकडे पुष्कळ माणसं आहेत."

त्याच्यातोंडचे ते शब्द ऐकून शशिकला क्षणभर स्तंभितच झाली, आणि मग नकळतच मोठ्यांदा हसत सुटली, चंद्रकात गोंधळून गेला.

"हसायला काय झालं ?" त्यानं जरा जोरातच विचारले.

तरी तिचं हसणं थांबलं नाही. मग तो थोडा रागावलाच. हसता हसता डोळ्यात जमा झालेलं पाणी शशीनं पदराच्या टोकानं पुसलं, अन् तेव्हाच तिच्या एकदम लक्षात आलं की "उद्या काय होईल ? काही कमी जास्त झालं तर ?" ही तिची भीती कुठल्याकुठे नाहीशी झाली होती, ती मग स्वतःशीच म्हणाली होती, "होईल ते होईल. नाही तरी आपण गेल्यावर जे काही होईल ते आपल्याला थोडंच कळणार आहे !"

घसरगुंडीवरच्या मोठ्या मुलांमधे बबलूचा शिरकाव होत नाहीये, असे पहात असून देखील आपणापुढे होऊन त्याचा नंबर लावावा, असे मग तिला वाटलंच नाही. थोड्या वेळानं चंद्रकात स्वतःच उठला, बबलूला उचलून त्यानं घसरगुंडीवर नेऊन बसवलं, आणि हाताला धरूनच सरकवत खाली आणलं, तेवढ्यावर तो खूष झाला होता. मग ती तिघं जणं परत यायला निघाली.

ऑपरेशन नीट पार पडलं. कमी जास्त काही झालं नाही, त्यामुळे घरात बबलूकडे पहायला कुणी नव्हतं. तिची तब्येतही तशी ठीक होती, म्हणून आग्रह धरून शशी जरा लौकरच नर्सिंग होममधून घरी आली. ती आली त्या दिवशी कसला तरी सण होता, म्हणून तिने तसेच उठत बसत नैवेद्यासाठी म्हणून थोडे पुरणही घातले. चारपाचदिवस आईविना उदासवाणा झालेला बबलू तिला पाहून हरखला. तिने घातलेल्या पुरणामुळे चार दिवस सकाळ सध्याकाळ ब्रेड ऑम्लेट् खाऊन वैतागलेल्या ला चंद्रकांतही त्याची तेवढ्या दिवसांची गैरसोय थोडी विसरल्यासारखं झालं. "आल्या आल्या लगेच स्वैपाकास लागू नको. मी बघेन आजच्या दिवस, तू जरा विश्रांती घे" असं काही तरी तो म्हणेल, असं शशीला वाटले होते. पण तसं काही झालं नाही. ती नेहमीसारखीच वेडी आशा निघाली.

शशीला लहानपणी तिची आजी तिला एक गोष्ट सांगायची. एक होता राजा. "त्याला दोन बायका होत्या. एकीचं नाव होतं हवीशी, आणि दुसरीचं नाव होतं नकोशी", मग, हवीशीचं कसं कौतुक व्हायच, तिला रहायला महाल, ल्यायला छान साड्या-दागिने जेवायला पंच-पक्वान्नं, असं सगळं वर्णन आजी करायची. नकोशीचं रहाणं झोपडीत, तिला नेसायला फाटक्या साड्या, जेवायला शिळं अन्न अशी स्थिती असायची.

ती गोष्ट ऐकता ऐकता शशी थोडीशी मोठी झाली आणि मग आजीला विचारायला लागली. "नकोशीशी केलंच कशाला मग राजानं लग्न ? नकोशी राजाशी भांडली का नाही ? नकोशी घरातून निघून का नाही गेली ?"

आजी म्हणायची, "आधी नव्हती काही ती नकोशी, आधी हवीशी होती म्हणून तर राजानं लग्न केलं तिच्याशी. नंतर मग ती नकोशी वाटायला लागली होऽ ! करणार काऽऽय ? नशिबात असतं ते सोसावं लागतं."

पण आजीच्या या उत्तरानं शशीची समजूत काही पटायची नाही, नशीब म्हणजे काय, सोसणं म्हणजे काय, ते समजण्याचं तिचं वय नव्हतं. पण तरी तिच्या डोक्यात चक्र चालू व्हायचं, कशामुळे झाली असेल ती हवीशीची नकोशी ? नाही नाही ते हट्ट करायची म्हणून ? सांगितलेलं काम ऐकायची नाही म्हणून ? घरात सगळ्यांशी भांडायची म्हणून ? हात पाय आपटून रडायची म्हणून ? अभ्यास नीट करायची नाही म्हणून ?

पण अभ्यास असायला ती शाळेत कुठे जात होती ? आणि हातपाय आपटून रडायला ती लहान मुलगी होती थोडीच ? ती तर चांगली मोठ्ठी बाई होती. शिवाय राजाची राणी, मग तिला घरात काम तरी कुठलं आलंय ! आणि नुसता हट्ट केला किंवा भांडलं म्हणून कोणी "हवीशी" ची "नकोशी" कशी होईल ? आपण तर कितीदा तरी "हवं म्हणजे हव्वंच" आणि "नाही म्हणजे नाऽहीच." करत असतो. पण आपण कुठे आई-बाबांना, आजीला नकोशा झालो आहोत ?

यथावकाश शशी मोठी झाली होती, गोष्टी ऐकण्याचं वय मागे पडून गोष्टी वाचण्याचं वय सुरू झालं होतं, वाचलेल्या गोष्टींमधल्या "राणी च्या" जागी स्वतःची कल्पना करून "राजा" बद्दलची स्वप्नही मनात रंगायला लागली होतीं,

मग काही काळानंतर पत्रिका, फोटो, दाखवण अशा रीतसर पायऱ्या ओलांडून शशी "चंद्रकांतची हवीशी" बायको झाली. त्यानं "पसंत आहे." असं सांगितलं. याचा अर्थ ती "हवीशी" आहे, असाच होता, नाही का ?

लग्नानंतरचे दिवस चांगले होते, चंद्रकांत-बरोबर हिंडणं फिरणं, सिनेमाला जाणं, अधून मधून बाहेर जेवणं, सणावाराला नव्या नव्या साड्यांच्या घड्या मोडणं, एकून आधी वाटलं होतं त्याप्रमाणे लग्न म्हणजे मजा होती खरीच.

लग्नाला सहाएक महिने होतात, तर शशीची पाळी चुकली. यापुढे तर सगळे कौतुकाचेच दिवस, पण कौतुक करून घेण्याचे शशीचे काही योग नव्हते. जेमतेम दोन महिने पुरे होतात तर तिला कडक डोहाळे सुरू झाले. पोटात पाणी ठरेना. रात्रंदिवस मळमळ असायची. सुरुवातीला चंद्रकांत काळजी करायचा. मग थट्टा सुरू झाली. पण पाचवा महिना लागला तरी डोहाळे कमी होईनात, तेव्हा मात्र तो चांगलाच वैतागला. मग मित्रांच्या बायकांशी तुलना सुरू झाली, त्याचा एक मित्र त्याच्या बायकोच्या गर्भारपणात तिला घेऊन काश्मीरला गेला होता, त्यांचं कसं मजेत चाललंय, ते किती enjoy करतात. तू जरा जास्तच नखरे करतेस, इथपासूम ते तुझ्या तब्येती-तच काहीतरी दोष आहे, इथपर्यंत बोलणं आलं. त्याच्या अशा बोलण्याला उत्तर देण्याइतकं सुद्धा त्राण तेव्हा शशिकलेत नसायचं.

"तू काही करू नको. फक्त भाजी पोळी कर" असं तो त्याच्यामते औदार्यानं तिला म्हणायचा तेव्हा तिच्या अंगात पलंगावर उठून बसण्याइतकीदेखील शक्ती नसायची, की स्वतः तोंडात पाणी घेण्याची इच्छा नसायची. जेवणाची गैरसोय आणि रात्री देखील उपवास ! चंद्रकांत चिडचिडा झालाच. नंतर बबलू झाल्याचा आनंदही फार दिवस टिकला नाही, तो तब्येतीनं रुटूखुटूच होता. शिवाय रात्री रडून सगळ्यांना जागवायचा. चंद्रकांतचा पापड हळूहळू फार चट्दिशी मोडायला लागला. शशीचं डोकं दुखायला लागलं, की, त्याच्या कपाळाला आठ्या, तिला ताप आला, की ह्याचा मिजाज गरम. आपल्या प्रेमाच्या माणसाला काटा जरी बोचला, तरी त्याची बोच आपल्याला लागते, असं म्हणतात. त्याचीच ही एक वेगळी आवृत्ती आहे, असं नंतर नंतर शशी वरकरणी हसत हसत आपल्या मैत्रिणींना सांगायला लागली. तिच्या हातच्या लहान सहान चुकांवरून चालणारं त्याचं धुसफुसणं, तणतणणं तिच्या चुका कळत नकळत वाढवीतच गेले, लहानपणी आजीकडून ऐकलेली नकोशी राणीची गोष्ट तिला अधूनमधून आठवायला लागली.

आता कसंबसं अंग टिपून कपडे घालताना शशीच्या मनश्चक्षू समोरून तिचं सगळं वैवाहिक जीवन सरसर सरकत गेलं.

ती एकीकडे पोलक्याची बटनं लावीत होती. मनात येत होतं- "या दुखण्याची नुसती शंका जरी आली, तरी तो भाग संपूर्ण कापून टाकतात म्हणे. म्हणजे त्या नंतर हे पोलके, किंवा जुनं कोणतंच पोलकं आपण वापरू शकणार नाही की काय ? आणि एकीकडची छाती सपाट झाली, तर चंद्रकांतला काय वाटेल ? हल्लीच तो फारसा जवळ येईनासा झाला आहे. वेळी-अवेळी पाळी येते. अंगावर दहा दहा दिवस जात रहातं, त्याची गैरसोयच होते खरं म्हणजे, आणि त्यात आता हे !"

साडी गुंडाळून घेत शशी बाथरूमच्या बाहेर आली. डॉक्टरकडे जाऊन एकदा खात्री करून घ्यायला हवी होती. ते पुढच्या काही तपासण्याही सांगतील. असल्या तपासणीसाठी डॉक्टरकडे जायचं, तर चंद्रकांत बरोबर हवा. तो येईल की नाही ? की लेडी डॉक्टरकडे जा, किंवा मैत्रिणीस घेऊन जा म्हणून सांगेल ? सध्या त्याला काही न सांगता आपण एकटीनंच जाऊन सर्व तपासण्या करून आलो तर ? त्याला देखील तेच सोयीचं होईल. शशीला वाटलं, दीर्घ वैवाहिक जीवनानंतर एक-मेकांना नकळत समजून घेणारं वागणं म्हणतात, ते हेच असावं !

आपल्याला शंका वाटत्येय तेच निदान डॉक्टरांनीही केलं, तर चंद्रकांतला काय वाटेल ?

शशिकला आरशात पाहून कुंकवाची टिकली कपाळावर टेकवीत होती. आरशातल्या स्वतःच्या

प्रतिबिंबाच्या डोळ्यात ती डोकावून पहायला लागली, तर ते डोळे तिला निर्विकार दिसले.

सुटल्यासारखंही वाटेल कदाचित. फक्त शेवट फार लांबू नये एवढंच.

तसलं काही नक्की निदान झालं, तरच ते त्याच्या कानांवर घालयचं, शशीनं ठरवलं. आपली भीती कमी झाली, असं लक्षात येऊन ती मनाशी किंचितशी हसली. ■

बी- ७, ओ. एन. जी. सी. फ्लॅट्स,
प्रभात कॉलनी, सांताक्रूझ (पूर्व)
मुंबई- ४०००५५

अनुक्रमणिका

जोगण्या

योगेन्द्र मेश्राम

आज रोजच्यापेक्षा लवलर जाग येते, ती चौकात लाऊडस्पीकरवर चाललेली स्वातंत्र्य-गीताची स्फुरणदायी धून ऐकून. मी डोळे उघडतो. गीताच्या गोडीने जागच्या जागी थोडे कानही हलवितो. पण झट्दिशी उठायचे स्फुरण काही मला होत नाही. मी खाटेवर तसाच पडून राहतो. पडून राहणे हवेसे वाटते. कालच्या दिवसभरचा मनादेहाचा शीण पुरता घालवायला शरीराला आणखी काही वेळ कॉट-रेस्ट हवी असते ... कॉटरेस्ट ! अगदी उठवत नाही. शरीराची इकडे ही कूरकूर आणि आता तिकडे—

ए मेरे वतन के लोगो—
जरा आँख में भरलो पानी
जो शहीद हुवे हैं, उनकी—
जरा याद करो कुर्बानी !

—हे करुण गीत सुरू होते. ते मनात शिरून पसरू लागते, तसे शरीर-मन गदगदून उठते. मी आता शरीराचे फार लाड न करता अंगावरची चादर फेकून उठतो. त्या गाण्याचे शरीरावर ओलसर शहारे उठत असताच डोक्यात एकदम प्रकाश पडतो आज १५ ऑगस्ट ना ! हो, देशाच्या स्वातंत्र्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण दिवस, अविस्मरणीय. मी कसा विसरलो !

या संसारात सदासर्वकाळ सुखदुःख हे पाठीला लागलंच असतं. पण आज काही नको. आज मागची मरगळ आठवायची नाही, पुढची विवंचना करायची नाही. दुःख, दारिद्र्य, उपासमार, उद्याची विवंचना, कालची लाचारी ही सर्व माणसाला टाकावू करणारी विद्रूपे पटकीसारखी नामशेष करावयाची वस्तू आहे. ती कोणाही माणसाच्या गुणाची चीज होऊ देत नाही. ती त्याला सुंदर स्वप्नं पाहू देत नाही. जीवनाच्या साऱ्या दिशाच धूसर करते. दारिद्र्य, लाचारी, परावलंबन, दास्य हे तर माणसाचं अस्तित्व थोडं थोडं खुडत कुरतडत नेते. जीवनाला कोणतंच मूल्य प्राप्त होऊ देत नाही. स्वाभिमान शिल्लक राहू देत नाही. माणसा-माणसात भेगा निर्माण करते. त्या भेगा बुजविण्याचं काम स्वातंत्र्यच करू शकते. आपला तर स्वतंत्र भारत. भारतातील हर गावात, हर समाजात, हर शहरात राहणारा प्रत्येकजण स्वतंत्र, तो देश स्वतंत्र म्हणूनच ना ! हा सार्थ स्वाभिमान आपल्या स्वातंत्र्यानंच प्रत्येक माणसात पेरला नाहीये का ?

शेकडो वर्षांच्या क्रूर-कठोर दास्यबंधनातून मुक्त झाल्याचा गर्द आनंद म्हणजे आपलं हे स्वातंत्र्य. एखादा साधा सणही घरात आनंदाचे क्षण देऊन जातो. भारताचा स्वातंत्र्यदिन हा तर राष्ट्रीय सण. सुवर्ण मोलाचा असा हा आजचा दिवस महानच !—अपरिमित आनंदाचा, देशाच्या सौभाग्याचा, हर्ष उल्हासाचा, सगळ्या-सगळ्यांनी सुखासमाधानाने घालवावयाचा हा दिवस प्रत्येक प्रत्येक माणसाचा. सर्वांसाठी कारण सगळ्याच भारतीयांच्या हातापायातल्या बेड्या तडातड् तोडून फेकणारा हा दिवस म्हणजे भारताचा खरा मुक्तिदिन. सुवर्णदिन.

असा हा पंधरा ऑगस्ट आपण आता तनामनाने पाळायचा. अगदी धूमधडाक्यात. रोजची सगळी धावधडपड, खटपट, फरफड, चिंता घरघर, सारी मरगळच काढून फेकून आज, स्वातंत्र्यदिनाचा नुसता आनंद तेवढा मनमुराद उपभोगायचा. देहामनाचं सारं ओझं फेकून द्यायचं, अगदी बंधमुक्त होऊन, म्हणजे अनिर्बंध स्वतंत्र पणानं. कसलाच, कुठलाच, कोणाचाच इव्हन् बायकोचासुद्धा आज तरी गुलाम म्हणून राहायचं नाही. गुलाम म्हणून वागायचं नाही आणि इतर कुणाला तसं वागवायचंही नाही. आपला आपण-सुद्धा नाही. बस् ठरलं अगदी पक्कं.

माझ्यात सकाळीच असं नवं नवं उगवतं,

मनांत. भारी भारी. विचार आणि नव्याचं संकल्पांचा संचार. रक्तात एक स्फुरण दौडू लागते. दैनंदिन व्यवहारातील कसला सुद्धा मनाला हेलकावा नको, म्हणूनच मी सकाळी दैनिक न वाचण्यापासूनच आपल्या मूलभूत व्यक्ति–स्वातंत्र्याच्या पालनास पद्धतशीरपणे सुरुवात करतो. आता प्रत्यक्षात त्यात व्यक्तिस्वातंत्र्य वगैरे कुठले असते, मला कळत नाही. पण सकाळपासून माझी 'तटस्थ' म्हणजे ताठर–तऱ्हेवाईक न् काहीशी बेमुर्वतपणाची, काहीही लहरीपणाची पण पूर्ण मुक्त अशी रोजच्याहून वेगळीच वागण्याची तऱ्हा पाहून बायको–पोरांना नवल वाटत असावं, ते टकमका एकमेकाकडे–म्हणजे माझ्याकडे पाहून–पाहतात. कानाशी काही धुसूर–फुसर करतात. पण तेही (माझी निंदा) त्यांचं आज मी खिजगणतीत काढतो, मनातल्या मनात. रोजच्यासारख्या चिडून, घुस्स्याने बोलून आजतरी त्यांचं स्वातंत्र्य डागाळू देत नाही.

रोज सहसा या घरात असं होतं नाही. इतरांचं स्वातंत्र्य मारून वा हिसकून ठेवण्यातच माझ्या स्वातंत्र्याचं मूलबीज आहे, असंच चाललेलंय. पण इतरांचं स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यात माझंही स्वातंत्र्य सुरक्षित राहणार आहे, असा विवेक मला आजच्या दिवस तरी सुचतो. म्हणून घरातल्यांना कुठल्याच बाबतीत मी बाधा आणू इच्छित नाही. असा मी पूर्ण निःसंदेही, पूर्ण स्वतंत्र स्वतःला बादशहा आलमगीर समजून–पण छे–छे, नव्हे–माझं लक्ष कुणाकडेच, कशाकडेच नसून आपलं आपणात, स्वतंत्र वाण्यात मुरत चाललेलं मला जाणवते. एवढा आपणात मग्न की माझ्या मला स्वातंत्र्याच्या जणू जोगण्याच लागल्यासारख्या, मी आधीच घरातल्या सगळ्यांच्या स्वातंत्र्याला मुक्त वाव देऊन टाकलेला असतो. ते–तेही पूर्ण आणि 'मी'ही असा पूर्ण निःसंग...माझा पुरा स्थितप्रज्ञ वगैरे करून टाकतो.

आणि काय, रोज भिऊन वचपून वागणारी पोरं आता निर्भय होऊन ट्रंका, रिकामे पिपे, डबे, पितळीचा फुटका गुंड वा याली, पातेली, कोणी काच–कोणी काय घेऊन, एकाच तालांत ठोकून सिनेमाच्या आधुनिक चालीवर घरात एकप्रकारचा जलसाच खडा करतात. त्यांच्या त्या सुरेल रेलचेलीत कपबशी, काचेचा ग्लास, बरणी वगैरे खाडकण् फुटल्याचा आवाज...आणि त्याचवेळी पाठीत धपाटे देताना बायकोच्या हातातल्या बांगड्यांची जलतरंगी किण्‌किण् ऐकून मला डिस्कोगीताची सुंदर धमाल ऐकत असल्याचा भास होतो. आणि मग माझे मन आणखीच घरात सुरू झालेल्या या स्वातंत्र्य–सोहळ्यात बेहोश होऊन डुबू लागते....मग्न.

असा किती वेळ जातो, कळत नाही. सकाळपासून हेच सुरू. मी जेवण घेतलं; का नाही; याचंही भान नाही. कशाचंच काही लावून घ्यायचं नाही, असंच ठरवलेलंय... 'डिस्को'ची एक चकरी संपल्यानंतर बाहेर हुंदडली गेलेली पोरं पुन्हा घरात प्रवेशतात. अन् त्यांची पुन्हा 'रिहर्सल' सुरू होते. त्यांचं ते निमूटपणे सोसत–ऐकत मी अगदी निर्लेप स्वतंत्र मनानं, समाधानानं मान डोलवीत कधी डुलकत सकाळचे दोन तीन तास घरीच घालवत पडलेला असतो. आता डोळे मिटून आपल्याच अंतर्नादात मग्न असतानाच बायको नकळत एकाएकी जवळ येऊन ओरडते–

"आहो, एऽऽ– आज कसली टाळी लागली; समजत नाही. बाई–बाई–बाई ! एऽ,– आतातरी समाधी उठवाल का नाही ? घरात दाणा राशन नाही. तेल– तिखट, न कांदा– लसूण काही नाही. गूळ, जीरं जिरकूट बी सरलंय. काय खापरं रांधू न वाहाडू– ?"

मी खाडकन् उठतो, "हो–हो तेही करायचंय. आज काही गोडधोड घरात व्हायलाच पाहिजे आहे- आत्ता–आत्ता जाऊन आणतो हं, सगळं– गूळ. वीळ."– असं बायकोला सांगून मी एका तंद्रीतच अंगात कपडे घालतो. आणि हातात थैली घेऊन लगेच बाहेर पडतो...

बाहेर बंगल्या–माड्यावर, रस्तोरस्ती चाललेली सजावट बघून मला आपल्या घरातलं स्वातंत्र्य थिटं नि, फिकं–फिकं वाटू लागते. बाहेर जगात चाललेल्या स्वातंत्र्याचा सार्वजनिक सोहळा बघितल्याशिवाय, समरूप झाल्याशिवाय एकट्या

'स्वतंत्र'पणाला अर्थ नाही,– असा व्यापक पातळीवर विचार करीत मी रस्त्याने चालू लागतो. वरती नजर जाते... आभाळ ढगाळलेलं. पण सकाळपासून पाऊस असा नाही. आज यायलाही नको. आजचा दिवस तरी उजेडभर असू दे. स्वातंत्र्य–दिवस कसा मोकळा–मोकळा, स्वच्छ स्वच्छ पाहिजे. मी स्वातंत्र्याचं महत्त्व आठवीत जात असतो. एका कल्पनाविश्वात गुंग.

पण छे, त्या कल्पना नव्हत. स्वातंत्र्य ही फार मोठी गोष्ट. महत्त्वाची गोष्ट. एक झणझणीत प्रकाशित वास्तव. देश जिवंत असल्याचं हे राष्ट्राचं साजिवंत नि स्वयंतेजस्वी अस्तित्व. राष्ट्राची अस्मिता. देशाचं स्वातंत्र्य हा एक जिताजागता अमर इतिहास. तो इतिहास शक्ती, भक्ती, प्रेम, त्याग, अश्रू व पराक्रमाने भरलेलाय. असंख्य जीवितांच्या रक्तसिंचनाने, बलिदानाने पुनित झालेला. अनेक स्त्रियांचे सौभाग्य हरवलेल्या डोळ्या–डोळ्यातून वाहणाऱ्या आसवांचा अभिषेक देऊन निर्मिलेला स्वातंत्र्याचा इतिहास सुवर्णाक्षरांनी माळून ठेवायचीच वस्तू. जीवापेक्षाही जपून रक्षण करावयाचे ते अमोल संचित. एक मौल्यवान ठेवा. शतकानुशतकांच्या मनामनातल्या अतृप्त नि अनावर इच्छेची परिपूर्ती. परक्यांच्या दीर्घ गुलामगिरीचे कुट्ट काळे पान जाळून टाकल्याचा हा अमर पुरावा. देशाच्या दाही दिशा उजळणारं एक तेज. कोनां न् कोपरा, गल्ली–कुचली, झोपडी खोपटीसुद्धा उजेडी करणारं, जागविणारं स्वातंत्र्य ! सर्वस्व नि सगळं खर्ची घालून, 'होम' होऊन मिळविलेलं स्वातंत्र्य मोलाचंच ! भारताचे स्वातंत्र्य हर एक भारतीयांचेच नाही का ?

स्त्रियांचे-पुरुषांचे, लहानांचे–थोरांचे, गरीबांचे–श्रीमंतांचे, मोटरवाल्यांचे–स्कुटरवाल्यांचे, टांगा–रिक्शा–हातगाडीवाल्याचेही. मालकाचे तसे नोकर–चाकराचे (?), मॉलीशवाल्याचे–बुटपॉलीशवाल्याचे, मंत्र्यांचे–संत्र्यांचे, एवढेच काय, चोरचिलटाचे, भटक्या भामटयाचे, कलंदर शिकाऱ्याचे, बिलंदर भिकाऱ्याचे, पानपट्टीवाल्याचे, हातभट्टीवाल्याचे, कैद्याचे तसे आळशी ऐद्याचे सुद्धा... स्वातंत्र्य हे अशा सगळ्या–सगळ्यांचे... सगळ्यांसाठी !... सारखेच नाही का ?

स्वातंत्र्याचा सूर्य घेऊन उगवणारा आज– १५ ऑगस्टचा दिवस प्रत्येकाचा. प्रत्येकाने ज्याच्या पावन स्मृतीला मानाचा मुजरा बहाल करावा, असा हा दिवस. प्रत्येकाच्या सन्मानाचा इज्जतीचा, प्रतिष्ठेचा. माणसाला निर्भयपणे व निर्वंधपणे जगण्याची प्रेरणा देणारा. सुखाने जगायला लावून जागे ठेवणारा आजचा महान स्फूर्तिदायी स्वातंत्र्यदिन, हा !

मी विचाराच्या तंद्रीत सरळ लोकांनी गजबजलेल्या बाजार–चौकाकडे जातो. सभोवार भिरभिरती नजर टाकतो. उल्हासित चेहऱ्या–चेहऱ्याकडे पाहतो, ...उल्हसित !– अन् पाहतच राहतो... तर काय हे रोजचेच व्यवहार. रोजचेच चेहरे. आत्ममग्न संत्रस्त. चिडचिडलेले. उदास. कंटाळलेले चिंतेची टाळी लागलेली. धापा टाकत. बदल तो कसा नाही. आज पंधरा ऑगस्ट असून ? ह्या लोकांना स्वातंत्र्याचे महत्त्व कळत नाही, कसे ?– कसे कळत नाही– ?

–आणि हे काय, अरेरे, आज या भरचौकात जास्त भिकारी जमलेलेयत ! ह्यांना निदान आजच्या दिवस तरी भीक न मागण्याचं स्वातंत्र्य कसं नाही ? जिकडे–तिकडे फूटपाथवर रोजचे तेच अपंग, आंधळे–लंगडे रोगी–भोगी... सगळे–सगळे असली नकली... पोटासाठी रडत–ओरडत, तडफडत आहेत. ह्यांनी खरं तर या स्वतंत्र देशाचं, आपल्या या महान संस्कृतीचं स्वच्छ चित्रच खराब थोंगळ करून टाकलंय. ह्यांना एका रांगेत गोळ्या घालून...

–पण... हे तर सारं रोजचंच रडगाणं आजही– ? आजचा दिवस तरी नको होतं. पण... सांगायचं कोणाला ?

सगळं तसंच... नो चेन्ज ! लुंगी–चड्डी–कापड–फळं ठेलेवाले, छत्रीवाले, पॉलीशवाले, मोची, मिठाई खोमचेवाले– सगळे सगळे जण आपापल्या धंद्याकामात गुंतलेले. गुरफटलेले. त्यांना ओरडून सांगावं का, 'अरे आज १५ ऑगस्ट ! ऐष आरामाचा, आनंदाचा सुखाचा, विश्रांतीचा, अन् घरात गोडधोड करून खाण्याचा– थोडी चंगळ (थोडी चेंगळ !') करण्याचापण दिवस. पण छे ! या लोकांचं 'स्वातंत्र्य' कुठं मसनात

अनुक्रमणिका

गेलं ? कोणी हिरावून नेलंय ? –की ह्यांना भानच नाही, आपल्या बहुमोल स्वातंत्र्याचं ? देशाच्या स्वातंत्र्याचं भान न ठेवणारे हे कसे बरं भारतीय लोक ? हे भारतीय अडाण्–मागास लोक कसे ? ह्यांना देशाच्या स्वातंत्र्याशी काही देणं–घेणंच दिसत नाही. . . म्हणजे काय,. . . कृतघ्न ! पण. . .

मला काही कळत नाही. मनात हे जे काही राहून राहून उचकून येतं, काही खरं नाही ! माझा नुसता भ्रमकल्लोळ चाललेलाय. काय तरी जोगण्याच लागलेल्या. मी एकदम दचकतो, ते–मघापासून काळवंडत आलेलं आभाळ वाघ डरकावल्यासारखं गरजू लागलेलं पाहून. (तसंही या–त्या वाघाला डरकावताना पाहून दचकून उठण्याची मला सवयच लागलेलीय.) मी वरती बघतो. वरचं सर्व आभाळ जबडधात घेऊन थैमान घालणाऱ्या राक्षसासारखा एक प्रचंड काळाकुट्ट ढग ठिकरीवर येऊन आदळल्यासारखा भास होतो. तो आपले विक्राळ हातपाय पसरतो. आणि भल्या मोठ्यानं वळवळत येऊन तडकतो. . . वारे जोर धरतात. धुंदाळ वादळ होतात. आणि टपोऱ्या थेंबाचा पाऊस सुरू होतो. गारांचे थेंब अन् थेंबांच्या धारा बनतात. आणि ताल धरल्यागत कोसळू लागतात काचेच्यानळचा प्रमाणे पावसाच्या पांढऱ्या सरी तीनचार मुसळधार सरी पडल्यावर पावसाचा आरोह–अवरोह संपल्यासारखा होतो. त्याची एक बारकी संथ लय मात्र सुरू राहते. पाऊस उघडण्याचे चिन्ह मात्र दिसत नाही. हे पाहून आतापर्यंत एका छावणीत दम घेत थांबलेल्या म्हाताऱ्या माणसाला मालक दटावतो. तसा तो हिंमत करून जवळ जातो. आणि मालाने लदलदलेली दुचाकी हातगाडी ताकद लावून ओढू लागतो. तो तगडा मालक माणूसही मागून छत्री धरून गाडीवरोबर चालू लागतो. लवकर ओढण्याची म्हाताऱ्यास घाई करतो.

'माल खराब होईन, तू तुहा बाप भरून देईन काय ?'– म्हणून िसण्या देत जातो. भिजून चिंब झालेला म्हातारा ताकद लावत उँ– उँ– उँ ऽऽ. . हँ :–करत कुथत कुथत ओढतो. धापा टाकतो. गाडी किरकिरत किरकिरत जात असते. . . आणि धाडकण् एका खड्ड्यात चाकच जाऊन फसते. तो सगळा जोर लावून कुथत खिचतो. पण चाक काही केल्या वर चढत नाही. मग पार थकलेला, दम निघत आलेला म्हातारा घेरी येऊन खाली पासलाच पडतो. तो उठतच नाही. झिरका पाऊस पडतच असतो. एका दुकानाच्या ओटयावर उभी काही कामकरी हमाल माणसं त्याच्या मदतीला धावून जातात. . .

आता पाऊस शिथळत आलेला बघून मीही निघतो. . . मला एकदम घरची आठवण होते. . . म्हणजे बायकोजवळ बोलून आल्याप्रमाणे–

आता माझी धुंदी नकळत उतरत असते. सकाळची तंद्री भंगत जाते शुद्धीवर येता–येताच मी संशयाने खिसे चाचपतो. पण कवडीही हाताला लागत नाही. . . माझे सर्व खिसे खाली ! कोणी मारलं तर नाही, म्हणून मी ते पुन्हा पुन्हा उलटून पालटून पाहतो. विचार करतो. आठवतो, आणि मग माझ्या लक्षात येते. की–त्या तंद्रीत घरून मी पैसेच घेतले नव्हते. पुन्हा गालात मारल्याप्रमाणे फाडकन् आठवते, की घरी घ्यायला पैसेच नव्हते ! –कुठं होते ? खरं म्हणजे एका पठाणाकडून पैसे घ्यायला मला सकाळीच जायचे होते. किंवा काल मित्राला बोलून ठेवल्याप्रमाणे त्याच्या ओळखीच्या एका सावकाराकडून मला पैसे काढायचे असतात. . . माझ्या स्मरणशक्तीने खऊट खोवरे खाल्ले होते, तर ! आठवणच गेली. मी आता गडगडतो नुसता. आणि एक खोल लांब उसासा सोडत रिकाम्या थैलीनेच आल्या रस्त्याने चालू लागतो.

आभाळ हळुवार तुषार रूपाने झरतच असते. रस्त्याने घाण पाण्याचा–पावलांचा चिखल आलेला असतो. तो तुडवीत छातीत धपापत...विषण्ण मन मुठीत घेऊन चालत मी आता झोपडपट्टीच्या वस्–सडकेने लागलेला असतो...समोर एका आडव्या गल्लीत कोणाचे तरी निकराचे भांडण जुंपले असल्याचे ऐकू येते. पुढे जातो, तो तेवढयात एक माणूस त्या आडव्या गल्लीतून एका बाईला चिखलातून फरफटत सडकीवर आणतो. बाया–पोरं, माणसं बघायला जमतात. त्यांच्या घेऱ्यात ती तरुण 'बाई' आता मेल्यासारखी निपचित पडून असते. कदाचित ती त्याची बायको असावी,

तो खस्सकन् गळयातले मंगळसूत्र तोडतो. अन् झोकांडत जाऊ लागतो. तेवढयात दुसरा एकजण गल्लीतून धावत येतो.

'बईन देल्ली तु, असा फजितवाडा कराले काऽय साल्या ? बेसूद होइस्तवर मारलास न् फरकळ नेलास डरंग्या ?...आतं गन्यातलं देतंस, का नाई, तुह्या बयनीले ××× मी–' म्हण्णन तो त्याच्या अंगावर धावून जातो. मग चार–पाच माणसं–कोणी सोडावयाला कोणी हाणायला, एकमेकावर जाऊन पडतात... लाथा...बुक्क्या... मारामारी पेटते. मग सुरे चाकू चमकतात. काही कळण्यापूर्वीच तेथे काहीतरी भयानक घटना सहज घडावी, तशी घडून गेल्याचे समजते... वातावरण थरारत तरंगत राहते...रहदारी चालूच असते.

पावसाचे सडकेच्या डोंगीत साचलेले पाणी आता लाल झाले होते. जवळ आलेला एक सज्जन सायकलवाला तरुण ते दृश्य पाहून थरकापतो. जागच्या जागी उलट वळवायसाठी फट्कन् ब्रेक दाबतो. तेवढयात पाठीमागचा येऊन आदळतो. मग तिसरा...चौथा...आणि मागोमाग भरधाव वेगाने आलेला ट्रक, बस्– कर्रर–कर्रर...कीं–कीं, कच्च...कन्–होत असतानाच घुसमटत कोणी किंचाळल्याचा आवाज... एक आर्त किंकाळी...आणि—

च्–च्–च्–च्–च्...लोक चुकचुकतात...अरेरे ! बाका तरुण ! ड्रायव्हर ट्रक सोडून केव्हाच पोबारा.

...नको त्या त्या वयात पाण्या–पावसात जखखड मालाची हातगाडी ओढण्याचे काम कर- करणारा तो म्हातारा हमाल...चाकूंनी एकमेकांचे उदर लाल करणारी ती माणसं...ढोराप्रमाणे ती निपचित पडलेली बाई...हा गरीब सायकलवाला तरुण विद्यार्थी–आणि हातातली माझी रिकामी पिशवी...सर्व माझ्या डोळयापुढे चक्रासारखी फिरू लागतात. मी भांबावून गेलेलो...ते रस्त्यावरील दृष्य पाहत असतो.

...ते दृश्य हलत–बोलत–रडत असते. त्याचा मोठा आक्रोश सुरू होतो. घराघरांवरचे आभाळ फाडत तो वाढत जातो.

आज स्वातंत्र्याचा दिवस...आणि हे असले विपरीत !...हा भयंकर आक्रोश...हे काय ? स्वातंत्र्यानं हा आक्रोश अजून संपविला नाही की काय ? मला काही कळत नाही.

सकाळी घरी मला एखाद्या बादशहाप्रमाणे जे मस्तवाल, भययुक्त, बंधमुक्त वगैरे जे वाटत होतं, ते इतक्या लवकर उडून जावं, म्हणजे काय ? आता वाटतं, माझं मन आजपर्यंत स्वायत्त, धीट–व निर्भय झालेलंच नाही. काही तरी–कोणी तरी या मनाला सारखं पोखरून पोखरून खात आलेलं असते. आजसुद्धा मी आपल्या पायावर उभा नाही. सारखा लटपटतोय्. आणि हे सभोवतालचं रक्तबंबाळ जीणं बघून–अनुभवून अधिकच चिंताग्रस्त नि भयग्रस्त होतो. मी असा असुरक्षित व नाना भीती–काळज्या–विवंचनांनी जखडलेलाच आहे, याची मला आता फिरून जाणीव होते.

...डोळयापुढचा आक्रोश अक्राळ–विक्राळ होताना पाहतो. आणि मी लटपटतच मग एका आडगल्लीने तिथून सटकतो, एका अवाटीच्या मैदानाच्या बाजूने. शांत मार्गाने....आता अंधारून येते...

ते गड्डया–गड्डयांचे, खोल्या–खोल्यांचे, डबड–खाबड मैदान असते. त्यात कुठे कुठे पाणी जमलेले अचानक माझे लक्ष तिकडे हालचालणाऱ्या सावल्यांकडे जातं. पलीकडच्या उंचाटीवर पाच-सहा आकृत्या उभ्या दिसतात. आणि....हे काय, बापरे–! मी दचकतो. एका घराच्या अंधाऱ्या आडोशाला थबकतो....त्यांच्या हातात चाकू–गुप्त्या–तलवारी सारखी काही हत्यारं चमकतात. आणि तिकडे समोरच्या घराकडे तोंड करून ती माणसं जशी टेहळणी करीत...दरोडा बिरोडा घालण्याच्या विचारात की काय ? न्–न्, नाही, तिकडे कोणी तरुण स्त्रीपण....बापरे, तेथे ती बेहोश पडल्यासारखी. अस्ताव्यस्त. हलत नाही, की डुलत नाही. तिच्याकडे 'ते' एकदोघं 'होऊन' जात–येत दिसतात. पुन्हा तिच्याकडे गेलेले–शेवटपावेतो ती अवजणार की नाही, याचा तिला चाचपून–चुचपून अंदाज घेत असतात. माझ्या तो प्रकार लक्षात येतो. तो चाकू–सुऱ्यांचा,

तलवारीचा, चाललेला भयंकर बलात्कार माझ्याच्याने आता पाहावेना. मला खूप मोठ्याने ओरडावेसे वाटते. पण...फक्त वाटते. बोलकुटीच फुटत नाही. नकळत मी लटलटा कापत पुढे सटकतो.

मैदानाच्या आजूबाजूच्या घरा–घरातील गृहस्थ टोकाच्या एका घराजवळ जमलेले दिसतात. माझ्याप्रमाणे तेही नुसते भीतीने भांबावून त्या तलवारी–सुऱ्या–चाकूकडे आडून नुसते बघत असतात. पुढची हालचाल काही–काही नाही. त्यांचा पुरुषार्थ, त्यांची चीड, त्यांचा स्वाभिमान व शेजारधर्म कोणी हिसकावून घेतला, कळत नाही....आणि अगदी असहाय्य हवालदिल व भयग्रस्त झालेलं ते टोकाचं घर जागच्या जागी तडफडत मात्र असते.

ते– डोळाभर क्रोध– चिडीने तसेच असह्य दुःखाने, भीतीने, आक्रोशत असते. तो आक्रोश वाढतच जातो. वाढत वाढत समोरच्या रोडपर्यंत जातो. . . रहदारीच्या पोलीस– हवालदारापर्यंत. पण तोही मनुष्यप्राणीच. टोपी घट्ट कानावर सरकवून देतो. . . तिरपी घट्ट !

मी तेथून एकीकडे वळतो. कानावर कल्लोळ पडतच असतो. त्याने चिंधीसारखा मी टरटर फाटत जातो. उरात एक जोराची कळ उठते, गरम–गरम. पण हळूहळू तीही थंड होत जाते. मी नुसताच दुःखी– हताश व सुन्न सुन्न होऊन आत 'शॉर्टकट्' घेतो. आपला नेहमीचा शॉर्टकट ! आणि कसाबसा एकदाचा घरी जाऊन पोहचतो.

–अंतःकरणात काहीतरी खोल खुपसल्यासारखं होत राहते. उकसत, अस्वस्थ करत. बेचैन लांब सुस्कारे. काय करावं, एखाद्या नितांत वस्तूची मनाला निकड असावी, त्याची तडफड व्हावी, पण नेमकं काय हवं,– तेच जवळ असू नये; किंवा जे हवं ते आटोक्यावाहेरचं तरी असावं. –असं खूप काहीतरी हरवल्यासारखं दूर दूर जात असल्यासारखं. हृदयात त्याचा सारखा ठणका. गळा कोरडल्याप्रमाणे. आणि डोळ्यात पीच–पीच उद्वेगाच्या घिनमुन्या डसत. . .

मला वारंवार ते मैदान, पावसाच्या रोडवरचा तो म्हातारा, ती तरूण स्त्री आणि शेवटची किंकाळी फोडणारा तो तरूण. . . आणि तो रक्त खूनी भयंकर बलात्कार. . . सगळे फेर धरून आठवतात.

–पावसाचं पाणी. . . पाण्याचं रक्त . . रक्ताने भरलेल्या सडकेची लाल लाल डोंगी. . . हत्यारबंद मैदान. . . सडक– बस. . . लाल. . . रोड. . . ट्रक. . .

डोळ्यापुढे जीवनाच्या जाणिवेचे रोड तडकलेले दिसतात. . आणि त्यावर 'बर्स्ट' झालेल्या टायरींचा खच. . . रक्तबंबाळ पावलं. . . . आक्रोश. . . आक्रोश. . ! इथे–तिथे. . . सर्वत्रच !

माझा आता पार खचलेला, काळवंडलेला चेहरा आणि रिकामी थैली बघून बायको जे समजायचं ते समजून जाते. नाईलाजाने डोळे वटारून क्षणभर नुसती पाहत राहते. . . सकाळी पिपे वाजविणारी पोरं भूक भूक करत आता पोटं पिटत असतात. त्यांचा तो कालवा बघून ती मग मूग गिळत शेजारच्या घरी जाते. . . मी मात्र सुन्न दगडासारखा. काही काही सुचत नाही. मी आडवा पडतो.

काही वेळ तसाच पडून राहतो. . . मस्तकात पुन्हा आठवणींची शिळकं टोचू लागते. तसाच उठतो. आणि आधाशीपणाने सकाळी न वाचलेले दैनिक आता लक्षपूर्वक वाचू लागतो.

स्वातंत्र्य– दिनावर अग्रलेख. राजकारणाच्या नित्याच्या नाना उलाढाली. अनेक बऱ्यावाईट वातम्या– दरोडा– चोरीच्या, खुनाच्या, आत्महत्येच्या, स्त्रिया– पोरी पळवल्याच्या, हुंडाबळीच्या अमानुष बलात्काराच्या, जातीय दंगलीच्या, कत्तलीच्या, अत्याचाराच्या, काळाबाजार– भ्रष्टाचाराच्या, उपासमारीच्या. . . एक ना दोन– रोजच्याप्रमाणेच आणि दररोज वाढत्या. कालपरवा तशा आज– पंधरा ऑगस्टच्या दिवशीही. दिवस म्हणून सारखाच. दिवसेंदिवस, महिनो न् महिने, वर्षोन् वर्षे. . .

हे दुष्ट चक्र कधी थांबणारच नाही का ? कोण थांबविणार !

प्रत्येक वर्ष येते आणि आक्रोश घेऊन तडफडत निघून जाते. . . पंधरा ऑगस्टच्या समारोहाची, कॅलेंडरची पाने पुढच्या पंधरा ऑगस्टपर्यंत निर्जीव

भितीला नुसती फडफडत असतात. आता खुंटीला तडफडणाऱ्या माझ्या रिकाम्या थैलीसारखी.

मी सकाळी साठवलेल्या मनाच्या मडक्याला भोक पडून सगळ्या आशा–आकांक्षेचं पाणी आता झिरपून गेलेलं असते. उगाच हवा भरलेला माझा फुगा केव्हाच फुटलेला असतो. फट्कन् ! आणि छिन्न भिन्न झालेला असतो. . . मी विरून विरून जातो.

बायको तळतळत येते. पोरं तिचा पदर धरून भुकेनं सारखी कळवळत, रुंग रुंग करीत असतात. आणि मी खाटेवर आडवा–बर्फाच्या गोळ्यासारखा थंड. शून्य दृष्टीने कुठेतरी पाहत. आणि आत १५ ऑगस्टचा– मी नुकताच पाहिलेला व भोगत असलेला 'आज' आठवीत असतो. मी निष्क्रीय !

आता माझं स्वातंत्र्य– गच्च भरलेले आलू काढल्यावर थैलीला जसं स्वातंत्र्य मिळते, तसं उरलं होतं. अगदी त्या खुंटीच्या लटकत्या थैली–सारखं हे स्वातंत्र्य माझं मी भोगलंच पाहिजे. कारण एकदा मिळालेलं 'स्वातंत्र्य' हे बहुमोल असते. बहुपदरी असते, कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे.

शेजारच्या रेडियोवर स्वातंत्र्य–दिनानिमित्त आज खास खास कार्यक्रम आणि भाषणे वगैरे व्हॉलूम वाढवून वाजत असतात. पण मला स्पष्ट असं काहीच ऐकायला येत नाही. माझ्या मुंग्या आलेल्या बधीर–बधीर मनाला त्याचं काहीच कसं वाटत नाही ? ह्या कोण जोगण्या ?

–नुसता गोंधळ. . न् सरू पाहणारा कल्लोळ !

मला हे झालं काय ?

■

लेखकांसाठी सूचना

१. मजकूर कागदाच्या एका बाजूने लिहिलेला व सुवाच्य असावा.

२. पुरेसे पोस्टेज नसलेले लेखन परत केले जाणार नाही. स्थळप्रत ठेवावी, नाहीतर पुरेसे पोस्टेज पाठवावे.

३. कवितेची पोच दिली जात नाही. निर्णयही दिला जाणार नाही. तीन अंकापर्यंत कविता न आल्यास ती अस्वीकृत आहे असे समजावे. कवितेसंबंधी कुठलाही पत्रव्यवहार करणे शक्य होणार नाही.

४. अनाहूत लेख, कथा, ललित वा वैचारिक निबंध ह्याबाबत निर्णय हवा असल्यास पत्ता लिहिलेले एक पोस्ट कार्ड पाठवावे. गद्याबाबत निर्णय कळवल्यानंतरही, तावडतोब प्रसिद्ध होईलच असे नाही. यथावकाश प्रसिद्ध होईल.

५. अनाहूत समीक्षणे प्रसिद्ध होणार नाहीत. 'युगवाणी'-कडून मागवली गेलेली समीक्षणेच प्रसिद्ध होतात.

६. 'युगवाणी' साहित्यप्रेमाला, साहित्याला मोकळी वाट देते. पण ते साहित्य अभिरुचीसंपन्न असावे.

अनुक्रमणिका

फाशी

बशीर सा० मुजावर

पेढयांची दुसरी परातही संपली तेव्हा मात्र विमलाबाईंना विलक्षण थकवा आला. थकवा होता तोही शारीरिक. मन मात्र दुप्पट वेगाने उसळ्या मारीत होते. त्यांनी तिसऱ्या परातीला हात घातला मात्र शेजारच्या सावित्रीबाईंनी त्यांना अडविले. "तुम्ही आता थकल्या आहात. थोडीशी विश्रांती घ्या. तुमचे काम मी करते." असे म्हणत जवळ जवळ त्यांनी त्यांच्या हातातील परात हिसकावून घेतली.

उरात न मावणारा आनंद विमलाबाई हातांवाटे उधळत होत्या. तोही सावित्रीबाईंनी हिसकावून घेतला. अस्सा राग आला त्यांना सावित्रीबाईंचा. पण त्या तरी काय करणार. त्यांच्या इतकाच आनंद सावित्रीबाईंनाही झाला होता. एकाच चाळीत आणि अगदी शेजारचेच बिऱ्हाड असल्यामुळे त्यांचीही माया आपल्या स्वतःच्या मुलावर असल्यासारखीच होती. राजू त्यांना परका कधीच वाटला नव्हता. त्यातही सावित्रीबाई निपुत्रिक. साहजिकच त्यांचा राजूला लळा होता आणि या असल्या विशेष प्रसंगी त्यांनी आपला हक्क गाजवला नसता तरच नवल.

कपाळावरचा घाम पुशीत विमलाबाई थोडा वेळ बाजूला उभ्या राहिल्या. आपल्याच राज्याभिषेकाचा सोहळा दूर राहून पाहत असल्या सारख्या. सावित्रीबाई पेढे वाटत होत्या. त्यांच्या पुढे ही झुम्मड उडाली होती. प्रत्येकाचा उजवा हात पेढयांच्या परातीपर्यंत पोहचला होता. डावा हात मात्र गुंतला होता. त्या प्रत्येक हातात एक वर्तमानपत्र होते. ताजे. दुमडून घडी केलेल्या त्या वर्तमान पत्रावरची हेड लाईन मोठ्या दिमाखात आपली मोठी मोठी अक्षरे विमलाबाईंच्या डोळयापुढे नाचवीत होती. त्या एक दोन डोळयात भरणाऱ्या अक्षरांवरून त्या परत परत हेडलाईनीची उजळणी करीत करीत होत्या— राष्ट्रपतींनी दयेचा अर्ज मंजूर केला. राजूची फाशी रद्द !

तेवढयात कुणाचा तरी धक्का लागला. सावित्रीबाईंना परातीचे वजन झेपले नाही. परात उपडी झाली. सर्व पेढे रस्ताभर विखुरले. विमलाबाई विलक्षण संतापल्या. कसलं जळ्ळं मेलं लक्षण ! असल्या शुभप्रसंगी थोडी तरी काळजी घ्यायची. इडा पिडा टळो म्हणून त्यांनी आपली बोटे कानावर मोडली. आणखी काही अशुभ पाहायला लागू नये म्हणून त्यांनी डोळे घट्ट मिटून घेतले.

पण त्या अशा किती वेळ डोळे घट्ट मिटून ठेवणार होत्या. परात उपडी झाली, त्या आवाजाने त्यांची झोप मोडली ती मोडलीच. आपण रस्त्यावर घाम पुसीत उभ्या नसून आपल्याच काळंयामिट्ट खोलीत कॉटवर आडव्या आहोत हे लक्षात येताच त्यांच्या छातीतील भयाण पोकळी थंडगार हवेने भरून गेली. त्या तसल्या एकटेपणाच्या जाणिवेने आणखी भयभीत झाल्या.

जा पाखरा जा वणव्यातुनी या
पृथ्वीच आई पुढती तुझी रे
आकाश घेईल तुला कवेत
चारी दिशांचा तुला आसरा रे !

सारा वर्ग मुसमुसत होता. विमलाबाई तन्मयतेने शिकवीत होत्या. फाळणीच्यावेळी साऱ्या देशभर दंगली उसळल्या होत्या. मिळेल त्या मार्गाने जो तो देशाबाहेर पडण्याचा प्रयत्न करत होता. एका विमान–तळावर उड्डाण घेणाऱ्या विमानात एका मातेने आपले अर्भक लोटून दिले होते. माझे काहीही होवो, हा मात्र जगात कुठेही सुरक्षित राहील या एकाच भावनेने तिने हे साहस केले होते. आकाशात वेगाने झेपावणाऱ्या विमानातील आपल्या बाळाला ती निरोप देत होती.

कुसुमाग्रजांच्या या कवितेने सारा वर्ग भारावून गेला होता. विमलाबाई स्वतः त्या विमान

अनुक्रमणिका

तळावर पोहचल्या होत्या. गर्दीतून वाट काढीत आपल्या कवेतल्या राजाला त्यांनी एकदार हृदयाशी कवटाळून आकाशात झेपावणाऱ्या विमानात लोटून दिले होते. अश्रूंचा कढ आवरत नव्हता. हातातील रुमालाचा तुकडा भिजून चिंब झाला होता. डोळ्यांना पुढील ओळी दिसत नव्हत्या. तरी त्या वाचत होत्या. तोच दारात शाळेचा शिपाई उभा राहिला,

"बाई, हेड सरानी बोलावलंय."

बाईंना सुटल्यासारखे झाले. या भावनेच्या आत्यंतिक आवेगातून बाहेर पडायला काहीतरी निमित्त हवे होतेच. त्यांनी शिपायाचे मनोमन आभार मानले, पुस्तक मिटून टेबलावर ठेवले. मुलांना पुढील ओळी वाचायला सांगून त्या वर्गाबाहेर पडल्या.

विमलाबाईंनी कूस बदलली. एक गुरखा काठी आपटत त्यांच्या दारासमोरून गेला तेव्हा त्यांच्या लक्षात आले की आता चार वाजायला आलेत. चटकन उठून नळावर जायला हवे. नाहीतर तिथेही भलीमोठी रांग लागायची. तासभर थांबून सुद्धा नंबर मिळायची मारामार. पण आता त्या पाणीतरी कुणासाठी भरणार होत्या? पाणी म्हणजे जीवन. पण राजूशिवाय आता कसले जीवन! इतके दिवस ओढले ते केवळ राजू इथे नसला तरी तुरुंगात तरी जिवंत आहे म्हणून. कदाचित देवाला दया येईल आणि त्याची फाशी रद्द होईल या आशेवर क्षण क्षण रेटला. पण आज-आज मात्र सारेच पालटले होते. राष्ट्रपतींनी दयेचा अर्ज फेटाळल्याची तार कालच तुरुंगाधिकाऱ्यांना मिळाली होती. जेलर साहेबांनी खास माणूस पाठवून त्यांना ही बातमी कळविली होती.

रित्या होत चाललेल्या शरीरात थंडी भरू लागली तसे अभावितपणे त्यांनी ब्लँकेट डोक्यापर्यंत ओढून घेतले.

विचारांच्या गर्तेत विमलाबाईंची चार वर्षांची विमल केव्हा झाली हे त्यांच्या लक्षातही आले नाही. विमी म्हणूनच सर्व तिला हाक मारीत. तर ही विमी आपल्या मावशीच्या कुशीत झोपली होती. बाबा हॉस्पिटलमध्ये होते. त्यांचा आजार बळावला होता. म्हणून आईलाही तिथेच बाबांच्या सोबतीला राहावे लागत होते. घरी सोबतीला कुणी नव्हते म्हणून आईने मावशीला बोलावून घेतले होते. दिवसभर ती शाळेत किंवा आईबरोबर हॉस्पिटलमध्ये येरझारा घालीत असे. रात्र पडली की तिला मावशीच्या कुशीत शिरावे लागे. मावशीची ऊब तिला बाबांच्या आजारापासून काहीकाळ दूर नेऊ शकत असे. पण तेवढीच. एकदाची झोप लागली की मग तिला चित्रविचित्र स्वप्ने पडू लागत. डोळे उघडे ठेवून निश्चेष्ट पडलेले बाबा आणि त्यांच्या शरीरावर हुंबरडा फोडत असलेली आई तिला दिसे. किंवा दारासमोर खूप लोक जमले असून ते आपल्या बाबांची तिरडी बांधत आहेत असा भास होई. ती दचकून जागी होई. तिची हालचाल वाढली की मावशीचा हात तिच्यावर आणखी घट्ट होई. परत ती अर्धवट ग्लानीत आल्यासारखी पडून राही.

एका सकाळी ती जागी झाली तर दारात ॲम्ब्युलन्स उभी होती. गल्लीतील सारी माणसे तिच्या भोवती जमा झाली होती. चारपाच जण बाबांचा देह सावकाश खाली घेत होते. आई थिजलेल्या बर्फासारखी शांत उभी होती. चिमुकल्या विमीला मावशीने आपल्या पायाशी जखडून ठेवले होते.

विमलाबाईंना वाटले, आता आपला डोळा लागेल आणि राजा दार वाजवील. नाहीतरी त्याला आता सवयच लागलीय, रात्री अपरात्री येण्याची. पूर्वी नव्हता तसा वागत तो. कसा वेळच्यावेळी जेवायचा. अभ्यास करायचा-रात्री बाहेर पडायचा नाही. लवकर झोपून लवकर उठायचा. अलिकडे तर तो मला पाणीसुद्धा भरू नाही द्यायचा. नाहीतरी पहिल्या मजल्यावर बादली चढविताना किती दमछाक व्हायची. दोन तीन बादल्या आणल्या की राजा त्यांच्या हातातून बादली काढून घ्यायचा. बाकीचे सारे पाणी स्वतः भरायचा. नंतर मात्र त्याला गरम गरम पोळी लागायची. पोळी तयार झाली की नाही हे विचारण्यापूर्वीच पाट ओढून बसायचा.

शाळा सुटली आणि तो मेला-म्हापश्या-त्याच्या नादी लागला. आणि आतातर कधीही येतो-रात्रीचे दोन म्हणत नाही की पहाटेचे पाच.

विमलाबाईंचे कान तिखट झाले. जिन्यावर कुणाची तरी पावले वाजली. आता राजा येऊन दार धडकणार. नीट हाक पण मारणार नाही. मलाच उठावे लागणार. आल्या आल्या अंथरुणात घुसेल आणि मुटकुळे करून झोपेल. पसरेल दहा वाजेपर्यंत—

जिन्यावर पावले वाजणार नव्हती आणि दारपण धडकणार नव्हते. त्या दिवशी शाळेचा शिपाई बोलावून गेल्यावर त्या वर्गाबाहेर पडल्या त्या थोडयाफार सुटल्या अवस्थेतच. वार्षिक परीक्षा जवळ आली. त्या संबंधात घाई चालली होती. हेडसरांना त्या बाबतीत काही सूचना द्यायच्या असतील असा मनाशी विचार करीत त्या ऑफिसात शिरल्या.

नेहमीप्रमाणे सरांनी त्यांचेकडे पाहून स्मित केले नाही. त्यांच्या उतरलेल्या चेहऱ्याकडे पाहून त्यांना एकदम कसेतरी झाले. ऑफीसमध्ये एक शिपाई सोडला तर स्टाफपैकी आणखी कुणी नव्हते. आणखी तिघेजण. प्रथम त्यांच्या डोळ्यांवर विश्वासच बसला नाही. या पोलीसांचे इथे काय काम? त्या स्वत:शीच प्रश्न विचारू लागल्या.

"बाई, आलात? तिथं थोडावेळ बसून घ्या." सरांनी शांत आवाजात बोलायला सुरवात केली, "धीर सोडू नका. सर्व काही ठीक होईल. फक्त तुम्ही मनाची तयारी केली पाहिजे."

विमलाबाईंना आपण काय ऐकतोय हेच कळेना. माझ्या राजाला तर काही झाले नसेल? त्यांनी मनातल्या मनात देवाचा धावा सुरू केला.

"राजा तापसेच्या तुम्ही आईच ना? तुमच्या राजाला अटक करण्यात आली आहे. शहरात सुरू असलेल्या भयानक खूनसत्राच्या संदर्भात." शिशाचा तप्त रस ओतल्याप्रमाणे शब्द विमलाबाईंच्या कानात शिरले. आपण काय ऐकतोय हे कळण्यापूर्वीच त्या मटकन खाली बसल्या.

सुन्न झालेल्या ऑफीसच्या वातावरणाचा भंग करीत त्यांच्यातील एकजण बोलला,

"बाई आम्हाला सहकार्य हवे आहे. तुमच्या घराची झडती घ्यायची आहे."

बधिर झालेल्या कानामध्ये यातील एकही शब्द शिरला नाही. हेडसर आणि शिपाई यांनी त्यांना आधार केव्हा दिला आणि ते सर्वजण घरापर्यंत कधी पोहोचले हे त्यांना समजलेच नाही.

दोन महिन्यापूर्वीचे ते भीषण हत्याकांड. सारे शहर हादरून गेले होते. शहराबाहेरच्या एका एकाकी बंगल्यात पाच खून पडले होते. दोन वृद्ध—आजा आणि आजी. तीन नातवंडे. सर्व दहा वर्षांखालील. दोरीने फास लावून त्यांचे जीव घेतले होते. घरातील चीज वस्तू लुटून नेली होती. प्रतिकार करू शकणारे कुणीच नव्हते. सर्व देशभर केवळ अमानुष या एकाच शब्दाने या प्रकाराची संभावना झाली होती. खुन्यांनी मागे कसलाही धागा सोडला नव्हता. अगदी श्वान पथकाने सुद्धा माघार घेतली होती. त्यामुळे त्या भीषण हत्याकांडामागे विलक्षण गूढ निर्माण झाले होते.

उकळत्या चहामध्ये दुधाची धार सोडून तो कपात गाळून घेण्यासाठी विमलाबाई थांबल्या होत्या. राजा अजून उठला नव्हता. असाच पहाटे तो केव्हातरी आला होता. नाहीतरी त्याची आता सवयच झाली होती. उठेल आता कधीतरी दहा अकरा वाजता असे स्वत:शीच पुटपुटत त्यांनी चहाच्या भांड्याला हात घातला. तोच शेजारच्या सावित्रीबाई 'अहो ऐकलंत का' म्हणत आत शिरल्या. त्यांच्या हातात वर्तमानपत्र होते. हातातली गाळणी तशीच धरून त्यांनी शहरात रात्री घडलेला प्रकार सावित्रीबाईंच्या तोंडून ऐकला होता. मधून मधून त्या संदर्भासाठी वर्तमानपत्रातल्या ओळी वाचून दाखवीत होत्या. बातमी ऐकून त्यांची चहावरची वासनाच उडाली. चहाचे भांडे स्टोव्हवर तसेच उकळत राहिले.

राजाने झोपेत थोडी चुळबूळ केली. तो या कुशीवरून त्या कुशीवर वळला. सावित्रीबाई वाचत होत्या त्यावेळी त्याने आपल्या तोंडावरचे पांघरूण दूर केले होते. त्याने ही बातमी एकाग्रतेने ऐकली. सावित्रीबाई निघून जाताच परत त्याने पांघरूण तोंडावर ओढले व झोपी गेला.

विमलाबाईंनी खाली जाऊन ते वर्तमानपत्र विकत आणले. त्या ती बातमी सविस्तर वाचू लागल्या. कोवळ्या कोवळ्या चिमण्या जिवांचे

फोटो काळजात घरे पाडीत होते. तसेच शक्तीहीन, असहाय वृद्धांची अस्ताव्यस्त पडलेली प्रेते— सारेच सहनशक्तीच्या पलिकडील होते. त्यांना मळमळून आले. एवढी बातमी ऐकूनही राजा शांतपणे झोपला होता. तोंडावरील पांघरूण बाजूला करून ऐकण्यापलीकडे त्याच्यात काहीही बदल झाला नव्हता. त्यांनी राजाला मुद्दाम हलवून जागे केले.

"अरे राजा, ऐकलंस का रात्री शहरात काय घडलंय ते ! बघ, मी मुद्दाम जाऊन पेपर आणलाय. उठून वाच जरा ही बातमी."

"कशाला ? सावित्रीबाईंच्या तोंडून ऐकली मी. पुन्हा पुन्हा त्यात काय वाचायचे ?" राजा तुटकपणे बोलला.

"अरे घटना काही साधी नाही, हे फोटो बघ. किती अमानुषपणे खून केलेत मेल्यांनी. एवढं होत असताना देवानं कुठ तोंड लपवलं होतं कुणास ठाऊक !" विमलाबाई कळवळून बोलल्या.

राजा हसला. म्हणाला, "आई, खरं सांगू ? मरणारे मेले. म्हणजे मारणारांनी त्यांना मारलं. जे काय पाप लागायचं ते गुन्हेगारांना लागेल, त्यात तुला एवढं काय वाटायचं ? शिवाय पुढलं सार बघायला पोलीस आहेत की—"

राजा असलं काही बोलेल अशी त्यांना कल्पना नव्हती. विमलाबाई शहारून गेल्या तरी पण त्या म्हणाल्या,

"अरे, हे सर्व खून रात्री झालेत. तूही रात्रभर बाहेरच असतोस. न जाणो त्या मोकाट खुन्यांच्या तावडीत—"

त्या अचानक थांबल्या आपण हे अमंगल बोलायला नको होतं याची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली. नरमाईच्या स्वरात त्या म्हणाल्या,

"राजा, आईचं एवढं ऐक. रात्री अपरात्री असा बाहेर राहत जाऊ नकोस." हातातली वर्तमानपत्राची घडी टेबलावर टाकून त्या स्वयंपाकाला वळल्या.

दिवसभर शाळेत शिकवताना त्यांचे सारे लक्ष त्या बातमीवरच केंद्रीत झाले होते. राहून राहून त्या चिमण्या जिवांचे फोटो त्यांच्या नजरेसमोर उभे राहत होते. त्यातून राजाची त्यावरील कठोर वक्तव्ये. त्यांना स्वत:चीच लाज वाटली. आपल्या पोटच्या पोराने एवढे कठोर व्हायला नको होते.

संध्याकाळी त्या परत आल्या तर राजा घरीच होता. कॉटवर पालथा झोपला होता. त्यांनी जवळ जाऊन पाहिले. त्याला झोप लागली होती. पण चेहरा उतरला होता. तापाच्या ग्लानीत पुटपुटावे तसे त्याचे ओठ हलत होते. त्यांनी त्याच्या कपाळाला हात लावून पाहिला. चांगला भाजून काढणारा ताप होता. त्यांना गलबलून आले. त्यांनी हळुवार आवाजात त्याला हाक मारली, "राजा—"

राजाने डोळे उघडले. त्याचे शरीर थंडी भरल्यासारखे हुडहुडत होते. लगबगीने त्यांनी सुंठीचा चहा तयार केला. चहा घेतल्यावर तो थोडा शांत झाला. अंगावर चादर लपेटून तसाच बसून राहिला. विमलाबाईचे लक्ष टेबलावर गेले. सकाळी टाकलेले वर्तमानपत्र तिथे नव्हते. त्यांनी राजाला विचारले; तो म्हणाला,

"आई, असल्या बातम्या वाचायला तुला आनंद वाटतो ? मी सकाळी बोललो ते काही खरं नव्हत. खरं म्हणजे इतका भयानक प्रकार ऐकताना मी पुरता मोडून गेलो होतो सकाळी. त्यात आणखी भर म्हणून तो पेपर विकत आणलास. खरोखर कसली उत्सुकता होती त्यात ? ती भयाण अमानुष वार्ता परत परत वाचायला ? मी टाकला फाडून तो. एवढे बोलताना राजाला घाम फुटला होता.

विमलाबाईंचा आपल्या कानांवर विश्वासच बसेना. सकाळचा राजा हाच का असा संभ्रम पडला. सकाळचा राजा खरा नाहीच. खरा आहे तो आताचा. शेवटी माझाच पोर तो. त्यांचा ऊर अभिमानाने भरून आला.

एक महिनाच उलटला असेल. शहरातल्या दुसऱ्या कोपऱ्यात, एकाकी बंगल्यात आणखी चार खून पडले. अगदी त्याच पद्धतीने. सारे शहर हादरून गेले. पुरा महाराष्ट्र ढवळून निघाला. यावेळीही खुन्यांनी माग ठेवला नव्हता. खुनांमागले गूढ वाढले होते. मागचा प्रकार घडूनही राजाने आपला नेहमीचा उशीरा येण्याचा शिरस्ता सोडला नव्हता. तो आपला पहाटे येतच होता.

अनुक्रमणिका

यावेळी सकाळी बातमीने खळबळ उडवून दिली तरी राजा घरी परतला नव्हता. राजा येईपर्यंत विमलाबाईंना रुखरुख लागून राहिली होती. सकाळी तो जेव्हा घरी परतला तेव्हा कुठे त्यांचा जीव भांड्यात पडला.

खुनी सापडत नव्हते, सारे शहरभर भीतीचे साम्राज्य पसरले होते. रात्री आठनंतर कुणी एकटा दुकटा बाहेर पडत नव्हता. राजाला मात्र त्याचे काहीच नव्हते. विमलाबाईंचा जीव गोळा होत होता. पण त्याला अडवू शकत नव्हत्या. त्याला कुठेतरी नोकरीत गुंतवला पाहिजे म्हणजे त्या म्हापशाची संगत सुटेल आणि ताळ्यावर येईल. हेडसरांना कुठे तरी शब्द टाकायला सांगितले पाहिजे.

राजाला अटक झाली आणि सारे संपले. राजाबरोबर म्हापशा आणखी दोघेजण होते. इतके दिवस ज्या ताठ पायावर आपण उभे होते ते नियतीने खालून ओढले आहे असे त्यांना वाटले.

आज शेवटचा दिवस. राजाच्या आयुष्यातला आणि तसे म्हटले तर आपलाही. राजाला अटक झाल्यापासून जवळजवळ पाच वर्षे लोटली. राजा सुटला नाही तरी त्याला फाशी तरी नक्कीच होणार नाही याची विमलाबाईंना खात्री होती. खटला उभा राहिल्यापासून पोलीसांनी उभा केलेला पुरावा राजाच्या वकिलांनी पुरता मोडून काढला होता. राजाने खुनाच्या गुन्ह्यात भाग घेतला होता, पण मनापासून नाही. केवळ अपघाताने म्हापशाबरोबर त्याला राहावे लागले होते. या हत्याकांडातला खरा सूत्रधार खरोखर एकटा म्हापशा होता. बाकी सारे हुकुमाचे ताबेदार. कोर्टात वकिलांनी पढविल्याप्रमाणे बोलणाऱ्या राजाने आईजवळ मात्र सारे ओकून टाकले होते. प्रत्यक्ष खून होईपर्यंत आपण काय करतोय हे त्याला माहीत नव्हते. त्याला वाटले होते ही सर्व गंमत चालली आहे. फार तर एक धाडशी दरोडा. प्रत्यक्ष म्हापशाने खिशातून दोरी काढली तेव्हा मात्र बाकीचे सुन्न झाले. पण त्याला प्रतिबंध करण्याचे साहस मात्र कुणीच केले नव्हते. आता वेळ गेली होती. म्हापशा–जंगली लांडगा !

दाराच्या फटीतून बाहेरचा प्रकाश आत शिरला तेव्हा त्या उठून बसल्या. बादली घेऊन त्या खाली आल्या. नळावर आधीच लावलेली बादली कुणीतरी काढून घेतली. त्यांना मोकळी वाट. त्यात सहानूभूती किती व तिरस्कार किती याचा अंदाज त्यांना आला नाही. नाही तरी गेली पाच वर्षे हे असेच चाललंय. महारोग्याला वागवावे तसे सर्वजण वागवितात. शाळेतल्या सहकाऱ्यांची ही तीच तऱ्हा. प्रत्येक जण तोंडावर सहानुभूतीने बोलतो. पण शक्यतो सर्वजण टाळतात. अगदी हेडसर सुद्धा कामाव्यतिरिक्त काही बोलत नाहीत. इतरांचे ठीक आहे, पण हेडसरांबरोबरचे संबंध बिघडून चालणार नाही. त्यांना एकदा समजावून सांगितले पाहिजे. माझा राजा खरोखर तसा नाही हे त्यांना कळले पाहिजे.

ऑफीसमध्ये हे सर्व सांगणे अशक्य आहे. कोणी सहकारी नसताना सर एकटे सापडणेही कठीण आहे. त्यांना घरीच गाठले पाहिजे. एका रविवारी सकाळीच त्या हेडसरांच्या घरी गेल्या. न जाणो सुट्टीचा दिवस म्हणून सर सकाळीच बाहेर पडायचे आणि मग भेट नाही व्हायची. दाराची बेल वाजवून त्या थांबून राहिल्या. दार उघडायला स्वतः हेडसरच आले. त्यांना पाहताच त्यांनी त्यांचे स्वागत केले. आत येऊन बसायला सांगितले. आत येऊन त्या संकोचाने खुर्चीत बसल्या.

तोपर्यंत त्यांच्या मिसेस बाहेर आल्या होत्या. त्यांना पाहताच सरांच्या चेहऱ्यावरचे भाव पालटले. किंचित नरमाईच्या सुरात म्हणाले,

"या आमच्या शाळेतल्या विमलाबाई."

"हं. मला माहित आहे ते. राजा तावसेच्या आईच ना ?" त्यांच्या कोरड्या स्वरात उपरोध होता. विमलाबाईंना वाटले चटकन उठावे आणि निघून जावे. त्यांच्या मिसेस आत गेल्या तेव्हा हेडसर समोरच्या खुर्चीवर बसले.

"हं बोला."

पण काय बोलायचे ते विमलाबाईंना समजेना सांगायचे होते खूप, पण सुव्यवस्थित जुळणी केली नव्हती. अभ्यास न केलेल्या विषयावर ऐनवेळी परिक्षेत निबंध लिहायला यावा तसे झाले. गळ्याशी आलेला कढ त्या तशाच दाबत राहिल्या.

आत कपवशांचा आवाज होत होता. बाजवी पेक्षा जास्तच. थोडचा वेळाने चहा आला. निमूटपणे त्यांनी तो घेतला. हेडसर तसेच शांतपणे बसून होते. शेवटी त्यांनी विचारले,

"बाई काय काम होतं बोलला नाही ?"

"माझा राजा तसा नाही हो–" एकदम कंठ फुटल्यासारखा त्या हमसून– हमसून रडू लागल्या. सांत्वनासाठी हेडसरांची चुळबूळ चालू होती. पण ती खुर्चीतच. त्यांच्या मिसेस परत दारात येऊन उभ्या राहिल्या होत्या. आवेग संपल्यानंतर त्या उठून उभ्या राहिल्या.

"जाते मी."

"अहो पण–" हेडसरांनी बोलायचा प्रयत्न केला. पण त्यांनी आपले शब्द तिथेच थांबवले. त्या दारापर्यंत आल्या तेव्हा पाठीमागून त्यांच्या मिसेसचा आवाज आला,

"बाई, काही काम असेल तर ऑफीसमध्येच भेटत चला. शाळेत."

विमलाबाईंनी मागे वळून पाहिले नाही. हेडसर दारापर्यंत आले होते की नाही कुणास ठाऊक. त्या तशाच चालत राहिल्या.

शेजारच्या सावित्रीबाई तर किती वेळा घरी यायच्या. तासन् तास गप्पा मारायच्या. झालेल्या भीषण हत्याकांडावर अधूनमधून चर्चा व्हायची. त्या खुन्यांना शिव्या घालायच्या. शिव्या देण्यात जणू त्यांची स्पर्धाच चालायची. आता मात्र त्यांनी येणं बंद केलं. त्यांचे काम निघायचे नाहीच. पण विमलाबाईंचे काही काम निघालेच तर त्या त्यांची दारातूनच बोळवण करायला लागल्या.

पाण्याची बादली घेऊन त्या वर आल्या. आज राजाचा शेवटचा दिवस. त्याला आज शेवटचे पाहायचे. पाच वाजताची भेट ठरलीय. त्यानंतर दर्शन नाही. काहीतरी चांगले करून नेले पाहिजे. त्याला आवडणारे. राजाला काय काय आवडते ? म्हणजे जे आवडत नाही ते सर्व काही आवडते. भेंडीची भाजी असली म्हणजे अर्ध्या ताटावरून उठायचा. त्याचे वडील होते तो पर्यंतच घरात भेंडीची भाजी होत राहिली. त्यांच्या मागे त्यांनी भेंडीच बंद केली. मग—? त्या स्वतःशीच हसल्या. राजाला फाशीची शिक्षा सुनावल्यापासून त्यांना अशीच सवय लागलीय. मध्येच हसण्याची. त्यांच्याही ते लक्षात येतं. मग लगेच आसपास कुणी नसल्याची त्या खात्री करून घेतात.

काही उत्साही विद्यार्थ्यांनी हेडसराजवळ तक्रार केली. होती की बाई शिकवताना उगीचच हसतात. त्यांच्यातल्याच एका फुटिराने बाईंना ही बातमी पुरवली होती. तेव्हा मात्र त्या हबकून गेल्या. ऑफीसमध्ये सर्वजण आपल्याकडे संशयाने पाहात आहेत असा त्यांना भास होई. कुणी त्यांच्याकडे नुसते रोखून पाहिले तरी त्यांना वाटायचे कदाचित आपण हसलो तर नाही. जग आपल्याकडे वेगळयाच नजरेने पाहतेय याचा उपहास करायला त्या चेहऱ्याची थोडीफार हालचाल करायच्या. पण जगाला वाटतं, मी हसतेय. बिचारे !

रांधताना त्या परत कुसुमाग्रजांच्या ओळी गुणगुणू लागल्या—

जा पाखरा जा वणव्यातुनी या
पृथ्वीच आई पुढती तुझी रे

त्या चांगल्या तल्लीन झाल्या. न कळत त्यांचा आवाज केव्हा चढला हे त्यांनाही कळले नाही त्या रांधत नव्हत्याच, एका हातात पुस्तक व दुसऱ्या हातात खडूचा तुकडा घेऊन त्या उभ्या राहिल्या होत्या. जसजशा ओळी सरकायला लागल्या तेव्हा खडूची जागा रूमालाने घेतली. खडचा आवाजात त्या म्हणू लागल्या–

आकाश घेईल तुला कवेत
चारी दिशांचा तुज आसरा रे

शेजारच्या वर्गावर कोणी शिक्षक नसावेत. नाही तर त्या वर्गातील मुले अशी खिडकीत येऊन उभी राहिली नसती. त्यांना ते आवडले नाही. कविता वाचताचे थांबवून त्या ओरडल्या,

"आपापल्या वर्गात जा पाहू ? इथं कुणी थांबायचं नाही."

त्यांचे मोठयाने कविता गायन ऐकून शेजारच्या सावित्रीबाई आणि रमाकाकू खिडकीत येऊन उभ्या राहिल्या होत्या. विमलाबाई ओरडताच त्या तोंडाला पदर लावून एकदम बाजूला झाल्या. तेव्हा कुठे त्यांच्या लक्षात आले की आपण आता वर्गात नाही. राजीनामा देऊन एक महिना होऊन गेला. जुनी सवय जात नाही.

परत खाली बसून त्या रांधू लागल्या.

राजाला अटक झाल्याची बातमी वर्तमानपत्रातून माहेरी पोहचली आणि त्यांचा भाऊ धावत पळत आला. आल्या आल्या बहिणीच्या गळे पडून रडला. तुरुंगात जाऊन राजाला भेटून आला. आल्यावर म्हणाला,

"चांगला वकील दिला पाहिजे. राजाला काही होणार नाही."

मग तो चांगला तीनचार दिवस राहिला. शहरातल्या नामांकित देशपांडे वकिलाकडे केस सोपवली. पाच हजाराचा चेक लिहून बहिणीच्या हातावर ठेवला. त्या नंतर तो अदृश्य झाला तो कायमचाच. आज कदाचित येईल. शेवटचे दर्शन घ्यायला. राजाचे आणि माझेही–

त्या परत हसल्या.

"आपण की नाही एक गंमत करणार आहोत." त्या स्वत:ला सांगू लागल्या," पहाटे पहाटे राजाला फासावर चढवतील. लोक म्हणतील, राजा मेला. एक गुन्हेगार जगातून नाहीसा झाला. समाजाला लागलेली कीड काढूनच टाकावी लागते–

फाशीची शिक्षा सुनावल्यावर न्यायमूर्तींचे त्या केसवरचे वक्तव्य विमलाबाईंना अजून आठवत होते. गुन्हेगार वयाने लहान असले तरी त्यांनी खून ज्या थंडपणाने केले आहेत की त्यांच्या संबधात त्यांना दया संभवतच नाही. एक वृद्ध जोडप्याची–की ज्यांनी आयुष्यभर जबाबदार नागरिकाचे आचरण केले, त्यांची संध्याकाळ अमानुषपणे त्यांनी संपवली. जी बालके ज्यांनी जगाच्या मुखडाही पाहिला नाही त्यांची सकाळ तितक्याच थंडपणाने नष्ट करून टाकली.

त्याच वर्तमानपत्रात शिक्षेबद्दल समाधान व्यक्त, करणारा संपादकांचा लेख होता. तो लेख त्यांनी मोठ्या धैर्याने आणि संयमाने शेवटपर्यंत वाचला होता.

आजच्या भेटीला आपणाला एकटीला जायला जमायचे नाही. आपले पाय लटपटतील. कदाचित परत येताना चक्कर येईल. कुणीतरी सावरायला हवे. रस्त्यावरच काहीतरी घडेल. तसे नको काही घडायला. तसे झाले तर नंतरचा साराच कार्यक्रम बिघडून जाईल, राजाचा प्रत्यक क्षण आपणाला जगायचा आहे. त्याचा प्रत्येक श्वास अनुभवायचा आहे आणि नंतर–

"कुणालाच नाही सांगणार," त्या त्वेषाने बोलल्या, "मेल्या नुसत्या भिंतीला कान लावून बसतात काहीतरी ऐकायला मिळेल म्हणून."

सावित्रीबाईंनाच बरोबर घेऊन जावे. त्यांचे घरही आपल्या शेजारीच आहे. निदान त्यामुळे तरी त्या आपणास घरापर्यंत नीट घेऊन येतील. त्या शेवटच्या भेटीनंतर मला नीट घरी आलेच पाहिजे. नाहीतर लोक मला वेडी म्हणतील. एकदा घरात पोहचले की बस. पहाटे पहाटे राजा गुल् ! नंतर डेड बॉडी घ्यायला बोलावलय ! कोण येतय डेड बॉडी घ्यायला बघा तर खरं. . .

त्यांना मनापासून वाटत होते, आजची फाशीही पुढे ढकलली जाईल. आतापर्यंत दोन वेळा तारीख ठरली. दोनही वेळेला पुढे ढकलली गेली. एकदा कुणी फाशीचा कैदी म्हणून सात वर्षे तुरुंगात काढली म्हणून त्याने फाशीच्या शिक्षेच्या माफीचा अर्ज केला. त्या अर्जाचा विचार करण्यासाठी देशातील सर्वांचीच फाशी स्थगित करण्यात आली. दुसऱ्या वेळी कुणी फाशीच्या दोरालाच आव्हान दिले. पुन्हा सर्वांची शिक्षा स्थगित झाली. बेमुदत. किती आनंद झाला होता त्यांना ! राजाचा अर्ज राष्ट्रपतींकडे पडून होता म्हणून बरे, निदान शिक्षेची अंमलबजावणी तरी होत नव्हती. राजाच्या आयुष्याची दोरीच बळकट. राष्ट्रपतींनी दयेचा अर्ज फेटाळला म्हणून काय झाले. आणखी काहीतरी असेच घडेल. कमीत कमी काही दिवस तरी पुढे ढकलली जाईल.

फाशी स्थगिती आणि फाशीच्या दोराला आव्हान यामुळे पुरा देश ढवळून निघाला होता. शहर मात्र पेटून निघाल्यासारखे झाले होते. सरकारच जाणूनबुजून शिक्षेच्या अंमल बजावणीस दिरंगाई करीत आहे असा सूर उमटला होता. उघड उघड कुचेष्टा चालली होती. विरोधी पक्षही आपापल्या परीने त्याला हातभार लावीत होते.

सावित्रीबाई सांगत होत्या, "फास लावून दुसऱ्यांचा जीव घेताना वेदना झाल्या नसतील ?

ती काय माणसं नव्हती ? अहो या राज्यात गुन्हेगारांनाच भावना असतात. वेदना असतात. त्यांना नको काहीही भोगायला !"

विमलाबाई घरात जाता जाता थांबून हे सर्व ऐकत होत्या. सावित्रीबाई हसल्या तेव्हा तोंड फिरवून त्यांनी त्यांच्याकडे पाहिले. सावित्रीबाई दचकल्या. विमलाबाईंजवळ आपणाकडे वळून पाहण्याचे धैर्य असेल असे त्यांना वाटले नव्हते. ओशाळेपणाने त्या मागे सरल्या.

विमलाबाईंनी रोखून त्यांच्याकडे पाहिले. पुढच्याच क्षणी त्यांच्या चेहऱ्यावर हसू उमटले. त्यांनी आपल्या हसण्याला मुक्त वाट करून दिली. एखादा विनोद झाल्यासारखा सावित्रीबाई आणि ऐकणारी शेजारीण लगबगीने बाजूला झाल्या.

विमलाबाईंनी स्नान केले. ठेवणीतला शालू नेसला. केसांचा नीटसर अंबाडा घातला. राजाचा डबा भरून ठेवला. निघायला अजून तासभर तरी अवकाश होता. सावित्रीबाईंना सांगून यायला हवे बरोबर यायला. त्यांना सांगायला त्या बाहेर पडल्या.

सावित्रीबाईच्या दाराला कुलूप होते.

मग त्या एकटयाच गेल्या. भेट आटोपून परत यायला चांगले आठ वाजले. राजाची शिक्षा रद्द झालीय. फार तर उद्यापर्यंत त्याला सोडतीलही अशा थाटात त्या त्याच्याशी बोलत होत्या. आपण करून आणलेल्या पदार्थांचे गुणगान करीत होत्या. राजा जेवत होता. समोरचा डबा त्याने एका दमात फस्त केला तेव्हा त्या प्रसन्नतेने हसल्या. भेटीची वेळ संपली तेव्हा राजा उभा राहिला. आईच्या डोळयांत खोलवर पाहून घेत तो दूर झाला. पाठ वळवून दिसेनासा झाला.

विमलाबाईंनी हसतमुखाने जेलर साहेबांचा निरोप घेतला. बाहेर पडताना त्यांचे पाय लटपटले नाहीत. फाशीची वेळ त्यांनी नीट विचारून घेतली. पहाटे ठीक साडेचार वाजता. रात्री घडयाळ नीट लावून ठेवले पाहिजे.

घरी आल्यावर त्यांनी पोटभर जेवण केले. कितीतरी वर्षात त्या पहिल्यांदाच अशा मनापासून जेवत होत्या. जेवणानंतर त्यांनी भांडी नीट घासून ठेवली. सारेकाही ठाकठीक असल्याची खात्री करून घेतली. माहेरी भावा सपत्र लिहून ठेवले. घडयाळाला चावी देऊन बरोबर गजर लावून ते नीट उशाशी ठेवून दिले. राजाच्या फाशीपूर्वी स्नान वगैरे आटोपले पाहिजे. एकदाचे साडेचार वाजले की बस !

दाराला आतून कडी घालून मग त्या पेटी जवळ आल्या. पेटीचे कुलूप उघडून दोर बाहेर काढला. फाशीची तारीख ठरल्या दिवशीच त्यांनी बाजारातून दोर विकत आणला होता. अगदी लपवून. दोराला लोणी लावून तो क़मावला जातो असे त्यांनी वाचले होते. रोज रात्री त्या गुपचुपपणे दोराला लोणी माखत होत्या. दोर परत पेटीत लपवून ठेवीत होत्या. आताही तो नीट अवस्थेत आहे याची खात्री करून तो परत पेटीत ठेवला. वर आढयाला खुणेच्या ठिकाणी नजर स्थिर करत त्या स्वतःशीच हसल्या.

देवाचे नामस्मरण करत त्या अंथरुणावर पडल्या. राजा रात्रभर पोथी वाचणार होता. तो बसतोय तर बसूदे. मला नाही जमायचं जागरण. त्या स्वतःशी पुटपुटल्या. त्यांनी डोळे मिटून घेतले. मिटलेल्या पापण्यांच्या पलीकडे कुणीतरी उभे होते. त्यांनी डोळे उघडून पाहिले. तो म्हापशा होता. या म्हापशामुळेच सारे घडले. पहिल्या दिवशी तो राजाबरोबर घरी आला होता. त्याची भिरभिरणारी नजर काहीतरी शोधत होती. त्या वेळीच त्यांना त्याचे लक्षण ठीक वाटले नव्हते. आपण त्या वेळीच त्याचा खून करायला हवा होता. म्हणजे फाशी मला झाली असती आणि राजा वाचला असता. पण आता खूप उशीर झाला होता.

उशीर तर झाला होताच. रात्रीचे बारा वाजून गेले होते. आणखी काही तासांचा अवधी. स्नान आटोपून आपण देवाचा जप करायचा. राजाला त्याच्या अखेरच्या क्षणी त्रास होऊ नये म्हणून देवाची आळवणी–आळवणी की गुळवणी ? गुळवणीच–पुरणपोळी–बरोबरची गुळवणी. पुरणपोळीचे जेवण असले म्हणजे राजा एखादी पोळी खायचा. खाल्ल्याचे नाटक करायचा. हळूच गुळवणीची ताटली तोंडाला लावायचा. ताटातली गुळवणी संपली की हळूच ताट पुढे करायचा. आणखी गुळवणी वाढण्यासाठी.

पहाटे उशालगतच्या घड्याळाचा गजर झाला तेव्हा विमलाबाई राजाला घेऊन चतुःशृंगीच्या यात्रेत मृत्युगोलाजवळ उभ्या होत्या. त्यात वर खाली आणि डावीकडून उजवीकडे बेफाम वेगाने धावणाऱ्या मोटर सायकलींच्या गोंगाटापुढे त्यांना काहीच ऐकू येत नव्हते. एका हाताने राजाला छातीशी कवटाळून त्या मृत्युगोलातील थरार अनुभवत होत्या.

फटाक्यांच्या धूमधडाक्याने त्यांना अचानक जाग आली. आज दिवाळीचा पहिला दिवस असून सुद्धा आपणाला उशीरा जाग आली याचा त्यांना खेद वाटला. बाहेर पहाटे पासून लोकांनी फटाक्याचा बार उडविला होता. त्यांनी आजूबाजूला पाहिले. खोलीत राजा नव्हता. सर्वांच्या सर्व फटाके घेऊन स्वारी खाली पळाली होती. त्याला अजून फटाके नीट पेटवता येत नाहीत. एखादा अॅटम बॉम्ब तोंडाजवळ फुटेल. तो ऐकायचा नाही. त्या लगबगीने उठल्या. दार उघडून पाहिले. खाली खूपशी माणसे आणि मुले त्यांच्या दारासमोरच फटाके उडवीत होती. एका मागून एक होणारे फटाक्यांचे आवाज कानांचे पडदे फाडत होते. दोन्ही कानावर गच्च हात दाबून धरीत त्या राजाला शोधू लागल्या, पण राजा कुठेच दिसेना.

"एवढे सारे फटाके घेऊन हा गेला तरी कुठे? बघा हो त्याला—काही तरी करून घेईल. राजा. एऽऽ–" जिन्यावरून खाली उतरून त्या रस्त्यावर धाऊ लागल्या.

वर्तमानपत्र विकणारा पोऱ्या रस्त्यावरून ओरडत चालला होता–शहरातील भीषण खून सत्रातील खुन्यांना फाशी दिली."

त्याच्या जवळचे पेपर संपण्यापूर्वी आपण तो अंक विकत घेतला पाहिजे याची प्रत्येकाला घाई झाली होती. ■

सी. जे. एफ. डी. टेल्को
पिंपरी, पुणे–४११०१८

भूक

शशिकांत तासगावकर

येरे येरे पावसा–पावसा
तुला देतो पैसा–पैसा
....
पाऊस आला मोठा !

"आई, आई, हे बघ, हे बघ, केवढा मोठा पाऊस ! अगं बघ तरी जरा, गारा बी पडल्यात ! आई मी बाहेर जाऊ. गारा येचायला ?"

"बाबा, गारानं काय व्हणार ? पोटात पाणीच व्हायचं ! आताच तांब्याभर पानी ढोसलसं ना ? ये इकडं, तुला कुशीत घेऊन निजते."

"आई, आभाळातनं गाराऐवजी दाणं पडलं असतं तर, कित्ती बरं झालं असतं, नाही !"

''लई बरं झालं असतं, माझ्या बाबा !"

तो प्रसंग आठवताच माझ्या डोळ्यात पाणी उभं राहिलं. अश्रूंच्या महापुरात वाहत जाऊन मी भूतकाळात पुन्हा गडप झालो. बाबा मुंबईला गिरणीत कामाला. कुठल्याशा बाईच्या नादी लागून नको नको त्या व्यसनांनी बरबटून गेला होता. घराकडं डोकून बघत नव्हता. चुलत्यानं–आत्यानं–सारी जमीन गळपाटलेली. भुकेच्या आगीत होरपळत राहाणं, हे आईच्या आणि माझ्या नशिबी आलेलं.

असाच आकाडाचा महिना होता. पाऊस चिबधार. चिमणी घरटं सोडत नव्हतं. आईला कुठं काम मिळत नव्हतं. दोन दोन दिवस गुळाच्या पाण्यावर काढावं लागत होतं. अशा वेळी एखादं म्हातारं माणूस गचकत होतं. त्याचं उत्तरकार्य जेवायला मिळत होतं. रोज असंच कुणी ना कुणी गचकावं नि त्याचं उत्तरकार्य जेवायला मिळावं असं मला वाटत होतं.

एक दिवस आम्ही उपाशी होतो. भुकेनं मी कासावीस झालो होतो. दोन वेळा गुळाचा चहा पिऊनही भूक शांत झाली नव्हती. आई वाकळ अंथरून झोपली होती. मी तिच्या कुशीत झोपलो होतो. आई मला थोपटून झोपविण्याचा प्रयत्न करत होती. पण भुकेल्यापोटी झोप कशी येणार ? मी सारखा कूस बदलत होतो. आई मात्र गप्प पडून होती. ती उठून कुणाकडनं तरी भाकरी मागून आणून मला देईल असं मला वाटत होतं, म्हणून मी सारखी वळवळ चालवली होती. पण यावेळी आई दाद देत नव्हती. खरं होतं तिचं. रोज कुणाजवळ दात इचकणार ? आणि उसनं–पासनं तरी कुठवर करणार ? त्यालाही काही सीमा असते. पण मला कुठलं आलंय ते कळायला ! मी आपली वळवळ चालूच ठेवली होती. याच वेळी माझ्या मनात एका म्हातारीचा विषय घोळत होता.

"आये..." मी हळूच म्हणालो.

"काय रं... ?" तिनं कुतुहलानं विचारलं.

"आगं, ती दादूनानाची म्हातारी लई आजारी हाय म्हनत्यात !"

"असू परती ! आपल्याला काय करायचं हाय ?"

"आगं, ती लई आजारी हाय. माणसं म्हणत्यात, ती आता जगायची न्हाय !"

"न्हाय जगू दे, न्हाय जगली तर ! तुला काय पडलंय तिचं ?" आईच्या ह्या सवालानं माझी वाचाच बंद झाली.

"तुला का ध्यान झालं तिचं ?" आईनं विचारलं.

"काय न्हाय ! आपलं उगीच ईच्यारलं !"

आई त्यावर काही बोलली नाही. ती म्हातारी मेल्यावर तिचं उत्तरकार्य जेवायला मिळेल, हा माझ्या मनातला हेतू तिला कळला नव्हता. थोड्या वेळानं तिचा डोळा लागला. आणि माझ्या कानावर पलिकडं आत्यांच्या घरात तांब्या, पितळ्या खडबडल्याचा आवाज आला. आईच्या कुशीतनं

हळूच बाहेर येऊन, अंधारात धडपडत मी आबांच्यात गेलो.

"नाने, मारत्या हाय का गं ?" मी चुलती जवळ माझ्या चुलत भावाची उगीच चौकशी केली.

"हाय, जेवतूया," नानी म्हणाली.

"सकाळी त्यानं माझ्या गोट्या चोरल्यात !" मी बळंच म्हणालो.

"एऽ कवा रं !" मारत्या चिडून ओरडला. त्याच्या एकाएकी ओरडण्यानं नरड्यात घास आडकला. तरी तो मला सारखा खेकसून म्हणत होता, "ए, कवा रं चोरल्या तुझ्या गोट्या ?"

"बरं, आसू दे आता; बस, जेव दोन घास !" असं नानीनं म्हणताच मी घुळकन् जेवायला बसलो.

नानीनं मला एक भाकरी वाढली. थाळीत दोन पळ्या कोरड्यास वाढलं. मी भाकरी मोडली. आर्धी थाळीत कुस्करली नि अर्धी मांडीवर ठेवली. खाता खाता कुणाचं लक्ष नाही असं बघून आर्धी भाकर हळूच मांडीखाली दडवली. जेवण संपवून हात धुऊन मी उठलो. दडवलेली आर्धी भाकरी हळूच काखेला मारली आणि गुपचूप येऊन आईच्या कुशीत शिरू लागलो.

आई मला कुशीत घेत नव्हती.

"आयेव ! धर तुला....!!"

"बीन आब्रूचा मुडदा !"

आईनं माझ्या हाततनं ती आर्धी भाकरी हिसकावून घेतली आणि लांब कोपऱ्यात भिरकावून दिली. दिव्याच्या अंधुक प्रकाशात ती भाकरी आईला वाकुल्या दाखवत होती नि आई तिच्याकडं पाहात ढळढळा रडत होती ! ■

देवचंद कॉलेज, अर्जुननगर
(जि. कोल्हापूर)

कावळे

यादव वांढरे

कावळ्याने पुन्हा झडप घातली. मी चवताळून उठलो. त्याला धडा शिकवायलाच हवा. हो. . . हो, शिकवायलाच हवा. किती सहन करायचे. काही मर्यादा ?

एकदा नव्हे. . . दोनदा नव्हे. . . चांगले चार वेळा त्याने माझ्या ताटावर झडप मारून माझं अन्न उष्टावले. तेही खिडकीतून झडप मारून.

सुरवातीला मला वाटले. बिचारा भुकेला असेल म्हणून त्याला माझ्या ताटातले अन्न बाहेर नेऊन टाकले. पण तो त्याला शिवला नाही. माझ्याकडे टक लावून बघत राहिला. मी पुन्हा नवीन ताटात अन्न घेताच झडप मारली. हा त्याचा प्रकार पुढेही सुरूच राहिला.

मग मी संतापलो.

बाहेर कावळा कुंपणाच्या खांबावर बसला होता. एकटक माझ्याकडे पाहात होता. काळ्याभोर मण्यासारखे चमकणारे त्याचे डोळे मला खिजवत होते. मी आणखीनच संतापलो.

"ठीक आहे वच्चमजी. पाहून घेतो तुला" म्हणून ताडकन् एक दगड उचलला आणि नेम धरून त्याच्यावर हाणला. आश्चर्य म्हणजे कधी बरोबर न लागणारा नेम बरोबर लागला.

तो तडफडत खाली कोसळला. मी जवळ येत आहे असं पाहून त्याने उठण्याचा प्रयत्न केला. सतत. पण टोला वर्मी लागला होता. त्याला उठणे शक्य नव्हते. प्रयत्न करकरून तो दमला. सरते शेवटी जमिनीवर आदळला.

मी त्याच्या जवळ गेलो आणि म्हणालो, "कशी जिरली खोड बेटचा. आता जाशील माझ्या वाटेला. अरे क्षुद्र प्राण्यांनी कधी माणूस नावाच्या प्राण्याच्या वाटेला जाऊ नये समजले !"

माझे हे बोलणे पूर्ण होत नाही तोच ताडकन् कुणीतरी माझ्या डोक्यावर घणाघाती प्रहार केला. मी विव्हळलो आणि खाली बसलो. वर पाह्यले. चार काळेभोर डोळे माझ्यावर आग ओकत होते.

थोडा उठून उभा राह्यलो. कावळे पुन्हा माझ्यावर झेपावले. टपाटप टोचा मारल्या आणि हात उगारायच्या आत पसार झाले. मी वेगाने घरात पळालो. गत्यंतर नव्हते.

त्यानंतर मग त्या कावळ्यांनी मला, माझ्या कुटुंबियांसकट घरात बंदिस्त करून टाकले. कुणीही घराबाहेर पडायचा प्रयत्न केला की ते टोचा मारून बेजार करायचे. रक्तबंबाळ करायचे.

ते दोघे जखमी कावळ्याच्या आजूबाजूला दोन दिशांना उभे राह्यले. पाळत ठेवत. कुणीही त्याच्या जवळ गेला की त्याला टोचा मारून हैराण करीत. . . पळवून लावीत.

मध्यंतरी एकजण जखमीजवळ जाऊन आला. कसल्यातरी खाणाखुणा केल्या. चोचेसकट मान डोलावत, सावध नजरेने मान डोलावत, सावध नजरेने खाणाखुणा करीत, काहीतरी सूचना दिल्यासारखे केले. जखमीने मनःपूर्वक आज्ञाधारकपणे मान डोलावल्यासारखी केली. मग उठण्याचा प्रयत्न न करता निपचित पडून राहिला.

लगेच दोघातला एकजण दूर आकाशात उडत गेला. अगदी दूर. . . अदृश्य झाला. तोवर दुसरा त्या जखमीचे संरक्षण करीत होता.

काही वेळाने पहिला परत आला. दुसऱ्याला काहीतरी खेदजनक भाषेत समजावले. त्याच्या चेहऱ्यावर निराशा होती.

मग ते दोघे एका ठिकाणी आले. गुप्त खलबत करीत बसले. मधून मधून हालचाली करणाऱ्या माझ्यावर त्यांची क्रोधिष्ट नजर वळायची. काही वेळाने त्यांच्यात काहीतरी ठरले. पुन्हा त्या दोघांनी एकवार माझ्याकडे पाह्यले . . रागाने...

मी हिंमत करून पाऊल पुढे टाकायचा प्रयत्न केला. तोच पहिला भरारी मारून माझ्याकडे झेपावला मी पुढचं पाऊल विद्युत वेगाने मागे घेतले.

आता दुसरा जखमीजवळ गेला. त्याला काही समजावल्यासारखे केले. त्यानंही मान डोलावली, मग दोन्ही जखमीच्या आजूबाजूला अंगरक्षकासारखे उभे राह्यले. जखमी सरपटत सरपटत पुढे सरकू लागला. मधेच तो दुःखाने कण्हे, चालणे थांबवी. तेव्हा दोघांपैकी एक जण त्याच्या जवळ जाऊन त्याला धीर देई. जखमी नाईलाजाने पुन्हा सरपटू लागे. कण्हत कुथत मध्येच तो दरवाज्यात उभ्या असलेल्या माझ्याकडे रागावून पाहू लागे. मान हलवून काही तरी पुटपुटल्यासारखे करी आणि चालू लागे.

शेवटी कसावसा जखमी माझ्या घरासमोरील पिंपळाच्या वृक्षाच्या ढोलीजवळ पोहचले. तिथे त्याला त्यांनी लपवले. सुरक्षितपणे कुणीही त्याला पाहू नये असं. मी देखील.

त्यांच्यातला एक पुन्हा आकाशात गडप झाला दुसरा जखमीचे रक्षण करीत. . माझ्यावर पाळत ठेवू लागला.

इकडे माझा पारा क्षणाक्षणाला चढत होता. एका काळ्याकुट्ट पक्षाने मला वंदिस्त करावे. माझ्यासारख्या पांढऱ्या शुभ्र माणसाला. . . नाही. . नाही. मला पण त्याला धडा शिकवलाच पाहिजे. डोकं विचार करायला लागले. काहीतरी जालीम उपाय शोधू लागले. "पापा. . पापा. . ते बघा" मी विचारात गुंतलेला असताना पाहून चिरंजीवाने आकाशाकडे दूरवर बोट दाखवले.

मी पुन्हा हादरलो. दूरवर एक काळं संकट. . . कर्णकर्कश आवाज करीत माझ्याच दिशेने झेपावत होते. एक नाही. . दोन नाही. . शे दोनशे कावळे. त्यांचा इरादा काही ठीक दिसत नव्हता. दूर अंतरावर असले तरी त्यांच्या डोळ्यातली आग मला जाळत होती.

मी हादरलो. ते माझ्यापर्यंत येण्यापूर्वी मला त्यांचा काहीतरी वंदोवस्त करायला हवा. नाहीतर ते माझा. . .

मी माझं डोकं चालवू लागलो. एकदम डोक्यात प्रकाश पडला. घरात धावलो. घरातलं माझं अन्नाने भरलेले ताट उचलले. छत्री डोक्यावर घेतली. आणि. जखमी कावळ्याकडे धावलो. त्याच्या जवळपास संपूर्ण अन्नाचे कण विखरून टाकले. अन् विद्युत वेगाने परतलो. दरम्यानच्या काळात पाहाऱ्यावरच्या कावळ्याने माझ्यावर हल्ला चढवला. पण डोक्यावरील छत्रीने वचावलो.

कावळ्यांचा. थवा तेथे येऊन पोहचला काही निर्णय घ्यायच्या अगोदर त्यांची नजर अन्नावर पडली. त्यांचे डोळे लकाकले. पहिल्या दोनही कावळ्यांचे काही न ऐकता ते अन्नावर तुटून पडले. त्यांना समजावण्याचा प्रयत्न करणाऱ्या कावळ्यांना त्यांनी टोचा मारून ठार केले.

जखमी कावळ्याने घाबरून पळ काढण्याचा निष्फळ प्रयत्न केला. पण लालची कावळ्यांनी त्यालाही सोडले नाही.

सगळे अन्न फस्त केल्यावर कावळे सावकाश पसार झाले. जखमी कावळा आणि त्यांच्या दोन संरक्षकांचे निष्प्राण कलेवर सोडून. . .

मी समाधानाचा सुस्कारा सोडला. नव्हे विजयाचा शत्रूला नेस्तनाबूद केल्याचा.

मी परत घरात गेलो आणि तृप्तीने समाधानाने अन्नाने भरलेल्या नवीन ताटावर तुटून पडलो.

२७५ ओमनगर
नागपूर- ४४०००९

वळण

माधव कृष्ण

गोष्ट अगदी साधी. सुती.
प्राध्यापकाच्या आयुष्यात नेमाने घडणारी.
ऋतुचक्राप्रमाणे दरवर्षी नवे चेहरे वर्गात येत.
'जुने हळू हळू मागे जाऊन
पिवळचा पडलेल्या फोटोसारखे
आठवणींच्या अडगळीत पडत.
पुन्हा कधीमधी भेटतही.
आयुष्याच्या मागे जीवओढीने धावताना
ओझ्याने वाकलेले...
चेहरे काळवंडून चिंतामेघांनी झाकलेले...
क्वचित पावसाने न्हालेल्या झाडासारखा
टवटवीत कुणी
अथवा त्या तेव्हाच्या धुंदपणातील पोरकटपणा
त्या आठवणी....
हा कोणत्या बॅचचा ?
किती सालचा परिक्षार्थी ?
हे आठवावे लागे.
कसे काय ? चाकरी कुठे ? मुले किती ?
म्हणत जिव्हाळचाने, निघताना, कधी बरोबरीने
येत हात हाती.
अंतर कमी झालेले असे
आणि वाढलेलेही असे.

अशाच एका वर्षीची गोष्ट.
मुलीच्या कळपकरी घोळक्यातून ती आली.
रूप बेतास बात.
पण तरतरीतपणा जाणवेलसा.
शिकण्यात विशेष रस.
एखादा सूक्ष्म तपशील उलगडताना
ती व्यग्र होऊन ऐकत एकटक पाहे...
कविता ऐकताना जणू कांही
त्या अनुभवाच्या सावल्यातून चालत राहे.
वाऱ्यावरून ध्वनीलहरी उठाव्यात
तसे सहकंप उमटत वर्गातली हवा थरके
तिच्या चेहऱ्यावरून तेव्हा
झरझर ऊन सावली सरके.
इतर कोरडचा मुद्रांच्या खडकातून
ती होडी वल्हवीत
चालल्यावाणीं वाटे.
मला बरे वाटे.

निदान एक तरी श्रोता संवेदनशील असल्याचे
समाधान.
अशी सोत्सुक तन्मयता.
ती परिक्षार्थी घोळक्यात.
चाळीस मिनिटांच्या तासांत
पूर्ण होणे कसे जमावे ?
तिने मग शंका घेऊन यावे...
गुंतलेल्या विचाराचा धागा, अडखळलेला प्रश्न
ती घेऊन येई नि मी सगळा
घोळ हसतहसत सहज
सोडवून देई.
कवितेच्या एखाद्या ओठमिटल्या ओळीशी ती अडे.
एखाद्या अनवट प्रतिमेचे तिला कोडे पडे.
मग मी पुस्तकी पोपटपंची करी
कवितेचा अर्थ तिर्यक असतो
तो शब्दांच्या ओंजळीत मावत नसतो
असे कांही
तसे कांही.
उमजल्यासारखी ती थोडचावेळाने निघून जाई.

आपला एक विद्यार्थी सजग, शहाणा होतोय
याचे मला समाधान वाटे.
मते, मतांतरे होत.
ऋतुबदलत्या पक्ष्यांसारखी मूळ वसतीस्थानापासून
दूर भ्रमंती होई.
मग पथदीपाचे शिक्षकी सार्थक
माझ्या वाटचाला येई.

ओघाओघाने हे घडले
तसे ओघाओघानेच तिचे शिक्षण सरले.

ती आपल्या आयुष्याच्या मागे गेली
आमची 'कशासाठी पोटासाठी'
आगगाडी नवे उतारू घेऊन
धडधडत धावत राहिली.
कधी जिज्ञासू विद्यार्थ्यांवरून साहचर्याने
तिचे स्मरण होई.
चौकस विद्यार्थी उणावत चालल्याची
नेहमीची खंत मनाला टोचत राही.
ती आता दूर गेली
दुरावलीही.
आणि हे स्वाभाविक सहज होते.
त्यात नवे काही नव्हते.

पण एवढेच असते तर ती गोष्ट नसती झाली
किंवा आवर्जून सांगावी अशी वेळही
नसती आली.
गोष्टी थांबतात.
पण संपत नाहीत.
त्या वळून पुढे जातात
नव्या वाटेने चालत राहतात.
तसे इथे झाले.

प्रत्यक्ष जगण्याच्या धरातलावर
उन्हात, गर्दीत ती निघून गेली होती
तिलाही आपला कोपरा सापडला असेल
किंवा अजून ती चालत असेल.
हे संभाव्य होते.
मागे वळू न पाहताना
आमचे हे पुस्तकी जग खोटे वाटून
अधिक समजूतदार हसेल.
किंवा यातले काहीच
तिला आठवतही नसेल.
हे योग्य होते.
आज एक लग्नपत्रिका आली.
नेहमीची घटना.
पाकीटात एक चिठ्ठी.
अगत्याचे निमंत्रणपत्र असेल.
पत्रिका हा रिवाज.
पत्र ही आस्था.
कोण बरे ? म्हणून घडी उघडून वाचू लागलो.
"तुम्ही आम्हाला भरभरून शिकविलेत.
विचारांच्या कुबड्या न देता
आपली वाट शोधायला लावलीत.
वळ दिलेत." वगैरे....
औपचारिक
तरी सुखावणारा भाव.
थोडी भावुकता, भाविकता म्हणून ठीक.

पण पुढे लिहिलेय—
"मी स्वतंत्र निर्णय घ्यायला शिकले
आणि अर्थात प्रेमविवाह जुळविला."
उत्तम ! माझे स्वगत.
"माझ्या मित्राला, आता जोडीदाराला
माझी ओळख करून
देताना तुमच्या विषयी
(अर्थात एकदोन गोष्टी वगळून)
खूप सांगितले.
तुमची त्याची गाठभेट व्हावी
असे मला फार वाटतेय. तेव्हा लग्नाला { तुम्ही
आलेच पाहिजे हं !"
वगैरे.
हे ठीक. स्वाभाविक थोडे अधिक म्हणता येईल.
पण पत्रातील कंसाने अडखळलो.
भूतकाळाच्या किनाऱ्यावर फेकला गेलो.
कंसात राहावे.
मनात उरावे.
असे काहीच तर नव्हते.
नसावे.
चार चौघांना मिळणारा ओलावा.
गुणग्राहकतेमुळे थोडे अधिक
शिकविण्याचे माप, याचा वेगळा अर्थ संभवावा ?

मग माझ्या कोणत्या शब्दाची
अर्थवलये तिच्या मनाच्या किनाऱ्यापर्यंत पोचली ?
कोणत्या शब्दात अधिक काही स्वर झंकारले ?
कधी कवीच्या शब्दात तिला माझाच भाव ऐकू
आला ?
की माझाच स्वर माझ्या नकळत हेलावला ?
की वाढवयात ती स्वभाविक स्वप्नाळू हळवेपणी
पुस्तकांच्या ओळीतून हिंडताना आपल्याच मनाचे
कवडसे पहात होती ?
की मीच जाणीवेच्या काठावर तटस्थपणे


उभा आहेसा मानत असताना नेणिवेत मात्र माझी
नौका
मृगजळाच्या प्रवाहात वहात होती ?
आणि ते तिला स्त्री सुलभ वृत्तीने जाणवले.
की असे काय घडले असेल ?
काहीच न घडता घडता आंत काय रुजले वाढले
असेल ?
की मीच काही स्वतःपासून लपविले होते ?
स्वतःलाच फसविले होते ?
साधी सुती गोष्ट
गुंतागुंतीची झाली.

पुस्तकात ठेवलेल्या पानाला जशी आपसुक
नकळत मुळे आली.

की हे सारे माझ्याच मनाचे खेळ ?
मला काहीच कळेना. काही उलगडेना,
तिच्या लग्नाला जावे ?
की उगी राहावे ?
कशाचा काय अर्थ होईल ?
संपली म्हटलेली गोष्ट
कोणत्या नव्या वळणाने पुढे जाईल ?

■

पीपल्स कॉलेज
नांदेड ४३१६०२



अनुक्रमणिका

लाल सलाम

विश्वास पाटील

कलकत्ता महानगरीत होतो. संध्याकाळ परीसारखी हळूहळू उतरत होती. ओल्या फुलांचा एक चुरगळलेला गंध हवेत तरंगत होता. संध्याकाळच्या अंधारात चेहरे अस्पष्ट होत चालले होते. गूढ आणि रहस्यमय. जुनं कब्रस्तान ओलांडत आमची टॅक्सी अंधारातून एका अनोख्या प्रकाशदालनाकडे सरकत होती. पार्क स्ट्रीट म्हणजे प्रकाशाची लखलखती आरास. दिल्लीचं कनॉट प्लेसही त्याच्यापुढे फिकं वाटावं. पार्क स्ट्रीटला तोड नाही. पार्क स्ट्रीटला कलकत्ता गंध आहे. स्वतंत्र चेहरा आहे. लाल दिव्याच्या संकेताने टॅक्सी थांबली, एक गार, आकसलेला कृश तळवा माझ्यासमोर तरंगू लागला–'आमाके किछु दिन मोशाय, उपाशी आहे चार दिवसांपासून.'

पार्क स्ट्रीट म्हणजे भूक, भुकेचे पर्यायी रूप. भुकेची अनंत गाथा. एक छोटा–सा मुलगा ब्रियरची बाटली घेऊन रस्ता पार करतोय. गुपचूप, घाईघाईत पण चोकसपणे ! आता आम्ही चौरंगीवर आहोत. मग चित्तरंजन एव्हेन्यू, बहू बाजार, महाजाति सदन...पण पार्क स्ट्रीटची सावली आमचा सतत पाठलाग करतेय. पार्क स्ट्रीट म्हणजे वेताळ आहे वेताळ ! साधा नाही आग्या वेताळ, एकदा का आपल्या मानगुटीवर बसला की उतरता उतरत नाही.

थंडीचे दिवस होते. वृक्षांचा पर्णसंभार गळत होता. पानं सुकत होती. झरत होती. पिवळ्या मैदानावर पिवळी जीर्ण पानं. डलहौजी चौकात ब्रेबॉर्न रोडच्या एका अंधाऱ्या कोपऱ्यात उतरून मी दवा धरून बसलो होतो. अमलतास मुखोपाध्यायची वाट बघत होतो. रात्रीचे दहा होत आले होते. पुन:पुन्हा मी मनगटी घड्याळाकडे बघत होतो आणि माझी अस्वस्थता अधिकाधिक वाढत चालली होती. मी कावराबावरा होत होतो. अमलतासची वाट बघत होतो. चार वर्षांपासून तो फरार झाला होता. एक भयानक नक्सलाईट म्हणून. आणि आता तर...भयानक दिवस होते. त्याचा पाठलाग करणाऱ्या हातांचे पंजे पोलादी झाले होते. नजर घारीची बनली होती.

अकरा वाजत होते. मी थकून गेलो होतो. थकत चाललो होतो. अमलतासची वाट बघण्यात काही हशील नव्हता. रसल स्ट्रीटपर्यंत आलो. तिथून दहा–पंधरा पावलांवर तर होतं पार्क स्ट्रीट. आणिबाणीत...अनेक भूमिगत राजनेते, लेखक, कलावंत अन् चिंतकांची ही आश्रयभूमी ठरली होती. शरणस्थली होती. जणू हे स्थान पोलिसांच्या अधिकारक्षेत्रात येतंच नव्हतं. मदिरा आणि मदिराक्षीच्या आलिंगनात बद्ध अशा या पार्क स्ट्रीटबद्दल पोलिसांना शंका घेण्याचे कारणच नव्हते.

एके दिवशी तिथल्या एका उपाहारगृहात बसून मी नियतकालिक चाळत होतो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे अमलतास आला. गुपचूप येऊन माझे डोळे झाकले. मी हाताने त्याच्या हातांना स्पर्श केला. ओळखणं शक्यच नव्हतं. 'हरलो बुवा !' म्हणताच तो माझ्या पुढ्यात येऊन उभा राहिला. 'तुझी आंगठी कुठाय ?' आश्चर्यचकित होत मी विचारले. 'ती मुद्दामच काढून ठेवलीय !' किती वर्षांनी भेटत होतो मी अमलतासला, तो शांतपणे माझ्या पुढ्यातल्या खुर्चीत येऊन बसला. गूढपणे हसला आणि म्हणाला–

'डॉन ! माझं नाव डॉन ! डॉन म्हणायचं मला !'

दुसऱ्याच दिवशी. तिच्या गोऱ्यापान हातात एक अल्सेशियन कुत्र्याचं पिलु होतं. स्थूल, बुटकी बॉबकट केलेले भूरे केस भुरभुरु उडत होते. डोळ्यावर चष्मा. फुला–फुलांचा बिनबाह्याचा फ्रॉक, रुंद जबड्याचा प्रशस्त चेहरा. चकाकते

शुभ्र दात आणि सुरेख जिवणी असलेली बाकदार हनुवटी. अनेक टेबलं ओलांडून कोलमडत–भेलकांडत ती आमच्याप्रत पोचली. ओरडत विचारत होती–'आज...माझ्यासाठी कुठलीही सीट रिक्कामी नाहीये ? आं ! का रे बुढा ? बार चालू ठेवायचा विचार नाहीए का ?'

माझ्यावर तिची नजर खिळली होती. त्या नजरेतले तांबडे धागे क्रोधानं रंगलेले होते की मद्यात हे सांगणे अवघड नव्हते. तिच्या कोलमडत्या–धडपडत्या आवाजातूनही तिचा नशा डोकावत होता. वयाच्या पन्नास-पंचावन्नाच्या वर्षीही ती कमालीची आकर्षक वाटत होती. जागा तर कुठेही शिल्लक नव्हती, वेटर सचित होता तो धावतच तिच्यापर्यंत पोचला. सारे लोक आपापल्या स्थानांवरून बघत होते. हातांच्या इशाऱ्याने आणि माना वळवून ते कुजबूजत होते उलटसुलट प्रतिक्रिया उसळत होत्या. मद्य फेस ळत होतं. सारा बार हसत–खिदळत होता.

माझ्या समोरच्याच खुर्चीचा आधार घेत ती म्हणाली. 'इफ यू डोण्ट माइण्ड...!' वेटरला ढकलत ती माझ्यासमोर उभी होती. 'आय वांट टू सिट हियर...हियर ओनली.'

आणि माझ्या होकार...नकाराची चिन्ता न करता ती धम्मदिशी माझ्या पुढ्यात बसली.

बार जणू घुसळून निघाला. काही उसळते शब्द, काही संकेत, क्वचित् मंद हास्य आणि काही अस्फुट घोषणा सुद्धा ! पण तिला यापैकी कुठलीच फिकीर नव्हती.

वेटरने तिच्यापुढे बियर ठेवली. पहिला घोट तिने कुत्र्याच्या पिलाला पाजला रुमालाऐवजी फ्रॉकनेच त्याचे तोंड पुसले. आणि मग माझ्याकडे रोखून बघू लागली. मला तिथून पळ काढावा असं प्रकर्षाने वाटू लागलं.

'ए नौजवाना ! तुझी तब्वेत तर ठीकाय ना? ...असा काय भेदरतोस ?' एक पूर्ण मग एका दमात संपवून आपल्या ओठांवरून फेस चाटत ती म्हणाली. तिचे डोळे विस्फारत होते.

'छे...छे... ! आय ॲम ऑलराइट मॅडम !'

'मग चेहरा असा व्हाईट का ? व्हाय ?'

'खूप वेळ झाला इथे बसून !' काय बोलावं हे नेमकं सुचेना म्हणून काहीतरी उत्तरलो.

'पण काय रे पोरा ! एवढीशी तर प्यालाय ना तू ? मला भिऊ नकोस. मी गुड वूमन आहे. बुढ्ढी पण नाइस वन !'

ती बोलत होती आणि माझा श्वास अवरुद्ध होत होता.

मला खूपच भेदरल्यासारखं होत होतं. रात्र वरातीसारखी सरकत होती. घड्याळाचे काटे मंदपणे सरकत होते. ती उठून निघून गेली.

पुढे अमलतासने तिची जी कथा मला ऐकवली होती ती विलक्षण प्रत्ययकारी होती. पार्क स्ट्रीटला साजेशी. तिचे यजमान भारतीय सेवादलात मोठे अधिकारी होते. पासष्ठ साली रिटायर्ड झाले आणि अडुसष्ठ साली मरण पावले. त्यांना दमा होता. एक मुलगा, एक मुलगी. मुलगा अमेरिकेत. मुलगी गुजरायेत. तिला मात्र कलकत्त्याखेरीज कुठलंही शहर मोहवू शकलं नाही. नवरा हयात असतानाही तिने कलकत्त्याचा पदर सोडला नव्हता. कलकत्ता तिचा श्वास होता. प्राण होता.

'आर्मीतले ऑफिसर सारेच मेले माझ्यावर मरायचे नुसते. पण मी मात्र कुणालाच लिफ्ट दिली नाही बरं ! पोरा तुला खरं सांगते !'

तिच्या गोऱ्या गालांवर गुलाबी रंगाची झळाळी सजली. अगदी अबोध. कोवळी अशी. षोडशी कन्येसारखी ती लाजली.

'दिल्ली असो वा बॉम्बे, मद्रास असो की अहमदाबाद, कलकत्त्याची मौज काही औरच ! इथे तुम्ही शांतपणे दुःख पिऊ–पचवू शकता.... बघा, यू कॅन एंजोय यूवर सफोकेशन विथ ग्रिस पेग !'

ती आता कलकत्त्याचीच झालीय. तिचं मोठं घर चौरंगीवर आहे. भाडेकरू आहेत. पैसा मोप मिळतो.

"पण मी तर बाबा पार्क स्ट्रीटची टेनंट आहे. डेली...इवलं रेंट द्यायला यावं लागतं. रोख पैसे मोजते मी. नो क्रेडिट !'

ती हसत होती. कुत्र्याचं पिलू अर्धमिटल्या डोळ्यांनी तिच्या फ्रॉकवरील फुलपाखरांना पकडू बघण्याचा अयशस्वी प्रयत्न करत होतं.

बार बंद व्हायची वेळ झाली तसे आम्ही सारेच बाहेर पडलो. तिला आधाराची गरज होती. माझ्या

खांद्यावर मान टेकवून ती धडपडत चालत होती. पिलाला मात्र तिने छान घट्टपणे आपल्या छातीशी धरून ठेवले होते.

पार्क स्ट्रीट आता पेंगायला लागले होते. आपल्या शरीराचा तोल सावरणे आता तिला अशक्य होत चाललं होतं. 'तुम्हाला सांगू ? मी कलकत्ता का सोडलं नाही ते ? बघा तुमच्यावर माझा विश्वास आहे म्हणून आय टेल यू ! सांगू ? बघा. शराब प्यायल्यावर आदमी खोटं बोलू शकत नाही. औरत खोटं बोलू शकते. पण बाय गॉड, खरंच सांगते.' तिला कसंबसं सावरत मी टॅक्सी-कडे ढकलत नेत होतो, कपाळावर घामाचे थेंब साकळले होते.

'अरे हट ! आमचा एक बावर्ची होता...खूप अच्छा ब्वॉय...नटवर...गुजराती. गायचा छान. चित्रं काढायचा. बट ही वॉज कंपलीटली रूइन्ड इन लव अफेअर ! त्याच्या बिलवेडने बेवफाई केली. पाच सालापूर्वी तो झोपेच्या गोळ्या घेऊन...कमिटेड सुसाईड. पुअर चॅप !'

मी टॅक्सी ड्रायव्हरला शोधत होतो. पण तिनेच हात उंचावून हाक मारली. 'ड्रायव्हर !'

टॅक्सीत तिला जवळजवळ ढकलावंच लागलं. ती सीटवर बसली. कुत्र्याच्या पिल्लाला मांडीवर 'विथ केयर' घेतलं. मला म्हणाली,

'थँक्यू वेरी मच...आय लाइक्ड यूवर कम्पनी. ओ. के....सी यू अगेन ! गुड नाईट !!'

मी हतप्रभ होऊन बघत राहिलो. टॅक्सीबाहेर तोंड काढून ती त्या रंगीबेरंगी रस्त्यावरील रंगी-बेरंगी दिव्यांना बघत राहिली. लेकरासारख्या उत्फुल्ल आनंदाने म्हणत राहिली. 'गुड नाईट टू एव्हरी बडी, लेडिज अँड जंटलमॅन !'

तो दिवस लोटला आणि मग तिची-माझी भेट नित्याचीच झाली. पंधरवड्यापर्यंत मी तिथेच राहाणार होतो. कधी ती केमिस्टच्या दुकानात भेटायची, कधी कुठल्याशा दुकानात. कधी सिनेमागृहात तर कधी बाजारात, पण तिच्या हमखास भेटीची जागा मात्र पार्क स्ट्रीटवरला बार.

एकदा व्हिक्टोरिया जाण्यासाठी म्हणून मी पार्क स्ट्रीट ओलांडत होतो तोच ती दिसली. एवढ्या गर्दीतही कसं कोण जाणे पण तिने मला हात उंचावून अभिवादन केले. 'येता का बार-मध्ये ? या ना !...गुड इव्हिनिंग !'

अलिकडे तिच्या वागण्या-बोलण्यातले अंतर वाढतच चाललं होतं. तिच्या शरीराचा तर तोल जात होताच पण मनही तिचं सैरभैर होत राहिलं होतं. काय-काय प्रेरणा; माणसाच्या मनाच्या संदर्भात कार्यशील असतात कोण जाणे ?

परवा ती पुन्हा भेटली. पाऊस पडत होता, रस्ते स्वच्छ वाटत होते. पार्क स्ट्रीटवरून सी. पी. एम. चा मोर्चा निघाला होता, शहीद मीनार चौकात जाहीर सभा होणार होती. बंगालच्या छोट्या-मोठ्या खेड्यापाड्यातून आलेला माणसांचा महासमुद्र उसळत होता. हातात लाल झंडे, मुखी घोषणा, तांबारलेल्या डोळ्यांचा, विस्कटल्या केसांचा नेता प्रचंड हात-वारे करीत मोर्च्याचे नेतृत्व करत होता. घोषणा फलक उंचावले जात होते. स्त्री-पुरुषांची उसळती गर्दी होती. जल्लोष होता नुसता. पाऊस कोसळत होता. कुणाला त्याची तमा नव्हती. गतीत चालणारा तो मोर्चा कमालीचा शिस्तबद्ध होता. आरडा-ओरडा आक्रस्ताळेपणा, उंचावणाऱ्या घोषणा सोडल्या तर शाळेतील मुलांची सहल वाटावी अशी मंडळी रांगेत लयबद्ध निघाली होती.

योगायोगाने आम्ही एकाच छताखाली उभे होतो, 'मी पार थकले हो आता !' म्हणत तिने दीर्घ निश्वास सोडला,

'तुम्ही मोर्च्यात गेला असता का ?' मी विचारले.

'काय सांगू तुम्हाला ! कॅन यू बिलिव्ह ?' ती थकत चालली होती.

पाऊस थांबत होता. रस्ते ओले झाले होते. आम्ही चालू लागलो. मोर्च्यातला एक कापडी लाल झेंडा रस्त्यावर पडला होता. विळ्याचं पांढरं चिन्ह डोकावत होतं. सडक चकाकत होती.

एका ढेरपोट्या शेठजीनं तो झेंडा उचलला व आपलं स्कूटर पुसू लागला.

तिने ते बघितले आणि कुत्र्याच्या पिलाला माझ्या हाती देत उसळत तिथे पोचली, त्याच्या

हातून झेंडा हिसकावून घेतला. तिच्या डोळ्यात आग होती. एरवी शांत–नशेत बुडालेलं निळे डोळे आज ठिणग्या ओकत होते. 'तू स्साला... कुत्तेका पिल्ला, शरम येत नाही, लाल झेंड्याचा अपमान करतोय ? हरामजादा !'

ती शिव्यांचं स्तोत्र म्हणत राहिली होती. त्या शेठजीने त्वरित आपलं स्कूटर सुरू करून पळ काढला होता.

तिचा तो दुर्गावतार बघून मी स्तब्ध झालो. काही सुचेना. काय बघतो आहोत आपण असं वाटलं.

मी तिला म्हटलं 'मॅडम...लाल सलाम !!'

तिचे डोळे पुनश्च शांत निळ्या डोहासारखे नितळ, पारदर्शक झाले. पिल्लाला माझ्या हातून काढून घेत ती म्हणाली–'आम्ही मित्रे आहोत, कॉमरेड्स ! पण त्यांना आपण मानलं पाहिजे. मानायला हवं. त्यांची शक्ती...ते ब्रेव्ह आहेत. त्यांच्यामुळे हिंदुस्तान आहे. आपण सारे पोचट. विकाऊ, दोगल साले ! खरंच !'

ती आणखी बोलत होती. मला काही सुचेना. माझ्या ओठांवर त्याक्षणी होत्या ऑलिव्हर थायनरच्या या ओळी—

शिणून आम्ही खाली पडलो तेव्हा दुसरी काही तरुण आणि ताज्या दमाची माणसं उभी रहातात, आम्ही खोदलेल्या पायऱ्यांवरून ते चढत चढत शिखरापर्यंत जातात त्या पायऱ्या कुणी खोदल्या हे त्यांना कधीच कळत नाही.

कधीच कळणार नाही. ■

३४ ब कृष्णांबरी सरस्वती कॉलनी
शहादा (धुलिया) महाराष्ट्र
४२५४०९

अनुवादकांकरिता–

वाङ्मय अनुवाद म्हणजे खरे तर संस्कृतींचेच भाषांतर.

युगवाणीतून विभिन्न संस्कृतींची ओळख अनुवादित वाङ्मयातून होणे युगवाणीस हवे आहे.

विभिन्न भाषेतील महत्त्वाच्या लेखनाचे अनुवाद मूळ लेखकाच्या परवानगी-सहित पाठवावेत. अनुवादकविषयक लिखाणही.

तिवारी यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने विशेष टिपण.

दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी[१]

अक्षयकुमार काळे

राष्ट्रीय कवींमध्ये तिवारींचे स्थान महत्त्वाचे आहे. तिवारी यांचे घराणे मूळचे महाराष्ट्रातले नव्हते. उत्तरहिंदुस्थानातून इकडे येऊन स्थायिक होणाऱ्या परदेशी लोकांपैकी ते एक असले, तरी मराठ्यांविषयीचा जाज्ज्वल्य अभिमान त्यांच्या व्यक्तित्वाचा विशेष होता; इतकेच नव्हे तर उत्तर हिंदुस्थानी या नात्याने राजपूत इतिहासाबद्दलही त्यांच्या मनात अपार निष्ठा होती. या दोन्ही निष्ठांचे मनोहर दर्शन त्यांच्या संपूर्ण कवितेमध्ये आढळते. काव्यलेखनाची दांडगी हौस असल्यामुळे तिवारींनी आपल्या बावन्न वर्षांच्या आयुष्यात विविध प्रकारची प्रचंड काव्यरचना केली. तथापि त्यांच्या काव्यव्यक्तिमत्त्वाचा संबंध त्यांनी निर्मिलेल्या संग्रामगीतांशी अधिकतर जोडला गेला.

मराठ्यांची संग्रामगीते

'मराठ्यांची संग्रामगीते' या गीत संग्रहातील गीतांची ठेवण शाहिरी वाङ्‌मयाची जवळिक साधणारी आहे. त्यांचे स्वरूप पोवाड्यासारखे आहे. गतेतिहासातील वेचक वीरश्रीने युक्त असे प्रसंग शोधून त्यावर ही कवने रचली आहेत. या गीतांची भाषा प्रासादिक परंतु जोरकस अशी आहे. वीररसाचा उत्कर्ष साधणे तिवारींना अगदी सहजगत्या जमते. मराठ्यांच्या इतिहासातील उज्ज्वल प्रसंगाचे चित्रण नेमक्या व परिणामकारक शब्दांत ते करतात. या बहुतांश गीतांसाठी त्यांनी 'उद्धवा शांतवन कर जा' हीच चाल वापरली आहे. वस्तुतः ही चाल करुण रसाला पोषक आहे असा सर्वसाधारण समज आहे. परंतु तिवारींनी आपल्या ओजस्वी वाणीच्या साह्याने ही चाल वीररसाला देखील तेवढीच मानवते हे सिद्ध केले. अर्थात तेच एक वृत्त वापरल्याने काहीसा कंटाळवाणेपणा या संग्रामगीतांत आला हे नाकारता यावयाचे नाही. तिवारींनी रचलेल्या, 'संताजीची घोडदौड' 'कुंभेरीची भंवेरी,' 'गारदी कटोनी मेला,' 'भाऊ भाऊ' इत्यादी गीतांमध्ये वीररसावरोबरच करुण रसाचाही परिपोष चांगला साधला आहे. या गुणांमुळे तिवारींच्या कालखंडात या गीतांनी असीम लोकप्रियता संपादन केली होती. ऐतिहासिक घटनांच्या दिग्दर्शनामुळे गतेतिहास आठवून स्वातंत्र्याची प्रेरणा देणे हे कार्य या संग्रामगीतांनी केले. त्यांत प्रचाराचा भाग विपुल असला तरी हे स्वदेशाभिमानी काव्य ढिसाळ झाले नाही.

कुंभेरीचा कुंभार । बसवीन गाढवावरती
चौमुलुख धिंड काढून । देईन यमाच्या हाती

१. तिवारी, दुर्गाप्रसाद आसाराम. जन्म : १८८७ मृत्यु १९३९ व्यवसाय : प्राथमिक शिक्षक, वास्तव्य : खानदेश, काही काळ 'प्रसाद' या टोपण नावाने लिखाण. काव्यरचना काळ १९१५ ते १९३९. काव्यरचना : १. काव्यकुसुमांजली (स्फुट कविता संग्रह) १९१६; २. काव्य रत्नमाला (स्फुट कविता) १९२०, ३. मराठ्यांची संग्रामगीते १९२०, ४. प्रसन्नराघव (खंडकाव्य) १९२०, ५. मनोहरलीला (ऐतिहासिक खंडकाव्य) १९२०, काव्यतुषार (राष्ट्रीय कविता) १९२३, ६. अभंगमाला १९२५, ७. झाशीची संग्रामदेवता १९२५, ८. राधामाधव (खंडकाव्य) १९२६, ९. मान्यांची यमुना १९२६, १०. कुमुद्वती (स्फुटकविता) १९२७, ११. चंडीशतक (चित्रकाव्य) १९२७, १२. कविता–वनिता १९२७, १३. शिवप्रताप १९०८, १४. महाराणा प्रतापसिंह १९२६, १५. नंदिनी (खंडकाव्य) १९३०, १६. मराठी शिवराज–भूषण १९३१.

सार्थकता तरी देहाची
पूर्तताही जनकत्वाची
त्याविण शांतता कुठची
अजि उडेल संस्मृतिकारी । कुंभेरीची भंवेरी

अशी सूरजमल्ल जाटाला मातीत मिळविण्याची मल्हारराव होळकरांची थरारून टाकणारी प्रतिज्ञा प्रत्ययास आणून देण्याचे सामर्थ्य त्यांच्या वाणीत आहे. संताजी, धनाजी, सदाशिवराव पेशवे, विश्वासराव, इब्राहिमखान गारदी, महादजी शिंदे, यांची तेजस्वी शब्दचित्रे तिवारींनी नेमक्या शब्दांत उभी केली आहेत.

'झांशीची संग्राम देवता' हा काव्यग्रंथ केवळ राणी लक्ष्मीबाईच्या पराक्रमावर त्यांनी रचला आहे. त्यात त्यांनी लक्ष्मीबाईच्या 'मेरी झांशी नही दूंगी' या प्रतिज्ञेपासून तिच्या आत्माहुतीपर्यंतच्या इतिहासावर दहा कवने रचली आहेत. रचनेच्या दृष्टीने 'मराठ्यांच्या संग्रामगीता'पेक्षा कोणतेही वेगळे वैशिष्ट्य यात नाही. परंतु संपूर्ण पणे राणीच्याच जीवनावर हा काव्यग्रंथ रचण्यात आलेला असल्यामुळे एक प्रकारचा स्वयंपूर्ण घाट या संग्रहाला आला.

'हयू रोज आंग्ल नरवीर
झांशिच्या तटावर शीर
आपटून झाला जेर
हिंदीत बोलला बोली । मर्दानी झांशीवाली

अशी रणरणती भाषा तिवारींनी अगदी सहजगत्या वापरली आहे. "राणीचे चरित्र अत्यंत तेजस्वी खरे पण आज भोवताली पसरलेल्या दुर्बलतेच्या विरोधाने वाचकाचे मन हुळहुळे करून त्यास क्षणभर रडावयास लावते, आणि हीच तिवारींची प्रतिभा होय. जुना इतिहास वीर्यशाली असला तरी आजच्या दुर्बलतेने जुने पोवाडे वाचून उत्साहाबरोबर अनुतापही उत्पन्न होतो. आणि या मिश्र भावनेला पोषक अशी वृत्तयोजना करण्यात तिवारींनी विलक्षण मार्मिकता दाखविली आहे."[1] असा या काव्यग्रंथावर श्री. नारायण केशव बेहरे यांचा अभिप्राय आहे.

१. बेहरे, ना. के. प्रस्तावना, झांशीची संग्रामदेवता आवृत्ती दुसरी १९२७ पृ. ७

खंडकाव्ये

—पौराणिक, सामाजिक, ऐतिहासिक अशा खंडकाव्याच्या तीनही दालनात तिवारींनी विहार केला आहे. 'राधामाधव' हे तिवारींचे पौराणिक काव्य असून राधाकृष्णावरील निष्काम भक्तियुक्त प्रेमावर रचले आहे. हे काव्य सातसर्गात बद्ध केले असून निसर्गवर्णनांना या काव्यात विशेष महत्त्व दिले गेले आहे. उदात्त प्रेमाच्या (Platonic Love) माहात्म्य वर्णनास्तव कराव्या लागणाऱ्या कथात्मक तडजोडी तिवारींनी येथेही केलेल्या आहेत. 'प्रसन्न राधा' हे सामाजिक खंडकाव्य असले तरी त्याचे कथानक काहीसे अद्भूतरम्य आहे. वास्तवतेपासून दूर जाणारे आहे. परित्यक्ता स्त्रियांचा प्रश्न तिवारींना चांगल्या रीतीने यात मांडता आला असता. पण त्यांनी या खंडकाव्याला शेवटी कल्पनारम्य सुखान्तिकेचे स्वरूप दिले. राधा-कृष्ण हे बालपणीचे सवंगडी. आर्थिक दुरवस्थेमुळे राधेचे माधवाशी लग्न होते. कृष्ण विरागी होतो. पुढे त्यांच्या व राधेच्या भेटीवरून संशय घेऊन माधव राधेला घरातून घालवितो. व पुढे त्याला कृष्णाच्या हातचे राधेला आलेले शुद्ध प्रेमाचे पत्र सापडते.. त्याचा भ्रमनिरास होतो. शेवटी हरिद्वाराला या तिघांच्या गाठी पडतात. असे या खंडकाव्याचे कथानक आहे. वस्तुतः यातील सामाजिक प्रश्न तिवारींना फुलविता आला असता. पण मध्ययुगीन वातावरणात रमणाऱ्या त्यांच्या वृत्तीने आधुनिक पद्धतीने प्रचलित ज्वलंत विषय मांडण्यापासून परावृत्त केले व त्यांच्या हातून सामान्य बोधवादी खंडकाव्याची निर्मिती झाली.

तिवारींनी एकूण चार ऐतिहासिक खंडकाव्ये लिहिली. पैकी पहिल्या 'मनोहर-लीला' या खंडकाव्याची कथा आधी गद्यात लिहून मग त्यांनी तिला पद्याचे रूप दिले. हे खंडकाव्य यादवकालीन इतिहासामधल्या दंतकथेच्या आधारे त्यांनी लिहिले. दुराचरणी शंकरदेवाने एका साध्वीला भ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला म्हणून यादवसाम्राज्य धुळीला मिळाले ही या खंडकाव्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी होय. या पार्श्वभूमीवर मनोहर-लीला या पात्रांच्या संघर्षशून्य प्रेमाची कहाणी तिवारींनी

रंगविली. कवीची शैली ओजस्वितेमुळे आकर्षक आहे. अर्थांतरन्यासाचा ह्व्यास त्यांच्या प्रतिभेला असल्यामुळे सुभाषितवजा चरणांची पेरणी त्यांनी प्रयत्नपूर्वक केली आहे.

'महाराणा प्रतापसिंह' हे काव्य त्यांनी पाच सर्गांत रचले असून त्याकरिता अक्षर गणवृत्ताचा वापर केला आहे. शिवाजी महाराजांप्रमाणे राणा प्रताप हा तिवारींच्या आदराचा विषय आहे. प्रताप आणि विशेषत: प्रतापाच्या पत्नीच्या अचाट पराक्रमाचे वर्णन करण्यात हे काव्य त्यांनी खर्ची घातले आहे.

'मान्यांची यमुना' हे तिवारींचे अद्भुतरम्य ऐतिहासिक खंडकाव्य होय. ते मुरार व यमुना यांच्या प्रेमकथेवर आधारले आहे. अजिंठा पर्वतातील रांगेत असलेल्या वाडीच्या किल्ल्याचे खरे राजे माने. स्वामिद्रोह करून पवारांनी तो बळकविला. कालांतराने मान्यांची दोन मुले जयवंत आणि यमुना आपले पूर्ववैभव मिळविण्याचा प्रयत्न करतात. व त्यात शिवर्यांचा मुरार मदत करतो. पुढे मुरार व यमुनेचे लग्न होते. असे या खंडकाव्याचे कथानक आहे. या खंडकाव्याची भाषा सुबोध आणि ओघवती असून शृंगार-वीर रसाचा उत्कर्ष तिवारींनी चांगला साधला आहे. सृष्टीवर्णने त्याचप्रमाणे युद्धाची वर्णने तिवारींना चांगल्या प्रकारे साधलेली असल्याने हे काव्य वाचनीय झाले आहे.

'नन्दिनी' हे काव्य १६८१ ते १७०० या कालखंडातील मोंगल-रजपूत इतिहासाच्या पार्श्वभूमीवर तिवारींनी रचले. चोंडावत व सूक्तावत या रजपूत घराण्यातील आपापसातील वैमनस्ये व रजपूताशी मोंगलाचा झालेला संघर्ष एवढाच काय तो सत्य इतिहास आहे. बाकी या पार्श्वभूमीवर रचलेली नन्दिनी व अचलसिंह यांची ही प्रेमकथा कल्पित आहे. ही रचना त्यांनी साकी वृत्तात केली असून ती सहा भागात विभागली आहे.

इतिहासप्रेम हा तिवारींच्या एकूण सर्वच काव्याचा प्रमुख विशेष आहे. परंतु इतिहासापेक्षा दंतकथांचे वेड त्यांच्या प्रतिभेला अधिक आहे. सामान्य रसिकांना दंतकथांचे वेड अधिक असते हे जाणवल्यामुळे तर या कथांना त्यांनी अधिक रुचिर करण्याचा प्रयत्न केला. ऐतिहासिक दंतकथेची पार्श्वभूमी, त्यात गुंफिलेली एक सांकेतिक प्रेमकथा प्रसंगपरत्वे शृंगार, वीर, अद्भूत, करुण रसाची केलेली निर्मिती, ओजस्वी आणि जोरकस भाषा व जमल्यास शेवटी ढोबळ स्वरूपाचा उपदेश असे त्यांच्या ऐतिहासिक खंडकाव्याचे स्वरूप आहे. या खंडकाव्याच्या प्रत्येक विभागाच्या आधी, पुढे पद्यात काय सांगितले आहे याचा गद्य मजकूर देण्याची तिवारींची पद्धत आहे. त्यामुळे काव्य निर्मितीच्या मूळ प्रयोजनालाच त्यांनी अजाणता सुरुंग लावला आहे.

रूपांतरे

श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदरी असलेले हिंदी महाकवी भूषण यांनी रचलेल्या 'शिवबावनी' व 'शिवराज भूषण' या दोन काव्यग्रंथांची तिवारींनी 'शिवप्रताप' व 'मराठी शिवराजभूषण' अशी रूपांतरे केली आहेत. भूषण कवीच्या या दोन्ही काव्यग्रंथांचा परिचय त्यांनी प्रस्तावनेत करून दिला आहे. त्याचप्रमाणे त्यांचे कथा व दंतकथांनी भरलेले त्रोटक चरित्रही त्यांनी 'मराठी शिवराज भूषण' या रूपांतरात छापलेले आहे. त्यांनी केलेले 'शिवराजभूषण' हे रूपांतरही त्यांच्या परिश्रमाची साक्ष देण्यास पुरेसे आहे. 'शिवराजभूषण' हा ग्रंथ आलंकारिक आहे. शिवचरित्रकथनापेक्षाही अलंकार शास्त्रावरचा आपला अधिकार दाखविण्याकडे भूषण कवीचा कल आहे, पण जन्मसिद्ध प्रतिभेमुळे हा ग्रंथ सरस उतरला आहे व त्याचे भाषांतरही तिवारींनी मुळाची हानी न होऊ देता केले आहे. आपल्या मर्यादांची जाणीव त्यांना असल्यामुळे "भूषणासारख्या भाषापंडिताने या अलंकारिक ग्रंथात भावसौंदर्याबरोबरच जागजागी जे प्रासानुप्रासांचे शब्दसौंदर्य साधले आहे ते आम्हास साधणे दुष्कर होते...मराठीतील भव्य आणि कंठ-गेय अशा या मात्रावृत्तातील कवीचे सर्व भाव आणता येणे कठीण आहे. पुन्हा अलंकार कायम ठेवून हे साधणे त्याहूनही कठीण"[1] अशी

१. तिवारी, दु. आ. — मराठी शिवराजभूषण- आवृत्ती पहिली, १९३१, पृ. १४

प्रांजळ कबुली त्यांनी या ग्रंथाच्या प्रस्तावनेत दिली आहे.

स्फुट कविता

संग्रामगीते व खंडकाव्याव्यतिरिक्त तिवारींनी पुष्कळ स्फुट कविताही लिहिली. ती 'काव्य कुसुमांजली', 'काव्य रत्नमाला', 'कुमुद्वती', 'काव्यतुषार', 'कविता–वनिता' इत्यादी काव्यसंग्रहात समाविष्ट झाली आहे. तिवारींची दृष्टी मूलतः बहिर्मुख आहे. त्यामुळे त्यांच्या स्फुट कवितांतही राष्ट्रीय ऐतिहासिक सूर ऐकू येतात. भूतकाळात रमताना ऐहिकाचे भान ते विसरतात म्हणून स्वकालाच्या संदर्भात आवश्यक असणारे गांभीर्य त्यांच्या कवितेला कधीही लाभले नाही. पुष्कळदा बहिर्मुख व्यक्तित्वामुळे काव्याची प्रेरणाही दुय्यम स्वरूपाची झाली आहे हे जाणवते. 'कविता–वनिता' या काव्यसंग्रहात वनिता-विषयक अनेक मधुर व कोमल भावना एकत्रित करण्यात आलेल्या असल्या तरी त्यात रसिकांच्या हृदयाला हात घालता येईल असे काही नाही. 'चंडी शतका'सारखे चित्रकाव्य आणि 'अभंग-मालेसारख्या भक्तिपर कवितेच्या निर्मितीमागे आत्मनिष्ठेपेक्षा काव्याच्या सर्वच प्रांतात निरंकुश-पणे आपण संचार करू शकतो हे दाखविण्याचा अट्टाहासच अधिक आहे हे जाणवते. तथापि ऐतिहासिक राष्ट्रीय कविता जनमानसात आपल्या बुलंद आवाजाने लोकप्रिय करण्याचे काम तिवारींच्या कवितेने एकूण केले असे म्हणावयास प्रत्यवाय नाही.

■

८/१, राणी लक्ष्मीनगर
नागपूर ४४००२२

.....युगवाणी प्रतिभेत भेद करणार नाही.
प्रतिभा जुनी–नवी अशी नसतेच.
अशा धारणांच्या लेखकांची युगवाणीस गरज आहे.

क वि ता

टिळा / सदानंद देशमुख

आली रात्र चांदण्याची ओला गारवा घेवून
दव थेंबांनी निघाले घोस फुलांचे न्हावून
मिटू मिटू पापण्यांना दक्ष जागते ठेवले
आजवरचे भोगले ओठातून ओघळले
कांबातून चिखलाच्या तळी उगले कमळ
तुझ्या माझ्या वेदनेचा झाला हळूवार मेळ...
रात्र सरता सरता हळू चंद्र मालवला
तुझ्या कपाळीचा टिळा माझ्या भाळावर आला !

□ □

पुनर्जन्म / रमेश वानगावकर

उंबरठा ओलांडून आली
तांबुसगोरी तुझी पाउले
विराणवास्तू फुलून गेली
प्राचीचे मधुलाल्य उधळले.
हास्य मुलायम अधरींचे तव
अणुरेणू वास्तूचे प्याले
मृदु स्पर्शाच्या नवलाईने
अंग अंग रोमांचित झाले.
भिंतींना लाभले भिंतपण
दारे खिडक्या डुलू लागल्या
कौलारांना सोनझळाळी
झाडेवेली बहरून आल्या.
वास्तूचे संपले रितेपण
साफल्याचे गुच्छ लहडले
तृषार्तास जलकुंभ मिळाला
आनंदाचे मोर नाचले.
सहज पखरिले प्रेमभाव तू
प्राजक्ताचा सडा सांडला
तुझ्या निरामय सहवासाने
पुनर्जन्म वास्तूस लाभला.

□ □

पिंजरा / किशोर पाठक

पिंजऱ्यातला पक्षी म्हणाला
आभाळ हवं का कोरडंठाक ?
भिजण्याची भिती नाही
तापण्याची भिती नाही
जगण्याची निश्चित हमी
मालकापेक्षा काम कमी...
        थोडे आपलेही आभाळ असावे
म्हणून मी पिंजऱ्यात जाऊन उभा राहिलो
आणि पक्षी पसार झाला......
सध्या मी पक्षाच्या शोधात
पिंजऱ्यातलं आभाळ सांभाळीत
आणि पक्षी...पिंजऱ्याच्या...नव्या !

□ □

पेंढा

पेंढा भरलेल्या वासराच्या गळ्यातल्या
घुंगुरघंटांच्या निनादानेही निष्पाप गाय पाझरते...
त्या फसवून काढलेल्या पौष्टिक दुधावर पोसलेल्या
लेकराला मी पाहिले
त्याच्या डोळ्यात बुबुळे नाहीत
        कानांना पडदे नाहीत
फक्त एक लांबलचक जीभ...लोचटलाळ
आणि त्याच्या देहात
सनातन मूल्यांचा पेंढा काठोकाठ भरलेला !

□ □

विहिरीचे फक्त पाणी प्यावे !
वसंत वऱ्हाडपांडे

विहिरीचे फक्त पाणी प्यावे !
जमलेच तर
पोहऱ्यात मावेल तितके पाणी
वर शेंदून घ्यावे
स्नानासाठी...

विहिरीत डोकावून मात्र मुळीच पाहू नये !
कारण आत असते अंधारगुहा
पाताळस्पर्शी
अन् कपारींच्या आडोशाने
वावरत असतात जिवाणू
विहीर भिंतीवरल्या शेवाळाला मिठी मारून !
वाऱ्याबरोबर गरगरत येणारा
पालापाचोळा,
क्वचित सडलेलाही—
तरंगत असतो पाण्यात, नाइलाज म्हणून
अन् त्याचा दमट दर्प
तवंग धरून असतो सर्वत्र !

— अन् पाणी शेंदून घेतानासुद्धा
पोहरा हळूच टेकवावा पृष्ठभागावर
पाण्याच्या...
हाताच्या हलक्या हळुवार झटक्याने
वरच्यावर भरून घ्यावा
दोर किंचितसा सैल सोडून.

पोहरा तळापर्यंत खोल जाऊ देऊ नये
अन् गेलाच (चुकून) तर
त्याला झटके मारू नयेत
बेलगाम होऊन !
तळींचा सारा सडगाळ
वर येतो नाहीतर
अन् मग पाण्याचीच सगळ्या चव जाते
नेहमीसाठी !

□ □

या उन्हात कलत्या भिजता
मृणाल चिचाळकर

गोठवून स्वप्ने सारी ठेवियली शीतगृहात
विकलांग या स्मृतिंना उरली न कशाची खंत

संवाद संपला कधिचा मौनात हरवली वाणी
शब्दांचे ऋण फिटेना भावाकुळ हिंदोलांनी

एकाकी काळीजपक्षी विस्तिर्ण पोकळी भक्ती
बळ जटायूचे पंखांत निरखितो वाट ग्रिष्माची

जरी प्रवास लांबचलांब नवनव्या प्रदेशामधुनी
जुळविले उद्याशी नाते या शिणलेल्या श्वासांनी

हा ग्रिष्मझळांचा दाह मुग्धशा सुरांनी शमला
कोवळ्या पालवीमधुनी आषाढ मंदसा हसला

भर्जरी व्यथा साहुनी घडविली खेळणी कितिदा
अंधुकशा प्रकाशलहरी गुणगुणती दिडदा दिडदा

या उन्हात कलत्या भिजता सावल्या सुगंधी होती
शीळ घालीत वारा जपतो शापीत फुलांची नाती

□ □

कविता / अशोक विद्रोही

आपल्याच हाका आपल्याजवळ
उडून बसतात तेव्हा
डोळ्यातील अश्रू डोळ्यात नसतात
विप्लव देहाच्या चिंध्या
आतआतून पेटून उठतात
सळसळून आलेल्या झाडासारखे
गुलमोहरून येतात गहिवर
आणि मनाच्या वेटावर
उगवलेला शुष्क सुकलेला प्रदेश
रान घेऊन जळत असते
घायाळ अंकुर चिखलग्रस्त दिसतात
उदास उदास तडफडत असते
पहाडी आभाळ मनगटातून
प्रलयऋचा खोल खोल खोदणीत
भूलेचा चंद्र आक्रोशतो...अवकाशभर

□ □

कविता / अरुण शहाणे

१

तूं लीलया
हात
पुढं केलास
मी मागितला
म्हणून
नुक्ती फुलूं लागलेली
दोनचार
गुलाब फुलं अलगद
जमिनीनं झेलली
तेव्हा !
खाली वाकलो ती
उचलण्यासाठी
तर पावलंही तुझीं
त्यांचीच बनलेली ! !
तश्यातच
सहज वर पाहिलं –
तुझा अंतर्बाह्य
चेहराही
त्यांचाच
आता मी आणू तरी
कुठून
तो स्पर्श ? तो स्पर्श ?

□ □

२

कुंवारपण
जपलेल्या कळ्यांनी
कां
घालावी बेभान
वाऱ्याला साद
तितक्याच बरोबरीनं ?
त्याला नमवून
आपल्या कळीपणाचा
निर्विवाद गंध
सुयोग्य ठिकाणी
पोचवण्याचं कुंवारफर्मान
बिनधास्त सोडावं !
ते कायं
मोडतंय त्याच्याच्यानं !!
शिवाय
बाजारबुणगे भुंगेही बेसहारा
बनतील आपोआप !!!

□ □

३

ते सूर ती जुन्या
गाण्याची चाल
सूर्य किरणांनी
दंव बिंदूत
प्रतिबिंबित केलेली
हृदयाची तार तार
हळूवार छेडणारी
पुसट पुसट
झालीय !
ती नव्यानं
तशीच सूरमयी
कोण बरं करील आतां ?
या सूर्यकिरणांना
दवबिंदूंना
विचारून पाहिलं
ते सुद्धां
तिच्याविना
हरवलेलेच दिसले !!

□ □

सायुज्य / वसंत वऱ्हाडपांडे

आकंठ बुडालो इतुका...
की मीच जाहलो पाणी
विरघळुनी गाता गाता
मी होउनि बसलो गाणी !

□ □

संसद / लक्ष्मीकान्त घुमे

हे बघ ही संसद आहे.
पक्षी संसदेवरून उडत जातात
आणि संसद माणसांवरून रोलरसारखी.
थांब !
मी सध्याच तुझा विचार करू शकत नाही.
आजकाल मी संसदेवर जाणाऱ्या
संतप्त मोर्चात असतो.

तू सावध रहा.
या उन्मत्त पोलिसांच्या रिव्हाल्वरच्या निशाना
माझ्याच दिशेने आहे.

मी देशात आणि रिव्हाल्वरची गोळी माझ्यात
तुला एक सांगतो
तुला यायचेच असेल तर
या मोर्चात माझ्यासोबत ये.

आणि पुन्हा एक.
देशात भाकरीची प्रचंड टंचाई आहे.
अशा वेळी भूक लागली असेल तर
रिव्हाल्वरच्या गोळ्या खा...गोळ्या
फुकटात मिळतात...फुकटात ! !

□ □

दोन कविता / उल्हास मनोहर

१.

कधी कधी
असा मौसम कोसळत रहातो.
आपल्यातंच.
ज्याचा वेध घेता येत नसतो.
वादळाशी झुंज दिल्यावरही वादळांचाच
मौसम सुरू होतो.
कालच प्रवास संपल्याची वार्ता आली.
आणि पुन्हा प्रवास सूरू झाला
हा माणुसही असा बेमौसम'जन्मतो—अन्—
बेमौत मरतो
अन् अशातच तूही घायाळ पक्षिणीसारखी
भेटलीस.
सारं कळण्या आधीच
मी दरीसारखा शहरात दुभंगत राहलो
तू मात्र गठीसारखी गावात कोसळत राहली.

२.

आम्ही स्वप्नपंखांचे वास्तवी आभाळ
धरून जाणारे सूर्यपक्षी. तुझ्यासोबत.
तु मात्र वादळचिन्हे दिसलीत म्हणून
आम्हाला लाटाचे किनारे दाखवितेस.
जाऊ दे.
कुठलाहि सूर्यपक्षी कधीच गात नसतो.
आभाळाचं काळगणं.

□ □

सुगी / नीलकृष्ण देशपांडे

करंद काळ्या कागदावरी उमटून आल्या हिरव्या ओळी
समोवताली विविधारंगी कोमल रेखिव कशिदा जाळी.
निरक्षर त्या कृषीवलांच्या घामातूनही उमटे अक्षर.
समृद्धीचे स्वप्न लोचनी मागतांना नाजुक अंकुर.
सदैव उघडे पान भूमीचे किती लिहावे किती गिरवावे.
नसे स्वल्पही विरामकष्टा तनामनाने किती झिजावे.
माथ्यावरच्या आभाळातील मेघ डवरूनी येता नयनी.
मोरपिसांचा मत्त फुलोरा अंतःकरणी येई तरारूनी.
ओरखडे किसलयी पुलकीत उठले असता जागोजागी.
प्रश्नांकित आयुष्य तरीही असे कितीक ती दूर सुगी.

□ □

ऋतु असा बाळसला

ऋतु असा बाळसला सर्वदूर हिरवी नजर
क्षितीजाच्या किनाऱ्याला जडलेला पाचू पदर.

अशी धरतीही गरती नदी नाल्यांना भरती
काळ्या ढगांचीच माया अंकुरल्या बीजावरती.

कळ्या फुलांच्या ओठात धुंद गंधाचा दरवळ
कलंदर पाखरांच्या पंखातही नवे बळ.

आर्ततेच्या विलयात कात टाकलेली सृष्टी
मळभल्या डोळ्यामध्ये श्रावणाची तृप्त वृष्टी.

□ □

संध्याकाळ / कृष्णा चौधरी

संध्याकाळ
एक न उमलणारी, न फुलणारी
उदास मन, उदास नभ
ओंजळीत रित्या
अर्घ्य मावळत्या गडद सांजरंगांचे !
अवकाश...पुढे भिंत...पुढे भिंत अवकाश...
मी कधीचा आपटतोय डोके भिंतीवर रक्काळून !
नियतीच्या वरवंट्याखाली भरडले जाणारे
अमल अजाण जीवजंतु...
काहींना मात्र मिळाला म्हणे
तुझ्याकडून पूर्वीच 'पासपोर्ट'
प्रश्नांनी प्रश्न वाढतात...
उत्तरे कधी गवसतच नाही.
हे कृपासिंधु !
मला विरघळून टाक ना तुझ्या अजस्र मिठीत ?
प्रश्न निर्माण होण्याआधीच ! !

□ □

नंगा फकीर / या. मु. पाठक

ब्रह्मांडच आले पिंडाच्या सत्संगा
गंगेत वितळली या, गगनाची गंगा !

ती शतशतकांची घोर रात्र अंधारी
ये परंपरेच्या प्राचीला अंधारी
भारती प्रजा तर अंध बने गांधारी
हा दुबळा आला दलिताच्या भयभंगा !

तादात्म्य सारखे चराचराशी ज्याचे
त्या राष्ट्रपित्याच्या परमात्मा ये वाचे
साम्राज्यधुरेचे जोखड मनुजा जाचे
हा थोर महात्मा फकीर म्हणती नंगा !

नरसिंह गर्जना करी तीनदा फक्त
अन् भारत झाला दोन तपातच मुक्त
मुक्तीत सांडले याचे पावन रक्त
पण मानवता ये याच्याची उत्संगा !

□ □

क्षण मंतरलेले / श्रीपाद गंगाधर कावळे

पांथस्था थांबशील तेथे
लाटावरती तरंगावली
सरितेचे अंतर्मन भिजले
मृदगंधाची जिथे नव्हाळी

पांथस्था थांबशील तेथे
रानगर्द झाडांची सळसळ
धेनूवर्षाची जिथे नव्हाळी
पराग मधु पाकळ्यात दर्वळ

पांथस्था थांबशील तेथे
अपूर्व आभा हिरे जडविले
चंद्र महाली झडते मैफल
नुपुरनाद झंकार उमटले

पांथस्था थांबशील तेथे
ज्ञानेशाची ओवी गाईली
कुबडी तीर्थ सुनामे कोणी
घन छायांकित वृक्षा खाली

पांथस्था थांबशील तेथे
कमंडलुतुन तीर्थ सांडले
कुणि तपस्वी मंत्रोच्चारण
आत्ममग्न क्षण मंतरलेले

□ □

दोस्तहो / बबन सराडकर

दोस्तहो, नाही असा मी संपणारा
मी जगाला न्याय माझा मागणारा
आज नाही गंध वेड्या लेखणीला
पण भविष्याला फुले मी वाटणारा
रे, जरी दारात तुमच्या बैसतो मी—
माकडांचे मी न उष्टे चाटणारा
केवढे बुजगावणे 'चालू' दिव्यांचे !
मी उद्याचा सूर्य आहे तळपणारा
सांडते कौलांतुनी आभाळ माझ्या
पण इथे सम्राट झोळी पसरणारा
शब्दही होतील मग तलवार माझे
या सुन्याने मी कशाला झुंझणारा ?

□ □

सारंच सोपं होईल / नीरजा

काल उरले सुरले सारे शब्द
समुद्राला देऊन टाकले
अन् मुक्त झाले.
आता काही हरकत नाही
तुला यायला.

आला आहेसच
तर हे चित्र पहा–
कडेकोट किल्ला
आपल्या अस्तित्वाचा
आणि पहाऱ्याला
मनस्मृती.
हे छताला टांगलेले
पोस्टर पाहिलेस
समुद्राला मधोमध चिरून
चिळकांड्या उडाल्याचे.
ते रक्त नाही
तो खून आहे
माझ्या कवितेचा.

Sorry !
कवितेवर बोलायचं नाही आता
करार आहे तो आपला.
एक करशील ?
ह्या चित्रातील दुपार पेटायच्या आधी
छाटून टाक
नको असलेली पानं
त्या कुंडीतल्या कलमाची.
त्यानंतर सारंच सोपं होईल
तुझं चेहराभर कौतुक
माझ्यासाठी
अन् माझ्या अंगभर
तत्परता
तुझ्यासाठी.

प्राक्तन

स्वतःचेच वेड अंगावर पांघरून
अनंताच्या प्रवासाला निघालेला प्रवासी
आकाशगळतीच्या वेदनेनं
विरत जातो,
आतल्या आत.
अन् मग खोल गाभाऱ्यात
वाजणाऱ्या मृत्युघंटा
त्याला खुणावतात
अंगाअंगांनीं.
आपल्या नावाचे प्राक्तन शोधताना
त्या बेबंद समूहात
बंद होतात मागची सारी दारे.
त्यानंतर हजारो यातना
अन् बाहेर फेकल्यानंतरचे
केविलवाणे अस्तित्व.
आता पावले रेंगाळतात
स्वतःभोवतीच.
अंगावरच्या वस्त्रांच्या
चिंध्या चिंध्या झालेल्या
डोळे आशाळभूत फिरतात
भरारणाऱ्या पाखरांच्या
स्वप्नाळू पंखातून.
□ □

अंबरात माझ्या / आर. रामनाथ

अंबरात माझ्या
नक्षत्र मेळावा
अंतरात पावा
वाजतसे
रात्र की दिवस
लागेनाच ठावा
हरि हा कावा
खेळतसे

असे मुशाफीर

नाही ऐलतीर
आणि पैलतीर
असे मुशाफीर
पाणियात.

रात्र अवसेची
थोडी पावसाची
आणि पुनवेची
डोळियात.
□ □

गाणे पावसाचे / प्रभू राजगडकर

पाऊस माझ्या घरावरचा, रीप ऽ रीप
पाऊस शेतावरचा, पेर्तेव्हा, पेर्तेव्हा
पाऊस मुम्बईचा, उघडा छत्री मारा दडी
पाऊस तुका ओव्यांचा, मन झाले चिंब
पाऊस डिंग डाँग
पाऊस चर्चे मदमस्त !
पाऊस मारतो दडी—
पाऊस प्रश्नही
पाऊस उत्तरही
कोठे गेला भौ पाऊस !
माझी माय काळी अस्थी पंजर झाली
जशी कावळा बसाया, फांदी तुटाया
तुझ्या आश्वासनाच्या पावसाने गा भौ !

□ □

तुळस / शिवा राऊत

इतुके न साहे
उन्हाचे वलण
एवढे अंगण
सांजपिसे.

काजळाला खोल
आठवांचे व्रण
चांदणे उधाण
अवसेला.

काजळकातर
कालिंदीचा डोळा
गोपुरसावळा
गहीवर.

आता तुळशीला
गोधुलीचा तोडा
भेटणार चुडा
कुंकवाला.

□ □

रस्त्यांसाठी / दे. शि. दुधलकर

रस्त्याने कसे साधे सरळ असावे
तसेच चालणाराला आपलेसे करून घ्यावे
रस्त्याने व्हावे वेगवान, पारदर्शी
चालताना भेटतात खाचखळगे,
डोंगरदऱ्या, जंगलपहाड
तेव्हा रस्त्याने एक लक्षात ठेवावे
त्यांना बेमालूम द्यावी हुलकावणी
पण स्वतः पडू नये
आणि चालणारालाही पाडू नये

रस्त्याने ठेवावे दिशांचे भान
वाटेल त्या गावात रस्त्याने थांबू नये
उगीचच चालणाराची जिंदगी बरबाद करू नये
रस्त्याने असावे इमानदार, प्रामाणिक, एकनिष्ठ
आमिषावर भाळून रस्त्याने फितुर होवू नये

रस्त्याने शक्यतोवर मागे पाहून चालावे
थोडा कानोसाही घेत जावा
म्हणजे पुढच्या प्रवासाची आखणी करता येते
आणि ज्यांनी छाटले माणसाचे पाय
त्यांच्यापासून सावध होता येते

जो भेटेल त्याला हाक द्यावी
प्रत्येकालाच साथ द्यावी
स्वतः लहान होऊन सगळ्यांशीच
ओळख करून घ्यावी
रस्त्याने मात्र एक लक्षात ठेवावे
चालणाराची सोबत सोडू नये
ते पळायला लागले की त्यांचे पाय ओढू नये
आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे
रस्त्यांनी रस्ते विसरू नये

□ □

शहामृग / बाळकृष्ण वन्नोरे

छाटून टाकलेत स्वतःचेच पंख आज
या विचित्र शहामृगाने
होऊ नये ख्वाळी
भर बाजारात पक्षधरांच्या
पंख असूनही उडता येत नाही म्हणून
(म्हणजे पिसांनीच केलेला
पक्षपात व अखेरचा पक्षाघात.)
गरुडाच्या भारुडास टोचण्यास
कधीकाळी वर उगारलेली
तशीच मृगनाभीच्या कस्तुरीचा
घोट घेण्यास खोल वाकविलेली
ही उदग्र चोच
आता या वाळूतील
तडजोडीच्या पाणथरात
खुपसून खुपसून
झाली आहे ढाल भदाड
गदगाफरीची
वातड काट्याच्या लाळेने कळकलेली :

आणि त्याबरोबरच सराईतपणे
मानेला लाभलेला
एक शहाजोग बाक,
जागच्या जागी घातलेल्या
वीतभर लांब व दीड वीत उंच
घागरकुंकी मोरनाचामुळे
पायाचेही झालेले (वाजलेले) सूप;

कडेलाच स्फिंक्सच्या
अजस्र मुखवट्यांनी
चवताळलेले आडवे पठार
ठार अनोळखी निर्विकार
ओढी प्रहरांचे वार,
समोरच्या क्षितिजावरून
उन्मत धावत येणारी
पेटत्या परमाणूंची सागरलाट
भिडते पायाशीच...

तरीही होत नाहीत नेस्तनाबूद
संस्कार व संसार इथल्या किनाऱ्यांचे
हाकेच्या अंतरावरून
जाणाऱ्या उंटाचा पायरव
उधळून टाकतो
उरातील खजुरराने
सामावून येत
खुद्द त्या तारगहार येशूला
पाठीवर वाहून नेणाऱ्या
गर्दभीचा आदिम गहीवर
नि दूर कुठे...तळ्याच्या काठावर
दिसते महिरपलेली
दाट हिरवी लव,
न उडणाऱ्या राजहंसाचे कळप
व आभाळातील बगळ्यांना
दुधाचा जोगवा मागीत
स्वतःचीच नखे रंगविणारी
राखेतील अश्राप पाखरे...

□ □

कैवल्य / वत्सन सरडकर

शरीर—मनाला
मानू नये थडी
ऋतूंसवे रुप
बदलते नदी...

शोधावी नदीच्या
उगमाची धाव
आसपास कुठे
चैतन्याचे गाव...

गावाच्या पल्याड
विदेही किनारा
पुढे खोल खोल
कैवल्याच्या धारा...

तिथे माणसाने
चंद्रगीत गावे
कैवल्यात आणि
जन्म जन्म व्हावे...

□ □

डुकरांची कुत्सित लाळ दुर्लक्षितोय / प्रकाश खरात

मी तळपते चक्र;
वाचा,
मुद्रेवर
कारुण्य क्रूसावरील
नि अजिंठ्यातील दिग्विजयी स्मित.
कोलंबसाचा वंशज;
सनृहमरणाचा महासागर पार करतोय्.
: डुकरांची कुत्सित लाळ दुर्लक्षितोय्...

□ □

विषघट वाहून नेताना

रोमँटिक संगीत लहरत गेल्यावर
तत्कालीन भाववृत्तीतून
भारावून जाणं स्वाभाविक.
म्हणून का
तू कालस्तंभित राहणार फणा उभारून ?
संगीताचे स्वर मंद मंद होत गेल्यावर
विषघट वाहून नेताना—
दीर्घ वाटेवरून
संवेदनकात टाकीत
सळसळत जायचंय...

□ □

मयसभा / वंदना विटणकर

बहरले आयुष्य त्याचे गणित मी मांडू कशाला ?
लाभले आभाळ हाती क्षितिज मी शोधू कशाला ?

उसळता देहार्त लाटा बंध तुटले पार्थिवाचे
कणकणाला उजळणारी वीज मी मापू कशाला ?

त्या प्रमाथी स्पर्शमुद्रा मातलेली श्वासभाषा
सूर्य गात्री तळपताना शाश्वती मोजू कशाला ?

सुखसमाधी अर्पणाची प्राण हा निःसंग झाला
तृप्तिचा क्षण साहताना कृपण मी होऊ कशाला ?

जाणते मी मयसभा ही भुलविणाऱ्या प्राक्तनाची
साहिला मी स्वर्ग येथे अमरता मागू कशाला ?

□ □

ओळी वाचता वाचता / नीळकंठ घोडे

ओळी वाचता वाचता तुझा उमगेना ठाव
शिडावाचून चालली कुण्या सागरात नाव

आत तूफान वादळ कसे अल्लाद झेलले
कसे शब्दांच्या खांद्यांनी उभे आकाश तोलले

तुझ्या काठावर नाही उतरला दर्यावर्दी
झाले मैफिलीत जमा तालासुरातले दर्दी

मागे भेटली तेव्हाची रात्र होती गोरीमोरी
कशी ठेवली जपून सप्त सागराची चोरी

ओळी वाचता वाचता निखळला कडा कडा
कसे पाऊल तुडवी देहपाकळ्यांचा सडा

□ □

आडवाट

पावलांनी जावे किती
कुठे तुडवावी वाट
भेटीसाठी जवळच
असते ना आडवाट

आडवाट चालताना
काट्यांचे झडते अंग
आणि फुलाफुलातून
फणा काढतो भुजंग

□ □

सुरभी : लोकनाट्य कला

व. दा. कुळकर्णी

"सुरभी नाटक समाजमुलु" ह्या जगातील अनन्यनेव व्यावसायिक कुटुंबीय नाट्य संस्था असाव्यात. एकाच कुटुंबातील सर्वच्या सर्व सदस्य स्त्री-पुरुष, बाल, तरुण, वृद्ध-हे या नाट्य संस्थेतील कलावंत होत. गावोगाव हिंडून रात्री नाटकांचे प्रयोग करावयाचे व कौटुंबिक जीवन जगायचे हा त्यांचा क्रम गेली १००-१२५ वर्षं अव्याहतपणे अविरत चालू आहे. सुरभीच्या जवळपास ३६ कुटुंबीय नाट्य संस्था आंध्र प्रदेशात आहेत. या कुटुंबीय नाट्यसंस्था नात्या-गोत्यांनी विवाहादी संस्कारिक बंधनांनी परस्परांशी गुंफिल्या गेल्या आहेत. वीथिनाटकम्, काष्ठच पुतळ्यांचे खेळ आणि चामड्यांच्या बाहुल्यांचे खेळ या पथनाट्य व मनोरंजनपर लोक-नाट्याच्या प्रयोगातून उदयास आलेल्या या कुटुंबीय नाट्यसंस्था होत. ह्या नाटक मंडळी आंध्रप्रांतात 'अरे मराठेलु'च्या नाट्यसभा म्हणून ओळखल्या जातात. मराठी माणूस हा नाट्यवेडा आहे. कौटुंबिक व व्यावसायिक बंधनामुळे सर्वच्या सर्व मराठी कुटुंब नाट्यवेडे बनते याचा खरा खुरा प्रत्यय आंध्रप्रांतातील सुरभी नाट्य संस्थांद्वारे येतो. भरत नाट्य-शास्त्राच्या तत्त्वानुसार कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने आपले जीवन नाट्यकलेला समर्पित केलेले येथे आढळते. 'सुरभी' नाट्यसंस्था संस्थापक वानारस गोविंदरावांना 'आंध्र नाटक कलोद्धारक' ही बहुमानाची पदवी आंध्रजनतेने प्रदान केली आहे. वानारस गोविंदरावांची १९२७ साली हत्ती वरून मिरवणूक काढण्यात आली. आंध्रप्रदेशात हा सर्वात मोठा मान समजला जातो. परप्रांतीय मराठ्याने आपल्या कर्तृत्वाने आंध्र रंगभूमी गाजविली, भूषविली. कुटुंबीय नाट्यसंस्था प्रस्था-पिली, रुजविली, फुलविली आणि शाखोपशाखांनी पल्लवीत केली.

तिसऱ्या पानिपत युद्धाच्या दारुण पराभवानंतर मराठ्यांचे सैन्य इतस्ततः विखुरले गेले. इ. स. १८१८ साली मराठी सत्तेचा पूर्णतः लोप झाला. मराठे सैनिक भारताच्या प्रांतोप्रांती स्थलांतरित झाले. कालावधीने ते तेथेच स्थायिक झाले. अशाच मराठी सैनिकांची एक तुकडी आंध्रप्रदेशातील रायलसीमा प्रांतात वस्तीला आली. यांना अरे कापु किंवा अरे मराठे म्हणतात. आंध्रप्रांतातील अरे मराठ्यांच्या लोकसाहित्याचा आणि लोक-भाषेचा भाषाशास्त्रीय अभ्यास डॉ. श्री. रं. कुळकर्णी यांनी केला असून त्या भाषेचा सांगाडा अपभ्रंश भाषेशी किती मिळताजुळता आहे हे त्यांनी सप्रमाण सिद्ध केले आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्यावतीने लवकरच ते प्रकाशित होत आहे. अरे मराठ्यांच्या प्रमुख तीन शाखा आहेत. १. रायदुर्ग २. सुरभी ३. बालकोंडा. यापैकी सुरभी व बालकोंडा शाखेने आपले सर्वस्व नाट्यकलेला अर्पण केले आहे तर रायदुर्ग शाखेने प्रथम नाट्यव्यवसाय स्वीकारला. पण कालांतराने शेती हाच आपला प्रमुख व्यवसाय निवडला. आंध्रप्रदेशात शेती करणारे अरे मराठे यांची कुलनामे आजही भोसले, शिंदे, गायकवाड, पवार, जाधव हीच आहेत. त्यांची घरची भाषा मराठी आहे. सुरभी आणि बालकोंडा ही ग्राम-नामेच त्या कुळातील मंडळीने तेलगु पद्धतीप्रमाणे आपली आडनावे म्हणून स्वीकारली. अरे मराठ्यांचे कुलदैवत विठोबा आहे. इष्टदेव राम व हनुमान आहे. हे शैव संप्रदायी असून लिंग व यज्ञोपवीत धारण करणारे आहे. सुरभी नाट्य संस्थेतील नट्य स्वतः नाटकाची संहिता लिहीत व गीतरचना करीत. स्वतःचे मेकप त्यांना स्वतः करावे लागते. कंपनीत कुणीही मेकपमॅन नसतो. नाटकात वृद्धांना वृद्धाची, मुलांना मुलाची, स्त्रियांना स्त्रियाची भूमिका करावी लागते. वास्तवातील पती-पत्नी नाटकातही पती पत्नीच

असाध्यात असे बंधन नाही. अपरिहार्य प्रसंगी स्त्री नटी, पुरुष नटाचीही भूमिका करते व पुरुष नट नटीची. प्रसंग पडला तर कुणाला कुठलीही भूमिका करायची तयारी ठेवावी लागते. आई–बाप, माय–लेक, पिता–पुत्र, पती–पत्नी, भाऊ–बहीण, चुलते–पुतणे, मामा–भाचे, सख्खे, सावत्र, मानलेले सर्वच नात्यागोत्यांची स्त्री पुरुष एकत्र येऊन नाटयसंस्था चालवतात. ही कल्पनाच अभिनव आहे आणि त्यातही पिढया न पिढया ती टिकवितात हे त्याहीपेक्षा अद्‌भुतरम्य आहे.

रायलसीमा प्रांतात ब्रिटिश राजवटीला चोर, लुटारू, दरोडेखोर यांचा उपद्रव होऊ लागला. मुळातच शूर असलेले वीर सैनिक व गनिमी काव्यात तरबेज असलेले मराठे सैनिक जे अरे मराठे म्हणून त्या प्रांतात ओळखले जात त्यांनी दरोडेखोरांच्या बंदोबस्ताकरिता इंग्रजांना मदत केली. ब्रिटिश सरकारने प्रसन्न होऊन अरे मराठयांना हजारो एकर जमीन बेल्लारी, रायलसीमा प्रांतात बक्षीस देऊन त्यांच्या वीरत्वाचा गौरव केला. श्री रायदुर्ग ड्राम्याटिक थिएटर्स या कंपनीचे प्रोप्रायटर व मालक वानारस वेंकोबराय याच्या वंशजाकडे अद्यापही ती सनद आहे.

सुरभी कुटुंबीय नाटक मंडळीचे मूळ पूर्वज वानारस संजीवराव होत. त्यांचा व्यवसाय शेती असून दारू विक्रीचे दुकानही त्यांनी चालविले होते. दारूची धुंदी आणि विषयासक्त जीवन यांचा उबग येऊन कुटुंबात कलह सुरू झाला.

संजीवराव हे अत्यंत भावनाप्रधान पुरुष. ते शक्तीचे–देवीचे, अनन्य उपासक. त्यांनी सर्वस्वाचा त्याग करून सर्व मालमत्ता आपल्या पुतण्याच्या नावे करून दिली. आपल्या दोन पत्नी व दहा मुले यांचा भार त्यांच्यावर टाकून त्यांनी विजनवास पत्करला. एकदा देवीच्या उत्सवाच्या प्रसंगी ‘वानारस कुटुंबाच्या उत्कर्षासाठी देवी नरबली मागते” असे पुजाऱ्याने सांगताच भावविवश होऊन वानारस संजीवरावाने यज्ञवेदीपुढे धारदार तलवार रोविली व त्यावर उडी घेऊन स्वतःचाच बळी देवीला दिला. कुटुंबाच्या कल्याणासाठी, उत्कर्षासाठी व सौख्यासाठी स्वतःचे बलिदान दिले. कुटुंबाच्या भरणपोषणाची जबाबदारी वडील पुत्र रामय्यावर पडली. काष्ठच पुतळयांच्या खेळाची कला त्यांना अवगत होती. रामय्या, वेंकोजीराव आणि कृष्णाजीराव या बंधूंनी काष्ठच पुतळयांच्या खेळाबरोबरच चामडयांच्या बाहुल्यांच्या खेळाची कला अवगत केली. आजही चामडयांच्या बाहुल्यांच्या खेळ करून जनरंजन करीत करीत उपजीविका करणारे असे मराठे आंध्रप्रदेशात आहेत. आंध्रप्रांतात चामडयांच्या बाहुल्यांच्या खेळाच्या कलेचा प्रारंभ इ. स. पूर्व तिसरे शतक मानतात.

इ. स. १८०० च्या सुमारास कडप्पा जिल्ह्यातील हनुमद्‌गुंडम व त्या परिसरातील खेडोपाडी चामडयांच्या बाहुल्यांचा खेळ करण्यासाठी कृष्णाजीराव, वेंकोजीराव, रामय्या व त्यांची वृद्ध आई चेन्नमा हे वानारस कुटुंब आले. फकीरप्पा या नावाचा एक नऊ वर्षांचा अनाथ मुलगा देवीच्या साथीने तळमळत होता. दयार्द्र अंतःकरणाने चेन्नमाने त्याची सुश्रुषा केली. पूर्ण बरा होताच त्याला आपल्या कुटुंबात वाढविले. फकीरप्पाची तरल बुद्धिमत्ता, कलेची आवड आणि चुणचुणीतपणा पाहून चेन्नम्माने आपला अपत्यहीन मुलगा वेंकोजीराव यास त्यास दत्तक घेण्यास सुचविले. गाव प्रमुखाच्या अनुमतीने व सर्वांच्या साक्षीने हे दत्तविधान पार पडले व त्या मुलाचे नाव गोविंद असे ठेविले. वेंकोजीराव व त्याची पत्नी सुंकम्मा यांनी गोविंदाचा उत्तम तऱ्हेने प्रतिपाळ केला. हेच वानारस गोविंदराव सुरभी कुटुंबीय नाटक मंडळीचे संस्थापक होत.

सुरभी हे कडप्पा जिल्ह्यातील रायछोटी तालुक्यातील एक छोटेसे गाव. त्या गावचे रहिवासी म्हणून त्यांची नाटक मंडळी ‘सुरभी ड्राम्याटिक थिएटर्स’ या नावाने ओळखली जाऊ लागली. गोविंदाचे चुलते रामय्या यांनी त्यास तेलुगु वाचावयास, लिहावयास शिकविले. तेलुगु गद्य व पद्य साहित्याचा त्याच्याकडून अभ्यास करवून घेतला. वडील वेंकोजीने त्यास संगीताची दीक्षा दिली. साहित्य व संगीत या कलांत गोविंदाने प्रावीण्य मिळविले. वानारस कुटुंब चामडयांच्या बाहुल्यांचा खेळ केवळ खेडोपाडीच करीत असत असे नाही तर मद्रास, बेल्लारी,

विशाखापटणम् राजमहेन्द्री, श्रीकाकुलम, मछली-पटणम्, विजयवाडा, सिकंदराबाद, हैदराबाद या शहरीही करीत. आंध्रप्रदेशाबाहेर पुणे, मुंबई, बेंगलूर, येथेही त्यांनी चामडयांच्या बाहुल्यांच्या खेळाचे प्रयोग केले. पुणे मुक्कामी मराठी नाटके पाहण्याचा योग गोविंदरावांना आला आणि त्या नाटयप्रयोगांनी ते भारावून गेले. अशाच प्रकारचे प्रयोग आपल्या कुटुंबीय मंडळींनी सादर करावेत हा ध्यास त्यांनी घेतला. उत्तर सरकार व रायलसीमा विभागात धारवाडच्या सांगली बंधूंची नाटके त्यांनी पाहिली. कर्नुल जिल्ह्यातील नंदीयाल या गावी ज्योति सुब्बय्या नाटक मंडळीचा मुक्काम होता. तरुण गोविंदराव कुणालाही न कळविता सुरभीहून पळून नंदीयालला आले व ज्योति सुब्बय्याच्या नाटक कंपनीत प्रवेश मिळविला. सुब्बय्याने गोविंदरावास संगीत व अभिनयाचे शिक्षण दिले. या कंपनीत गोविंदरावांनी 'हरिश्चंद्र' नाटकात विश्वामित्राची भूमिका केली. ही भूमिका अत्यंत गाजली. आई–वडील आपल्या मुलाच्या शोधातच होते. वेंकोजीरावांनी नंदीयालला जाऊन ज्योति सुब्बय्याच्या कंपनीतून काढून आपल्या मुलास गोविंदरावास सुरभीस परत आणले. कोच्चर्ड गंगी-रेड्डीची मुलगी पेद्द सुब्रम्माशी त्यांचा विवाह केला. कोच्चर्ड गंगीरेड्डी हे अरे मराठे कुळातील असून अवेटी गंगय्या म्हणून ओळखले जात. सुरभी अरे मराठेची प्रमुख पाच घराणी आहेत. १. वानारस २. अवेटी ३. आटोक ४. रेकमदार आणि ५. शिंदे. या घराण्यात आपआपसात विवाह होतात आणि त्यातील लेकी–सुना, मुले–जावई, नात–नातवंडे त्या त्या नाटच संस्थेत नट–नटी म्हणून कामे करतात. या प्रकारे परस्परात गुंफिलेल्या आणि गुंतलेल्या बंधांनी या व्यावसायिक कुटुंबीय नाटचसंस्था अद्यापही टिकून आहेत.

इ. स. १८९५ मध्ये सुरभी गावातील सुखवस्तु व श्रीमंत घराणे श्री. रामी रेड्डी व चेन्ना रेड्डी यांनी एका विवाह प्रसंगी वानारस बंधूंना बाहुल्यांच्या खेळासाठी निमंत्रित केले. परंतु वानारस गोविंदरावांना बाहुल्यांचा खेळ प्रस्तुत करण्याची कल्पना आवडली नाही. त्यांनी या विवाह–सोहळयाच्या प्रसंगी महाभारतातील आख्यानावर आधारित नाटक सादर करण्याची संमती मिळविली. रामी रेड्डीच्या घरातील बायकांच्या साडया व दागदागिने तसेच लग्न समारंभास आलेल्या पाहुण्यांच्याही साडया व दागदागिने, वंजान्याकडील पोषाक व कपडेलत्ते या नाटकासाठी मिळविले. या विवाह प्रसंगी 'कीचकवधा'चा सुंदर प्रयोग वानारस कुटुंबियांनी सादर केला. सुरभीचा हा पहिला प्रयोग खूपच यशस्वी झाला. या नाटकात कुटुंबातील मंडळीनी खालील भूमिका केल्या.

कृष्णाजीराव – कीचक
पेद्द रामय्या – भीम
वेंकोजीराव – कंकभट्ट
वजीरप्पा – बृहन्नडा
गोविंदराव – नकुल
चित्र रामय्या – सहदेव
पापाबाई – द्रौपदी
चित्र सुब्बय्या – उत्तरा

या नाटकात मृदंग, संबळ, व्हायोलीन इत्यादी याच मंडळींनी वाजविली. तसेच पार्श्वसंगीतही याच मंडळींनी गायिले. ज्या ज्या वेळी रंगमंचावर काम नसे त्या त्या वेळी ही कामे त्यांनी केली. पुलिवेंदला येथील सब मॅजिस्ट्रेट श्री. टी. एन. गोविंदराजलू नायडू या प्रयोगास उपस्थित होते. त्यांना हा प्रयोग अतिशय आवडला. अनेक बक्षीसे त्यांनी दिली. त्यांनी व रामीरेड्डी यांनी नाटचसंस्था उभारण्यास वानारस कुटुंबियास भरपूर आर्थिक साहाय्य दिले आणि सुरभीची पहिली नाटच संस्था 'शारदा मनोविनोदिनी नाटच सभा' ही इ. स. १८९५ साली अस्तित्वात आली.

आंध्र रंगभूमी व मराठी रंगभूमी साधारणत: एकाच काळी अस्तित्वात आली. दोहोंचाही प्रेरणा-स्रोत एकच आहे. मराठी रंगभूमीचा प्रारंभ इ. स. १८४३ मानला जातो. परंतु तत्पूर्वी तंजावरचे मराठे राजे शाहराज भोसले (१६८४—१७११) यांची नाटके ही मराठी रंगभूमीची गंगोत्री होय. तेलुगु नाटकाची गंगोत्रीही येथेच आढळते. शाह-राज भोसले यांची जवळपास पंचवीस मराठी नाटके आणि वीसच्यावर तेलुगु नाटके आहेत. तमिळ आणि हिन्दी नाटकांचे पहिले मानकरी

तेच होत. आधुनिक तेलगु नाटचसृष्टी साधारणतः इ. स. १८५७ नंतर उदयास आली. कोरड रामचंद्र शास्त्री यांचे 'मंजिरी मधुकरियम्' हे पहिले तेलगु स्वतंत्र नाटक इ. स. १८६० साली अवतरले. मराठी नाटककारांप्रमाणेच तेलुगु नाटककारांनी संस्कृत-इंग्रजी नाटकांचे अनुवाद प्रसिद्ध करून रंगभूमीवर सादर केले. वाविलला वासुदेव शास्त्री यांचे 'नंदक राज्यमु' हे पहिले तेलुगु सामाजिक नाटक इ. स. १८७५ मधील होय. कठपुतळचांचे खेळ, चामडचांच्या बाहुल्यांचे खेळ, यक्षगान, भागवतम्, बुर्रा कथा यांच्याद्वारे तेलुगु जनतेचे मनोरंजन व प्रबोधन त्या काळी होत असे. याचीच परिणती पुढे स्वतंत्र रंगभूमी निर्माण करण्यात झाली.

कंदकुरी विरेश लिंगम् पंतलु (१८८०) हे आधुनिक तेलुगु रंगभूमीचे प्रवर्तक मानिले जातात. इ. स. १८९२ साली गुरजाडा अप्पाराव यांनी 'कन्याशुल्कम्' हे नाटक सादर केले. मराठीतील देवलांच्याच 'शारदे'चा तो तेलुगु अवतार होय. धर्मावरम् रामकृष्णाचार्यलु (१८५३-१९२२) हे स्वतः नट, नाटककार व दिग्दर्शक होते. त्यांना 'आंध्र नाटच पितामह' म्हणून संबोधिले जाते. त्यांची नाटके त्यावेळी लोकप्रियतेच्या शिखरावर होती. 'सुरभी'ने त्यांना प्रयोगासाठी नाटक मागितले त्यांचा नकार मिळताच त्वेषाने व दुप्पट उत्साहाने 'सुरभी'ने स्वतःच्या कंपनीतील सदस्य नाटककार म्हणून घडविले. इतर नाटक कंपन्यांतून पुरुषच स्त्री भूमिका करीत. परंतु सुरभी नाटचमंडळीत त्याच कुटुंबातील स्त्रिया स्त्री भूमिका करीत असल्याने प्रेक्षक वर्ग 'सुरभी' नाटकांकडे अधिक आकर्षिला जाई. तेलुगु नाटकातून स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनी करण्याचा पहिला पायंडा 'सुरभी' नाटच मंडळीनी सुरू केला. सुरभी पापाबाई ही तेलुगु रंगमंचावरील पहिली नटी होय. तसेच कृष्णाजीरावांची मुलगी सुरभी कमलाबाई ही तेलुगु सिनेमातील पहिली चित्रपट तारका होय. सुरभी पापाबाई, अंजनम्मा, सुब्बम्मा, लक्ष्मम्मा, भोजाबाई, वेंकुबाई या सुरभीतील प्रसिद्ध नटी व गायिका होत. वेंकुबाईना तर तिच्या झुंझुटी रागाच्या अप्रतिम गायकीवर प्रसन्न होऊन धर्मावरम् गोपालाचार्यलुनी त्यांना 'झुंझुटी वेंकुबाई' ही पदवी प्रदान केली. या काळात 'सुरभी'ने हरिश्चंद्र, शार्ङ्गधर, शाकुंतलम्, शारदा परिणय पारिजाता पहरणम्, कांतीमती, रुक्मांगद, मल्लणराजचरित्तमु, स्त्रीसाहसम्, चंद्रकान्ता, कीचकवध, लंकादहनमु इत्यादी नाटके अत्यंत यशस्वितेने सादर केली. रापाटी सुब्बादासुच्या आणि नंतर नारायणदासाच्या संगीत शिक्षणाने 'सुरभी'तील नट नटी संगीतात पारंगत झाल्या व त्यांचे नाटचप्रयोग अधिकाधिक रंगत गेले. तेलुगु नाटकात हार्मोनियम वादनाचा पहिला प्रयोग करण्याचा मान 'सुरभी' नाटक संस्थेकडे जातो. सुब्बादासुची आठवण म्हणून आजही त्यांनी लिहिलेली व बसविलेली विघ्नेश्वरस्तुती, गणेशवंदन नाटच प्रयोगाच्या प्रारंभी गायिली जाते. ते पद असे.

"श्री शैलजासुत रजित कुंवर साधन मत्तेभवदन कात्यायनीधन सुब्बदास नमोस्तुते । तत्त्चरण पद्ममुलु परिपालयमाम निरत त्वमाश्रयम् । सत्याधुरेन संसत् कल्पावनी सुरभीकर श्री शारदा मनोविनोदिनी..."

नाटकातील संगीत नाटकाला भरघोस यश मिळवून देते असे वाटल्यावरून नाटचसंस्थेच्या नावात 'सुरभी शारदा मनोविनोदिनी संगीत नाटक सभा' असा बदल केला. सुरभीच्या तीन कुटुंबातील साधारणतः तीस पस्तीस व्यक्ती नट-नटी रंगमंच प्रयोग व व्यवस्थापन सर्व सांभाळत. त्यांचा स्वतःचा स्वतंत्र ऑर्केस्ट्रा असे. आलेल्या उत्पन्नाची समान वाटणी होई. गुंटुर, नरसारावपेट, राजमहेन्द्री, श्रीकाकुलम्, मछलीपट्टणम् बेहरामपूर' विजयवाडा, वरंगल, मद्रास, बेंगलोर, एवढेच नाही तर मंडाले, रंगून आदी अंदमान-निकोबार, ब्रह्मदेश, मलाया आर्चिपेलगो असे भारताबाहेरील देशात दौरे करून त्यांनी आपली नाटके सादर केली. कंपनीचा खूप विस्तार झाला आणि व्यवस्थापन करणे कठीण होऊ लागले. परिणामतः तिन्ही भावांनी समंजसपणे विभक्त होऊन 'सुरभी'च्या तीन नाटच संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला. कृष्णाजीरावांनी म्हैसूर व मद्रास लगतच्या सरकार प्रदेशात प्रयोग करावेत. पेंद रामय्याने निझाम संस्थानात प्रयोग करावेत तर

वेंकोजीरावांनी उत्तर सरकार जिल्ह्यात प्रयोग करावेत असे ठरले. वानारस गोविंदरावांनी व्यवस्थापन आपल्या हाती घेऊन 'गोविंदराव सुरभी नाटच मंडळी' असे नवे नामाभिधान आपल्या नाटचसंस्थेस दिले. दिज्जिहाळ चिंतामणी शास्त्री, कोप्पारपु सुब्बाराव सारखे प्रसिद्ध नाटककार पुढे आले आणि त्यांनी आपली नाटके 'सुरभी'ला प्रयोगासाठी दिली. परंतु आजही अनेक प्रयोगसादर नाटके लिखित स्वरूपात नाहीत. पुस्तकरूपाने नाटचसंहिता छापलेल्या नाहीत.

भीमावरम् येथे 'लंकादहनम्' या नाटकाच्या प्रयोगात वानारस गोविंदरावांनी अंजनेय म्हणजे हनुमानाची भूमिका केली. गोविंदराव हे राम व हनुमान भक्त असल्यामुळे शनिवारी नवे कपडे परिधान करीत नसत आणि नाटचप्रयोग तर शनिवारी ठरलेला. अंजनेयाच्या भूमिकेत राम राम राम असे रामनायाचे भजन करीत असताना त्यांच्या अंगावरील कपडचाने अचानक पेट घेतला. गोविंदराव अंजनेयाच्या भूमिकेत एवढे तल्लीन झाले होते की त्यांना कपडे पेटल्याचे भानही राहिले नाही. प्रेक्षकांना ट्रिक सीनसमुळे तो प्रयोग खराखुरा व अप्रतिम वाटू लागला. त्यांची पत्नी लक्ष्मम्मा ही त्याच नाटकात भूमिका करीत होती. तिच्या लक्षात तो प्रसंग आला. प्रसंगावधान राखून तिने आग विझविली परंतु गोविंदरावांचा उजवा हात पूर्णतः जायबंदी झाला. या दुर्घटनेमुळे हताश न होता गोविंदरावांनी काम मात्र पूर्ववत चालू ठेविलें व 'कांती मदी' नाटकात ते चोराची आपली गाजलेली भूमिका करीत. श्री. गोविंदरावांनी अमाप पैसा कमाविला व तेवढचाच सढळ हाताने दानही करून टाकिला. स्वातंत्र्ययुद्धातील स्वातंत्र्य सैनिकांना त्यांनी मदत केली.त्यांना आश्रय दिला. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला उदार अंतःकरणाने आर्थिक साहाय्य दिले. मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठी दाने दिली. धर्मशाळा बांधल्या, पांथस्थांसाठी विहिरी खोदविल्या. अनेक शैक्षणिक संस्थांना मदत केली. एवढेच नाही तर इ. स. १९३३ साली मद्रास येथे भरलेल्या आंध्र नाटच कला परिषदेचा संपूर्ण खर्च स्वतः केला. इ. स. १९३७ मध्ये येल्लुरू येथे वानारस सुरभी गोविंदरावांच्या नाटचं प्रेमी मंडळींनी पुढाकार घेऊन त्यांचा ७० वा वाढदिवस साजरा करण्याचे ठरविले. हिंदू युवजन संघम्‌च्या परिसरात वानारस गोविंदरावांचा पुतळा त्यांनी उभारला आणि कानडी नाटक कंपनी गुब्बी थिएटर्सचे प्रोप्रायटर व सुप्रसिद्ध नट जी. एच. वरिण्णा यांच्या हस्ते त्या पुतळयाचे अनावरण करण्यात आले. वयाच्या ८६ व्या वर्षी येल्लुरू जवळील पोलसन्नीपल्ली या गावी त्यांचे निधन झाले. आयुष्याच्या उत्तरार्धात गोविंदराव तेथेच स्थायिक झाले होते. ज्या ज्या ठिकाणी सुरभी नाटचप्रयोग करते त्या त्या गावात परोपकारी सामाजिक कार्य उभारून मगच कंपनी आपला मुक्काम दुसऱ्या गावी हलविते.

वानारस कृष्णाजीरावांचा दत्तकपुत्र वानारस चिना रामय्या हा बहुगुणी नट सुरभी नाटक कंपनीत होता. हा हरहुन्नरी नट तेलुगु प्रांतातच नव्हे तर संपूर्ण दक्षिणेत 'दशावतार' खेळाचा प्रवर्तक मानला जातो. नाटकाचे पडदेही हा स्वतः रंगवीत असे.

सुरभी नाटच संस्थेच्या आज जवळ जवळ ३६ कुटुंबीय नाटचसंस्था आंध्रप्रदेशात खेडोपाडी नाटकांचे प्रयोग करतात. ही सर्व नाटके तेलुगुत असतात. प्रामुख्याने महाभारत, भागवत आदि पुराणातील आख्यानावर आधारित ही नाटके असतात. क्वचित ऐतिहासिक नाटकेही सादर केली जातात. त्यांचा तो व्यवसाय खरा पण वंशपरंपरागत नाटचकला त्यांनी जोपासली हे अहंविशेष. अशाप्रकारच्या कुटुंबीय नाटचसंस्थांचे केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील हे एकमेव उदाहरण असावे. या व्यवसायिक कुटुंबीय नाटचसंस्थांतील प्रमुख नाटच संस्था अशा :

१. गोविंदराव सुरभी नाटच मंडळी
२. शारदा विजय नाटच मंडळी
३. वेंकटेश्वर नाटच मंडळी
४. राम सत्यनारायण नाटच मंडळी
५. न्यू पूर्णानंद ड्राम्याटिक थिएटर
६. गोवर्धन नाटच मंडळी
७. गजपती नाटच मंडळी
८. शारदा मनोविनोदिनी नाटच कला मंडळी

९. वसुंधरा नाटय मंडळी
१०. विजय नाटय मंडळी
११. सुरभी रमाबाई नाटय मंडळी

रंगभूमी हेच सुरभी लोकांचे जीवन. रंगमंचाच्या आजूबाजूला प्रत्येक कुटुंबाचे 'घर' असते. प्रत्येक नट–नटींना योग्यतेप्रमाणे व गरजेनुसार पगार दिला जातो आणि त्या मासिक वा वार्षिक उत्पन्नात त्यांना 'संसार' चालवावयाचा असतो. थाटावयाचा असतो. सर्वांचा स्वयंपाक एकाच ठिकाणी होतो. भोजनही एकत्रच होते. नाटकातील राणी–दासी नाटक संपताच सर्वसामान्य संसारी स्त्री प्रमाणे वागते. सर्वांना या वेळी समान लेखिले जाते. नाटक संपताच उष्टी–खरकटी काढण्यासाठी आणि भांडी कुंडी घासण्यासाठी त्या सरसावतात. धुणी–भांडी त्यांनाच करावे लागते. जीवन ही रंगभूमी आहे याचे वास्तव दर्शन 'सुरभी' नाटय संस्थाद्वारे होते. नाटकात रंगभूमीवर स्त्रिया भूमिका करतात पण लौकिक जीवनात मात्र खानदानी मराठा स्त्री प्रमाणे पडदानशीन होतात. बहु पत्नीकाची चाल सुरभी अरे मराठा यात रूढ आहे. नाटकात स्त्री भूमिका करण्यासाठी हक्काची योग्य स्त्री असावी हाही त्या मागचा एक उद्देश असावा. तंबू उभारण्यापासून तो तंबू उचलण्यापर्यंत सर्वच कामे नाटकातील नट–नटी करतात. तिकिट विक्री करणे, पडदे ओढणे, ऑर्केस्ट्रा वाजविणे सर्वच कामे वेळ मिळेल तसे नट–नटींना करावी लागतात. नाटकाला लागणारे राज दरबाराचे व सीन सिनरीचे पडदे ते स्वतःच रंगवितात. नेपथ्य आदीचेही तंत्रविशारद तेच असतात. कुठलेही काम हलके मानिले जात नाही. श्रेष्ठ नटी व कनिष्ठ नट हा भेदभाव पाळला जात नाही. मिळालेली बक्षिसे, पारितोषके आणि प्राप्त झालेला गौरव हा सामुदायिक ऐवज मानला जातो. योग्यतेप्रमाणे किंवा आवश्यकतेनुसार कुणालाही त्याचा उपयोग करण्याची मुभा असते. व्यक्ति–स्वातंत्र्याच्या कुठेही हे आड येत नाही. व्यक्तिविकासाला पूर्णतः वाव दिला जातो आणि याच कारणांमुळे दीडशे वर्षांपासून व्यावसायिक कुटुंबीय नाटयसंस्था न भंगता टिकून आहेत आणि हेच त्यांचे अनन्यसाधारण वैशिष्टय होय.

नटाचे तोंड पाहू नये म्हणतात. धर्मशास्त्रकारांनी घालून दिलेला हा दंडक आहे. व्यावसायिक नट–नटींना समाजात आजही हीन लेखिले जाते. अरे कापु किंवा अरे मराठे हे आंध्रवासियांना परप्रांतीय व परकेच. त्यांनी अरे मराठयांना विशेषतः सुरभी नाटय संस्थांशी संबंधित असलेल्या स्त्री–पुरुषांना समाजात मिसळू दिले नाही. त्यामुळे आपआपसात प्रेम वाढून विवाहादी संस्कारांनी बद्ध झाल्यामुळे त्यांच्यात एकोपा निर्माण झाला असावा, संघटना निर्माण झाली असावी. अरे मराठयांपैकी ज्यांनी शेती हा व्यवसाय स्वीकारला तेही आपणास सुरभी नाटय संस्थांतील स्त्री पुरुषांपासून अलिप्त ठेवतात. सुरभी नाटय संस्थांच्या शाखोपशाखात रोटी–बेटी व्यवहार होतो. विवाहादी संस्कार पार पडतात आणि शेतकीप्रधान अरे मराठे आपआपसात रोटी–बेटी व्यवहार करतात. प्रत्येक गटाच्या जणू स्वतंत्र वसाहती निर्माण झाल्या आहेत. व्यवहारासाठी त्यांनी तेलुगु भाषा आपली भाषा मानिली पण घरी मात्र मराठी बोलतात. हळू हळू तीही लुप्त होत जाईल. आपण मराठे आहोत ही जाणीव त्यांनी आजही जपली आहे. इतर कार्य उत्सवाप्रमाणेच दरवर्षी शिवजयंतीचा सोहळा मोठ्या उत्साहाने ते साजरा करतात. श्री शिवछत्रपतीचे मनोभावे श्रद्धापूर्वक स्मरण करतात. त्यांना महाराष्ट्राचा आणि मराठी भाषेचा कोठेही संपर्क नाही अशा आडवळणाच्या खेडयापाडयातून हे लोक विखुरले आहेत. विवाह प्रसंगी उत्सव प्रसंगी वा संमेलन प्रसंगी सर्व एकत्र येतात. सरपंचादी मानाची स्थानेही यानी आपल्या कर्तृत्वाने मिळविली आहेत. शिक्षणाकडे आज या कुटुंबियात ओढ निर्माण झाली आहे.

आंध्र लोकनाटय समृद्ध करण्यात सुरभी नाटय मंडळीचा सिंहाचा वाटा आहे. वीथि नाटकपथ नाटय, यक्षगान, भागवत, दशावतारी खेळ काष्ठ पुतळयांचा आणि चामडयांच्या बाहुल्यांचा खेळ यांची परिणत अवस्था नाटय संस्था उभारण्यात झाली आहे. ग्रामीण जनतेची अभिरुची

लक्षात घेऊन सुरभी नाटच संस्था आपले नाटच प्रयोग सादर करते. सुरभी नाटच मंडळी या व्यावसायिक कुटुंबीय नाटचसंस्था होत. आंध्र प्रदेशात अशा व्यावसायिक कुटुंबीय नाटच संस्था ३६ च्या वर आहेत. नाटचकलेचा हीन (?) व्यवसाय स्वीकारल्यामुळे व परप्रांतीय अरे मराठे असल्यामुळे आंध्र प्रांतात या मंडळींना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली नाही. व्यावसायिक नाटचसंस्था असल्या तरी पिढचा न् पिढचा ह्या संस्था टिकल्या आहेत. वंशपरंपरागत चालत आलेल्या नाटच व संगीत कलांचा आविष्कार येथे दृष्टोत्पत्तीस येतो. कुटुंबीय बंधन व गुंफण असल्यामुळेच हे शास्त्र झाले असावे. अरे मराठचांनी लौकिक व्यवहारात जरी तेलुगु भाषा आत्मसात केली असली तरी मराठी भाषा घरापुरती. घरगुती म्हणून जतन करून ठेवली आहे. महाराष्ट्रापासून दूर असलेल्या, महाराष्ट्राशी व मराठीशी संपर्क नसलेल्या या अरे मराठचांनी तेलुगु सांस्कृतिक जीवन विकसित केले आहे, समृद्ध केले आहे. आंध्र रंगभूमीच्या इतिहासात सुरभी नाटचसंस्थांना मानाचे पान आहे. "आंध्र नाटच कलोद्धारक"सारखी बहुमानाची उपाधी आपल्या कर्तृत्वाने या मंडळींनी मिळविली· तेलुगु रंगमंचावर स्त्रीची भूमिका स्त्रीनेच केल्याचा पहिला मान सुरभी नाटचसंस्थेतील कौटुंबिक संसारी स्त्रीकडे जातो. अशा अनेक वैशिष्टचांनी परिप्लुत असलेल्या अरे मराठचांचा अल्प परिचय येथे घडविला आहे.

या परिचयामुळे लोक कलेच्या संशोधनाला नवी दिशा मिळेल हा विश्वास वाटतो.

[अहमदपूर येथील 'लोकवाङ्मय आणि लोककला' या चर्चासत्रात वाचलेला निबंध]

अभ्यासाची साधने

१. सुरभी नाटच संस्थचे संचालक, दिग्दर्शक व नट श्री. एन. आय. बाबाराव व श्री. वानारस शामसुंदर तसेच नाटकातील अनेक नट व नटी यांच्या मी स्वत: घेतलेल्या मुलाखती व प्रत्यक्ष पाहिलेले नाटचप्रयोग.
२. चामडचांच्या बाहुल्यांचा खेळ करणाऱ्यांच्या मी स्वत: घेतलेल्या मुलाखती.
३. अरे मराठीचा भाषिक व सांस्कृतिक अभ्यास – डॉ. श्री. रं. कुळकर्णी
४. भरत नाटचशास्त्र.
५. मराठी रंगभूमीचा उष:काल – प्रा. मामा सरदेसाई
६. मराठी रंगभूमीचा इतिहास – प्रा. श्री. ना. बनहट्टी
७. Shahendra Vilas – Sridhar Venkatesh, Edi. Dr. V. Raghawan.
८. आंध्र यक्षगान वाङ्मय चरित्रगु – डॉ. यस्वी जोगाराव
९. History of Talugu Literature – Dr. M. Kailashkhar Rao.
१०. Surabhi Theatres – Shri P. Sriram Shastri
११. Our life : A Drama – Shri Aveti Nageshwarrao
१२. Surbhi Drama Troups – Shri J. S. Sarma
१३. सुरभी नाटक समाजमुलु – Dr. P. S. Apparao
१४. वीथि नाटक रंगम् : श्री. वानारस गोविंदराव – श्री. अंमचर्ला गोपालराव
१५. सुरभीवारी पट कथा – Dr. M. Nagbhushanam Sharma
१६. सुरभी नाटक कला संग्रमु – श्री. एन. आय. बाबाराव
१७. तेलुगु रंगभूमी व प्रायोगिकता – श्री. ए. कृष्णाराव. पंचधारा (आंध्र प्रदेशातील रंगभूमी विशेषांक) एप्रिल – जून १९७८
१८. आंध्र नाटचकलेचा आगळा आविष्कार "वीथि नाटकम्" – व्ही. राधाकृष्णमूर्ति तत्रैव
१९. आंध्र जनतेने जीवाभावाने जपलेला हा खेळ बाहुल्यांचा – एम. वी. रमणभूमी तत्रैव ■

उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद.

मराठी वाङ्मयेतिहास : तत्त्वमीमांसा

(लेखांक २)

मधुकर रामदास जोशी

कोणत्याही वाङ्मयाचा इतिहास हा त्या भाषेपुरता मर्यादित कधीही नसतो. त्याच्या कक्षा बऱ्याचशा विस्तृत व विशाल असतात. तसेच वाङ्मयेतिहास म्हणजे समीक्षाही नसते. भाषा व समीक्षा या दोन घटकांच्या सर्वस्वी अधीन झाल्यामुळे आजपर्यंतचे मराठी वाङ्मयेतिहास सदोष झालेले आहेत. समीक्षा हे भाषाशास्त्राप्रमाणे स्वतंत्र शास्त्र आहे परंतु वाङ्मयेतिहास मात्र शास्त्र नसून विद्याशाखा आहे. या कारणामुळे कोणत्याही शास्त्राची जशी पारिभाषिक संज्ञा असते तशी वाङ्मयेतिहासाची कोणतीही परिभाषा नाही. परिभाषेच्या साह्याने कोणत्याही वाङ्मयाचे केलेले मूल्यमापन हा वाङ्मयेतिहासाचा पाठ्यविषय होऊ शकतो. उलट मूल्यमापनामुळे कळत न कळत समीक्षेची कास धरून समीक्षक व टीकाकार वाङ्मयेतिहास क्षेत्रात धुडघूस घालतात व वाङ्मयेतिहास संपूर्णतः गढूळ करून सोडतात. गेल्या दीडशे वर्षात इंग्रजीभाषावाङ्मय संपर्कामुळे अर्वाचीन (?) मराठीत जी समीक्षा अवतीर्ण झाली ती अद्यापही शैशवावस्थेत आहे. या आजच्या मराठी समीक्षेने व समीक्षकांनी इंग्रजीची कास धरूनच समीक्षा करण्याचा प्रयत्न केला, परंतु इंग्रजी वाङ्मयामध्ये जसा ॲरिस्टॉटलने आपल्या स्वतःच्या समीक्षेने इंग्रजी, ग्रीकच नव्हे तर सर्व प्रकारच्या वाङ्मयाची समीक्षा करता येते हे जसे दाखवून दिले तसे आजच्या कोणत्याही मराठी समीक्षकाने समीक्षा मूल्यमापनाचे सर्वव्यापी दंडक दाखवून दिलेले नाही. अर्वाचीन मराठी समीक्षकांना अभिप्रेत असलेल्या समीक्षामूल्य घटकामुळे संपूर्ण भारतीयच काय मराठी वाङ्मयाचीही समीक्षा सुसंगतपणे करता येत नाही. परंतु मौज अशी की, या समीक्षकांनी वाङ्मयेतिहास क्षेत्रात प्रवेश करून वाङ्मयेतिहासाच्या नावावर स्वतःला प्रिय असणारी पण तीही अर्धवट व सदोष समीक्षा सादर केली. मराठी वाङ्मयाचा कोणताही इतिहास वरवर चाळला तरी त्यामध्ये उपरोक्त समीक्षकांनी स्वतःला प्रिय असणारी समीक्षा कशी केली आहे याचा प्रत्यय कोणाही विचक्षण वाचकाला येईल.

मराठी वाङ्मयेतिहासात समाविष्ट झालेली समीक्षा वाङ्मयेतिहास दृष्टीने कितीही आक्षेपार्ह असली तरी त्या समीक्षेने आपली मौलिकता सिद्ध करून समीक्षेला नवीन वळण दिले आहे काय हा, समीक्षकांनाही भेडसाविणारा प्रश्न समीक्षा व समीक्षकावर सोपवून दिला तरी, अशाप्रकारची समीक्षा वाङ्मयेतिहासात का समाविष्ट व्हावी ? वाङ्मयेतिहास म्हणजे समीक्षेचा विस्तार नव्हे. समीक्षेने विचारार्थ घेतलेल्या कोणत्याही प्रश्नाचे स्वरूप आस्वादक समीक्षक व आस्वाद्य ठरलेली वाङ्मयकृती असते. जवळ जवळ प्रत्येक समीक्षक (सहृदय) आस्वाद्य भूमिकेवरून निर्माण झालेल्या साहित्यकृतीचाच विचार करीत असतो. एवढेच नव्हे तर कित्येक वेळा तो मूळ ग्रंथकर्त्याला बाजूला सारून निर्माण झालेल्या वाङ्मयकृतीचा आस्वाद, उपभोग्य व उपभोग घेणारा या दृष्टीनेही घेतो. या सर्वच प्रकारात समीक्षक ग्रंथकाराला गौण समजून सृजनक्रियेला व पर्यायाने निर्मिततत्त्वाला दुय्यम समजतो व आस्वादक भूमिकेला प्रधान समजतो. तसेच आपल्या आस्वाद्यभूमिकेला मूल्य-

मापनाचे स्थान देऊन कित्येक वेळा ग्रंथकृतीला मूल्यमापनाच्या दावणी बांधतो. अशाप्रकारे प्रथन वाङ्मयनिर्माण, ग्रंथकार व नंतर ग्रंथकृतीला गौण लेखून स्वत: व स्वत:ची मूल्यमापन कसोटी ही एकमेव कसोटी मानतो.

तथापि वाङ्मयेतिहासाचा विषय असतो तो ग्रंथकार व त्याच्या एक वा अधिक वाङ्मयकृती. एकच ग्रंथकार एकापेक्षा जास्त वाङ्मयप्रकार हाताळतो तेव्हा केवळ प्रयोग म्हणून हाताळलेला वाङ्मयप्रकार व यशस्वी करून दाखविलेल्या वाङ्मयप्रकारामध्ये कोणते नाते असते याचा शोध किंवा एका वाङ्मयप्रकाराहून दुसरा वाङ्मयप्रकारावर घेतलेल्या उड्डाणाची मीमांसा वाङ्मयेतिहासात अभिप्रेत असते. कित्येक वेळा असेही दृष्टोत्पत्तीस यते की, दोन किंवा अधिक वाङ्मयप्रकारावर लेखकाचे कमालीचे प्रभुत्व आहे. अशा परिस्थितीत कोणताही एक वाङ्मयप्रकार केवळ प्रायोगिक भूमिकेवरून नेहमी ग्रंथकार हाताळत असतो असे समजणे गैर ठरेल. शिवाय केवळ आशयप्रगटनासाठीच ग्रंथकार खरोखर वाङ्मयप्रकार हाताळत असतो काय या प्रश्नाचीही चिकित्सा करणे संयुक्तिक ठरेल. प्राय: एकच आशय विविध प्रकारांच्या वाङ्मयप्रकाराद्वारा ग्रंथकार सादर करीत असतो. तेव्हा एकच आशय एकाप्रकारच्या वाङ्मयप्रकाराद्वारा प्रगट करूनही तोच आशय प्रगट करण्यास दुसऱ्या वाङ्मय प्रकाराची आवश्यकता ग्रंथकारास का भासते हा प्रश्नही वाङ्मयेतिहासकाराने विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते. ग्रंथकाराचा आशय वाङ्मयप्रकाराशी एकरूप होऊन रूपबंधांच्या द्वारा प्रगट होतो असे प्रतिपादन करणारा अभ्यासकांचा एक वर्ग मोठ्याप्रमाणावर आहे. परंतु समजण्यात येतो तसा खरोखर कोणताही रूपबंध परिपूर्ण असतोच असे नाही. बहुधा तो शिथिल व बराचसा विस्कळीत असतो. परंतु त्यामुळे आशयाच्या प्रगटनास कोणताही अडथळा येत नाही. शिवाय वाङ्मयप्रकाराशी आशयाची एकात्मकता होऊन एकरूप झालेला आशय परिपूर्ण रूपात प्रगट झाला असताना पुन: तोच आशय प्रगट करण्यास ग्रंथकाराला दुसऱ्या वाङ्मयप्रकाराची आवश्यकता का भासते याचा शोध जेव्हा कोणताही वाङ्मयेतिहास घेऊ लागतो तेव्हा वाङ्मयप्रकाराची ग्रंथकाराच्या प्रकृतीधर्माशी असलेली सुसंगतही वाङ्मयेतिहासकाराला उकलून दाखवावी लागते. एकच ग्रंथकार आपल्या वाङ्मयीन प्रकृतीधर्माशी सुसंगत व सुसंवादी ठरणाऱ्या वाङ्मयप्रकारांचा सतत शोध घेत असतो व यामुळे कित्येक वेळा एकच वाङ्मयप्रकार आलटून–पालटून तो हाताळीत असतो. गडकऱ्यांसारखा ग्रंथकार नाटक+काव्य+नाटक वाङ्मयप्रकार हाताळून आपले वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाबरोबर वाङ्मयीन चारित्र्य घडवीत असतो. तेव्हा एका किंवा कोणत्याही ग्रंथकाराने हाताळलेल्या वाङ्मयप्रकारांचा केवळ कालानुक्रम निश्चित करण्याऐवजी एकच वाङ्मय प्रकार पुन:पुन: ग्रंथकार का हाताळीत आहे याची सकारण मीमांसा वाङ्मयेतिहासकाराने सादर करताना, त्या त्या वाङ्मयप्रकाराचा वाङ्मयीन संप्रदाय व परंपराशी असलेला अनुबंधही उकलून दाखविणे आवश्यक असते.

वाङ्मयात विविध परंपरा व संप्रदाय असतात व एकाच वेळी ते संप्रदाय कार्यरत असतात. परंतु आजच्या मराठी समीक्षकाप्रमाणे वाङ्मयेतिहासकारांनीही मराठी वाङ्मयेतिहासातील विविध संप्रदाय व परंपरा यांचा विचारही केलेला नाही. उलट समीक्षकांची कास धरून वाङ्मयेतिहासात निरर्थक बाबींची खोगीरभरती केली. वस्तुत: कोणत्याही वाङ्मयीन प्रकाराचा वाङ्मयीन परंपरा व संप्रदायाशी नेमका संबंध कोणता आहे याचा शोध घेतला तर वाङ्मयीन विश्वातील अनेक प्रश्नांची उकल आपोआप होईल. परंतु सर्वस्वी परप्रत्ययनेय असलेल्या मराठी समीक्षेच्या आहारी जाऊन, वाङ्मयेतिहासकारांनी आपल्या विचारशक्तीचा संकोच केलेला आढळून येतो. उदा. महाकाव्य या वाङ्मयप्रकाराच्या संदर्भात आजच्या काही पाश्चात्य समीक्षकांनी कादंबरीचाही विचार करून कादंबरीला महाकाव्याचे उत्तररूप कल्पिले आहे. वस्तुत: महाकाव्य प्रामुख्याने अभिजात असलेल्या विदग्धपरंपरेतील वाङ्मयप्रकार असून विदग्धपरंपरेच्या विरोधात उत्पन्न

झालेल्या स्वच्छंद परंपरेत कादंबरीचा समावेश होतो. तेव्हा महाकाव्य व कादंबरी यांचे परस्पराशी खरोखर संबंध आहेत की हे दोन्ही वाङ्मयप्रकार सर्वस्वी भिन्न आहेत हे सिद्ध करण्यापूर्वी अभिजात व स्वच्छंद परंपरेचे संबंधही विचारात घ्यावे लागतात. शिवाय पाश्चात्यांनी मान्य केले म्हणून आपणही ते जसेच्या तसे निष्कर्ष मान्य केले पाहिजेत ? मराठीतील अभिजात आणि स्वच्छंद व त्याच बरोबर मराठीतील महाकाव्य व कादंबरी यांचाही विचार करणे क्रमप्राप्त असते, परंतु वाङ्मयप्रकारांचा संबंध वाङ्मयीन संप्रदायाशी आहे, असे मान्य केल्यास वाङ्मयप्रकार→वाङ्मयीन परंपरा व संप्रदाय→वाङ्मयेतिहास असा क्रम मान्य करावा लागेल याविषयी दुमत असू नये.

कोणत्याही ग्रंथकाराने हाताळलेल्या एक किंवा एकापेक्षा अधिक वाङ्मयप्रकारांचा शोध घेणे (समीक्षा करणे नव्हे) हा वाङ्मयेतिहास क्षेत्रातील महत्त्वपूर्ण टप्पा असतो. या मधूनच एकीकडून प्रेरणा व दुसरीकडून उद्दिष्टाचे विविध पैलू स्पष्ट होऊ लागतात. उदा. केवळ वाङ्मयप्रकारच जमेस धरून त्या त्या वाङ्मयप्रकाराच्या संदर्भात ग्रंथकारविषयक सिद्ध होणारे निष्कर्ष व विशेष ग्रंथकाराच्या संदर्भात त्याने हाताळलेल्या वाङ्मयप्रकारविषयक निष्कर्ष, समान व एकत्र असतात असे नाही. पण उद्दिष्टापेक्षाही प्रेरणा अधिक व्यापक व विस्तृतरूप ठरतात. उदा. स्मृतीस्थळ, आचारस्थळ, वृद्धाचार, अन्वयस्थळ, गूढा, हे वाङ्मयप्रकार मराठी वाङ्मयामध्ये केवळ महानुभावीय ग्रंथकारांनीच हाताळलेले आहेत. तसेच "मान" व "समास" पर रचना केवळ समर्थ रामदास व रामदासी ग्रंथकारांनी हाताळलेले दिसतात. अशाप्रकारे धर्म व संस्कृती क्षेत्रातील विविध परंपरेच्या सांप्रदायिकांनी एकाच कालखंडात विशेष परंतु सर्वस्वी वेगळे असे जे वाङ्मयप्रकार हाताळले त्यांचा शोध घेणे हे वाङ्मयेतिहास क्षेत्रात अभिप्रेत असते. वेगवेगळया उपासना-पारंपारिकांनी सुप्रतिष्ठित केलेल्या वाङ्मयप्रकारांची निर्मिती कोणत्या प्रेरणामुळे झाली हा वाङ्मयेतिहासातील एक महत्त्वपूर्ण प्रश्न आहे. रामदासींनी समास, वारकऱ्यांनी निखळ 'अभंग'प्रधान रचना, महानुभावीयांनी गूढा लापनिका, स्थळ, वृद्धाचार व त्याचबरोबर सर्वच संत परंपरेतील लेखकांनी 'चरित्र'पर जे काही मोजके व निवडक वाङ्मयप्रकार हाताळून सुप्रतिष्ठित केले त्यांच्या वाङ्मयीन प्रेरणा कोणत्या व त्या केवळ उपासना संप्रदायापुरत्याच मर्यादित का ठरतात याचा शोध वाङ्मयेतिहासात अभिप्रेत असताना, त्याकडे केवळ दुर्लक्षच नव्हे तर त्याची दखलही दुर्दैवाने आजपर्यंत घेतलेली नाही. प्राचीन मराठी वाङ्मयामध्ये अनेक व विविध वाङ्मयप्रकार आढळतात. आजपर्यंत तीनशे नव्वद वाङ्मयप्रकारांची सूचीवजा नोंद प्रस्तुतलेखकाने केली आहे. ही नोंद अधिक विस्तारितही होऊ शकते. परंतु प्राचीन मराठी वाङ्मयाचा अभ्यास वाङ्मयीन भूमिकेवरून जसा आजच्या मराठी समीक्षकांनी केला नाही तसा मराठीच्या वाङ्मयेतिहासकारांनीही केलेला नाही. ग्रंथकार व त्याच्या वाङ्मयीन घटनांची उकल करण्याऐवजी जुजबी माहिती आपापल्या ऐसपैस बुद्धिविलसितासह देणे म्हणजे मराठी वाङ्मयाचा व तोही प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिणे अशी ज्याने त्याने समजूत करून घेतलेली आढळते.

वाङ्मयीन 'प्रेरणा व स्वरूप' हा आजच्या समीक्षकांचा व त्यांच्या बरोबर वाङ्मय इतिहासकारांचाही परवलीचा शब्द आहे. प्रेरणा मग त्या कोणत्याही असोत त्यांचा शोध व त्याबरोबर त्यांची समग्र चिकित्सा वाङ्मयक्षेत्रात तरी करण्यास कोणाचाही आक्षेप असू नये. तथापि तसे होत नाही. साम्यवादाच्या प्रेरणेने निर्माण झालेले वाङ्मय व परमार्थाच्या प्रेरणेने निर्माण झालेले वाङ्मय कोणत्याही विचक्षण वाचकाने डोळयासमोर ठेवले तर ग्रंथकाराच्या उद्देशाचा व हेतूचा शोध घेता येईल. व त्यातील आशयाची चिकित्साही करता येईल. अशा प्रकारे 'प्रेरणा' उद्देश हेतू व आशयाचे स्वरूप स्पष्ट करू शकेल. परंतु एवढयाने सर्वच प्रश्नांची उत्तरे मिळणार नाहीत. कारण निर्माण झालेले वाङ्मय कोणत्या ना कोणत्या वाङ्मय प्रकाराद्वारा प्रगट झालेले असते. तसेच ते वाङ्मयीन परंपरा व संप्रदायाशी निगडीत असते. साम्यवादाची प्रेरणा घेऊन निर्माण झालेले

वाङ्मय (वादार्थ, असे समजण्यास हरकत नाही की,) वास्तव, अतिवास्तव व अस्तित्व संप्रदायाशी संबंधित असते. ह. ना. आपटे, केशवसुत व श्री. कृ. कोल्हटकरांचे वाङ्मय स्वच्छंदवादाशी तर परमार्थाची प्रेरणा घेऊन निर्माण झालेले वाङ्मय आर्य, लोक, विदग्ध व संत परंपरा व संप्रदायाशी संबंधित असत. अशा परिस्थितीत उद्दिष्ट, हेतू व आशयाशी संबंधित असलेल्या 'प्रेरणा' संकल्पनेच्या मर्यादा स्पष्ट होतात. व त्याचा अपुरेपणा सिद्ध होतो. तेव्हा कोणत्याही वाङ्मयेतिहासकाराने समीक्षाक्षेत्रातील (जी काही आहे ती) परिभाषा व संज्ञा वाङ्मयेतिहासास कितपत संयुक्तिक ठरते याची दखल घेतली नाही तर समीक्षाक्षेत्रांतील गोंधळ, जशाचा तसा वाङ्मयेतिहासातही अवतरित होऊन ते सर्वच क्षेत्र शबलीत होईल. वस्तुतः 'प्रेरणा' हे एक वाङ्मयबाह्य मूल्य आहे. परंतु आज सर्वत्र हे वाङ्मयबाह्य मूल्यच मान्य करून वाङ्मयाची समीक्षा होत आहे. वाङ्मयप्रधान मूल्ये जमेस धरून केलेली समीक्षा, निखळ प्रेरणा जमेस धरून केलेले मूल्यमापन व समीक्षा एकच नव्हे. 'प्रेरणा' ह्या कोणत्याही प्रकारांच्या असू शकतात. परंतु विशिष्ट हेतू डोळ्यासमोर ठेवून व प्रेरित होऊन निर्माण झालेले वाङ्मय आशयाला प्राधान्य देणारे असते. अशा प्रकारच्या आशयप्रधान वाङ्मयाचा आस्वाद सर्वच सहृदय घेऊन शकतातच असे नाही. साम्यवादाच्या प्रेरणेने निर्माण झालेल्या वाङ्मयाचा दलितसाहित्यप्रेमी वाचक कसा काय आस्वाद घेऊ शकतो ? किंबहुना परमार्थाची आवड असणारा सहृदय अस्तित्ववादी साहित्याच्या प्रेरणेमधून निर्माण झालेल्या आशयप्रधान साहित्याचा आस्वाद घेणार नाही यामुळे ग्रंथकार व श्रोता यामधील 'संवादात्म' खीळ बसते. कोणतेही वाङ्मय सरतेशेवटी ग्रंथकार श्रोतामधील अखंड संवादपर असते. या श्रोता–वक्ता संवादाचे नेमके स्वरूप स्पष्ट करण्याचे दायित्व वाङ्मयेतिहासावर आहे. अर्वाचीन मराठी साहित्यकार व समीक्षकांनी श्रोता–वक्ता संवाद फेटाळून केवळ 'स्वगता'वर लक्ष दिल्यामुळे सर्वच अर्वाचीन मराठी साहित्य ग्रंथकार व समीक्षकाच्या 'अहं'भावाभोवतीच घिरटया घालतांना आढळते याविषयी दुमत नाही. (क्रमशः)

विद्यापीठ निवास
अमरावती मार्ग, नागपूर

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने आजपर्यंत ६० झालीत. १, २, ३ जाने. १९८८ रोजी ठाणे येथे होणारे ६१ वे संमेलन. आजपर्यंत ठाणे येथे १९६० साली एक संमेलन झाले व आताचे दुसरे ! १९६० साली रा. श्री. जोग हे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. आजपर्यंत पुणे येथे सर्वात जास्त म्हणजे आठ संमेलने झाली. त्याखालोखाल मुंबई येथे पाच झाली. तर नागपूरला एकच संमेलन झाले. तेही १९३३ साली. त्याचे अध्यक्ष कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर होते.

बडोदे येथे तीन संमेलन १९०९, १९२१ व १९३४ साली झाली. अध्यक्ष अनुक्रमे का. र. कीर्तिकर, न. चि. केळकर व ना. गो. चाफेकर होते. ग्वाल्हेर येथे १९२८ साली मा. श्री. अणे यांच्या तर १९६१ साली कुसुमावती देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली संमेलन भरले होते.

अनुक्रमणिका

प्रतिभेची साक्षात् मूर्ती

गोपाळ मो. कोलते

ज्ञानेश्वर महाराज एक दिव्य प्रतिभेची साक्षात् मूर्ती होते. त्यांच्या वाचेला व वाणीला असा काही फुलोर आला की त्या प्रतिभासृष्टीतील एक एक शब्द हा आकाशातील एक एका ताऱ्यापेक्षाही तेजस्वी आणि नंदनवनातील सुंदर सुंदर फुलापेक्षाही सुंदर वाटल्याशिवाय राहिला नाही. आणि असे वाटले की सौगंध हा दुसरा कशाला नसून फक्त ज्ञानेश्वरीतील ज्ञानदेवांच्या शब्दा-शब्दालाच आहे. या जगात ब्रह्म वगैरे असले तर असो परंतु ज्ञानेश्वरांचे शब्दब्रह्म हे मात्र अगदी प्रत्यक्षच शब्दा-शब्दातून उभे राहिलेले. आज ७०० वर्षे लोटून गेली तरी एक एक शब्द कसा अमृतात न्हाऊन निघालेला. प्रतिभा ही एक दैवी देणगी आहे. ज्ञानेश्वरीतील प्रत्येक शब्दात गुरुकृपेचे मधु मिसळलेले आहे असेच वाटते. ह्या गुरुकृपेमुळे विश्वामित्राच्या सृष्टोलाही लज्जेने मान खाली घालावी लागेल अशी दुसरी सुंदर सृष्टी निर्माण झाली. याची साक्ष त्यांच्याच शब्दात देता येईल—

आधीचि देखणी दिठी । वरी सूर्य पुरवी पाठी
तैं न दिसे ऐसी गोठी । केवि आहे
म्हणौनि माझे नित्य नवे । श्वासोश्वासही प्रबंध होआवे
श्रीगुरुकृपा काय नोहे । ज्ञानदेवो म्हणे
मजलागी ग्रंथाचा स्वामी । दुजी सृष्टि जे हे केली तुम्ही
ते पाहोनि हासो आम्ही । विश्वामित्रातेही

गुरुची कृपा हाच प्रतिभेला आलेला बहर. तोच वसंत. प्रतिभास्फूर्ती ही होते कुठून ? येते कशी ?

'न कळे कोठुनि येती नवशब्द भेटण्या कविते'

हे नवनवोन्मेषशालिनी शब्द कवीच्या हृदयात येतात तरी कसे ? कुणाचे हे सामर्थ्य असावे ?

जेव्हा काही रम्य, सुंदर, भव्य, व महन्मंगल असे कवीचे हृदय झपाटून टाकते तेव्हाच काव्याची स्फूर्ती होते असे म्हणतात.

कवी केशवसुत म्हणतात—'जे रम्य ते वघुनिया मज वेड लागे' आणि असे वेड लागले की सहजच 'गाणे मनात मग होय सवेचिं जागे'—केशवसुत प्रतिभाशक्तीला शारदा समजतात.

'शारदेने जो मंत्र दिला कानी । तसे लिहिले मी शब्द तिचे मानी'

ज्ञानेश्वर महाराज ह्या दिव्य प्रतिभेला 'सद्‌गुरु' समजतात. या दिव्य शक्तीमुळेच कुसुमांना सौगंध प्राप्त होतो आणि आकाशात इंद्रधनुचे सप्तरंग खुलुन दिसतात. अंतरंगातील तेज घुसळले जाते व शब्दब्रह्म स्फूर्तीचे घुंगर बांधून थयथय नाचू लागते. काव्य समाधीचा अनुभव सांगताना कवी चंद्रशेखर म्हणतात—नाभिकमलातून एक अनन्य लहरी उठते व ती समस्त देह व्यापून टाकते, तिच्या प्रसरणाबरोबर देह हेलावून त्याच्या नसानसातून जणू एक विजेचा ओघ वाहू लागतो.

मुखामधून आपोआप अगदी सहज गदगदा ध्वनी येऊ लागतो. हृदय उचंबळून येते, डोळ्यामध्ये पाणी उभे राहते, काव्य विषयावाचून इतर कशाचेही भान राहात नाही, आणि मग एक चमत्कार घडतो–एक मनोहर रसात्मक पदावली वाहू लागते—

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात–विश्वैकधाम अशा सद्‌गुरुची कृपा हाच जो चंद्र त्याच्या योगे आपल्या मनात स्फूर्तीची पौर्णिमा प्रकाशली असता रसाळपणाला काय तोटा–

अगा विश्वैकधामा । तुझा प्रसादचंद्रमा
करु मज पूर्णिमा । स्फूर्तिची जी
जी अवलोकिलिया माते । उन्मेष सागरी भरिते
वोसंडेल स्फूर्तीते । रसवृत्तीचे

कामधेनु ज्याची आई आहे त्याला न मिळण्यासारखे अप्राप्य काही आहे काय ? म्हणूनच हा ग्रंथ मी हाती घेतला आहे तरी उणे असेल ते पुरे करून घ्यावे व जास्त असेल ते सोडून द्यावे. जर सरस्वती प्रगट होईल तर मुक्याला वाचा फुटेल. सद्‌गुरुची कृपा झाली म्हणून वाणीचे वैभव प्राप्त होऊ शकले.

तो मी येकु सर्वमुका । बोलोनि मऱ्हाठिया भाखा
करी डोळेवरी लोका । घेवो ये ऐसे जे

मराठी भाषेत गीतेवर टीका लिहिणे ही काही साधी गोष्ट नव्हती

साई खडेयाचे बाहुले । चालविल्यां सूत्राचेनि चाले
तैसे माते दावित बोले । स्वामी तो माझा

शब्द कसा बनवावा, चढत्या प्रेमाने व्याख्यान कसे करावे व अलंकार म्हणजे काय ते मला ठाऊक नाही. कळसूत्राचे बाहुले चालविणाऱ्याच्या सूत्राने चालते त्याप्रमाणे माझ्या गुरुच्या कृपेमुळे मी बोलत आहे. ज्ञानेश्वर महाराज पुढे आणखी म्हणतात की हा ग्रंथ नव्हे हे तर, माझ्या सद्‌गुच्या कृपेचे वैभवच आहे.

ज्ञानेश्वर महाराजांना प्रतिभा ही सद्‌गुरुची देणगी आहे असे वाटते. काव्यकौस्तुमात विद्याभूषण हे 'प्रज्ञा नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा मता'—अशी प्रतिभेची परिभाषा करतात. पंडितराज जगन्नाथांची रसगंगाधरातील परिभाषा दुसऱ्या प्रकारची आहे. ते म्हणतात–'काव्य घटनानुकूल शब्दार्थोपस्थिति: '–ज्या शक्तीमुळे काव्यानुकूल शब्द कवीच्या मनात अगदी प्रवाहासारखे भराभर येत असतात ती प्रतिभा. वाग्भट्ट मात्र नवीनता व अभिव्यक्ती यांचा समन्वय करू इच्छितात. परंतु प्रतिभा ही सर्वांनाच प्राप्त होते का ?–मग सर्वच ज्ञानेश्वर झाले असते व सर्वांनाच तशी ज्ञानेश्वरी लिहिता आली असती. ज्ञानेश्वरांच्या मते याचे कारण त्याच्या पूर्वजन्मीचा अभ्यास. प्रतिभा वयावर अवलंबून राहत नाही.

भोटकी देहाकृती उमटे । आणि निजज्ञानाची पहाट फुटे
सूर्यापुढा प्रगटे । प्रकाशु जैसा
तैसी दशेची वाट न पाहता । वयसेचिया गावा न येता
बाळपणीच सर्वज्ञता । वरी तयाते
तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभे । मनचि सारस्वते दुभे
मग सकळ शास्त्र स्वयंभे । निघती मुखे

ज्याप्रमाणे सूर्य उगवण्यापूर्वी अरुणोदयाचा प्रकाश होतो. त्याप्रमाणे योग्य अवस्थेची वाट न पहाता, प्रौढ वयरूपी गावाला पोचण्याच्या अगोदर लहानपणीच सर्वज्ञता त्यास माळ घालते. पूर्व जन्मात तयार झालेली बुद्धी त्याला अनुकूल असल्यामुळे त्याचे मनच सर्व विद्यांना प्रसवते व मग सर्व शास्त्रे

आपोआप त्याच्या मुखातून निघतात. ज्ञानेश्वरांचे वय ते केवढे ! सोळा वर्षांचे. आणि एवढ्याशा बुद्धीत एवढा मोठा प्रतिभेचा सागर ! म्हणून सर्वांनाच ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी हा एक त्यांच्या प्रतिभेचा दिव्य चमत्कार वाटतो. ज्ञानेश्वरांना निवृत्तीनाथ जीवनाचे किमयागार वाटतात. 'सारस्वत' हा ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेतील एक सुंदरसा शब्द आहे.

साधका तू माउली । पिके सारस्वत तुझिया पाउली
या कारणे मी साउली । न संडी तुझी

ही गुरुमाउली शुद्ध आहे. उदार म्हणून प्रसिद्ध आहे व अखंड आनंदाची वृष्टी करणारी आहे. म्हणून साधकांची तू माउली आहेस. सर्व विद्या तुझ्या चरणाचे ठिकाणी पिकतात म्हणून तुझा आश्रय मी कधीच सोडणार नाही. हे सद्गुरुकृपादृष्टी तुझा आश्रय ज्याला मिळतो तो विद्यारूप सृष्टीचा ब्रह्मदेव बनतो. म्हणून ज्ञानदेव सद्गुरु माउलीला श्रीमंते, निजजन कल्पलते असे संबोधून प्रतिभाशक्ती प्रगट करण्यास विनवितात.

नवरसा भरवी सागरु । करवी उचित रत्नांचे आगरु
भावार्थाचे गिरिवरु । निफजवी माये
साहित्य सोनियाच्या खाणी । उघडवी देशियेचिया आक्षोणी
विवेकवेलीची लावणी । हो देई सैंध

ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहिताना अशी प्रतिभाशक्ती प्रगट होऊ दे की नवरसांचे सागर माझ्या भाषेत भरवून टाकावे. योग्य अशा अलंकाररूपी रत्नांची खाण ज्ञानेश्वरीत उघडली जावी. भावार्थाचे पर्वतच्या पर्वत तिथे दिसावे. मराठी भाषारूपी पृथ्वीमध्ये अलंकाररूपी साहित्यसोनियाच्या खाणी उघडून देऊन जिकडे तिकडे आत्मानात्म विचाररूपी वेलीची लावणी होऊ द्यावी. नास्तिकपणारुपी दऱ्या व वितंडवादरूपी आडवाटा नाहिशा कराव्या आणि कुतर्करूपी दुष्ट जनावरे हाकलून द्यावीत. श्रीकृष्ण गुणांचे वर्णन करण्यात मला दिव्य प्रतिभेने समर्थ करावे व श्रोत्यांना श्रवण सुखाच्या राज्यावर स्थानापन्न होऊ द्यावे. या मराठी भाषेच्या गावात आत्मज्ञानाची रेलचेल करावी व या जगाला केवळ ब्रह्मसुखाचेच घेणेदेणे होऊ द्यावे. हे गुरुमाते, तू मला प्रेमाचे पांघरुण घालशील तर आताच मी असे सोनिया सुगंधू साहित्य निर्माण करीन.

सहाव्या अध्यायाच्या उपसंहारात–' ज्ञानदेव म्हणे, मी चाडे । सद्गुरुनी केले कोडे । माथा हात ठेविला ते फुडे । बीजचि वाइले-' सद्गुरुनी माझ्या मस्तकावर हात ठेवून मोठाच चमत्कार केला. माझ्या मस्तकरूपी चाड्यात ब्रह्मबीज घातले त्यामुळे माझी वाणी अमृताहून गोड झाली. पुढे १५ व्या अध्यायांत ज्ञानेश्वर म्हणतात की सद्गुरुकृपा किती श्रेष्ठ आहे ! ती ज्याच्यावर होते त्याच्या वाणीला सुधेचा सागर बनवते. कोट्यावधी चंद्र त्याच्या वाणीवरून ओवाळून टाकावे असे माधुर्य त्यातील शब्दांना येते. सूर्योदयाबरोबर जिकडे तिकडे प्रकाशच प्रकाश होतो त्याप्रमाणे त्यांची वाणी श्रोत्यांना ज्ञानाची दिवाळी करते. तिच्यापुढे नादब्रह्म खुजे वाटते. त्याच्या वाग्वल्लीच्या विस्ताराने श्रवणसुखाच्या मांडवात संपूर्ण विश्व वसंतऋतूची बहार लुटते व मग--

ठावो न पावता जेयाचा । मनेसी मुरडिली वाचा
तो देवो होय शब्दांचा । चमत्कारु

श्रीसद्गुरु निवृत्तीनाथ म्हणजे चित्सूर्य. गुरूचे वर्णन कसे करावे असा प्रश्न ज्ञानेश्वरांना पडला आहे. सूर्याच्या अंगास उटी लावणे, कल्पतरूला हार घालणे, कापूरास सुवास देणे किंवा चंदनाला उटी लावणे जसे अशक्य तसे गुरूचे वर्णन करणे अशक्य. गुरूबद्दल ज्ञानेश्वरांची श्रद्धा केवढी !

' गुरुकृपा स्नेह सलिली । आपण होय मासोळी '

गुरुमाउली तुझ्या चरणकमली विद्येचे मळे पिकतात. तेव्हा तुझ्या छायेतून मी निघून जाऊ तरी कुठे ? तुझ्या करुणेत चौसष्टकला चौदा विद्येचे भरघोस पीक आल्याशिवाय कसे राहील ? हे

विद्येचे सुंदरसे देखणे झाड कुणी लावले बरे ! या सारस्वत वृक्षावर अनेक रसांची रसमधुर सुगंधी पुष्पे फुलल्याशिवाय का राहातील ?

हे सारस्वताचे गोड । तुम्हींच लाविले जी झाड

सूर्यबिंब दिसायला केवढे दिसते तर बचके एवढे. पण त्याचा प्रकाश साऱ्या त्रैलोक्यभर पसरल्याशिवाय राहत नाही. तसा मराठी भाषेतील एक एक शब्द. इच्छा करणाऱ्याला कल्पवृक्ष फळे देतो त्याप्रमाणे हे बोल व्यापक आहेत. शांतरसाला अलंकाराची जोड दिली आहे. जर मंत्रयोगाने शत्रूस ठार करता येईल तर कमरेस कटचार व्यर्थ कां बांधून ठेवावी ? जर दुधाने व साखरेने रोग बरा होत असेल तर कडुनिंबांचा रस पिण्याचे काय कारण ? इंद्रियांना दुःख न देता नुसत्या श्रवणाने घरबसल्या मोक्ष मिळत असेल तर तो का स्वीकारू नये ?–असे म्हणून ज्ञानेश्वर महाराज भावार्थ दीपिकेतील भावपूर्ण साहित्याचे मर्म सांगतात.

ज्ञानेश्वरांचे साहित्य हे अमर साहित्य आहे. ज्ञानेश्वर महाराज इहलोक सोडून गेलेत पण त्यांची ज्ञानेश्वरी अक्षर साहित्यातील कोहिनूर ठरली. ज्ञानेश्वरीतील आनंद हा सच्चिदानंद आहे. ज्ञानेश्वरीतील तेज हे चित्सूर्याचे तेज आहे. ज्ञानेश्वरांच्या गुरुकृपेचे साहित्यवैभव हे असे आहे. महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल. भावे म्हणतात–ज्ञानदेवाची कृती ही ज्ञानेश्वरीही आहे व वागीश्वरीही आहे. इतकेच नव्हे तर धर्मक्षेत्रही आहे व काव्यगंगाही आहे. ज्ञानेश्वरांच्या सृष्टीत एकदा जे निर्माण झाले त्याला जीर्णत्व नाही व नाशही नाही.

मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिणारे ल. रा. पांगारकर म्हणतात–विश्वाच्या वाङ्मयात ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ झाला नाही. महाराष्ट्रात मराठ्यांची राज्ये झाली व गेली पण लक्षावधी लोकांच्या हृदयात आत्मसुखाची शीतल छाया पाडणारा ज्ञानेश्वरीसारखा दैदिप्यमान हिरा हे महाराष्ट्राचे व मराठी भाषेचे चिरकालीन परम ऐश्वर्य आहे. प्रो. आर. डी. रानडे यांच्या मते ज्ञानेश्वरांनी आपली काव्यस्फूर्ती विश्वात्मक देवाचे वर्णन करण्यात खर्च केली. ज्ञानेश्वरीत कर्म आहे पण कर्माची कटकट नाही. ज्ञान आहे पण ज्ञानाचा रुक्षपणा नाही. भक्ती आहे पण ती भोळ्या अज्ञानाची नाही. त्यांनी तत्त्वज्ञानाला प्रेमाची माधुरी आणिली व भक्तीला ज्ञानाचा डोळा दिला. प्रो. रा. कृ. लागू म्हणतात–' जगाच्या वाङ्मयात अत्युच्च श्रेणीतील कोणत्याही काव्याची बरोबरी करू शकेल इतकी ज्ञानेश्वरांच्या भावार्थदीपिकेची थोरवी आहे.'–वाक्यं रसात्मकं काव्यम् ' ही विश्वनाथाची काव्याची व्याख्या त्यांच्या शब्दाशब्दाला लागू पडते.

वाचे बरवे कवित्व । कवित्वी बरवे रसिकत्व
रसिकत्वी परतत्त्व । स्पर्शु जैसा

सत्काव्य रसात्मक जसे असावे तसे ते परतत्त्वाचा स्पर्श करणारेही असावे. महाराष्ट्रातील थोर उपासक व ज्ञानेश्वरीकर्ते प्रा. श. वा. दांडेकर म्हणतात–काव्य प्रतिभाशाली होण्यास प्रसाद, माधुर्य इत्यादि गुणांची आवश्यकता असते. गहन विषय सहजसुंदर भाषेत सांगणे हे कार्य सोपे नाही. ज्ञानदेवांचाच दृष्टान्त द्यायचा झाला तर–

सहजे मलयानिलु मंदु सुगंधु । तया अमृताचा होय स्वादु
आणि तेथेचि जोडे नादु । जरी दैवगत्या
तरी स्पर्शे सर्वांग निववी । स्वादे जिव्हेते नाचवी
तेवीचि कानाकरवी । म्हणवी बापु माझा

ज्ञानदेवांना असे मधुर व प्रसन्न काव्य निर्माण करायचे होते. महाराष्ट्राचे साहित्यसम्राट न. चिं. केळकर म्हणतात–' आजच्या विसाव्या शतकातही कवित्वाचे दृष्टीने ज्ञानेश्वरी अजिंक्यपद मिळवील यात शंका नाही.' या सर्व दृष्टीने ज्ञानेश्वरीमधील साहित्य म्हणजे अमृताचा अखंड असा झुळझुळ वाहणारा प्रवाह आहे हेच खरे. ■

तिरोडा, भंडारा

कॅमेरा

अरुण शहाणे

लांबच्या प्रवासाला जायचं ठरवलं. एकट्यानंच.

निघायला दोन– अडीच महिने अवकाश होता तेव्हाच रिझर्वेशन काढून ठेवलं. त्यावेळी वाटलं होतं प्रथम प्रथम की एअर कंडीशंड कोचमधून रुबाबात प्रवास करावा. जिवाची चैन करावी. पण दुसऱ्याच क्षणी वाटलं– काही नको तसला प्रकार. तो म्हणजे अगदीच पॉलिश्ड प्रवास होईल. नुस्ती ऑर्डर सोडण्याचा अवकाशच की टी, ब्रेकफास्ट, लंच, डीनर, ड्रिंक्स सर्व काही हजर समोर. शिवाय कुशन्ड बेड, कुशन्ड सीट, कुशन्ड बॅक, अॅश ट्रे; नाईट डिम् लाईटस् इ. इ. ची चोख सोय. आता या कंडीशन्ड प्रवासासाठी आपल्याजवळ दररोजचं लागणारं सामानही पॉशच हवं. ते सारं ठेवायला साध्या सूटकेसेस चालतील का ? तिथं अॅरिस्टोक्रॅट, व्ही. आय. पी. का काय त्याच सूटकेसेस हव्या. हे सारं, हमालाला चार पैसे वर दिले की झक्कपैकी हवं तिथं ठीक–ठाक बसतं. जागचं हलत नाही; की त्यावर दुसरं कुणी प्रवास करणारं आपल्या बरोबरचं सामान ठेवत नाही. या व्ही. आय. पी. सामाना–बरोबर आपणही बनतो नाही का व्ही. आय. पी. ? मग प्रवास कसा जराही हादरे, गचके न बसता होतो. ते सामानही तसूभर सरकत नाही ठेवल्या जागेवरून ! असला ऐषआरामी, ऐदी प्रवास नको होता. ऐष आराम चैन करणं ज्यांच्या रोमांरोमांत भिनलेलं असतं असे सह-प्रवासीपण नकोत. हे लोक कधीच मनमोकळे नसतात. उसनंच हसतील, इंग्रजी भाषेत मोजकं बोलतील– युवर नेम ? वॉट इज युवर पोझिशन इन बिझिनेस ? अप टू विच स्टेशन आर यू ट्रॅवलींग ? हाऊ मच इनकम टॅक्स डू यू पे ? डू यू डील वुइथ फॉरिन कंट्रीज ? हॅव यू ट्रॅवल्ड देअर ? वुइथ हूम ? धिस लेडी इज मिस ××× माय सेक्रेटरी. व्हेअर इज युवर्स ?– नुस्ता प्रश्नांचा भडीमार ! दोन वेळा अनुभव घेतला– असला प्रवास करून फसलो ! दोन्ही वेळेला डोकं भणाणलं. सिक असल्याचा चांगला बहाणा करावा लागला ! तेव्हां कुठं इंग्रजी बोलण्याच्या आपत्तीतून सुटलो. पण, साधंसं कुणी विचारलंही नाही की.... जाऊ द्या झालं !

त्या दिवशी रात्री स्टेशनवर आलो. नऊची वेळ. गाडी येऊन उभी राहिली होती. ती सुटायला वीस मिनिटं अवकाश होता. मी बोगी नंबर हुडकून काढला व आंत शिरलो. माझं सीट बरोबर बर्थ रिझर्वेशनही होतं. माझ्या सीट नंबरपाशी येऊन पहातो तो काय– सीट रिकामं होतं पण वरच्या बर्थवर एका तरुण माणसानं खुशाल ताणून दिली होती. मी सीटवर प्रथम बॅग ठेवली हातातली. एव्हांना ती बोगीही गजबजायला लागली होती. पांच मिनिटंपर्यंत मी त्या तरण्या-ताठ्या माणसाला जाग कशी येईल म्हणून प्रयत्न करून पाहिला. पण माझा मला बर्थ मिळवता आला नाही. त्याचं घोरासुराचं आख्यान संपण्याचं पुसटसं चिन्हही मला सापडेना. गाडीनं स्टेशन सोडून तास उलटला. नंतरचं स्टेशन यायचंच होतं अजून. तासाभरानं स्टेशन आलं तशी कडे-कोट बंद बोगीचं दार आतल्या काही प्रवाशांनी उघडलं जा–ये चालू झाली. बाहेरच्या फेरीवाल्यांचं विशिष्ठ लयीतलं ओरडणं... पंधरा मिनिटांनी परत सारं सामसुम. गाडी सुटली होती. मी मान वर करून डोकावलं– त्याचा तो ताठा कायम होताच ! पुन्हा एक तास निघून गेल्याचं घड्याळानं दाखवलं मीही आता पेंगायला सुरुवात केली. किती वेळान काही आठवत नाही– गोंगाट गडबडीनं मी दचकून जागा झालो. बोगीतले बरेच सह प्रवासी का कुणास ठाऊक– गप्पा, हास्यविनोद हितगुज यांत रमलेले दिसले. मीही उगीचच सावरून वगैरे बसलो. माझ्या सीट-लगतची काचेची खिडकी किलकिली केली. बाहेरचे लगतचे रूळ, झाडं, घरं हळूहळू मागे

पडायला लागले. तेवढ्यात एकजण मला बोलावत होता– "सॉरी बरं का मिस्टर. बराच वेळ मी आपल्या बर्थवर ताणून दिली होती. पण आता गाडी थांबल्यावर मी उतरणार आहे. गेला दिवस भर डोक्यावर एक भयंकर ताण होता हो! आताच्या या येणाऱ्या शहरांत माझा भल्या सकाळीच एका बड्या कनसर्नमध्ये इंटरव्ह्यू आहे. दिवसभर कडेकोट तयारी करून खूप दमलो होतो, डोकं शिणवलं होतं. म्हणून तर मी... आपल्या बर्थवर... ! माफ करा." गाडी स्टेशनात येऊन थांबली एवढ्यांत व तो तरुण माझा निरोप घेवून दिसेनासा होऊ लागला. स्टेशनातून बाहेर पडलेला व नंतर उजव्या हाताला वळलेला त्याला पाहिला. तो झपाझप चालत होता. अजूनी अंधारच असल्यानं त्या मोठ्या रस्त्यावर रहदारीही तुरळक होती. गाडी सुटली. स्टेशन केबिन्स, स्टॉल्स, नांवाची पाटी मागं पडली. तरी मी त्याला त्या रस्त्यावर गाडीतून पाहू शकत होतो. मी जोरांत ओरडून म्हणालो, "बेस्ट ऑफ लक् !" त्यानंही थांबावून मान वळवून माझ्याकडे पाहिलं व हासला. आता मात्र गाडीनं चांगला वेग घेतला. किलकिल्या केलेल्या खिडकीतून वारा घोंघावत आत घुसू लागला. खूप बरं वाटलं. पाहातो तर बोगीत सामसूम झालं होतं. मी फाट्दिशी ती खिडकी बंद केली. पण गाडीच्या वेगाच्या खडखडाटापुढं तो आवाज कुठल्याकुठं विरून गेला. मी आता बर्थ गाठला. गादी पसरून ताणून दिली. तेवढ्यात पुडा आठवला– अगदी आठवणीनं घेतलेला– बिस्किटांचा ! सीटवरच्या बॅगेतून मी वर घेतला तो. परत उताणा झालो. पुडा फोडून एकेक बिस्किट माझी रात्रीची छोटी भूक भागवू लागलं. आजू बाजूला सर्वजण निद्राधीन कधीच झाले होते. फक्त बोगीच्या सीलींगवरचे दिवे बिथरल्यागत हलत होते. कधी तरी मग बहुधा मी बिस्किटं खाणं बंद केलं असावं, नंतर झोप लागली असावी.

माझ्या सीटवर येऊन बसलो तेव्हा उन्हं थोडी वर आली होती. बाहेरचा वेगानं मागं पडणारा परिसर खडकाळ होता बराचसा. अगदी कोरडा ठणठणीत. तरी कोवळ्या उन्हामुळे तकतकीत दिसत होते ते ओबडधोबड खडक, खरं म्हणजे सूर्योदय पहाण्यासाठी उठायचं म्हणून मनाशी पक्कं ठरवलं होतं, पण ते राहूनच गेलं. बोगीत गडबड माजली होती. गाडी धावतच होती स्टेशन गाठण्यासाठी. उजाडल्यापासून बहुधा कुठलं स्टेशन आलंच नव्हतं. लहान लहान चिल्लीपिल्ली रडून रडून आपापल्या आयांना अगदी बेचैन करत होती– वेळेवर दूध वगैरे मिळालं नाही म्हणून. म्हातारे कोतारे पण चहा न मिळाल्यानं अस्वस्थ होते. कुणी थर्मास भरून आणले होते, त्यांची चैन होती. बाकीचे ताटकळत राहिले स्टेशन येण्याची वाट पहात. ज्यांना पेपरच्या ताज्या बातम्या वाचायची खोड होती सकाळी–सकाळी, त्यांनी स्वत:चे ट्रान्झिस्टर्स सुरू केले. बाजूच्या मोठ्या आवाजातही त्यांनी बातम्या ऐकण्यांत तंद्री लावली. एवढ्यात बोगीत फेरीवाले आले. कुणाजवळ कॉफी, चहाच्या किटल्या. कुणाजवळ ताजी वर्तमानपत्र, पुस्तकं, मासिकं, बाहेरही गजबजाट प्रचंड ! गाडी नुक्तीच स्टेशनात थांबली होती. मी जरा कुंठितच झालो की या आधी नुस्ताच खडकाळ प्रदेश असताना, लगोलग हे छोटंस स्टेशन, त्यामानानं जादा गजबजलेलं, पांच सातशे छोटी छोटी पण टुमदार घरं– रस्ते, दुकानं, बाजार इ. इ. एक जण फेरीवाला एवढ्यात बोगीत शिरला. डोक्यावर मोठी थोरली टोपली. ती त्यानं खाली घेतली व स्वत:पण बसकण घालून बसला. पिवळी धमक बारीक शेव, पांढरे शुभ्र चुरमुरे, तांबूस रंगाचे भाजक पोहे, लाल भडक तिखटात मिसळलेले कांद्याचे बारीक तुकडे, चिरलेल्या लिंबाचे अर्धे अर्धे फाके, हिरवीगार बारीक चिरलेली कोथिंबीर– हे इतकं सारं पाहिलं मात्र साऱ्यांच्या जिभा खवळून उठल्या ! शिवाय एकाच ठिकाणी पण अलग अलग असणारे पदार्थांचे रंग ! नुस्तं पाहून पण स्तंभित रहावं !

अर्ध्या तासांत त्याची ती भली थोरली टोपली भरलेली, साफ रिकामी झाली. न दमता न चिडता भराभर मागेल त्याला त्यानं पुडे भरभरून भेळ दिली. बरीचशी चिल्लर नोटांसकट त्यानं सुखा समाधानानं कडूसरीला खोवली. तरी काही काही सहप्रवाश्यांना नाराजच रहावं लागलं होतं.

टोपली काखेत घालून तो भेळवाला उतरूनही गेला. ज्यांना झणझणीत पदार्थ खायची सवय नव्हती त्यांनीही हां हूं करत पण ती फस्त केली.

एव्हाना गाडी सुटली होती. या सार्‍याजणात मी स्वत:ला अगदी समाधानी समजू लागलो–बर्‍याच दिवसा नंतर ही झणझणीत भेळ चाखायला मिळाली म्हणून ! मी मधेच डोळे किलकिले करून सभोवार बघितलं– गाडी एका जंक्शन स्टेशनवर थांबली होती. त्यामुळे गर्दीच्या कलकलाटाला सुमारच नव्हता. दुसर्‍याच क्षणी मी परत डोळे मिटून घेतले. कारण ते भेळेचं स्टेशन गाडीनं सोडता सोडताच झोपेनं मला घेरलं होतं. पण ती माझ्या नशिबी नसावी त्यावेळेला. कारण कुणीतरी मला गदगदा हलवून जागं करत विचारत होता– "सायेब, तुमाला जेवणाची थाळी हवी का ? आताच बुक् करून घ्या. व्हेज् का नॉन–व्हेज पायजे तुमाला ?"

मी त्याला माझी नॉन व्हेज थाळी सांगितली. पैसे दिले व कुपन त्याच्याकडून घेतलं. म्हणजे आता तीन तासापर्यंत मध्ये कुठलं स्टेशनच लागणार नव्हतं. मग मी सहप्रवाश्यांना नीट न्याहाळू लागलो. माझ्या समोरच्या सीटसवर एक नवं जोडपं बसलं होतं. ती खिडकीच्या जवळ होती. त्यांच्यात काही कुजबूज चालली होती. दोघांचं हासणंही हळूवार. त्यापलिकडे पण एक जोडपंच होतं. छोटंस गोरं गोरं बाळ त्यांच्यात होतं. ते मधनंच रडू लागलं की त्याची आई अगदी कावरीबावरी व्हायची. मग; बाळाच्या बापाची पाळी. तो बिचारा सारखं उभं राहून बर्थवरच्या बॅगेतलं काय काय हवं ते काढून द्यायचा– बाळासाठी.

माझ्या शेजारी तिघं जणं दोस्त दोस्त– अजून कसलं लचांड मागं नसलेले होते. आम्ही मनमोकळे होतो त्यामुळं. त्या तिघांनीही नॉन–व्हेजच मागवलं होतं. आमच्या समोर बसलेल्यांकडे अजिबात लक्ष न देता थाळीवर मनसोक्त ताव मारता यावा म्हणून त्या आधीच्या तयारीला लागलो. छोटे ग्लासेस बाहेर आले व दोन बाटल्या–मध्यम ! वेळ जसजसा जात चालला तसतसं आम्ही वेगवेगळ्या विषयांवर घसरू लागलो. मनसोक्त; हासता हासता थाळ्यांची कडाडून आठवण व्हायची.

आमच्या बॅंकला एक बोर्ड होता साचेबंद उमटवलेला– "सौजन्य सप्ताह" ! त्याकडेही मागे वळून वळून विनोद रचणं झालं. बोगीतलं अवतीभवतीचं आम्ही अक्षरश: विसरलो होतो. गाडी अजुनी वेगात पळतच होती. थाळ्या समोर यायला अवकाश असावा कारण. लगेच पण दिसलं की एकेक करत आमच्या थाळ्या अचानक हजर समोर ! गाडी थांबल्याचं म्हणजे आमच्या गावीही नव्हतं ! यथेच्छ ताव मारून हात धुण्यासाठी आम्ही चौघंही उठलो. हात धुणं झाल्यावर ते तिघं तिथं दारातच थबकले ?

गाडी अद्याप हलली नव्हती. मी मात्र परत सीटवर येण्यासाठी वळलो. आमच्या समोरच्या सीटसवरली ती दोन जोडपी जाग्यावर नव्हती. मात्र कुणी तरी त्यांच्या बर्थवरच्या सामानाची उचकापाचक चालवली होती. ती व्यक्ती पाठमोरी मी तिथं जरा अलिकडेच थबकलो सीटवर बसण्या ऐवजी. वाटलं त्या जोडप्यांचं कुणी असावं. त्याचं उचकणं मात्र घाईघाईत चाललं होतं.

"काय पाहिजे ?" एवढं मी विचारलं. आणि ती व्यक्ती सर्रकन वळून माझ्याकडे न पहाताच ताड् ताड् निघून ही गेली. हातात काही तरी होतं वर्तमान पत्रात गुडाळलेलं. माझ्या लक्षात आलं की त्या व्यक्तीने उचकटलेली सूटकेस परत बंदही केली नाही. मी मग जाग्यावर बसलो. खिडकीतून उगीचच भिरभिर पाहू लागलो– चौफेर.

ती मघाची व्यक्ती दिसली नाही. प्लॅटफॉर्म माणसांनी फुललेला होता नुस्ता. त्या तिघा दोस्तांपैकी एकानं मला चांगलं "बोका" पान दिलं, त्याचीच वाट मी पहात होतो. समोरचे चौघंजणही आपापल्या जागांवर टेकले. आल्या आल्या जोडप्यापैकी एकीच्या लक्षात आलं की आपल्या सामानातली सूटकेस उघडीच आहे. नवर्‍यानं ती लगेच खाली घेतली. त्याचा चेहरा एकदम खूपच घाबरलेला झाला.

"अगं, आपला बटवा दिसत नाही इथं— मला पक्कं आठवतंय मी यातच, ठेवला होता."

"अहो, बरेच पैसे होते त्यात, शिवाय तिकीटं पण !"

"बराच लांबपर्यंत पल्ला गाठायचाय. गाडी थांबलीय एवढ्यांतच इथपासूनची तिकिटं काढायला हवीत. पैसे तर नाहीत...."

रडकुंडीला आले दोघंही. तो तर सूटकेस तशीच उघडी मांडीवर ठेवून भ्रमिष्टासारखं करायला लागला. ती हुंदके देऊ लागली–तोंड डोळे लपवू लागली रूमालामाग–

"अहो, आता काय करायचं ? गाडी सुटायच्या आत–" मी त्याचं संकट उमगलो. आम्ही चौघांनी वेळ न दवडता आपल्या जवळचे शक्य ते पैसे जमवले व मी त्यांना त्यांच्या उतरायच्या स्टेशनचे नाव विचारून घेऊन तरातरा पहिले खाली उतरलो. खिडकीशी क्षणभर थबकून हातानंच खूण केली–मला उशीर झाला व गाडी सुरू झाली तर साखळी ओढायची.

तिकिटं काढायच्या खिडकीशी तोबा लांब रांग होती. गाडी सुटायला फक्त पंधरा मिनिटंच होती. खिडकीच्या जवळपास नंबर लावायला मिळण्यासाठी पांच–सात मिनिटं खर्ची पडली. शेवटी एकदाचा माझा नंबर आला. तिकिटं काढली व निघालो झटकन् बोगी गाठण्यासाठी.

माझ्या पुढंच ती व्यक्ती मघाची वेगानं वाट काढत चालली होतीशी वाटलं मला. तोच बुशकोटचा रंग व केसांची ठेवण पाठीमागची. आणि सर्वांत म्हणजे तीच ती हातातली वर्तमानपत्राची सुरळी मुठीत घट्ट धरलेली. अजुनी अवकाश होता गाडी सुटायला पाच-सात मिनिटं तरी. मनातही बेत आखायची तुफान गर्दी उसळलेली–काय उपाय करावा याला पकडण्यासाठी ! का हा नाहीतर निसटून जायचा–म्हणजे महाभयंकर फसगत ! तेवढ्यात पण मी येऊनही पोचलो गाडीजवळ–अगदी नेमकं बोगीशीच. मी बाहेरनंच प्रथम मित्रांना त्याला आडवा तिडवा घाईत चाललेला दाखवला. तोही गाडीत दुसरीकडं कुठं तरी घुसण्याच्या नेक इरादयात असावा. मी आत आलो. तिघंही बाहेर तातडीनं. त्याच्या मागावर, आता त्यांनी जाता जाता मला खुणावलं–प्रसंग पडेल तर तू साखळी ओढ लगेचच म्हणून ! आणि तो प्रसंग आलाच–गाडी थोडी पुढं आल्यावर मी खेचली साखळी.

दोन मिनिटात थांबली गाडी. गार्ड आला डबा शोधत शोधत. तो बोगीत आलाही. त्याला मी माहिती दिल्याप्रमाणे तो वाट पाहू लागला. मग म्हणाला की पोलिसात तक्रार देऊन यावं हे बरं एवढ्यात ते आले तिघंही त्या व्यक्तीच्या गचांडीला घट्ट धरून. तिला तसंच धरून ठेवायला सांगून गार्ड म्हणाला की मी पोलिसांना घेऊनच येतो. हा एवढा सारा अजब प्रकार पाहून ते जोडपं तर बधीर अवस्थेला गेलेलं–पोलिस आले–त्या व्यक्तीला केलेला गुन्हा करावाच लागला कबूल–त्या जोडप्यानं आपली गेलेली–चीजवस्तू ओळखली–सारं सारं काही ठीकठाक झालं एकदम.

गाडी सुटली त्यानंतर. त्या जोडप्याच्या चेहऱ्यांवरचे भाव आता असे काही झाले होते ! हे उपकार आमचे ते कसे न् कधी फेडणार ! आपसात कुजबुज कुजबुत करत बाकीचे सहप्रवासी आमच्याकडे यायला सुरुवात झाली. त्यांना परत पाठवलं त्यांच्या जागांवर न् मग निवांतपणा मिळू लागला. ते आधीचं चांगलं चुंगलं खाणंपिणं झाल्यानंतरची सुस्ती परत डोकावू लागली. पण मग, भूकही कडाडली होती. सूर्य पश्चिम क्षितिजाशीं टेकला होता. त्या संधिप्रकाशाच्या वेळची तऱ्हेतऱ्हेच्या रंगांची उधळण–कुठे गडदपिवळा, कुठे तांबुस, नारंगी, डाळिंबी, कुठे जांभळा गडद फिका–आकाशात रेंगाळणाऱ्या ढगांनी जणू पिऊन घेतली होती.

माझ्या शेजारचे तिघं दोस्त मात्र चक्क पेंगायला लागले होते. गाडी एका अगदी छोट्या स्टेशनवर दोन–तीन मिनिटं थांबली व निघालीही लगोलग व मला एक फेरीवाला बोगीत चढलेला दिसला. डोक्यावर भली थोरली टोपली. रंगीत रंगीत भेळेनं शिगोशीग भरलेली. ती भेळ खाण्यापुरतं निदान झोपेला झटकावं लागलं. कुणीच काही गपशप् करण्याच्या मूडमध्ये नव्हतं. पण आमच्या चौघांच्या त्या पराक्रमाबद्दल जोडप्यानं कौतुक मात्र केलं व आम्हींही भेळ बिनधास्त यथेच्छ खाल्ली–झणझणीत होती चांगली ! पैसे त्या जोडप्यानं भेळवाल्याला दिले. आम्ही आमच्या

अनुक्रमणिका

झोपेच्या तयारीला लागलो. बाहेर डोकावलं- अंधारानं झोपायला परवानगी दिली आम्हाला. बोगीची दारं आतून लावली होतीच पक्की.

मला जाग आली तेव्हा गाडी पहाटे एका स्टेशनात थांबली. सात-आठ तरी प्लॅटफॉर्म्स होते स्टेशनला. पहाटेच्या गारठ्यात स्टेशन धुरकटल्यागत दिसत होतं. रेल्वेच्या दोन-चार ऑफिस रूम्समध्ये लाईटस् लावलेले फिक्कट प्रकाशत होते. दोन मोठी चहाची हॉटेलं जागी होऊ पहात होती. एक या प्लॉटफॉर्मवरचं व दुसरं शेवटच्या प्लॅटफॉर्मवरचं. तिथंही फारच फिक्कट उजेड दिसत होता. त्या तसल्या उजेडात दोन-चार दोन-चारजणं उभे होते थिजल्यागत, चहाचे घोट घेत-सिगरेट पीत निवांतपणे.

मधूनच एका प्लॅटफॉर्मवरनं सामानानं शिगोशीग भरलेली लोखंडी ढकलगाडी थरथरत जात होती. ती ओढणारा बराच वाकला होता पुढ्यात. एका बोर्डासमोर हळूहळू म्हणता म्हणता बरेच जणं जमा झाले उभ्या उभ्या. तो रेल्वे टाईमटेबलचा बोर्ड होता. जवळपास बिल्लेवाले बरेच हमालही एकत्र होत होते. स्टेशन एकाएकी चांगलंच गजबजून गेलं. बोगीची दारं कडेकोटानं लावली गेली-कारण गाडी ते गजबजलेलं स्टेशन सोडून देत होती-शांत होऊन गंभीरपणे, स्टेशन वेगानं मागं पडलं. तशी एकदम अगदी सपाटीचा भूभाग दिसू लागला-पार क्षितिजापर्यंत पसरलेला. अतिशय वेगामुळं नजरही ठरत नव्हती त्या सपाटीवर !

एवढ्यात तो सारा परिसर सोन्याहूनही पिवळा झाला. एका क्षितिज- बिंदुलगत प्रचंड मोठा फिक्कट नारिंगी व पिवळसर रंग पांघरलेला अगदी सौम्य गोळा दिसू लागला. कुणी बऱ्याच उंचीवरून आमच्या गाडीकडं पाहिलं असतं तर त्याला वळसे वळसे घेत सळसळत जाणाऱ्या नागिणीगत दिसली असती ती ! दोन गाड्या क्रॉस होताना दिसल्या- एक आमच्या गाडीच्या दिशेनेच धावणारी व दुसरी विरुद्ध दिशेला सुसाट धावणारी- जणू एका नागिणीच्या सोबतीला अजून दोन नागिणी ! काही क्षणापुरत्याच. एवढं लांबवर आल्यावर एक गोष्ट जाणवली की बोगीतली जवळच्या सीटसवरची व दूरच्या सीटसवरची माणसं परकी राहिली नव्हती. बोगीतलं वातावरण काहीसं घरगुती बनलं होतं.

आमच्या पलिकडची एक ओळ सोडून असलेल्या सीटसवरून माणसांचा एक विचित्र असा आवाज ऐकू येऊ लागला. पाठोपाठ तुपाचा वास आला साजूक असा, काहीतरी जळाल्याचा वासही आला तीळ, तांदूळ इ. चा. नंतर तो विचित्र गलबलाट बंद झाला व मंत्रोच्चारण ऐकू आलं. आम्ही चौघं व समोरची ती जोडपी उठून लगबगीनं काय चाललंय म्हणून तिकडे गेलो.

पूर्वी एका लोकल ट्रेनमध्ये पाहिलेलं दृश्य एकाएकी माझ्या डोळ्यांसमोर आलं- बराचसा सिंधी समाज एकत्र जमला होता. गुरू नानक व इतर देवादिकांच्या तसविरी डब्यात लावल्या होत्या. त्यांना सुवासिक हार घालून सजवलं होतं, निरांजन व उदबत्त्या लावल्या होत्या. तो सारा समाज त्यांच्या भाषेतली भजनं डोळे मिटून तल्लीनतेनं म्हणत होते. इतर प्रवासीही तो सोहळा बघत ताटकळत उभे होते. त्यांच्या कोणाच्याच चेहऱ्यावर काही विशेष असे भाव नव्हते. आश्चर्यही नव्हतं. लोकल थांबत होती- स्टेशन सोडत होती- प्रवासीही चढत उतरत होते. चेहऱ्यांवर काहीही न दाखवता ! शेवटी आरती झाली, प्रसाद वाटला गेला डब्यातील सर्वांना. तोपर्यंत शेवटचे स्टेशन आलं होतं.—

तसला काही तरी प्रकार इथंही चालू असावा असं मला वाटलं. पण, पहातो तर इथला प्रकार सगळ्यात आगळा. मधोमध छोटसं यज्ञकुंड. धगधगीत पेटलेलं— त्या भोवती सीटस्वर उघड्या छातीनं बसलेले सोवळे ब्राह्मण. मोठ्यामोठ्यानं मंत्रोच्चारण चालू होतं- तिळा तुपाच्या आहुती सढळ हातांनी यज्ञकुंडात पडत होत्या. धूप दीप नैवेद्य इ. चा गराडा भोवताली.

आम्ही बऱ्याच वेळानं जाग्यावर येऊन बसलो. समोरच्या जोडप्यांचे चेहरे भावमय दिसले. बहुतेकांचे तसेच होते चेहरे भक्तीनं डबडबलेले. आम्ही अवाक ! गाडी सुसाट वेगात पुढच्या स्टेशनकडे चाललीच होती नीटपणे लक्ष देत. बोगीत त्या पवित्र यज्ञकुंडातला धूर कोंडून राहिला होता.

गुदमरल्यासारखं वाटायला लागलं. डोळे वहात होते. तरी एक खिडकी आम्ही उघडी ठेवली होती. आमच्याकडची. तेवढं एक बरं होतं. तिकडे मंत्रादि विधी चालूच होते अजुनी.

सकाळचे बरेच वाजले होते. गाडीचा वेग कमी काही होत नव्हता. एक आश्चर्य जाणवलं– ते हे की गाडीनं भल्या पहाटे स्टेशन सोडल्या-पासून कुणी चहा घेतला नव्हता की कुणी फेरी-वालेही बोगीत नव्हते आले. तरी अस्वस्थ कुणीच झालं नव्हतं, तर त्या पवित्र कर्मात आकंठ बुडाले होते ते रोजचं सारं काही विसरले होते. मी व ते तिघंजण मात्र भलते अस्वस्थ झालो.

तेव्हाच एकजण ताडकन उठला व उजव्या हाताची चेन जोरात खेचली. दोन–चार मिनिटांत गाडी थांबली. तरी ब्रेक लावल्याचं बोगीत इतरत्र कळलंच नाही. गार्ड येतोय पाहिल्यावर मी उठून दार उघडलं. आत आला गार्ड बोगीतला तो विशिष्ठ वास आला मात्र– विचित्र आठ्या घातल्या कपाळाला त्यानं !

आम्ही त्याला यज्ञकुंडाकडे नेलं. तो असा काही ओरडला की, मंत्रोच्चारण बंद पडलं ठपकन ! कावरेबावरे चेहरे झाले साऱ्यांचे यज्ञकर्त्यांची तर बोबडी वळली, ते कापून लागले थरथर उभे राहिल्या जागेवरच ! आधीच त्याचे चेहरे लालबुंद झाले होते. डोळ्यातनं धाराही लागल्या होत्या. त्यातच गार्डचं दरडावणं ऐकून रडवेले झाले ते. यज्ञात आहुती पडणं थंडावलं तरी ते कुंड ज्वाळांनी लपेटलेलं राहिलं. इतर प्रवासी घाबरल्या अवस्थेत आपापल्या जागेवर बसले गुपचुप. गार्डचा हुकूम सुटला की यज्ञकुंड तावडतोब विझवा. पुढचा–पोलिस तपास वगैरे वगैरे. स्टेशन पंधरा मिनिटांनी येणार होतं. गाडी एकदाची हलली मधेच उभी राहिलेली.

बोगीत जीवघेणी शांतता होती. मी आपली तंद्री खिडकीबाहेर लावली. तर, कुठलंतरी स्टेशन जवळ येत असल्याच्या खुणा दिसू लागल्या. गाडी स्टेशनात शिरतच होती की तेवढ्यांत अडखळली कशाला तरी. पुढच्या क्षणी एक करुण हंबरडा कानावर आला. सर्वांग शहारलं विचि-त्रश्या संवेदनेनं. गाडी थांबली. थोडी पुढे जाऊन सारेच्या सारे प्रवासी खाली उतरून इंजिनच्या दिशेने धावायला लागले–आमच्या बोगीतले वासी सोडून.

थोड्या वेळानं पोलिस अधिकारी मोठ्या प्रयासानं वाट काढत काढत आमच्या बोगीत शिरले. परत सारेच्या सारे यज्ञकुंडाजवळ, त्या ब्राह्मणाजवळ जमा झाले. त्यांच्यातील मुख्य ब्राह्मणानं एका पोलिस अधिकाऱ्याला असा काही सॅल्यूट ठोकला ! मनमोकळं हासत हासत त्यांच्यांत डोळाडोळी झाली. ती भापा त्यांनाच फक्त कळली असावी–की पुढचं चटकन् सारं काही कुठल्याच सोपस्कारांशिवाय अगदी छान पार पडलं पोलिस लोकांना गंध लावलं गेलं–ओळीनं ! यज्ञकुंड नाममात्र परत पेटून उठलं–मंत्रांच्या सोपस्कारांनी !

आता मात्र कुणाच्याच आश्चर्याला सुमार उरला नाही. एवढेच काय पण प्रत्येकाला यज्ञाचा महाप्रसाद मिळाला–तेवढंच सार्थक उभ्या जन्माचं ! पोलिसातल्या एका फोटोग्राफरनं बोगीतच तो अत्युच्च क्षण अचूक टिपला. खुशीला पारावारच उरला नाही मग. सारेजण खाली उतरले. गर्दीत मिसळून गेले.

इंजिनपुढचं दृश्य मात्र दारुण होतं. तरी आमच्या बोगीतल्या यज्ञकर्त्यांनी ते मनाला अजि-बात लावून घेतलं नाही ! त्यांनी बघ्याची भूमिका छान बजावली. एक धष्टपुष्ट गाय मरून पडली होती रुळांवर रक्ताच्या थारोळ्यांत–आतड्यांच्या गुंत्यात. त्या गाईचा मालक ओक्साबोक्शी रडत होता जवळच ऊर–कपाळ बडवून घेत ! रेल्वे खात्याला सर्वांसमोर न्याय मागत होता. त्याचं म्हणणं होतं–गाडी स्टेशनात यायच्या आधी-पासूनच स्टेशनलगतचं छोटं फाटक बंद करायला हवं होतं म्हणजे त्याची गाय मेली नसती. त्या पोलिस अधिकाऱ्यानं त्या बिचाऱ्या खेडुताला दमात घ्यायला सुरुवात केली. हातातली बंदुकही त्याच्यावर उगारली हाकलून लावण्यासाठी. बहुतेक प्रवाश्यांना वाईट वाटलं घडल्या गोष्टीचं, पण त्याचा काय होता उपयोग ? शामत नव्हती कुणाची पोलिसांना काही सांगण्याची. त्या मुख्य

ब्राह्मणानं तर त्या खेडुताला शिव्याशाप द्यायला सुरुवात केली—

"जाऊ द्या, जाऊ द्या हो! हे असेच अडाणी असतात! चला आपण आता!" असं साळसूदपणे त्या अधिकाऱ्याला सांगू लागला.

आता गर्दी हटवणं चालू झालं दडपशाहीचा उपयोग करून. बहुतेकांच्या डोळ्यात पाणी आलं. जाता जाता तरी त्या फोटोग्राफरनं मात्र ते सारं दृश्य टिपलं. तो फोटो पेपरमध्ये छापायला देण्यासाठी!!

■

नगर–पुणे रोड
नॅशनल बॅटरीज समोर
केडगाव, अहमदनगर

साहित्य संमेलनाच्या निमित्ताने

मडगाव येथे एकदा १९३० साली वामन मल्हार जोशी यांचे अध्यक्षतेखाली तर १९६४ साली वि. वा. शिरवाडकर यांचे अध्यक्षतेखाली दुसऱ्यांदा साहित्य संमेलन भरले होते.

हैद्राबादला १९३१ साली १७ वे साहित्य संमेलन श्री. व्यं. केतकर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. हैद्राबाद येथे १९४७ साली भरलेल्या साहित्य संमेलनात न. र. फाटक अध्यक्ष होते. तर १९६५ साली वा. ल. कुळकर्णी अध्यक्ष होते.

बेळगावला १९२९ च्या साहित्य संमेलनात. शि. म. परांजपे अध्यक्ष होते. तर १९४६ साली ग. त्र्यं. माडखोलकर हे अध्यक्ष होते.

सातारा येथे १९०५ साली र. पां. करंदीकर आणि १९६२ साली न. वि. गाडगीळ अध्यक्ष होते.

अकोला येथे १९१२ साली ह. ना. आपटे, तर १९८१ साली गो. नी. दांडेकर हे अध्यक्ष होते. इंदूर येथे १९१७ साली ग. ज. आगाशे, तर १९३५ साली बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे अध्यक्ष होते.

आजपर्यंत सर्वात अधिक म्हणजे आठ अधिवेशने पुण्यात भरली आहेत. त्यात क्रमाने पहिली दोन, आणि चार, पाच, सहा अशी पाच अधिवेशने ३१ वर्षांच्या कालावधीत झाली. त्यानंतर १९ वर्षांनी पुण्यातले सहावे, त्यानंतर २२ वर्षांनी सातवे आणि त्यानंतर २८ वर्षांनी पुण्यातले आठवे अधिवेशन झाले.

जंगल, आदिवासी आणि 'थांग-अथांग'

प्रमोद मुनघाटे

कवी श्रीधर शनवारे यांचा तिसरा कविता संग्रह 'थांग-अथांग' हा १९८६ मध्ये प्रसिद्ध झाला. 'कविवर्य कुसुमाग्रज पारितोषिक' ही या संग्रहाला मिळाले. १९८५ मध्ये अर्वाचीन मराठी कवितेच्या शंभरीनिमित्त वि. सा. संघाच्या श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाने एक कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. श्रीधर शनवारे होते, आणि सप्टेंबर १९८७ च्या 'ललित' मासिकात प्रा. भास्कर नंदनवार यांनी घेतलेली डॉ. शनवारेंची दीर्घ मुलाखत प्रसिद्ध झाली आहे. वर उल्लेखिलेल्या कार्यक्रमात व मुलाखतीत शनवारे यांनी 'थांग-अथांग' या संग्रहात येणाऱ्या आदिवासी आणि जंगल या काव्यविषयाबद्दल आपली भूमिका, हेतू आणि अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. वस्तुत: कोणत्याही कवीच्या कवितांचा आस्वाद आणि आकलन त्या कवितांतून प्रतीत होणाऱ्या अनुभवावरच भिस्त ठेवून करणे योग्य, परंतु स्वत: कवीनेच आपली भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला तर कधी कधी त्या कवीची इच्छा नसेल इतक्या सुलभ रीतीने त्याच्या कवितेचा गुंता (कवितेचे अनुभवणे) सोडविता येतो आणि परिणामत: त्याची काव्यानुभूती नको तितकी नग्न होते.

'थांग-अथांग'मधील बऱ्याच कविता आदिवासी आणि जंगल या विषयावरील आहेत. या कवितांचे स्वरूप बहुधा स्थलचित्रणात्मक आहे. भंडारा जिल्ह्यातील जंगलापासून अरुणाचलातील आदिवासीपर्यंतचा प्रदेश या कवितांतून येतो. शनवारे यांच्या यापूर्वीच्या कविता संग्रहांतूनही सातत्याने निसर्गनिष्ठा जाणवते आणि समकालीन कवीच्या संदर्भात त्यांची निसर्गनिष्ठा काहीशी व्रतस्थ असलेली दिसून येते, पण 'थांग-अथांग' मधील 'जंगलातल्या कवितांना' त्यांच्या निसर्गनिष्ठेचा जो अंत:संदर्भ अपेक्षित होता तो मुळीच दिसत नाही. दुसरे म्हणजे या कवितांमधील अनुभूती विषय, प्रेरणा समकालीन कवींच्या तुलनेत किंचितही वैशिष्ट्यपूर्ण नाही, किंबहुना 'जंगलातल्या कवितांमध्ये' आता जुना झालेला ढोबळ आशयच आढळतो. शनवारे यांना अभिप्रेत असलेले 'अंडर करंट्स' या कवितांतून जाणवत तर नाहीतच पण त्यांनी सांगितलेल्या त्यांच्या भूमिकेमुळे त्यांच्या 'जंगलातल्या कवितांची' प्रेरणा उघडी पडली आहे. जंगलाला मित्र मानून 'जंगल' आणि 'आदिवासी' यांना काव्यविषय करण्याचा शनवारेंचा आवेश अगदीच नवोदित कवीचा आहे.

'दलित कविता ही वाङ्मयातील एक लाट होती. तिचा प्रवाह आता साचला आहे. नव्या वाटा चोखाळण्याची किंवा नव्या अनुभवांची आव्हानं पेलण्याची शक्ती आता दलित कवितेत उरली नाही.' असे डॉ. शनवारे यांनी अर्वाचीन मराठी कवितेच्या शंभर वर्षाच्या निमित्ताने सांगितले होते. आणि 'नव्या संघर्षाचं चित्रण करणारी आदिवासी कविता आता मराठीत अवतरणार आहे.' अशी भविष्यवाणी या भाषणात केली होती. या त्यांच्या वक्तव्यावरून 'थांग-अथांग'मधील 'जंगल आणि आदिवासी' या विषयांवरील कवितांमध्ये कोणत्या हेतूने, कोणत्या आवेशाने आणि कोणत्या अपेक्षेने 'अंडर करंट्स' अभिप्रेत आहेत. हे स्पष्ट होते आणि शनवारेंची 'हौशी' कविता अनुभूतीच्या किती कृत्रिम पायावर उभी आहे, याची जाणीव होते.

'दलित कविता' आणि 'आदिवासी कविता' यांच्या प्रेरणा व स्वरूप काय आहेत हे बरेचसे स्पष्ट आहे. ते सांगण्याची गरज नाही. 'माणसातल्या माणसाच्या भावनेला अवगाहन करणे' हा कुठल्याही कवितेचा हेतू याही कवितांना असतोच असतो; पण संस्कृती, समाजव्यवस्था,

इतिहास आणि प्रादेशिकता यांच्या संदर्भातून दलित कविता, आणि आदिवासी कविता या स्वतःची वैशिष्टये घेऊन अवतरतात. 'दलित' या शब्दाच्या वाङ्मयातील व्यापक अर्थानुसार जसे दलितांनीच लिहिलेली कविता म्हणजे दलित कविता होत नाही तसेच आदिवासी कविताही आदिवासी जाणीव अनुभूत करू शकणारा कोणताही कवी ती आपल्या काव्यात प्रतिबिंबित करू शकतो यात शंका नाही; पण हे मान्य करूनही 'थांग– अथांग' मधील शनवारे यांच्या कविता पारंपारिक सामाजिक आशया शिवाय दुसरा कोणताही अनुभव देत नाहीत. आदिवासी जाणिवेचा तर त्यांच्या कल्पक काव्यकृतीला स्पर्शही झालेला नाही !

१९८७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या विदर्भातीलच एका आदिवासी कवीच्या कवितासंग्रहातील कविता अनुभवल्यानंतर तर शनवारे यांनी काव्यविषय म्हणून स्वीकारलेली आदिवासी जाणीव अधिकच उघडी पडते. 'गोंडवन पेटले आहे' हा प्रा. विनायक तुमराम यांचा कवितासंग्रह. या कवीच्या स्वाभाविक आविष्काराला 'कविते'च्या संदर्भात मर्यादा असल्या तरी या कवीची पृथक अशी आदिवासी जाणीव अस्सल आणि महत्त्वाची आहे. त्याला काव्यविषय म्हणून ती स्वीकारावी लागत नाही तर त्याचा काव्यानुभवच आदिवासी जाणिवेतून जन्म घेतो. म्हणूनच समकालीन काव्यप्रवाहात आदिवासी कविता म्हणून त्यांची कविता स्वतःचे स्थान व अपेक्षा निर्माण करणारी आहे.

मग शनवारे यांची आदिवासी कविता कशी आहे ?

–हे समजण्यासाठी शनवारे यांचा पूर्वीचा काव्यप्रपंचही लक्षात घ्यावा लागतो. 'थातून वंद वेट' आणि 'उन्ह उतरणी' या दोन संग्रहांना मानसन्मान मिळाले. शनवारे यांना गेल्या दोन दशकांत कवी म्हणून लौकिक मिळाला पण त्यांच्या कवितांना एकूण मराठी कवितेत 'लक्षणीय' कविता म्हणून लौकिक मिळाला नाही, ही काहीशी विचित्र पण खरी गोष्ट आहे. याची कारणे काहीही असोत; पण ते मुलाखतीत, 'सामाजिक आशयाची कविता म्हणजेच श्रेष्ठ कविता हा आजकालचा विचार मला काही पूर्णतः मंजूर नाही. 'सामाजिक आशया'संबंधीची सध्याची मराठीतील धारणा तर मला संकुचितच वाटते, असे जेव्हा म्हणतात तेव्हा त्यांना याची काहीशी खंत वाटते हे स्पष्ट होते. सामाजिक आशय नसलेल्या कितीतरी कवींच्या 'कविता' या दोन दशकांतच (म्हणजे आजकाल) गौरविल्या गेल्या आहेत. (उदा. इंदिरा संत, आरती प्रभु, ग्रेस, बा. भ. बोरकर इ.) आणि दुसरे असे की 'सामाजिक आशया'संबंधीची शनवारेंना संकुचित वाटणारी धारणाच त्यांच्या 'थांग– अथांग' मधील 'जंगलातल्या कविता'मधून व्यक्त होते. त्या शिवाय दुसरे काहीही नाही. हे लक्षात आले म्हणजे 'दलित कवितेचा प्रवाह साचला आहे म्हणून ते नव्या संघर्षाचे वर्णन करणाऱ्या आदिवासी कवितेची' वाट का चोखाळतात हेही लक्षात येते.

सृष्टीतील एकंदरीत जीवनाची जाणीवच द्वंद्वात्मक आहे. या द्वंद्वाचे आकलन प्रतिभावंत आपल्या आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्यानुसार करून घेत असतो. 'दलित कविता', 'आदिवासी कविता', 'सामाजिक आशयाच्या कविता' असे वर्गीकरण वस्तुतः 'कविते'च्या आकलनाला मारक आहे पण कवीच्या प्रतिभेच्या मर्यादांमुळे कवी आपल्या कवितेतून मर्यादित द्वंद्वांचे आकलन करून घेत असतो म्हणून आपण ही सोय करतो. सामाजिक अन्यायाच्या पार्श्वभूमीवर अवतरलेल्या दलित कवितेला मर्यादित द्वंद्वाची मर्यादा आहे तशी 'आदिवासी कविते'लाही आहे. म्हणून दलितांच्या संघर्षापेक्षा आदिवासीचा संघर्ष 'नवा' आहे हे शनवारेंचे म्हणणे चूक आहे. उलट तो आदिम आहे. अर्थात मराठी साहित्याच्या क्षेत्रात हा संघर्ष कसा आहे, ते विनायक तुमराम यांच्यासारख्या आदिवासी जाणिवेतून उदयास आलेल्या कवीच्या कवितेवरून ठरविता येईल, 'आदिवासींचे नवे संघर्ष मराठी वाचकांना भुलावण घालतील' म्हणून तिकडे वळणाऱ्या शनवारेंच्या कवितातून नाही.

'पवनीपलीकडच्या जंगलात', 'नागझिरा : तीन कविता', 'अरुणाचल : तीन कविता' या

अनुक्रमणिका

काही आदिवासींचा संदर्भ असलेल्या 'थांग–अथांग'मधील ठळक कविता. यामधून आदिवासी जाणीव व्यक्त न होता, 'पारंपारिक ढोबळ सामाजिक आशय'च व्यक्त होतो.

अरुणाचलच्या तीन कवितांमध्ये एखाद्या अरुणाचली वाल्मिकीने 'रामायणा'सारखे एखादे काव्य लिहावे असे या कवीला वाटते आणि अखेरच्या ओळीत तो, म्हणतो,

'वाटते,
या रामायणात
सारे काही भव्य असेल ते यावे;
फक्त त्यात कुणा
शंबुकाचे वर्णन नसावे.'

या कवितेतील सामाजिक आशय हा तर एका अर्थी पारंपारिक आहे. (म्हणजे दलित कवितेचा प्रवाह साचला असे गृहीत धरले तर) दुसरे असे की शंबुकाचा संदर्भ टाळून 'उरलेले रामायण या वाल्मिकीने का लिहावे ? शंबुक–रामाचा संघर्षच नसलेले दुसरे काव्य या वाल्मिकीने लिहावे असे या कवीला का वाटत नाही ? म्हणून या कवितेत पृथक आदिवासी अनुभवच नाही. आता,

'ओसाड रानकपारी
मी वनपुत्र म्हणून जगावे
अन् माझ्या आसवांनी
दिवे जाळून तुम्ही महाली सजावे'

असे जेव्हा विनायक तुमराम म्हणतो तेव्हा शनवारे यांची आदिवासी जाणीव अधिकचउ घडी पडते व आदिवासी जाणीवेचा पृथक सूरही लक्षात येतो. शनवारे यांच्या कवितात येणारा अस्वल आणि आदिवासींचा संघर्ष, (पवनीपलीकडील जंगलात) नागझिऱ्याच्या जंगलातील लाल–काळचा मुंग्या यांच्यातील विषमता (नागझिरा : तीन कविता) ही कवीची स्वानुभूती म्हणून प्रत्ययास येत नाही तर पिकनिकला जाऊन लँडस्केप करणाऱ्या, दुर्बिणीतून आदिवासी न्याहाळून सौंदर्यपान करणाऱ्या 'हौशी' प्रवाशाची भूमिका आहे हे जाणवते. दिवाणखान्यात टांगण्यासाठी तयार केलेल्या जे. पी. सिंघलच्या अर्धनग्न आदिवासी युवतीच्या कॅलेंडर निर्मितीची ही भूमिका आहे. आदिवासींचा प्राचीन इतिहास, वर्तमानस्थितीतील समाजातील त्यांचे स्थान, आधुनिक जीवन जगणाऱ्यांची त्यांच्याकडे बघण्याची दृष्टी याविषयी जाणीव आणि आस्था नसल्याने ही भूमिका तयार होते.

श्रीधर शनवारे जंगलाला 'मित्र' मानतात तर विनायक तुमाराम स्वतःला 'वनपुत्र' म्हणवतो, यावरून हे कसे झाले हे कळते. आणि तुमराम 'माझ्या आसवांचे दिवे' असे का म्हणतो हेही कळते.

आणखी एका कवितेत शनवारे म्हणतात :

'रस्त्यावर येऊन मी आभाळाकडे
दुर्बिण लावली.... ....

... ...
तेवढ्यात कुठून तरी व्हॅगिल आला
माझ्या कोड्यावर रोखून आपली नजर
करडी, धीट
म्हणाला,
They can do it
because
They think, they can do it

जंगलाचा हा शनवारेंचा अनुभव तर कवितेच्या बागेत बागडणाऱ्या नवोदित निसर्गकवीचाच आहे.

यात 'नवा संघर्ष' किंवा 'अंडर करंट' कुठे आहे ?

'जंगलातल्या कविते'मध्ये

'वाहाते चुळचुळ पहाडपाणी
दगडचिपांनी अडवून
धीवरांनी त्यात टाकलेल्या बिजाच्या साली
त्या विषाने मेलेले मासे
दाढेत दाबले की,
धीवरांची तेवढीच काळी रात्र गोरी
झाली !'

असा दिदारक अनुभव सांगून शेवटी म्हणतात,

'अशा या जंगल जिव्हारात
मी विरघळून उभा
माझ्या उजाड उमरनाम्यात
असाही एक संपन्न सुभा !!'

असे म्हणून जंगलापासूनची आपली अलिप्तता स्वतःची सांगून टाकतात. इथे आदिवासींऐवजी

धीवर आहेत पण भूमिका तीच. पुन्हा येथे कवी विनायक तुमराम 'माझ्या आसवांचे दिवे' असे का म्हणतो याचा प्रत्यय येतो.

'आदिवासी' आणि 'जंगल' या विषयांवरील कवितांमधील शनवारे यांची जाणीव व अनुभूती पारंपारिक आणि वेगडी कशी आहे ते आणखी कितीतरी उदाहरणांवरून दाखविता येईल. जंगलातील मुंग्यामधील संघर्ष असो की, आदिवासी-अस्वलींमधील संघर्ष असो त्या अनुभवाने शनवारे आपल्या 'उजाड उमरनाम्यात एक संपन्न सुभा' उभा करतात. या उलट तुमराम सारखा आदिवासी कवी म्हणतो,

'मी वनवासी आहे
आणि शोधतो आहे आजही
माझ्या मरणांचा संदर्भ गिळणारा अंधार
नि:शब्द पहाडाच्या गर्भात
माझ्या जखमांना शब्द देणाऱ्या
रानकुसात—'

हा कवी आपल्या मरणांचा संदर्भ 'रामशंबुक' संघर्षात शोधीत नाही हीच त्याची पृथक् आदिवासी जाणीव आहे—

'थांग-अथांग'मधील इतर कविताही शनवारेंच्या लौकिकाच्या तुलनेत अतिशय सामान्य अनुभव देतात; (उदा० सोनाय, विपरीत, एक उभार चांदणी वुडत गेली) काही कविता तर शब्दचमत्कृती आणि सामाजिक आशयाचा ढोबळ सोस असलेल्या आहेत : (उदा० एका देशाची ओळख, वंदे मातरम्, देशाटनातील दृश्ये.)

वस्तुत: 'ललित' मधील मुलाखतीत शनवारे यांनी आदिवासी कवितेबद्दल केलेले चिंतन मननीय आहे. पण त्यांच्या कवितेतून त्याचा प्रत्यय येत नाही. प्रत्येक कवी हा एका अर्थी विचारवंत असतो. पण प्रत्येक विचारवंत हा कवी असतोच असे नाही' या विधानाची प्रचिती श्रीधर शनवारे यांचे आदिवासी कवितेवरील भाष्य आणि 'थांग-अथांग' मधील कविता यांच्या संदर्भात येते. ■

स्नातकोत्तर मराठी विभाग
विद्यापीठ परिसर
नागपूर-१०

साभार पोच

फिपुली / सुगंधा शेंडे / सुरस प्रकाशन, सोलापूर / पृ. १५८ / रु. ३५ /-
स्मरणांची कारंजी / यशवंत मनोहर / समुचित प्रकाशन, नागपूर / पृ. ५३ / रु. २० /-
श्री विठ्ठल : एक चिंतन / डॉ. माणिक धनपलवार / श्रीकांत धनपलवार प्रकाशन हैदराबाद / पृ. ७१ / रु. २० /-
दीपज्योतिर्नमोस्तुते / सुशीला महाजन / शिल्प प्रकाशन, पुणे / पृ. २३१ / रु. ६० /-
मेड इन इंडिया / पुरुषोत्तम वोरकर / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / पृ. १५७ / रु. ४५ /-
प्रार्थना / फ. मुं. शिंदे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / पृ. ८७ / रु. २७-५० /-
मास्कोतील कविता / बाबुराव जगताप / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / पृ. ६० / रु. २७-५० /-
शुभ्रखंडाचे सम्राट / मालती देशपांडे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / पृ. ७९ / रु. ४० /-
नेहरू- मोतीलाल- जवाहरलाल / बलराम नंदा / अनुवाद वासंती फडके / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / पृ. ७३ / रु. ८५ /-
परिस्पर्श / बाळ केळकर / चेतना प्रकाशन मुंबई / पृ. ७२ + १२ / रु. १५ /-
अवसेचा चंद्र / सुरेश शंकर वल्लाळ / समकालीन साहीत्य, नागपूर / पृ. १३९ / रु. ४५ /-
पाच तेजस्विनी / कमला वैद्य / समकालीन साहित्य, नागपूर / पृ. ९५ / रु. ३० /-
विवर्त / प्रभा गणोरकर / पॉप्युलर प्रकाशन, मुंबई / पृ. ९२ / रु. ३० /-

अनुक्रमणिका

सहा परीक्षणे / कुंदा केळापुरे

ग्रं थि की

जॉयसी
इंदुमती नणदीकर

महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाच्या कृपेने आकारास आलेले सौ. इन्दुमती नणदीकर ह्यांचे पहिले वहिले साहित्यपुष्प म्हणजे 'जॉयसी.' साहित्य क्षेत्रात बहुचर्चित असलेला स्त्री-जीवन विषयक समस्या हाताळणारी ही कादंबरी. स्त्रीचे गुणविशेष कलात्मकतेने आणि त्याचवेळी गूढ असणारे मन उकलून दाखविण्याचा लेखिकेचा प्रयत्न नक्कीच स्तुत्य.

जॉयसी वैद्यकीय व्यवसाय करणारी डॉक्टरीण. तिच्या जीवनातील गुंतागुंत उकलून दाखविताना लेखिकाच त्या गुंत्यात अडकल्यामुळे क्वचित कथानक कंटाळवाणे भासते. तरी परंतु स्त्री जीवनाचे प्रभावी चित्रण असणारी चेतश्री प्रकाशन, अमळनेरने प्रकाशित केलेली ही कादंबरी ठीक आहे.

जॉयसी—
सौ. इंदुमती नणदीकर
प्रकाशिका—सौ. यशोदा सोनार
चेतश्री प्रकाशन, देशमुख चाळ
अमळनेर—४२५४०१
जि.—जळगाव
पृ. सं.—७६
किंमत—२० रु.

भोवरा
सुधा डोंगरे

अगम्य मनुष्य जीवनाचे अविभाज्य घटक असणारे स्त्री-पुरुष ह्यांच्या जीवनाचा विचार करू लागताच विचारवंतास पाण्यातील भोवऱ्यात अडकल्यासमान भासू लागते. स्त्री जीवनातून जाणवणारे विविध अर्थ ध्वनित करणारे अनेक कथांचे चित्रण असणारे पुस्तक 'भोवरा'.

सुधाताई डोंगरे ह्यांच्या तेरा कथांचा हा त्यांचा पहिलाच कथासंग्रह. स्त्री जीवनातील जिव्हारी भिडणाऱ्या दुःखांना वाचा फोडणाऱ्या सर्वच कथा सरस नसल्या तरी लेखिकेच्या आदर्शवादास वाचा फोडणाऱ्या आणि म्हणूनच तिच्या लेखन सामर्थ्याची चुणूक दाखविणाऱ्या निश्चितच आहेत.

कालपक्ष
सरोजिनी देशपांडे

भारताच्या इतिहासात इंदिरा गांधीच्या कार्यकाळातील लोकशाही राज्यपद्धतीस काळिमा लावणारा कालखंड म्हणून जून १९७५ ते मार्च १९७७ ह्या आणिबाणी जाहीर झालेल्या कालावधीचे स्मरण सर्वांनाच राहील. परंतु ज्याने भोगले, सोसले त्या भावनांचे तरल पण हळुवार स्पंदनांचे एकीकरण असणारे पुस्तक म्हणजे सरोजिनी देशपांडे ह्यांचे 'कालपक्ष'.

एका सामान्य समाजसेविकेने प्रामाणिक अनुभव आपल्या कालपक्ष या पुस्तकाद्वारे स्मृतिरूपी दैनंदिनीच्या स्वरूपात जनतेपुढे मांडलेले आहेत. आणिबाणीच्या काळातील सामाजिक अन्यायरूपी काळोखाचे चित्रण त्यात साकारले जात असतानाच मिसा खाली तुरुंगवास भोगणाऱ्या अनेकांच्या भावनांचे सुंदर चित्रण त्यात साधले आहे. इंदिरा कांग्रेस सरकारच्या हुकूमशाही राजनीतीस वाचा फोडतानाच देशातील विरोधी पक्षाची भूमिका व कार्यपद्धतीतील अडचणींचे स्पष्ट निवेदन यात आहे.

अभिषेक प्रकाशनने 'कालपक्ष' पुस्तकाद्वारा आणिबाणीतील ऐतिहासिक डॉक्युमेंट, प्रांजळ रोजनिशीद्वारा मराठी साहित्यातील एक श्रेष्ठ आत्मकथन अवतीर्ण केलेले आहे.

कालपक्ष—
सरोजिनी देशपांडे
प्रकाशन—अभिषेक प्रकाशन
द्वारा—डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे
३२१ शंकर नगर
नागपूर—४४००१०
पृ. सं.—२२६, किंमत—५० रु.

विश्वकर्म्यांचे विश्व
सुरेश मथुरे

विज्ञान प्रगतीसह एकविसाव्या शतकात पदार्पण करताना मानवास यंत्रयुगात वावरण्याची सवय होणे अपरिहार्य आहे. औद्योगिक प्रगतीसह मानवास पुढे पुढे नेत असताना शारीरिक, मानसिक सुखः-दु:खांनी समाज ग्रासला जातो आहे अशावेळी भविष्य काळातील मनुष्यमात्राच्या जीवनाचा वेध घेणाऱ्या कल्पित कंपनीतील विविध कथांचे एकीकरण म्हणजे 'विश्वकर्म्यांचे विश्व' हा सुरेश मथुरे ह्यांचा कथासंग्रह.

मराठी लघुकथेस आगळेवेगळे स्वरूप देण्यात ज्या नवकथाकारांचा समावेश आहे त्यात सुरेश मथुरे एक. म्हणून विश्वकर्म्यांचे विश्व या आशयाच्यादृष्टीने आगळयावेगळया कथा अखेर मनुष्य जीवनातील जाणिवांचा शोध घेणाऱ्या म्हणून सर्वच कथा वाचनीय आहेत.

लागेबांधे
बाबा भांड

'खेडयाकडे चला' असे म्हणणाऱ्या शहर-वासीयांना जरी खेडयाची विशेष ओढ नसली तरी खेडयात राहणाऱ्यांना नेहमी शहरी झग-मगाटाचे, नवीन जगाचे आकर्षण असते. अर्थात ते असणाऱ्या सर्वांनाच तशी संधी प्राप्त होतेच असे नाही. मात्र नशीबाने प्राप्त झाल्यास येणाऱ्या अडचणींवर मात करून तिचा पुरेपूर फायदा घेणारे श्री. बाबा भांड सारखे काही भाग्यवंत असतात.

१९६९ साली जागतिक युवक–युवतींच्या मेळाव्यासाठी आणि अमेरिकन स्काऊट जांबोरी-साठी श्री. बाबा भांड गेले ते ऐन सोळाव्या वर्षी. बैलगाडीतून हिंडणाऱ्या बाबांनी वैमानिक प्रवास करून केवळ शहरी नव्हे तर जागतिक पातळीवरील जनतेच्या प्रतिनिधींचा म्हणजे भिन्न भाषा, संस्कृतींचा अनुभव घेतला. त्यांनी त्या सर्व चिरस्मृती आपल्या 'लागेबांधे' या प्रवासवर्णनात संग्रहीत केलेल्या आहेत. ही जगातील विविध मित्र–मैत्रिणींच्या लागेबांध्याची कहाणी म्हणजे विविधानुभव असलेला प्रांजळ प्रवासवर्णनाचा स्मृतीपटच होय.

मराठी साहित्यातील एका उत्कृष्ट निवेदन शैलीचा प्रत्यय या पुस्तकात असल्याने ते वाचनीय नक्कीच आहे.

लागे बांधे—बाबा भांड
साकेत प्रकाशन
औरंगाबाद–४३१००१
पृ. सं.–१६१, किंमत–४५ रु.

हरदत्ताचा जिंदगी नामा
अमृता प्रीतम

खऱ्या साहित्य रसिकांना अमृता प्रीतम हे नाव आजतरी अपरिचित राहिलेले नाही. श्रेष्ठ पंजाबी कादंबरीचा आस्वाद मराठी माणसास घेता यावा म्हणून त्यांच्या हरदत्तचा जिंदगीनामा या कादं-बरीचा मराठी अनुवाद श्री. पद्माकर जोशी ह्यांनी सहजतेने पण उत्कृष्ट रीत्या सादर केलेला आहे.

हरदत्त एका हिंदू ब्राह्मणाच्या घरी जन्मलेला. तरुणपणी कम्युनिस्ट नंतर इंग्रज सरकारच्या विरुद्ध लपंडाव खेळताना मुसलमान व अखेर नाताच्या वडिलांची इच्छा त्याने ख्रिश्चन व्हावे या एका सामान्य माणसाच्या जीवनातील वैय-क्तिक, सामाजिक व राजकीय घडामोडींचे पदर हळूवारपणे उकलत जाणारी ही कादंबरी निश्चितच अतिशय प्रभावी आहे. ३० ते ४० वर्षांपूर्वीच्या काळातील एका पंधरा वर्षे बंदीवास भोगणाऱ्या हरदत्तचा आशावाद 'रात्रीच्या गर्भातून नवा सूर्य उगवणार आहे. त्याच्या प्रेमाच्या आकाशात देखील आणि समाजवादी राज्यव्यवस्थेतदेखील' फोल ठरू नये.

कादंबरीचा अनुवाद इतका नेमका, सरस व सुलभ झालेला आहे की क्षणभर हे सर्व लेखन मूळ मराठीच आहे असा भास होतो; अर्थात हीच खरी अनुवादकाची कसोटी.

हरदत्ताचा जिंदगी नामा—
अमृता प्रीतम
अनुवाद–पद्माकर जोशी
प्रकाशक–दामोदर दिनकर कुळकर्णी
श्रीविद्या प्रकाशन, २५० शनिवार, पुणे–३०
पृ. सं.–१७६ किंमत–६० रु.

अनुक्रमणिका

बाळ सीताराम मर्ढेकर

द. भि. कुळकर्णी

मर्ढेकरांना मी कधी भेटलो नव्हतो. त्यांना साधं पाहिलंही नव्हतं मी. ठरवलं असतं तर ते सहज शक्य झालं असतं, पण तसा योग नव्हता आणि मुख्य म्हणजे तेव्हा तशी कधी इच्छाही झाली नाही. मर्ढेकरांबद्दलचं आकर्षण तर तेव्हाही आता इतकंच होतं, कदाचित थोडं अधिकच असेल पण तरीही आपण मर्ढेकरांना पाहावं, त्यांच्याशी बोलावं असं तेव्हा कधी वाटलं नाही. आज मात्र अधूनमधून वाटतं की मर्ढेकर कसे होते, काळे होते की गोरे, उंच की खुजे ते सारं आपण प्रत्यक्ष पाहायला हवं होतं. तेव्हा मात्र त्यांच्या शब्दांनी आणि विचारांनी, त्यांच्या निष्ठेनी आणि नावीन्यांनी झपाटला गेलो होतो.

कुणीही झपाटून जावं असंच ते व्यक्तिमत्व होतं. श्री पु भागवत, गंगाधर गाडगीळ हे चाहते तेव्हा झपाटून गेले यात आश्चर्य नाही. प्रभाकर पाध्ये, शरच्चंद्र मुक्तिबोध हे त्यांचे विरोधकही त्यानंतर मर्ढेकरांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वानं झपाटले गेले हे विशेष ! अशा साहित्यिकाच्या शब्दाशब्दाची चिकित्सा व्हावी हे किती स्वाभाविक ! पण आश्चर्य असं की या युगप्रवर्तक साहित्यिकावर त्या मानानं फार कमी लिहिलं गेलं. मर्ढेकरांच्या सौंदर्य–विचारावर दोन तीन पुस्तके तरी आहेत, पण त्यांच्या काव्यावर ? आणि त्यांच्या चरित्रावर ? ''समग्र मर्ढेकरां''– वर तर मराठीत एकही ग्रंथ नाही.

"बाळ सीताराम मर्ढेकर" या एकशे अकरा पानी डेमी साईजच्या पुस्तकाने ही उणीव आज वरीचशी दूर केली आहे. "साहित्य अकादमी' ने हे पुस्तक प्रकाशित केले आहे त्यामुळे वाचकास ते पंधरा रुपये एवढ्या अल्प किमतीत उपलब्ध झाले आहे हे तर झालेच पण त्या पेक्षाही महत्त्वाची बाब म्हणजे मराठीतील एका नामवन्त कवीने हे पुस्तक लिहिले आहे. या कवीचे नाव आहे. डॉ. यशवन्त मनोहर. एका विद्रोही कवीने दुसऱ्या विद्रोही कवीचा केलेला हा सन्मान आहे. अर्थात या दोन्ही कवींच्या विद्रोहांची दिशा भिन्न आहे ही बाब सर्वश्रुत आहे. मर्ढेकरांचा विद्रोह वाङ्मय क्षेत्रातील कुरूपतेविरुद्ध होता तर मनोहरांचा विद्रोह समाजक्षेत्रातील कुरूपतेविरुद्ध आहे. त्यांच्या जीवननिष्ठा आणि जीवन–जाणिवा याच्यांत भिन्नता असेल पण त्यांच्या निष्ठा आणि जाणिवा यांच्या कप्तामध्ये कुठेतरी जवळीक असेल त्याविना एक कवी दुसऱ्या कवीचे चरित्र आणि वाङ्मय यावर एवढ्या पोटतिडिकेने लिहावयास प्रवृत्त होणार नाही. "केशवसुत आणि मर्ढेकर"– हा प्रा. यशवन्त मनोहर यांचा पीएच. डी. च्या प्रबंधाचा विषय होता, त्यामागेही ही पोटतिडिक होती. त्याच्याच एका पैलूचा विकास असा हा मर्ढेकरांवरील ग्रंथ. त्यातही ही वाङ्मयीन पोटतिडिक स्पष्ट जाणवते.

डॉ. मनोहरांनी सहा प्रकरणांमध्ये आपला हा ग्रंथ विभागला आहे. त्यापैकी पहिले प्रकरण "मर्ढेकरांच्या जीवनाची घडण व संस्कार" हे आहे. या प्रकरणात सर्वसामान्य अभ्यासकाला ज्ञात नसलेली अशी खूपच नवी माहिती ग्रंथकाराने सादर केली आहे. त्यात मर्ढेकरांचे पूर्वज त्यांची भावंडे, त्यांच्या दोन पत्नी इत्यादी कौटुंबिक माहितीप्रमाणेच बालकवी, माधव जूलियन यांच्या वाङ्मयीन प्रभावाचेही दिग्दर्शन ग्रंथकाराने केले आहे.

"मर्ढेकरांची कविता" हे या ग्रंथाचे दुसरे प्रकरण. डॉ. मनोहरांच्या या ग्रंथाचे स्वरूप हेतुतः परिचयपर असले तरी जागोजाग मनोहरांच्या स्वतंत्र चिंतनाचे पडसाद यात उमटलेले दिसतात; मात्र आपल्या या चिंतनाचा विस्तार त्यांना पृष्ठसंख्येच्या मर्यादेमुळे, पुरेसा करता आला नाही असे दिसते. उदाहरणार्थ, या दुसऱ्या प्रकरणात डॉ. मनोहर म्हणतात "मर्ढेकरांची ही काव्यदृष्टी एक तर अध्यात्मवादी आहे आणि कलेचे जीवन–श्रेयाशी नाते जोडीत असल्याने जीवनवादी आहे. ज्ञानेश्वरांची परतत्वनिष्ठ काव्यदृष्टी आणि चिदविलासी जीवन दृष्टी आजच्या भाषेत मर्ढेकरांनी मांडली. अभिनवगुप्ताचीही काव्य व जीवनदृष्टी अशीच आहे." अभिनवगुप्त, ज्ञानेश्वर व मर्ढेकर यांच्यासंबंधीचे आपले हे निरीक्षण ग्रंथकाराने स्वतंत्रपणे व विस्ताराने मांडावयास हवे आहे इतके ते महत्त्वाचे

आहे. मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा मराठीत किती अनवट आणि गहन आहे हे आपण सारेच जाणतो. तिसऱ्या प्रकरणात डॉ. मनोहरांनी ही मर्ढेकरी सौंदर्यमीमांसा सुबोध करून मांडली आहे. लय-सिद्धान्त, भावनानिष्ठ समतानतेचा सिद्धान्त आणि वाङ्मयीन महात्मतेचा सिद्धान्त असे तीन सिद्धान्त मर्ढेकरांनी सांगितले आहेत. त्यापैकी पहिले दोन सिद्धान्त डॉ. मनोहरांनी अचूक मांडले आहेत. तिसऱ्या सिद्धान्तातील सूक्ष्मता मात्र त्यांना शब्दांत पकडणे साधलेले नाही.

"मर्ढेकरांचे कादंबरी लेखन" या प्रकरणात "रात्रीचा दिवस", "तांबडी माती" आणि "पाणी" या मर्ढेकरांच्या तीन कादंबऱ्यांचा उद्‌बोधक परिचय लेखकाने करून दिला आहे. मर्ढेकरांचे हे कादंबरीलेखन रूढ अर्थाने यशस्वी नसले तरी त्यांतील युद्धजन्य वातावरण व संज्ञा-प्रवाहविषयक प्रयोग यामुळे ते ऐतिहासिक महत्त्वाचे ठरले आहे. या कादंबऱ्यांच्या संदर्भात डॉ. मनोहरांची काही निरीक्षणे आहेत; जसे, "रात्रीचा दिवस" ही कादंबरी आत्मचरित्रात्मक आहे. (पृ. ७९) किंवा "युद्ध आणि उद्योगिकरण यांचे दुष्ट परिणाम रेखाटण्यासाठी मर्ढेकरांनी मुळात खेडे सुंदरच गृहीत धरलेले आहे आणि आपल्या शहरी कल्पनांचा त्यावर आरोप केलेला आहे." (पृ. ८९) अथवा "आधुनिक इहवादी मूल्यांचा तिटकारा आणि जुन्या सात्विक आध्यात्मिक जीवनाची ओढ आणि त्याच्या जपणुकीची कांक्षा असा गांधीवादी दृष्टिकोण मर्ढेकरांच्या या कादंबऱ्यांतून व्यक्त होतो." (पृ. ८९) इत्यादी डॉ. मनोहरांची ही निरीक्षणे पाहिल्यावर कुणाही अभ्यासकास मर्ढेकरांच्या कादंबऱ्यांचे पुनर्वाचन करावयाची इच्छा होईल.

मर्ढेकरांनी "संगम", "कर्ण", "औक्षण" आणि "वदकाचे गुपित" अशी चार संगीतके लिहिली. ही संगीतके मर्ढेकरांनी कशी लिहिली आणि आकाशवाणी कलावंतांनी ती कशी बसविली याचे रसभरित वर्णन कृ. द. दीक्षित यांनी आपल्या "सहवास" या ग्रंथात केले आहे. या संगीतकांचा आणि "नटश्रेष्ठ" या नभोनाट्याचा परिचय डॉ. मनोहरांनी पाचव्या प्रकरणात करून दिला आहे. खरे तर संगीत या कलेबद्दलची मर्ढेकरांची सौंदर्यशास्त्रीय भूमिका, आकाशवाणी या प्रसार माध्यमाचे वैशिष्ट्य आणि नवकवी मर्ढेकरांची प्रतिभा या तीन अंगांनी मर्ढेकरांच्या या संगीतकांचा विस्ताराने विचार व्हावयास हवा आहे.

"समारोप" या सहाव्या प्रकरणात डॉ. मनोहरांनी मर्ढेकरांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचे साकल्याने मूल्यमापन केले आहे. ते म्हणतात "साहित्यात खरे तर कोलंबस कमीच असतात, मर्ढेकरांच्या सर्जनशक्तीला ठायीठायी या कोलंबस–प्रतिभेचा थक्क करून सोडणारा स्पर्श झालेला आहे." (पृ. १०४)

समकालीन साहित्याच्या अभ्यासकांना डॉ. यशवन्त मनोहरांनी एक अत्यंत उपयुक्त पुस्तक सादर केले आहे. मर्ढेकरांशी त्यांचे मतभेद आहेत, पण मर्ढेकरांचे मोठेपणही त्यांना जाणवलेले आहे. त्यातूनच हा संशोधननिष्ठ पण सुबोध, रसिकनिष्ठ पण चिकित्सक असा "बाळ सीताराम मर्ढेकर" हा त्यांचा ग्रंथ साकार झाला आहे. ग्रंथाच्या अखेरीस मर्ढेकरविषयक संदर्भ साहित्यांची सूची जोडल्याने तर त्यांच्या या प्रयत्नास अधिकच मूल्य प्राप्त झाले आहे.

डॉ. मनोहरांनी अभ्यासकाची अपेक्षापूर्ती केली आहे पण कवी मर्ढेकरांची अपेक्षापूर्ती केलेली नाही. मर्ढेकर कवी मनोहरांना म्हणतील "तुम्ही आणखी एक ग्रंथ लिहावयास हवा. त्यात तुम्ही लयसिद्धान्त, समतनतेचा सिद्धान्त, महात्मता सिद्धान्त यांचे माझ्या काव्याशी काय नाते आहे ते दाखवावयास हवे. माझ्या एकेका कवितेचे नव्हे तर कवितेतील एकेका शब्दाचे प्रसरणशीलत्व तुम्ही दाखवावयास हवे. तुम्ही कवी आहात, रसिक आहात, संशोधक आहात. तुम्हीच हे काम करू शकता. अशी निर्मिती करीत असताना मग तुम्ही माझे अवमूल्यन केले तरी चालेल. कारण त्यामुळे झालीच तर मराठी समीक्षा आणि मराठी कविता समृद्धच होईल; निदान कवी आणि समीक्षक म्हणून तुमचा फार मोठा विकास घडून येईल!"

मर्ढेकरांचे हे उद्‌गार मला तरी नक्कीच पटतील, तुम्हाला ?

■

बाळ सीताराम मर्ढेकर,
यशवन्त मनोहर,
साहित्य अकादमी,
नवी दिल्ली, १९८७,
किंमत रु. १५ /–

साहित्य : अध्यापन आणि प्रकार

म. रा. जोशी

प्रा. वा. ल. कुलकर्णी हे अर्वाचीन मराठी समीक्षाक्षेत्रातील समृद्ध सुसंपन्न व विलोभनीय व्यक्तिमत्त्व आहे. १९८६ मध्ये त्यांचा अमृत-महोत्सव साजरा झाला. त्या निमित्ताने त्यांच्या कार्याचा गौरव त्यांच्या आवडत्या विषयांवर ग्रंथ प्रसिद्ध करून करण्यात आला. तो गौरवग्रंथ 'साहित्य अध्यापन आणि प्रकार' या नावाने नुकताच प्रसिद्ध झाला असून त्यांचे संपादन प्रा. रसाळ, शिल्पा तेंडुलकर, अंजली कीर्तने, पाडगावकर व श्री. पु. भागवत यांनी केले आहे.

प्रा. वा. ल. कुलकर्णी हे मराठी वाङ्मयाच्या समीक्षेप्रमाणेच अध्ययन–अध्यापन कार्यातही आत्मीयतेने समरस् होणारे होते. शिवाय एकेकाळी त्यांनी मराठवाडा व मुंबई विद्यापीठात मराठी विभागप्रमुख म्हणूनही कार्य केले. विद्यापीठात असताना त्यांनी जसे अनेक नवोदित लेखकांना पुढे आणले तसेच मराठी भाषा व वाङ्मयाच्या अध्ययन–अध्यापनालाही भरभक्कम बैठक मिळवून दिली.

वाङ्मयीन विद्यापीठ व वाङ्मय क्षेत्रात मराठी समीक्षा व अध्ययन ह्या दोहोवरच प्रामुख्याने लक्ष केंद्रित करून वा. ल. कुलकर्णींनी समीक्षेचा नव्या अंगाने पण सर्व पैलूसह विचार सतत केला. त्यामुळे ते सर्वच क्षेत्र उजळून निघाले. अर्वाचीन मराठी साहित्य व समीक्षा विषयक त्यांची आत्मीयता लक्षात घेऊनच प्रस्तुत गौरव ग्रंथाची आखणी करण्यात आली. सर्वप्रथम त्यांचा जीवनपट नेमक्या व समर्पक रीतीने सादर करून त्यांच्या समग्र साहित्याची सूची परिशिष्टरूपाने ग्रंथाला जोडली आहे. मालाकार चिपळूणकर, वा. दा. ओक, मराठे, श्री. कृ. कोल्हटकर, न चिं. केळकर व वा. म. जोशी, खांडेकर ह्या दिग्गज साहित्यिकांनी अर्वाचीन मराठी समीक्षा नावारूपाला आणली. त्यांचेच कार्य वा. ल. कुलकर्णींनी पुढे चालविले.

याच सुमारास मराठी साहित्याचा समावेश वेगवेगळ्या विद्यापीठात होऊन मराठी साहित्याच्या अध्ययन–अध्यापनाला गती मिळाली. विशेषत: एकीकडे सतत पण विविध रूपात निर्माण होणारे मराठी साहित्य व दुसरीकडे आंग्ल भाषा वाङ्मयातील विविध विचार–प्रवाह, वाङ्मयीन परंपरा व संप्रदाय, समीक्षा व शास्त्रातील सिद्धांत ह्यामुळे अर्वाचीन मराठी समीक्षाक्षेत्र बरेच संकुल झाले होते. शिवाय सौंदर्यशास्त्राचा जबरदस्त प्रभाव मराठी समीक्षेवर दिसू लागला. यामुळे मराठी वाङ्मयीन समीक्षा क्षेत्राच्या कक्षा ज्या विस्तृत झाल्या तशाच विद्यापीठीय मराठी अभ्यासामुळे अध्यापन व समीक्षाविषयक किती तरी प्रश्न व समस्या निर्माण झाल्या. किंबहुना विद्यापीठ स्तरावरील अध्यापन एका तऱ्हेने applied criticism चा एक प्रकार संभवतो अशी भूमिका कित्येकांनी घेतली. तिचा प्रभाव प्रस्तुत ग्रंथावर जागोजागी जाणवतो. उदा. साहित्याचे अध्यापन तत्त्व व पद्धती (स. शि. भावे); ललित वाङ्मयाचे अध्यापन : उद्दिष्टे व स्वरूप (सुधीर रसाळ); साहित्य समीक्षेचे अध्यापन : (रा. भा. पाटणकर); प्राचीन मराठी वाङ्मयाचे अध्ययन व अध्यापन (गो. ग. कुलकर्णी); वाङ्मयेतिहास अध्यापनातील काही प्रश्न (गो. म. कुलकर्णी); साहित्याचा अध्यापक : क्षमता व आक्षेप (म. सु. पाटील); मराठी वाङ्मयाचे अध्यापन : विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोणातून (वसंत पाटणकर). हे सर्वच लेख उपरोक्त भूमिकेवरून लिहिण्यात आले असले तरी मराठी साहित्याचे फार थोडे दर्शन त्यामधून होते.

प्राचीन मराठी वाङ्मयात आजपर्यंत सुमारे तीनशे ब्याण्णव वाङ्मयप्रकारांचा शोध लागला असून साडे आठ हजारावर ग्रंथ रचना आहेत.

परंतु या सर्वांकड दुर्लक्ष करून अभ्यासकांचा 'आधुनिक' दृष्टिकोणच व तोही अधुरा व अंधुक तेवढा मात्र प्रत्ययास येतो. धर्मप्रधान वाङ्मयाची वरवर पाहणी आधुनिक व तेही अशास्त्रीय दृष्टीने करण्याची जी विचित्र खोड आजच्या मराठी अभ्यासकाची आहे तिचा प्रत्यय येतो. वाङ्मयेतिहास ही एक स्वतंत्र विद्याशाखा असताना त्याकडे समीक्षाप्रधान दृष्टीने पाहणे कमालीचे आक्षेपार्ह ठरते. समीक्षा म्हणजे वाङ्मयेतिहास नव्हे. वाङ्मयेतिहासांतील जटिल समस्यांची चर्चा अभिप्रेत होती. तसेच वाङ्मयेतिहास व समीक्षा यांचे नेमके नाते काय? समीक्षकांनी वाङ्मयेतिहासाबद्दल आपली धारणा सुस्पष्ट करणे आवश्यक आहे. वाङ्मयेतिहास समीक्षा व अध्यापन हे एकमेकांशी कोणत्या सूत्राने बांधले गेले आहेत याची चर्चा अभिप्रेत होती परंतु नेमक्या ह्या सर्वच प्रश्नांकडे दुर्लक्ष होऊन 'अध्यापन'विषयक अतिशय ठिसूळ भूमिकेवरून अभ्यासकांकडून लेख आमंत्रित केल्या गेले आहेत.

वास्तविक मराठी वाङ्मयाचे अध्यापन ही एक चैतन्यशील स्पंदवर्ती भाव भूमिका असते. शिक्षक, अध्यापक व विद्यार्थी हे दोन महत्त्वपूर्ण घटक असून त्यांचे परस्पराशी असलेले सामंजस्य संत परंपरेत श्रोतावक्ता संवाद रूपाने प्रगट झाले आहेत. वसंत पाटणकर, पाटील व रसाळ यांचे लेख अध्यापन दृष्टीने विचाराला चालना देणारे असले तरी या विभागातील सर्वात विवाद्य, तर्कदुष्ट व वस्तुस्थितीला हरताळ फासणारा लेख रा. भा. पाटणकरांचा आहे. कोणत्याही इंग्रजीच्या प्राध्यापकाने मराठी साहित्याच्या अध्ययनाविषयी आस्था दाखविल्यास त्यात गैर काहीच नाही. गेल्या शंभर सव्वाशे वर्षांत अनेक भारतीयांनी इंग्रजीत लेखन करून वाङ्मयनिर्मिती मोठ्या प्रमाणावर केली आहे. याचा विचार ही विद्याशाखा करते. या शाखेच्या सापेक्ष व गंभीर अभ्यासकांनी भारतीय साहित्य व भारतीयांनी निर्माण केलेल्या इंग्रजी वाङ्मयाची सम्यक् चर्चा व मीमांसा करून काही निष्कर्ष सादर केले. परंतु अँग्लो इंडियन लिटलेचर व मराठी साहित्य यांचे काही नातेसंबंध आहेत काय व असल्यास त्यामधून कोणत्या वाङ्मयीन समस्या निर्माण होऊ शकतात हे स्पष्ट करण्याऐवजी पाटणकर, महाशय पाश्चिमात्य साहित्यातील जुनेच विचार डौलाने सांगतात! विशेष म्हणजे त्यांचे भारतीय साहित्याचे अज्ञान विलक्षण प्रत्ययकारी आहे. "सतराव्या शतकात जगन्नाथाने साहित्यशास्त्रावर ग्रंथ–रचना केली. त्यात त्याने रससिद्धान्ताचा नव्याने पुरस्कार केला. त्याला अभिनव गुप्तादींची माहिती होती हे स्पष्ट दिसते; पण त्याच्या जवळपास असलेले तुलसीदासादींचे भक्तिपर काव्य त्याला माहित होते की नाही हे मात्र निश्चितपणे सांगता येत नाही." असा निष्कर्ष पाटणकर कशाच्या भरवशावर काढतात हेच कळत नाही. मराठी प्राध्यापकच नव्हे तर मराठीचा कोणताही विद्यार्थी पाटणकरांना माहिती देऊ शकला असता की तुलसीदास समकालीन असलेल्या मधुसूदन सरस्वती व रूपगोस्वामींनी संताच्या भक्तीच्या आधारे रससिद्धान्ताची नव्याने मांडणी केलेली आहे. भक्तीला पांचवा पुरुषार्थ मान्य करून रससंस्थेची मीमांसा मधुसूदन सरस्वतींनी केली परंतु त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्षच नव्हे तर त्याची यत्किंचित् दखलही न घेता साहित्यशास्त्रात बदल करायला शास्त्रीलोक राजी नव्हते असे जेव्हा पाटणकर निष्कर्ष काढतात तेव्हा ते आपल्या मर्यादित अध्ययनाच्या सर्वच त्रुटी व उणिवांचा मात्र उत्तम प्रकारे परिचय करून देतात. त्यांचा संपूर्ण लेखच मुळी अप्रस्तुत दोषांचे मूर्तिमंत उदाहरण आहे. समीक्षा परंपरेचा अभाव संत व पंडित परंपरेत होता हा पाटणकरांचा शोध पाहिल्यावर प्राचीन मराठी अभ्यासकाला जाणवेल की एवढा विनोद पु. ल. देशपांडे देखील कधी करीत नाहीत. महानुभावीयांनी लिहिलेले टीप ग्रंथ किंवा ज्ञानेश्वरीवर साहित्यपर रचना मराठीत असल्यामुळे पाटणकरांच्या वाचण्यात आल्या नसल्याची संभवनीयता कोणीही मान्य करील.

प्रस्तुत गौरवग्रंथाचा उत्तरार्ध 'साहित्य प्रकार'पर असून त्यामध्ये एकूण आठ लेख आहेत. साहित्य प्रकाराची संकल्पना (मिलिंद स.

मालशे), साहित्यप्रकार : कविता (रमेश तेंडूलकर), शोकान्तिका (विलास खोले), सुखात्मिकेचा रूपबंध (जी. एस. अमूर), कादंबरी (उषा हस्तक), कथा : एक साहित्यप्रकार (सुधा जोशी), ललित-निबंध (आनंद यादव), विनोद एक वाङ्मय प्रकार (गो. मा. पवार) हे सर्वच लेख विशिष्ट दृष्टीने लिहिलेले आहेत. विलास खोले व अमूर या दोघांनी शोकान्तिका व सुखात्मिका यांचा विशेष विचार करून आपले साक्षेपी अध्ययन सादर केले आहे. कविता, कथा, कादंबरी व ललित निबंध हे अर्वाचीन मराठी वाङ्मय प्रकार विचारार्थ घेऊन तेंडूलकर, हस्तक, सुधा जोशी, व आनंद यादव, गो. मा. पवार यांनी उपरोक्त वाङ्मयप्रकारांचे विविध पैलू दाखवून दिले. त्यांचे विवेचन अभ्यासकाला मार्गदर्शनपर व जिज्ञासूला प्रसन्नकारक ठरते. परंतु तेंडूलकर, हस्तक, जोशी यादवांचे विवेचन व मिलिंद मालशेचे विवेचन समोरासमोर ठेवले तर मिलिंद मालशेंच्या विवेचनातील धरसोड उथळपणा मराठी वाङ्मय प्रकारांची जाण नसल्याची जाणीव चटकन् लक्षात येते.

विशेषत: अर्वाचीन मराठी वाङ्मयातील सत्तेचाळीस–अठ्ठेचाळीस साहित्यप्रकाराचा सर्वंकष आढावा घेऊन त्यांचा प्राचीन मराठी वाङ्मय प्रकारांशी असलेला अनुबंध दाखवून वाङ्मय प्रकारांची समीक्षासूत्रे अभिप्रेत होती. अर्वाचीन मराठी साहित्य पाश्चात्य प्रभावित असले तरी त्याने आपले 'देश्य रूप' वारंवार दाखवून दिले आहे. परंतु त्याकडे पूर्ण दुर्लक्ष मालशे यांनी केले. विशेषत: रमेश तेंडूलकर, हस्तक, जोशी, खोले, अमूर, यादव व पवार या अभ्यासकांनी हाताळलेले प्रश्न व निवडलेले विषय एका बाजूला तर मिलिंद मालशे दुसऱ्या बाजूला असे विलक्षण दृश्य प्रस्तुत ग्रंथात दिसून येते. प्राचीन व अर्वाचीन मराठी वाङ्मयातील प्रकारांची (३९२ + ४८ = ४४०) यत्किंचितही कल्पना मालशे यांना नाही. त्यामुळे त्यांचे सर्वच विवेचन वस्तुस्थितीबाह्य आहे. विशेषत: पाटणकर, मालशे यांचे लेख निश्चितच मराठी भाषावाङ्मयाला सर्वस्वी सोडून आहेत. काव्य आणि शास्त्र प्रकारच्या दोन संहिता असतात ?

साहित्याची निर्मिती आधुनिक काळातदेखील विदग्ध–जनाप्रमाणेच पारंपारिक परिवारातही होत होती. तेव्हा एका भाषेतील वाङ्मय व त्याचे प्रकार जसेच्या तसे दुसऱ्या भाषा वाङ्मयातही अवतीर्ण होतात काय व तसे ते होत असल्यास त्या साहित्यरचनाप्रकाराचे नेमके लक्षण कोणते ? याचा ऊहापोह करूनच साहित्य प्रकाराच्या मीमांसेकडे वळता येते. उदा. केशवसुतांनी हाताळलेले सुनीत हे अर्वाचीन मराठी साहित्याचे वैशिष्टय असेल तर ते आज देखिल तेवढे प्रभावी का नाही असा प्रश्न अभ्यासकाच्या समोर उभा राहतो. एकच एक वाङ्मयप्रकार व त्याचा प्रभाव या दोहोंचा वाङ्मयीन परंपरा व संप्रदाय यांच्याशी संबंध कोणता याची चर्चा साहित्य–प्रकारांच्या मीमांसेत अभिप्रेत असते. तसेच अर्वाचीन मराठी साहित्यात नाटक व श्राव्य काव्याचे जे विविध प्रकार उदयाला आले त्या दोहोंचे परस्पर संबंध व त्यांचा एकमेकावरील प्रभाव यांची मीमासा अभिप्रेत असताना मालशे मात्र इंग्रजीमधील साहित्यप्रकाराची शालेय माहिती करून देतात. मालशे, पाटणकरांनी नसता तो प्रपंच करून स्वत: क्षीणविले आहे. या दोन विद्वानांचे लेख वगळता प्रस्तुत ग्रंथातील साहित्यचर्चा नितान्त उपयुक्त ठरते. शिवाय त्याच बरोबर रसाळ प्रभृती शिष्यांनी आपल्या गुरूचा केलेला गुरुगौरव पाहून कोणीही सुखावतो व प्रसन्न होतो यात शंका नाही. ■

साहित्य : अध्यापन आणि प्रकार
संपा–श्री. पु. भागवत, सुधीर रसाळ, मंगेश पाडगावकर, शिल्पा तेंडूलकर, अंजली कीर्तने
पॉप्युलर प्रकाशन गृह, मुंबई
पृष्ठ ३७१, किं. रु. १७०/–

य. गो. जोशी : जीवन व लेखन दर्शन
प्रज्ञा आपटे

'वहिनींच्या बांगडया', 'शेवग्याच्या शेंगा', 'सुपारी' या सारख्या प्रचलित वळणापेक्षा वेगळया कथा लिहून लघुकथेच्या क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावणारे य. गो. जोशी यांच्या बहुविध लेखनाचे विवेचन उषा दि. गोखले यांनी 'य. गो.

जोशी : जीवन आणि वाङ्मय' या ग्रंथात केले आहे. परंतु त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या, नाटके, पटकथा, आणि ज्ञानेश्वरीवरील भाष्यग्रंथ यापेक्षा त्यांच्या कथासाहित्याचाच विचार प्रस्तुत प्रबंधात प्रामुख्याने केला आहे.

त्यांचे व्यक्तिगत जीवन आणि त्याच्याशी एकरूप झालेले त्यांचे लेखन त्यांच्या लेखनामागील प्रेरणा याचा शोध घेण्याचा प्रयत्न पहिल्या दोन प्रकरणांमधून जाणवतो. त्यानंतर य. गो. जोशी यांच्या कथा वाङ्मयातील भावचित्रण व वैचारिकता याचे विश्लेषण केले आहे. महत्त्वाच्या कथांचे वाङ्मयीन समालोचन केले आहे. तसेच लेखिकेने त्यांच्या कथेतर संकीर्ण लेखनाचाही परामर्श थोडक्यात घेतला आहे. मुळात पीएच.डी. साठी सादर केलेल्या या प्रबंधाची रूपरेषा अशी आहे की त्यातून य. गो. जोशी यांच्या लेखनाचा विस्तृत परिचय होतो.

य. गों. नी लिहिलेल्या एकूण जवळ जवळ १८० कथा प्रथम विविध नियतकालिकामधून प्रसिद्ध झाल्या व नंतर 'पुनर्भेट'च्या अनेक भागांमध्ये संग्रहित झाल्या. १९३५ पर्यंत त्यांनी आपल्या एकापेक्षा एक सरस कथा लिहिल्या आणि १९६२ पर्यंत ते तुरळकपणे कथा लिहीत होते.

१९२६ साली जेव्हा 'रत्नाकर' मासिकाचा कालखंड सुरू झाला तेव्हा कथावाङ्मयाला बहर आला होता. शहरातील मध्यमवर्ग हाच यांचा प्रमुख वाचकवर्ग होता. पाश्चात्य साहित्याच्या प्रभावामुळे आणि तंत्राच्या आहारी गेल्यामुळे त्या काळच्या मराठी कथा सामान्य मराठी माणसाच्या जीवनाणासून दूर गेल्या होत्या. त्यात कॉलेजात जाणारे देखणे, तरुण व सुखवस्तू नायक नायिका यांच्या जोडघा होत्या. वाचक व कथालेखक यांच्या विचार भावनांमध्ये खूपच तफावत पडली होती. अशा वेळी 'जिव्हाळ्याच्या पालखीत बसलेली य. गों. ची कथा' लोकांना फार रुचली. 'दुधाची घागर'मध्ये एके ठिकाणी त्यांनी म्हटले आहे की, 'जगता जगताच वाङ्मयाचे हे शितोडे उडले' ते जे जगले तेच त्यांनी लिहिले आणि त्यातून त्यांच्या हृदयस्पर्शी कथा आकारास आल्या. यासंबंधीचे विवेचन लेखिकेने केले आहे.

य. गो. जोशींचे व्यक्तिगत जीवन, त्यांनी जपलेली मूल्ये आणि त्यांची लेखनविषयक भूमिका यातील अभेद लेखिकेने टिपला आहे. जोशी यांची लेखनामागची भूमिका केवळ कलावादी नव्हती 'उलट समाजचित्रण करण्यासाठी आपण लिहितो' असे त्यांनी नमूद करून ठेवले आहे. पाश्चात्यांचे वळण घोटणाऱ्या समकालीन लेखकांवर अप्रत्यक्षपणे टीका करताना 'सुरवात आणि शेवट'या कथेत त्यांनी म्हटले आहे की 'आपला समाज वाङ्मयात जितका किडला आहे तितका सत्यसृष्टीत नाही.' मात्र 'काही लेखक हाती न येणारी दुसऱ्या झाडांची फुले आपल्या समाजवृक्षावर चिकटवून दाखवतात. कदाचित प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांचे व्यक्तित्व ह्या पुस्तकी संस्कारांपासून वेगळे राहू शकले असावे त्यामुळे आदर्श व्यक्तींची चित्रे रंगवली.

'खरे सुख अंत:करणाच्या वृत्तीत सामावलेले असते, बाह्य साधनांवर ते अवलंबून नसते' हा त्यांचा दृष्टिकोण होता. यामुळे नव्याचा धिक्कार व जुन्याचा पुरस्कार करताना काही वेळा 'जग हे श्रद्धेवर चालते', 'सुरवात आणि शेवट', 'ग्यानबा, तुकाराम आणि टेक्निक' या कथांमधील पात्रांच्या तोंडी लांबलचक व्याख्याने घातली आहेत. अशा वेळी क्वचित प्रचारकी थाटामुळे कथेला मर्यादा पडल्याचे जाणवते याची फारशी नोंद लेखिकेने घेतलेली नाही. मात्र य. गों. च्या कथांमधील विलोभनीय समाजाभिमुखता त्यांनी उलगडून दाखवली आहे.

त्यांची 'समोर पाहणारी मुलगी' ही कथा आधुनिक मराठी ललित वाङ्मयात नवप्रवृत्तींचा प्रवाह आणून सोडणाऱ्या मर्ढेकर, गाडगिळांचे स्मरण करून देणारी होती. मनाचे पापुद्रे उलगडताना स्वभावचित्रणाच्या रूढ कक्षा त्यांनी ओलांडल्या होत्या. 'शेवग्याच्या शेंगा' मध्ये एकाकी पडलेल्या अल्लड बालिकेचे, 'हिचे लग्न कधी होणार ?' मध्ये प्रौढ कुमारिकेचे आणि पतीपत्नींच्या नेणिवेमधील मनोव्यापारांचे, 'वहिनींच्या बांगड्या'मधील त्यांनी केलेले मनोविश्लेषण त्या काळात नवीन होते. तेव्हा याबाबतचे त्यांचे श्रेय आता मान्य झाल्यासारखेच आहे. त्याचा पुनरुच्चार लेखिकेने केला आहे.

कथेतर वाङ्मयापैकी 'सुबोध ज्ञानेश्वरी'-मधील य. गों. चे लेखनकौशल्य लेखिकेने उकलून दाखविले आहे. परंतु त्यांची संत तुकारामांशी केलेली तुलना वरवरची व ढोबळ वाटते. तसेच 'स्त्रियांनी लिहिले म्हणून मराठी वाङ्मयाला काही नवे दृष्टिकोण मिळाले नाहीत–साहित्य सेवकांच्या संख्येत भर पडण्यापलीकडे मराठी वाङ्मयाचा काही फायदा झाला नाही' हे य. गो. जोशी यांचे विचार लेखिकेला आजही 'अभिनव' वाटतात हे वाचून सखेद आश्चर्य वाटले.

य. गो. जोशी यांचे जीवन व लेखन यांचा संपूर्ण परिचय करून घेण्याच्या दृष्टीने हा ग्रंथ महत्त्वाचे कार्य करतो आहे असे जाणवते. ■

य. गो. जोशी : जीवन आणि वाङ्मय
उषा दि. गोखले
श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार, पुणे ३०
पृष्ठे ४३४, मूल्य : १२५ रु.

गुप्तजींच्या मानसकन्यांचा परिचय

सौ. प्रज्ञा आपटे

पुरातन काळापासूनच्या भारतीय साहित्यात काही तेजस्वी स्त्रियांचा एक उज्ज्वल प्रवाह उठून दिसतो. अशा पाच तेजस्विनींची ओळख प्रस्तुत पुस्तकातून लेखिका कमल वैद्य यांनी आपणास करून दिली आहे. उर्मिला, कैकयी, मांडवी, यशोधरा आणि विष्णुप्रिया या पाच मनस्विनींनी सुप्रसिद्ध हिंदी कवी मैथिलीशरण गुप्त यांना अस्वस्थ केले होते. कारण पातिव्रत्य, तपस्या, त्याग, विद्वत्ता हे त्यांचे गुण त्यांच्या जीवनाचे साधन होते. त्यांच्या अलौकिक त्यागाचे प्रभावी चित्रण गुप्तजींनी कसे केले आहे, याचा परिचय लेखिकेने या लेखांद्वारे करून दिला आहे.

१९८७ साली या महाकवीची जन्मशताब्दी देशभर साजरी होत असताना त्या निमित्ताने मराठी भाषिकांना या थोर कवीच्या काव्याचा परिचय करून देण्याच्या हेतूने त्यांच्या या पंच-कन्या प्रसिद्ध करण्याचे त्यांनी योजिले.

इतर भाषातील उत्कृष्ट वाङ्मयकृती मराठीत आणल्यास आपले वाङ्मय समृद्ध होते, तसेच वाचकांची दृष्टी व्यापक होण्यास मदत होत असते. तेव्हा मैथिलीशरणजींच्या मूळ कृतींमधील मर्म जाणून हे लेखन घडले आहे आणि त्यातून या मानवतावादी कवीच्या मनात स्त्रियांच्याविषयी जी आत्मीयता होती तिचा प्रत्यय येतो. लेखिकेचे संवेदनशील व बहुश्रुत व्यक्तिमत्व या लेखनातून वेळोवेळी जाणवते.

लेखिकेने प्रथम मैथिलीशरण गुप्तजींचे जीवन व काव्य यांचा यथोचित परिचय करून दिला आहे. 'सुवर्णमय भूतकाळापासून प्रेरणा घेऊन आम्ही आपला भविष्यकाळ उज्ज्वल करू शकतो,' हा त्यांच्या आशावाद आणि जनजागरणासाठी 'भारत–भारती'मधून त्यांनी केलेले कार्य यासवे लेखनासाठी लोकरंजनापेक्षा लोकमंगल हा उद्देश जतन करणाऱ्या गुप्तजींचा परिचय लेखिकेने योग्य साक्षेपाने करून दिल्याचे जाणवते.

मानव–संस्कृती व विश्वधर्माचे पुरस्कर्ते असणाऱ्या गुप्तजींना आपल्या मानसकन्यांचे दुःखित, उपेक्षित मन कसे आकळले होते यावर लेखिकेने प्रकाश टाकला आहे.

लक्ष्मणाची पत्नी उर्मिला हिचा त्याग सीते-इतकाच असूनही आद्यकवी वाल्मिकी किंवा भक्तिकालातील संत तुलसीदास यांनी तिच्या चित्रणाबाबत उदासीनता दाखविली. रवींद्रनाथ टागोरांच्या नंतर गुप्तजींनी मात्र तिचे दुःख साकार करण्यासाठी 'साकेत' या आपल्या काव्यात उर्मिलेच्या भावनांना प्राधान्य दिले. रामराज्याभिषेकाच्या आदल्या दिवसापर्यंत उपेसारखी प्रसन्न असणारी उर्मिला दैवगतीच्या आवर्तात सापडते. 'हे मन! तू प्रियके पथका विघ्न न बन' ही तिची भावना व मूक वेदना कवीने कुशलतेने टिपली आहे. दुःखाने तिचे कित्येकदा देहभान हरपते पण काळाचे आणि कर्तव्याचे भान कधी हरपत नाही. युद्धक्षेत्रात लक्ष्मणाला शक्तिबाण लागल्याचे वृत्त अयोध्येतील लोकांना

हतबल करते तेव्हा उर्मिला मात्र त्याच्या मदती-स्तव लंकेला जाण्याची तयारी दर्शवते. हे तिचे मनोधैर्य, तिचे तेजस्वी स्वरूप ग्रंथात जतन करण्याचे औचित्य गुप्तजींनी दाखवले आहे.

याचप्रमाणे 'साकेत' मधील पश्चात्तापदग्ध कैकयी स्मरणीय उतरली आहे याचा प्रत्यय "सौ बार धन्य वह एक लाल की माई" या लेखातून येतो. राजवाड्यात राहूनही वनवास भोगणारी भरताची पत्नी मांडवी हिचा त्याग गुप्तजींना महत्त्वाचा वाटला आणि तिच्या मनची व्यथा त्यांनी समर्थपणे शब्दांकित केली.

रामायणातील या तीन तेजस्विनींप्रमाणेच गौतम बुद्धाची पत्नी यशोधरा हिचे मौन त्यांना आकर्षित करून गेले. 'मानवाच्या कल्याणासाठी सर्वसंगपरित्याग करणारे पती आपणास सामान्य स्त्री समजले आणि म्हणून आपल्याला न विचारता गेले.' हीच तिची खरी व्यथा आहे. 'गोपा–बिना गौतम भी ग्राह्य नहीं मुझको' हे शुद्धोदनाचे उद्‌गार यशोधरेचे असामान्यत्व सांगण्यास पुरेसे आहेत.

बंगाल देशातील सुविख्यात वैष्णवभक्त चैतन्य महाप्रभू यांची परित्यक्त पत्नी ही देखील पतीने घेतलेल्या वैराग्यात होरपळून निघाली. तिच्या सोशिकतेचे आणि तिला सैरभैर करणाऱ्या प्रश्नांचे हृदयंगम चित्रण कवीने केले आहे. राजमान्य कुलीन पंडिताची ही रूपगुणमंडित कन्या जेव्हा गृहप्रवेश करते तेव्हाच उंबरठयाची ठोकर लागून तिच्या पायाच्या अंगठयातून रक्त वाहू लागते. भावी दुर्दैवाची ही सूचना जणू तिला मिळते. तसेच तिचे अनेक प्रश्न अनुत्तरित राहतात.

"पुरुषाने घर सोडले तर तो योगी समजला जातो. मागे राहिलेली त्याची पत्नी भोगविलासांचा त्याग करते. विफल जीवन आणि असफल प्रेम यामुळे चिरदाह व अपमान याशिवाय कसचा लाभ तिला होतो ?" हा प्रश्न केवळ गुप्तजींच्या काव्या-तील विष्णुप्रियेलाच नव्हे तर या व अशा अनेक पतिव्रतांना व्यथित करणारा प्रश्न आहे. अशा या तेजस्विनी व त्यांना न्याय देणारे महाकवी गुप्तजी यांचा परिचय करून देण्याचे महत्त्वाचे कार्य कमल वैद्य यांनी समर्पकपणे केल्याचे जाणवते. ■

पाच तेजस्विनी : कमल वैद्य
समकालीन साहित्य
'श्री फ्लॅटस्' एफ्–९
लक्ष्मीनगर, नागपूर
पृष्ठ ९५ – मूल्य ३० रु.

स्मरणांची कारंजी : मनोहरांचा वेगळा आविष्कार

प्रमोद मुनघाटे

'स्मरणांची कारंजी' हे डॉ. यशवंत मनोहर यांचे नवे पुस्तक. यशवंत मनोहर हे गेल्या दशका-तील विद्रोही परंपरेतील एक प्रातिनिधिक कवी आहेत. 'उत्थानगुंफा' हा त्यांचा कवितासंग्रह १९७७ साली प्रसिद्ध झाला. या संग्रहामुळेच त्यांचे कवी म्हणून स्थान निर्माण झाले. विद्रोही जाणिवेचा आविष्कार केवळ आक्रोशी, काव्यशून्य भाषेतून न करता मार्मिक, उपरोधिक, अनेक-संदर्भी प्रतिमांच्या सहाय्याने, अधिक अर्थवत्ता प्रसविणाऱ्या शब्दांनी त्यांनी आपल्या कवितेतून केला, हे त्यांचे मराठी विद्रोही कवितेतील वैशिष्टच आहे.

वाङ्मयातील सर्वच वाङ्मयप्रकारांची परिमाणे जाणीवांच्या पृथकतेमुळे कशी बदलत जातात याचे प्रत्यंतर मनोहरांच्या 'स्मरणांची कारंजी' या नव्या पुस्तकात येते. 'स्मरणांची कारंजी' हे रूढ अर्थाने प्रवासवर्णन. मनोहरांच्या मते ते केवळ सतपशील प्रवासवर्णन नव्हे तर 'विहंगमभ्रमण' होय. साहित्य अकादमीने १९८५ साली मनो-हरांना दक्षिणभारताच्या प्रवासासाठी अनुदान दिले होते. त्या प्रवासाच्या चिंतनपर–नोंदी म्हणजे प्रस्तुत पुस्तक.

प्रवासात पाहिलेली स्थळं, वेगवेगळ्या व्यक्ती, विद्यापीठं, मंदिरे यांच्या निमित्ताने त्यांनी जे चिंतन केलं ते पत्ररूपाने या पुस्तकात साकार केलें आहेत. मनोहरांच्या संवेदनशील काव्यात्म ललित

चिंतनात तर्ककठोर बुद्धिवादाचे कंगोरे जाणवतात. अर्थात हे कंगोरे सुललित, रम्य शब्दशैलीने झाकलेली आहेत. विद्रोही, नास्तिक मनोहर आणि कवी मनोहर या त्यांच्या व्यक्तिमत्वातील संयोगामुळे असे झाले असावे असे मला वाटते.

समिधा आणि मॅक्झिम या दोन पात्रांना उद्देशून लिहिलेल्या पत्रांचे येथे संकलन आहे. व्यक्तिगत नोंदी फार नाहीत. एखाद्या पत्रात लेखक आवश्यकतेपेक्षा भावनाविवश होताना दिसतो आणि असे झाल्यामुळे आवश्यकतेपेक्षा जास्त शब्दांची कारंजी उडविण्याची उर्मी लेखकाला रोखता आली नाही हे जाणवते. हे सर्व वाचवताना एकीकडे मनोहरांची विद्रोही जीवननिष्ठा सदैव जागी असलेली दिसते तर दुसरीकडे त्याच वेळी नखरेल–रम्यशब्दनिर्मितीची पारंपारिक (प्रतिविद्रोही ?) हौस दिसते. या विरोधाभासामुळे त्यांची शैली कुठे कुठे कृत्रिम वाटते.

गोवळकोंड्याचा किल्ला आणि, दक्षिणेतील मंदिरे पाहून मनोहरांचे बुद्धिवादी मन अनेक प्रश्न निर्माण करते. परंतु मनोहरांचे सर्वच प्रश्न विवेकी वाटत नाहीत. विर्ला मंदिराचे भांडवलशाहीचे प्रतीक असलेले वैभव आणि त्याभोवती घिरटचा घालणारी अंधश्रद्ध लोकांची मानसिकरीत्या गुलाम असलेली प्रवृत्ती यांचे अगदी योग्य वर्णन मनोहरांनी केले आहे. पण त्यांनी गोवळकोंडयाच्या किल्ल्याविषयी निर्माण केलेले प्रश्न काहीसे एकांगी वाटतात. त्यांची मार्क्सवादी किंवा पुरोगामी भूमिका मान्य करूनही एकूण मानवी समुहाच्या इतिहासातील सामाजिक उत्क्रांतीची टप्प्याटप्प्याने झालेली प्रक्रिया आपण नाकारू शकत नाही. आजच्या परिस्थितीत किल्ल्यांची इष्टानिष्टता पडताळून पाहणे इष्ट वाटत नाही.

या प्रवासाच्या निमित्ताने मनोहरांनी अनेक विद्यापीठांना व साहित्यिक संस्थांना भेटी दिल्या. दक्षिणेतील विद्रोही परंपरेतील साहित्यिकांच्या चर्चेच्या निमित्ताने तेथील विद्रोही साहित्याचाही त्यांनी आढावा घेतला आहे.

या पुस्तकात कुठेकुठे मनोहरांची शैली मात्र मार्मिक विनोदाने नटली आहे. त्यांचे शैलीचे सौंदर्य जसे निव्वळ सौंदर्यवाहक नाही तसेच त्यांचा विनोद सुद्धा निखळ विनोद नाही. हसता हसता त्यातील उपरोधामुळे वाचक वाचतांना अंतर्मुख होतो. एकूणच मनोहरांचे 'स्मरणांची कारंजी' हे पुस्तक त्याचे बुद्धिवादी मन व संवेदनशील मन यांची आगळीवेगळी बंदीश साधणारे, नव्या भूमिकेतून ललितचिंतनाच्या स्वरूपात लिहिलेले प्रवासवर्णन म्हणून लक्षणीय आहे.

■

(आकाशवाणी नागपूरच्या सौजन्याने)

प्रमोद मुनघाटे
स्नातकोत्तर मराठी विभाग
नागपूर विद्यापीठ परिसर
अमरावती मार्ग, नागपूर १०

प्रिय जी. ए.

स. त्र्यं. कुल्ली

प्रिय जी. ए. ! अखेर तुमची भेट झालीच नाही. तीन वेळा कोथरूडला तुमच्या घरी येऊनही तुम्ही भेटण्याचे नाकारले. मला तेव्हा तुमचा रागही आला होता. पण नंतर विचार केल्यावर वाटले होते की, असे व्रतस्थ एकाकीपण हे तर तुमचे वैशिष्टच आहे. तात्कालिक आणि सवंग प्रसिद्धीचा मोह टाळून तुम्ही अत्यंत गंभीर आणि चिंतनशील वृत्तीने जीवनशोध घेत राहिलात आणि झपाटलेल्या उत्कट मनोवृत्तीने वाङ्मयनिर्मिती करीत राहिलात.

तुमच्या कथा कोणत्या सदरात टाकाव्या म्हणून विचार करतो. महाराष्ट्र–कर्नाटकाच्या सीमेवर तुमचे दीर्घकाळ वास्तव्य होते; तुमच्या अनेक कथा या प्रदेशातील खेड्यात घडतात, पण प्रादेशिकतेचे रंगरूप असून त्यांना ग्रामीण किंवा प्रादेशिक कथा म्हणता येत नाही. तुमच्या कथेतील पात्रे मांगगारुडी जमातीमधील, भटक्या जातीतील, आदिवासी टोळयांमधील आहेत, असे असूनही त्यांना दलित–आदिवासी कथा म्हणता येत नाही. सुरस अरबी गोष्टी शोभाव्यात अशा मध्ययुगीन जीवनावरील चमत्कृतीपूर्ण कथा लिहूनही त्यांना अद्‌भुतरम्य कथा म्हणता येत नाही. मराठी कथा परंपरेतील सर्व घटक आत्मसात करूनही तुम्ही पारंपारिक कथाकार ठरत नाहीत.

खरी गोष्ट अशी आहे की, मराठी कथाकार जिथे थांबतात तिथून तुमची कथा सुरू होते ! भौतिक जीवनाचे रंगरूप, व्यावहारिक पातळीवरील ताण–तणाव, आर्थिक–सामाजिक–राजकीय व्यवस्थेने जीवनाला दिलेला आकार आणि निर्माण केलेले प्रश्न, ह्या समस्या सोडविण्याचे विविध विचारप्रणालींच्या आधारे मांडलेले उपाय मराठी कथेने अत्यंत कलात्मक सामर्थ्याने व्यक्त केले यात शंका नाही. तात्पर्य, मराठी कथा पार्थिवतेत रमून गेली होती.

तुम्ही मात्र प्रश्न विचारण्यासाठी लेखणी उचलली ती थेट आकाशस्थ शक्तींनाच ! म्हणून तुमची कथा ही भाष्यकथा, जाणिवेची कथा, मिथ्यकथा झाली. आकाशाचा डोळा उघडून विश्वकेन्द्री नजरेने तुम्ही मानवाकडे पाहता. तुमची दृष्टी केवळ पृथ्वीकेंद्रित किंवा मानवकेंद्रित नसते, ती विश्वकेंद्री असते. मनुष्याच्या सुखदु:खाचा, आयुष्यातील घटनांचा अन्वयार्थ तुम्ही तार्किक पद्धतीने न लावता तात्त्विक आणि भावात्मक पद्धतीने लावता. अतिभौतिकीय पातळीवरून मानवी जीवनाकडे पाहता. या मेटॅफिजीकल दृष्टिकोणामुळे तुमची कथा पार्थिवातून वर उचलल्या जाते. ती गूढ आणि अमूर्त बनते. तात्कालिकाच्या व संकुचिततेच्या मर्यादातून सुटून ती सार्वत्रिक, सार्वकालिक बनते. सर्व पात्रे, प्रसंग यांचे मोहरे अंतिम अर्थाकडे वळलेले असल्याने आणि चिरंतनाचा ध्यास घेतला असल्याने तुमची कथा गंभीर, अनेक संदर्भसूचक आणि वजनदार बनते.

या अतिभौतिकीय पातळीवरून तुम्ही जीवनातील मूलभूत प्रश्नांचा शोध घेता. सत्ताशास्त्रीय (Epistemological) प्रश्न उपस्थित करता. उदा. विश्वातील अंतिम सत्य कोणते ? हा विराट पसारा कोणत्या खेळियाने मांडला आहे ? माणसाचे विश्वात स्थान कोणते ? त्याचे सृष्टीशी आणि स्वत:शी नाते कोणते ? ज्ञान म्हणजे काय ? मानवी अस्तित्व आहे तरी काय ? ते अर्थपूर्ण

अनुक्रमणिका

आहे की निरर्थक ? माणूस का जन्माला येतो, त्याचा जीवित हेतू कोणता ? जन्म, मृत्यू, वासना, नियती, मानवी प्रेरणा, मानवी ध्येय अशा नाना प्रश्नांनी तुम्ही झपाटलेले आहात. जीवनाच्या अंतिम अर्थाच्या शोधाची दुसरी नस पकडण्याचा तुम्ही प्रयत्न केला. कथामाध्यमातून जीवनविषयक मूलभूत प्रश्नांचा शोध तुम्ही अत्युच्च दर्जाच्या कलात्मक सामर्थ्याने घेतला. म्हणून तत्त्वज्ञ आणि कलावंत यांचा संगम तुमच्या वाङ्मयीन व्यक्तित्वात आढळतो.

अतिभौतिकीय पातळी, सत्ताशास्त्रीय प्रश्नांची मांडणी आणि स्वतंत्र जीवनदृष्टी यामुळे तुमच्या कथेला महाकाव्याची वैचारिक श्रीमंती, ग्रीक शिल्पाची व इजिप्शीयन पिरॅमीडची भव्यता आणि शोकांतिकेच्या नायकाची करुणोदात्तता प्राप्त झाली.

तुमची ही स्वतंत्र जीवनदृष्टी कोणती ? तुम्ही नियतीवादी आहात, अस्तित्ववादी आहात, एकाच जीवनविषयक तत्त्वज्ञानाच्या भोवऱ्यात अडकलेले आहात असे समीक्षकांनी सांगितले. मला तत्त्वज्ञानातले फारसे कळत नाही. परंतु शून्यवादाकडे झुकलेला मायावाद आणि अस्तित्ववादी मानवतावाद असे संमिश्रण तुमच्या जीवनदृष्टीत मला जाणवले. शून्यवादातील 'सर्व क्षणिकम्' व 'सर्व दुःखम्' ही तत्त्वे तुमच्या कथांत दिसतात. पण अनित्यता दिसत नाही. कारण नियतीचे सातत्य तुम्ही मानता. मायावादातील पूर्वनियोजितता, पुनर्जन्म, मायेने मांडलेला जीवनाचा पसारा ह्या गोष्टी दिसतात. पण मायेचे अधिष्ठान असलेले आणि जीवनाला अर्थ देणारे ब्रह्म तुम्ही मानताना दिसत नाही. काजळमाया, रमलखुणा, पिंगळावेळ व सांजशकुन या उत्तरार्धातील कथा संग्रहामध्ये नागार्जुनाच्या शून्यवादाचे व वेदांती तत्त्ववेत्त्यांच्या मायावादाचे वरील घटक दिसतात. म्हणजे उत्तरार्धात तुमच्यावर पौर्वात्य तत्त्ववेत्यांची छाया दिसते. पण निळासावळा, पारवा, हिरवे रावे, रक्तचंदन या पूर्वार्धातील कथासंग्रहावर पाश्चात्यांच्या अस्तित्ववादाची छाया दिसते. कारण इथे तुम्ही मानवी अस्तित्व आद्य आणि केंद्रस्थानी मानून तात्त्विक प्रश्नांचा व जीवनमूल्यांचा विचार नतर करता. सर्व बाह्य गोष्टींचे शेवाळ बाजूला सारून जगण्याच्या तळाशी काय आहे ते बघता. माणसाच्या नैसर्गिक आदिम प्रेरणा त्याच्या मूलभूत भावना–वासना यांचा शोध घेता. पण तुम्ही मानवद्वेष्टे, सिनिक होत नाही ही गोष्ट मला अत्यंत नवलाची आणि मोलाची वाटते. सिनिकतेच्या कडयावरून कोसळताना तुम्हाला तुमच्यातील मानवतावादाने सावरले आहे असे दिसते.

प्रिय जी. ए. दुःखाची सहस्र रूपे तुम्ही दाखवता. मृत्यूची अटळता आणि जीवनाची क्षणभंगूरता व्यक्त करता. माणसाला प्रिय असणाऱ्या वासना रूप सौंदर्य, नातीगोती यातील वैय्यर्थ दाखवता. आम्हाला ज्या बुद्धीचा व मानवी कर्तृत्वाचा अहंकार असतो, ज्या ध्येयाचा ध्यास असतो त्या सर्वांच्या मर्यादा आणि त्यांची अप्राप्यता सिद्ध करता. आणि असे असूनही या मानवी जीवनाकडे तुम्ही करुणार्द्र नजरेने पाहता. मानवाच्या जखमांवरून मायेने हात फिरवता. (मला तर तुमच्या कथा वाचताना मानवाचे दुःख पाहून तुम्हाला येणारे हुंदके ऐकू येतात.) विश्वाच्या विराट पोकळीतही तुम्हाला निरपेक्ष प्रेम, आतडयाची माया, माणसाचे निर्णय, स्वातंत्र्य आणि त्याची केविलवाणी धडपड महत्त्वाची वाटते. शून्याच्या आधी येणाऱ्या अर्थाच्या आकडयाचा शोध हे तुमच्या कथांचे मुख्य सूत्र आहे. तुमचा मानवतावाद ही हताश, अगतिक मानवता असेल. कारण त्यात प्रेरकता नाही. पण उत्कटता आहे. त्यात दुर्दम्य विजीगिषा नसेल पण जीवनसत्य कळल्यानंतर आणि खूप दुःख पचवल्यानंतर येणारी शांतता आहे.

तुमच्या जीवन जाणिवेचे महावस्त्र आदिम, आर्ष, मध्ययुगीन आणि आधुनिक जाणीव यांच्या उभ्या आडव्या धाग्यांच्या ताण्यावाण्यांनी सिद्ध झाले आहे. आदिम जाणिवेमुळे भावनांचे मत्त तांडव, प्रमाथी वासना, जखमी संवेदनशीलता ह्यांचे दर्शन तुमच्या कथांमध्ये घडते. आर्ष जाणिवेमुळे विदग्धता, अभिजात सौंदर्यदृष्टी, मानवी संस्कृतीचे संचित यांची परिमाणे तुमच्या कथेला प्राप्त होतात. मध्ययुगीन जाणिवेमुळे रम्याद्भुतता, रहस्यमयता, रोमांचकता व नाटयपूर्णता ह्या घटकांनी

तुमची कथा संपन्न होते. तर आधुनिक जीवन जाणिवेमुळे व्यामिश्रता, अद्यावतता, प्रयोगशीलता आणि वैचारिकता यांचे पैलू पडून ती अधिकच प्रकाशमान होते.

इतिहास आणि विविध प्राचीन संस्कृतींच्या व्यासंगामुळे तुमच्या जीवनदृष्टीचा प्रकाशस्रोत भूत–वर्तमान–भविष्य यांच्या क्षितिजांवरून एकाचवेळी फिरतो. इतिहासाचे चढ उतार, संस्कृतींचे उत्कर्ष आणि ऱ्हास अभ्यासिल्यामुळे तुमच्या जीवनदृष्टीचा प्रवाह संथ, विस्तीर्ण बनला आहे.

तुमच्या कथेवर तुमची अशी नाममुद्रा आहे. तुमची प्रत्येक कथा मंत्रभारली आहे. त्यातील शब्दांवर जणू 'फुंका' पडलेला आहे. त्यातील साध्या पात्रांनाही अतिमानुषतेचा स्पर्श झालेला आहे.

तुमची कथा वाचून मी प्रत्येक वेळी अस्वस्थ झालो आहे. मला आश्चर्य वाटायचे की, बहुतेक बाबतीत विरोध असूनही तुमची कथा इतकी का आवडते ? माझा जीव पार्थिवात गुंतलेला, तुम्हाला अपार्थिवाचा ध्यास, अज्ञाताची ओढ. मानवी दुःखाची मुळे तुम्ही आकाशात शोधता, मी सामाजिक–आर्थिक व्यवस्थेत शोधतो. असे दोन ध्रुवावर दोघे आपण !

नंतर मी विचार करतो की समजा शोषणमुक्त, सुखी समाजाची निर्मिती झाली आणि पशूपातळीवरील अभावग्रस्त जीवनाची माणसाची दुःखे संपली, तरी मानवाची म्हणून जी दुःखे असतात ती तर राहतीलच ना ? खरे म्हणजे या अवस्थेत त्याला श्रेष्ठ दुःखाला, महान प्रश्नांना सामोरे जावे लागेल. या नव्या समाजातील माणसाला प्रतिविश्व (अँटी युनिव्हर्स) आणि कृष्ण विवर (ब्लॅक होल) या वैज्ञानिक शोधांनी भौतिकावरोबर अतिभौतीकीय प्रश्नांचा विचार करावा लागेल. खुद्द जीवनानेच उपस्थित केलेल्या प्रश्नांचे, सत्ताशास्त्रीय समस्यांचे निराकरण करावे लागेल. वैश्विक प्रश्नांचा अंतिम जीवनार्थाचा शोध घेण्यासाठी विज्ञानाच्या पायावर नवे अध्यात्म उभे करावे लागेल. विश्वाची विराटता आणि मानवाची सांतता ध्यानी घेऊन नम्रतेने विश्वाच्या रहस्यपूर्ण काळोखाचा वेध घ्यावा लागेल. आम्ही पुरोगामी लोक जीवनाच्या ऐल तीरावरील पाखरांचा शोध घेत असतो. तुम्ही मात्र जी. ए. त्या अज्ञात–गूढ पैल पाखरांचा व्याकुळ मनाने शोध घेतला, म्हणून तुम्ही मला प्रिय आहात.

प्रिय जी. ए. तुमची कथा मराठी कथाशिखरांमधील गौरीशंकर आहे. तुमच्यामुळे मराठी भाषेच्या वैभवात भर पडली आहे. तुमच्या कथेमुळे मराठीला भारतीय साहित्यातील प्रेमचंद, शरदबाबू यांच्या रांगेत मानाचे पान मिळाले आहे.

अखंड जीवनशोध घेणाऱ्या हे यात्रिका ! मानवी अस्तित्वाची अंधारवाट तू धैर्याने तुडवलीस. जाणिवेच्या पातळीवर आम्हा मानवांच्या सर्व यातना तू भोगल्या. आपल्या कथांनी वेदनेचे महाकाव्य निर्मिणाऱ्या, दुःखोपनिषद रचणाऱ्या हे तापसा, तुला माझा भावपूर्ण प्रणाम !

■

क्षितिज
जिजामाता नगर
बुलढाणा– ४४३००१

(ऑक्टोबर ते डिसेंबर ८७ या काळात घडलेल्या साहित्यिक घडामोडींची नोंद).

ऑक्टोबर – 'गोंडवन पेटले आहे' या कवी विनायक तुमराम यांच्या कवितासंग्रहाचे प्रकाशन मूल येथे श्री. वि. तु. नागपुरे यांच्या हस्ते.

□ □

नोव्हेंबर– वि. सा. संघात ५ रोजी रंगभूमी दिन साजरा करण्यात आला. रंगभूमीवरील ज्येष्ठ कलावंत श्री. नाना रेटर आणि श्री. केशवराव साळुंके यांचा याप्रसंगी अभिनेते–कलावंत चंद्रकांत मांडरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

□ □

प्रसिद्ध नाट्यकलावंत व दिग्दर्शक प्रा. भालबा केळकर यांचे पुणे येथे ६ रोजी निधन झाले.

□ □

ज्येष्ठ साहित्यिक श्री. विश्राम बेडेकर यांना राम गणेश गडकरी पुरस्कार बहाल करण्यात आला.

□ □

१४ रोजी १९८६ च्या संगीत नाटक अकादमी पारितोषिकविजेत्यांची नावे घोषित करण्यात आली. वि. वा. शिरवाडकर, शोभा गुर्टू, सुलभा देशपांडे, राम मराठे, पं. जसराज यांना हे पारितोषिक मिळाले.

□ □

१४ व १५ तारखांना अकोला येथे स्वातंत्र्यवीर सावरकर साहित्य संमेलन साजरे झाले. नांदेडचे प्रा. सुधाकर देशपांडे हे या संमेलनाचे अध्यक्ष होते.

□ □

१६ रोजी अ. भा. मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदी श्री. श्री. पु. भागवत यांची निवड करण्यात आली.

□ □

चित्रकार–अभिनेते श्री. चंद्रकांत मांडरे यांचा सत्कार वि. सा. संघातर्फे याच महिन्याच्या सुरुवातीला घेण्यात आला. संघाध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर अध्यक्षस्थानी होते. चंद्रकांत यांच्या चित्रांचे प्रदर्शनही तीन दिवस साहित्य संघात भरविण्यात आले होते.

□ □

डिसेंबर– ख्यातनाम नाटककार वसंत कानेटकरयांची ६१ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून अधिकृतपणे निवड घोषित करण्यात आली.

□ □

५ रोजी कादंबरीकार श्री. ना. पेंडसे यांना ग. दि. माडगूळकर पुरस्कार बहाल करण्यात आला.

□ □

१० रोजी नागपूर येथे सुरेश द्वादशीवार यांच्या 'अलकनंदा' या कादंबरीचे प्रकाशन साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेन्द्र बारलिंगे यांच्या हस्ते झाले.

□ □

११ रोजी प्रख्यात कथाकार जी. ए. कुळकर्णी यांचे पुणे येथे निधन झाले.

□ □

'श्री विठ्ठल : एक महासमन्वय' या रा. चिं. ढेरे यांच्या ग्रंथाला साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला.

□ □

२५ ते २७ डिसेंबरपर्यंत इंदोर येथे अ. भा. मराठी नाट्यसंमेलन श्री. चित्तरंजन कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. ■

संकलन :
सुनील शिनखेडे

वर्तमान
वर्तमान
वर्तमान
वर्तमान
वर्तमान
वर्तमान
वर्तमान

केन्द्रीय कार्यवृत्त / दि. १ ऑक्टो. ते ३१ डिसेंबर १९८७

दि. ७ ऑक्टो. : चेतना प्रकाशन, गोरेगाव, मुंबई व वि. सा. संघ यांच्या संयुक्त विद्यमाने "परिस स्पर्श" या श्री. बाळ केळकर यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. अध्यक्षस्थानी प्रा. राम शेवाळकर होते.

दि. ८ ऑक्टो. : वि. सा. संघ आयोजित कै. इंदिरा खरे आंतर शालेय वक्तृत्व स्पर्धा अणे दालनात घेण्यात आल्या. या स्पर्धेचे विषय–१. कसोटी सामन्यातून सुनील गावस्करची निवृत्ती, २. रामायण ३. दूरदर्शन आणि आमचा अभ्यास–असे होते.

स्पर्धेचे वैशिष्टय असे की यंदा प्रथमच या स्पर्धेत दोन अंध विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. परीक्षक होते प्रा. डॉ. विजया जोशी व सौ. शुभांगी संत. बक्षीस वितरण डॉ. विजया जोशी ह्यांचे हस्ते झाले.

या कार्यक्रमाच्या संयोजिका सौ. कुंदा केळापुरे या होत्या. त्यांनी शेवटी आभार प्रदर्शन केले.

दि. ८ ऑक्टो. : वि. सा. संघ व प्रबुद्ध विचार संसद यांच्या संयुक्त विद्यमाने "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार व सद्यः परिस्थिती" या विषयावर एक परिसंवाद आयोजित करण्यात आला. डॉ. खांदेवाले व प्रा. मधुकर डांगोरे यांनी या प्रसंगी आपले विचार मांडले.

दि. १० ऑ. : कविवर्य उ. रा. गिरी काव्य संशोधन संस्था, नागपूर यांनी वि. सा. संघाच्या सहकार्याने कै. उ. रा. गिरी यांची जयंती साजरी केली. अध्यक्ष श्री. वामन तेलंग, प्रमुख वक्त्या डॉ. आशा सावदेकर.

दि. १२ ऑक्टो. : लोहिया अध्ययन केन्द्रातर्फे व वि. सा. संघाच्या सहकार्याने प्रखर समाजवादी चिंतक डॉ. राम मनोहर लोहिया यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्रा. डॉ. ना. य. डोळे, उद्‌गीर, मराठवाडा यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी डॉ. भाऊ लोखंडे हे होते, कार्यक्रमाचे संचालच हरीष अडद्याळकर यांनी केले.

दि. १७ ऑक्टो. : दलित रंगभूमी व वि. सा. संघ यांच्या संयुक्त विद्यमाने "कॉमरेड जोशी" नाटकाचा उद्‌घाटन समारंभ साजरा झाला.

दि. २ नोव्हे. : मराठी चित्रपट सृष्टीतील नामवंत कलाकार व सुप्रसिद्ध निसर्ग चित्रकार श्री. चंद्रकांत मांढरे यांचा सत्कार वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर यांचे हस्ते झाला. पुढील ३ दिवस त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन भरले होते व ते सर्वांकरिता विनाशुल्क उघडे होते.

दि. ५ नोव्हे. : रंगभूमि दिनाचा मुहूर्त साधून कै. वि. रा. हंबर्डे ह्या जुन्या पिढीतील नाटककाराच्या स्मृतिप्रीत्यर्थ नाटय क्षेत्रात आपापल्या कलागुणांनी लौकिक प्राप्त कलावंत नाटयकार, नकलाकार श्री. नाना रेटर व नेपथ्यकार. श्री. शंकरराव मगरकर व नट श्री. केशवराव साळुंके यांचा जाहीर सत्कार प्रा. राम शेवाळकर यांचे हस्ते करण्यात आला.

दि. ७ व ८ नोव्हे. विदर्भ साहित्य संघाच्या दुसरबीड या शाखेतर्फे बुलढाणा जिल्ह्याचे साहित्य संमेलन प्रा. राम डोके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. वि. सा. संघाच्या केंद्रीय शाखेतर्फे अध्यक्ष राम शेवाळकर, उपाध्यक्ष श्री. वामन तेलंग, चिटणीस ह. गो. उपाख्य नानासाहेब पिंपळगावकर व श्री. योगेश वऱ्हाणपुरे हे प्रामुख्याने हजर होते.

दि. २६ नोव्हे. : तरुण भारताचे मुख्य संपादक श्री. दि. भा. उपाख्य मामासाहेब घुमरे यांचा नागपूरातील विविध संस्थांतर्फे सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभ प्रसंगी वि. सा. संघाचे सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी त्यांना पुष्पहार घालून त्यांचा सत्कार केला. याच प्रसंगी वि. सा. चे अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर यांचे मामासाहेब घुमरे यांच्या गौरवपर भाषण झाले.

दि. ५ डिसें. वि. सा. संघ व कौस्तुभ प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने "शरश्चंद्र कथामाला" या सौ. शुभांगी संत यांच्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ साजरा झाला. दै. तरुण भारताचे संपादक श्री. लक्ष्मणराव जोशी हे या कार्यक्रमाचे अध्यक्ष व शिक्षण–तज्ज्ञ डॉ. म. वा. कुंडले हे प्रमुख वक्ते होते.

दि. ७ डिसें. : पुरोगामी विचारवाहिनी व वि. सा. संघ यांच्या संयुक्त विद्यमाने रावसाहेब कसबे यांचे "दलित चळवळ व डावी चळवळ : आजची स्थिती" या विषयावर भाषण झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. श्रीनिवास खांदेवाले होते. प्रास्ताविक श्री. ताराचंद्र खांडेकर यांनी केले.

दि. २८, २९, ३०, व ३१ डिसें. : दक्षिण–मध्य क्षेत्रीय सांस्कृतिक केन्द्र व वि. सा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने बालगंधर्व जन्मशताब्दी निमित्त अखिल भारतीय स्तराची एक नाटचगीत गायन-स्पर्धा झाली. या स्पर्धेच्या आमंत्रक सौ. अनुराधा जोशी या होत्या. विजेत्यांना, मराठी नाटच परिषदेचे माजी अध्यक्ष व सुप्रसिद्ध नट श्री. प्रभाकर पणशीकर यांचे हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. ■

|शा|खा|वृ|त्त|

दि. ६ ऑक्टो. : लाखनी जिल्हा भंडारा येथील वि. सा. संघाच्या शाखेचा दहावा वर्धापन दिन प्रा. डॉ. सुनंदा कत्रिमंडन यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा झाला. या प्रसंगी लाखनी केंद्रात माध्यमिक, उच्च-माध्यमिक व पदवी परीक्षात मराठी विषयात सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थी व चित्रकला स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांचा गौरव करण्यात आला. त्याचप्रमाणे प्रा. नरेश वंजारी मराठी वाङ्मय परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त एक बाल चित्रकला प्रदर्शन भरविण्यात आले होते.

सरचिटणीस

अनुक्रमणिका

YUGAVANI / L-22 Regd. News Paper / NGP/341 / ▫ युगवाणी / आक्टो.-नोव्हें.-डिसें. १९८७ / मूल्य ६ रू.

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर-४४००१२.
मुद्रक : मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर-४४००१२.
मुखपृष्ठ मुद्रण : मधुकर आर्टस, धंतोली, नागपूर-४४००१२.

अनुक्रमणिका